महाराष्ट्र राज्य साहित्य व सं

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक २७

संशोधनमुक्तावलि

[सर सहावा]

लेखक

महामहोपाध्याय **वासुदेव विष्णु मिराशी**, एम्. ए., डी. लिट्.

माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर, आणि विदर्भ महाविद्यालय, अमरावती

संस्कृत आणि प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति यांचे माजी प्राध्यापक,

नागपूर विद्यापीठ,

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे सन्मान्य सल्लागार इ.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

प्रथमावृत्ति] किंमत आठ रुपये [१९७२

महाराष्ट्र राज्य साहित्य व संकृति मंडळद्वारा पुरस्कृत

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक २७

संशोधनमुक्तावलि

[सर सहावा]

लेखक

महामहोपाध्याय **वासुदेव विष्णु मिराशी**, एम्. ए., डी. लिट्.
माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर, आणि विदर्भ महाविद्यालय, अमरावती,
संस्कृत आणि प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति यांचे माजी प्राध्यापक,
नागपूर विद्यापीठ,
भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे सन्मान्य सल्लागार इ.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

प्रथमावृत्ति] किंमत आठ रुपये [१९७२

प्रकाशक :
डॉ. मु. बा. देवपुजारी,
विदर्भ संशोधन मंडळ,
पश्चिम हायकोर्ट मार्ग,
नागपूर.

मुद्रक :
पां. ना. बनहट्टी,
नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपूर १२.

माझी पुतणी

डॉ. कुमारी शकुन्तला मिराशी

हिला

सप्रेम अर्पण

अनुक्रमणिका

संशोधनपर लेख : पृष्ठे १ ते २२१

संस्कृत व मराठी वाङ्मय

प्राचीन भारतीय इतिहास

प्राचीन इतिहासाची साधने

चित्रांची अनुक्रमणिका

पुरस्कार

महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांच्या अलीकडील संशोधनपर लेखांचा संग्रह ‘ संशोधनमुक्तावलि : सर ६ ’ या नावाने सुविद्य जनतेपुढे सादर केला जात आहे. या ‘ सरा ’त एकूण अठरा लेखांचा समावेश आहे. त्यांत संशोधनक्षेत्रातील तज्ज्ञ वर्गाला उपयुक्त व रोचक अशी सामग्री आहेच, पण सामान्य रसिक वाचकवृंदालाही आकर्षक व महत्त्वाचे वाटावे असे खालील विषयही आहेत:–

१. वाल्मीकि आणि अगस्त्य ऋषींच्या आश्रमांची स्थाने.

२. हिंदु संस्कृतीत सुप्रसिद्ध असलेल्या नैमिषारण्याचे स्थान.

३. भवभूतीच्या जीवनचरित्रात महत्त्व पावलेल्या कालप्रियनाथाचे स्थान

४. भरतमुनींच्या नाटचशास्त्रात वर्णिलेल्या रंगमंदिरातील ‘ मत्त-वारणी ’चे स्थान.

५. पहिला मराठी कोरीव लेख.

६. विदर्भातील प्राचीन नाणी.

या सर्व अठरा लेखांत डॉ. मिराशींचा उतार वयातील उत्साह जसा दिसतो तसाच त्यांच्या व्यापक, चिकित्सक, सूक्ष्म व युक्तिनिष्ठ अध्ययनाचाही उत्कर्ष प्रकट होतो.

'सर्वः स्वसंकल्पवशात् लघुर्भवति वा गुरुः।' या वचनाप्रमाणे विदर्भ संशोधन मंडळाचे आजतागायत चार दशकांसमीप आलेले गौरवास्पद कार्य डॉ. मिराशींच्याच विशुद्ध संकल्पाचे प्रतीक आहे, यात शंका नाही. कोणतीही मानवनिर्मित संस्था ही नदीसारखी असते. सर्व नद्यांचे पाणी जरी वाहून जात असले तरी ते मेघ, पर्वत इत्यादिकांकडून त्यांत पुनः भरत असते. तद्वत् डॉ. मिराशींच्या स्फूर्तिदायक संकल्पाच्या सामर्थ्याने ही 'संशोधनमुक्तावली'च्या सरांची सरिता तरुण पिढीच्या संशोधनकार्याच्या रूपाने चिरकाल अखंड वाहत राहील, अशी आशा मी व्यक्त करतो.

हनूमज्जयंती
दि. २९–३–१९७२

भवानीशंकर नियोगी
(अध्यक्ष, विदर्भ संशोधन मंडळ)

लेखकाचे हृद्‌गत

मराठी वाचकांस साहित्य व इतिहास या विषयांतील संशोधनाची माहिती व्हावी आणि त्यांच्यात त्याविषयी गोडी उत्पन्न व्हावी म्हणून मी गेली जवळ जवळ पन्नास वर्षे महत्त्वाच्या विषयांवर मराठीत संशोधनपर लेख प्रकाशित करीत आहे. पुढे हे लेख अभ्यासकांस एकत्र उपलब्ध व्हावे म्हणून ते 'संशोधनमुक्तावलि' नामक ग्रंथमालेत प्रसिद्ध करण्याचा उपक्रम विदर्भ (तेव्हाच्या मध्यप्रांत) संशोधन मंडळाने सन १९५४ मध्ये करून आतापर्यंत त्या मुक्तावलीचे पाच 'सर' प्रकाशित केले आहेत. पाचवा सर सन १९६६ मध्ये प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर गेल्या सहा वर्षांतील माझ्या मराठी संशोधनपर लेखांचा हा सहावा संग्रह आता प्रसिद्ध होत आहे.

प्रस्तुत 'सरा'त संस्कृत व मराठी साहित्य, भारतीय संस्कृति आणि प्राचीन भारतीय इतिहास या विषयांतील विविध समस्यांवर अठरा लेख अन्तर्भूत केले आहेत. यातील काही समस्या गेली पन्नास–पाउणशे वर्षे विद्वानांना चकवीत आहेत, तर इतर कांही अलीकडे उपलब्ध झालेले ग्रंथ व कोरीव लेख यांमुळे उत्पन्न झाल्या आहेत. प्रत्येक समस्येवर

पूर्वीच्या मतांचे चिकित्सक परीक्षण करून नंतर मी आपला सिद्धान्त सप्रमाण मांडला आहे.

प्रस्तुत ग्रंथाचे (१) संस्कृत व मराठी साहित्य आणि (२) प्राचीन भारतीय इतिहास असे दोन मुख्य भाग आहेत. पहिल्या भागातील आरंभीच्या लेखांत भारतीय संस्कृतीशी संबद्ध अशा दोन आश्रमांचे व एका तीर्थाचे नक्की स्थान ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. पुण्याच्या भांडारकर प्राच्य–विद्या-संशोधन मंडळाने अनेक प्रदेशांतून हस्तलिखिते जमवून 'महाभारताचे खिलपर्व म्हणून गणले गेलेल्या 'हरिवंशा'ची चिकित्सक आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध केली आहे. तिला उपोद्बलक असा कोरीव लेखांचा आणि एका प्राचीन प्राकृत ग्रंथाचा अविवाद्य पुरावा तिसऱ्या लेखात मांडला आहे. 'मेघदूता'च्या दुसऱ्या श्लोकाचा शुद्ध पाठ 'आषाढस्य प्रशमदिवसे' किंवा 'आषाढस्य प्रथमदिवसे' असा होता याची चर्चा आज हजार वर्षे त्या काव्याचे प्राचीन टीकाकार आणि आधुनिक विद्वान् करीत आहेत. ही समस्या चौथ्या लेखात सोडविली आहे. पुढील लेखात भवभूतीची नाटके ज्या कालप्रियनाथाच्या देवालयाच्या प्रांगणात प्रथम रंगभूमीवर आली तो, आतापर्यंत विद्वान् समजत असत त्याप्रमाणे, उज्जयिनीचा महाकाल नसून काल्पी येथील सूर्यदेव होता हे भवभूतीच्याच 'मालतीमाधवा'च्या प्राचीन हस्तलिखितांच्या निर्विवाद पुराव्यावरून सिद्ध केले आहे. नंतरच्या दोन लेखांत 'कुन्दमाले'चा कर्ता आणि काल याविषयी माझ्या मतावर घेतलेल्या आक्षेपांचे साधार खंडन केले आहे, आणि एका अप्रसिद्ध संस्कृत चम्पूकाव्याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. प्राचीन नाट्यगृहात 'मत्तवारणी'संज्ञक विभागाचे नक्की स्वरूप कोणते होते, याचे विवेचन आठव्या लेखात केले आहे. मराठी भाषा उत्क्रान्त होऊन प्रचारात केव्हा आली हा प्रश्न इतिहासाचार्य राजवाड्यांच्या काळापासून विवाद्य बनला होता. त्यावर कोरीव लेखांचा प्रकाश या विभागातील शेवटच्या लेखात टाकला आहे.

प्राचीन काळी भारतीयांनी इतिहास–लेखनाकडे दुर्लक्ष केल्यामुळे आपल्या देशाचा प्राचीन इतिहास वेळोवेळी उपलब्ध झालेल्या संस्कृत-प्राकृतादि भाषांतील ग्रंथ, कोरीव लेख, नाणी, प्राचीन स्थापत्य व शिल्प

इत्यादि साधनांवरून जमवावा लागतो. गेल्या दोनशे वर्षांत पाश्चात्य आणि भारतीय विद्वानांच्या अविरत प्रयत्नांनी तो आता बराचसा माहीत झाला आहे. नवीन-नवीन साधने उपलब्ध होतात तेव्हा पूर्वीच्या समस्यांवर जास्त प्रकाश पडून तद्विषयक मते बदलावी लागतात. प्रस्तुत ग्रंथाच्या दुसऱ्या भागात गुप्त, विष्णुकुंडी, राष्ट्रकूट, कलचुरि आणि शिलाहार या प्राचीन राजवटींच्या इतिहासातील कांही समस्यांवर आता उपलब्ध झालेल्या साधनांच्या साहाय्याने नवीन प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटच्या कांही लेखांत दिलेली नवीन माहिती वाचकांस उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

प्रस्तुत 'सरा'तील अनेक लेख यापूर्वी विदर्भ संशोधन मंडळाच्या 'वार्षिका'त, 'नवभारत' व 'इतिहास आणि संस्कृति' या नियतकालिकांत, तसेच कांही अभिनन्दन व स्मारक ग्रंथांत प्रसिद्ध झाले होते. त्यांचा निर्देश प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटी परिशिष्टात केला आहे. त्यांचे पुनर्मुद्रण करताना त्या सर्वांच्या प्रकाशकांचे हार्दिक आभार मानतो.

मराठी वाचकांना संशोधनात विशेष रस वाटत नसल्यामुळे मराठी संशोधनपर ग्रंथ प्रकाशित करणे हे आतबट्टयाचे काम होते. तथापि विदर्भ संशोधन मंडळ ते गेली सुमारे वीस वर्षे सातत्याने करीत असून आतापर्यंत त्याने बावीस ग्रंथ मराठीत प्रकाशित केले आहेत. याशिवाय गेली चौदा वर्षे ते आपले वार्षिक नियमितपणे प्रकाशित करीत असते. त्यांतील बहुतेक लेख मराठीत असतात. या प्रकाशनकार्याला महाराष्ट्र राज्याच्या साहित्य-संस्कृति मंडळाने वेळोवेळी उदार अनुदाने देऊन बहुमोल साहाय्य केले आहे. प्रस्तुत 'सरा'च्या प्रकाशनालाहि त्याने तसे आर्थिक साहाय्य केले आहे. तदर्थ त्या मंडळाचे आम्ही अत्यंत ऋणी आहो.

आमच्या मंडळाचे आरंभापासूनचे अध्यक्ष डॉ. भवानीशंकर नियोगी यांनी इतर अनेक 'सरां'प्रमाणे प्रस्तुत 'सरा'सही आपल्या पुरस्काराने भूषविले याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानतो.

आतापर्यंतचे माझे बहुतेक ग्रंथ संशोधनकार्यांत माझा ज्यांच्याशी संपर्क आला त्या विद्वानांना मी अर्पण केले आहेत. प्रस्तुत सर मात्र मी

माझ्या नात्यातील एक व्यक्तीला अर्पण करीत आहे. माझ्या आदरणीय वडील बंधूंची कन्या डॉ. कुमारी शकुंतला हिने अत्यंत स्वार्थत्यागाने आपल्या कुटुंबाची सर्व जबाबदारी उचलली, पुंडलिकाच्या निष्ठेने माता-पित्यांची सेवा केली, सर्व भावंडांना उच्च शिक्षणाचा व बंधूंना तर परदेशच्या शिक्षणाचाही लाभ करून दिला आणि आपले निवासस्थान सोलापुर येथे अनेक सामाजिक संस्थांत निरपेक्षपणे काम करून इतरांस समाजसेवेचा आदर्श घालून दिला. या तिच्या बहुविध गुणांबद्दल व कार्याबद्दल मला वाटत असलेले कौतुक, आदर व प्रेम मी प्रस्तुत 'सर' तिला अर्पण करून व्यक्त करीत आहे.

शेवटी, नारायण मुद्रणालयाचे मालक श्री. पांडुरंगराव बनहट्टी यांनी मंडळावरच्या स्नेहाने प्रस्तुत ग्रंथ अल्पावधीत सुबक रीतीने मुद्रित करून दिला याबद्दल त्यांचेही हार्दिक आभार मानतो.

रामनवमी,
दि. १६ मार्च १९७२.

वा. वि. मिराशी

संशोधनमुक्तावलि

सर सहावा

१. वाल्मीकि आणि अगस्त्य यांच्या आश्रमांच्या स्थानांचा शोध

वाल्मीकि आणि अगस्त्य यांच्या आश्रमांचे उल्लेख ‘वाल्मीकि-रामायणा’त आणि प्राचीन संस्कृत वाङ्मयात अनेक ठिकाणी आले आहेत. परंतु त्यांची स्थाने निश्चित नाहीत. उपलब्ध पुराव्यावरून ती निश्चित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे.

‘रामायणा’त म्हटले आहे की वाल्मीकि ऋषीचा आश्रम तमसा नदीच्या तीरी होता. बालकांडात वर्णन आहे की एकदा देवर्षि नारद यांना वाल्मीकि ऋषींनी विचारले की, ‘पृथ्वीवर सध्या श्रेष्ठ पुरुष कोण आहे?’ तेव्हा नारदांनी अयोध्येच्या सिंहासनावर नुकत्याच आलेल्या रामाचे वर्णन केले. नारद निघून गेल्यावर वाल्मीकि ऋषि गंगातीरापासून दूर नसलेल्या तमसा नदीवर स्नानाकरिता गेले.

स मुहूर्तं गते तस्मिन् देवलोकं मुनिस्तदा ।
जगाम तमसातीरं जाह्नव्यास्त्वविदूरतः ।।[१]

तितक्यात एका व्याधाने क्रौञ्च पक्षाच्या जोडप्यातून एकाला बाणाने ठार केल्याचे त्यांनी पाहिले. तेव्हा त्यांनी 'मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः । यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधीः काममोहितम् ।।' (हे निषादा, तुला चिरकाल प्रतिष्ठा प्राप्त न होवो, कारण तू काममोहित अशा क्रौञ्च पक्ष्यांच्या जोडप्यातून एकाला ठार केले आहेस) अशा नूतन अनुष्टुभ् छंदातील श्लोकाने त्याला शाप दिला, अशी कथा 'रामायणा'च्या बालकांडात आली आहे. तिजवरून वाल्मीकीचा आश्रम तमसा नदीच्या तीरावर होता आणि तेथून जवळच गंगानदी वाहत होती असे दिसते.

यानंतर वाल्मीकीच्या आश्रमाचा दुसरा उल्लेख 'रामायणा'च्या उत्तरकांडात आला आहे. रावणवधानंतर अयोध्येला आल्यावर रामाला राज्याभिषेक झाला. नंतर पौरजनांतील अपवादावरून रामाने सीतेचा त्याग करण्याचा निश्चय केला. त्याने लक्ष्मणाला बोलावून सीतेला रथातून नेऊन गंगेच्या पलीकडे तमसेच्या काठी असलेल्या वाल्मीकीच्या आश्रमाजवळ सोडण्याची आज्ञा केली—

श्वस्त्वं प्रभाते सौमित्रे सुमन्त्राधिष्ठितं रथम् ।
आरुह्य सीतामारोप्य विषयान्ते समुत्सृज ।।
गङ्गायास्तु परे पारे वाल्मीकेस्तु महात्मनः ।
आश्रमो दिव्यसंकाशस्तमसातीरमाश्रितः ।।
तत्रैतां विजने देशे विसृज्य रघुनन्दन ।
शीघ्रमागच्छ सौमित्रे कुरुष्व वचनं मम ।।[२]

रामाज्ञेप्रमाणे लक्ष्मण सीतेला घेऊन गंगातीरी गेला. पण ती नदी पार करण्यापूर्वी तो मोठ्याने आक्रोश करू लागला. सीतेला रामाच्या योजनेची काहीच माहिती नव्हती. म्हणून तिने त्याला त्याच्या दुःखाचे

---

१. वाल्मीकि–रामायण (निर्णयसागर प्रेस), बालकाण्ड, २, ३.
२. पूर्वोक्त, उत्तरकाण्ड, ४५, १६–१९.

कारण विचारले. ती म्हणाली, 'नेहमी तुम्ही रामाच्या जवळ असता. गेल्या **दोन रात्री** त्यांचा वियोग झाल्यामुळे तुम्हाला इतके वाईट वाटते काय ?'

अथार्धदिवसे गत्वा भागीरथ्या जलाशयम् ।
निरीक्ष्य लक्ष्मणो दीनः प्ररुरोद महास्वनः ।।
सीता तु परमायत्ता दृष्ट्वा लक्ष्मणमातुरम् ।
उवाच वाक्यं धर्मज्ञा किमिदं रुद्यते त्वया ।।
जाह्नवीतीरमासाद्य चिराभिलषितं मम ।
हर्षकाले किमर्थं मां विषादयसि लक्ष्मण ।।
नित्यं त्वं रामपार्श्वेषु वर्तसे पुरुषर्षभ ।
कच्चिद्विनाकृतस्तेन द्विरात्रं शोकमागतः ।।

नंतर लक्ष्मणाने आपले अश्रु पुसून सीतेला नावेतून गंगापार नेले.

तस्यास्तद्वचनं श्रुत्वा प्रमृज्य नयने शुभे ।
नाविकानाह्वयामास लक्ष्मणः परवीरहा ।।
इयं च सज्जा नौश्चेति दाशाः प्राञ्जलयोऽब्रुवन् ।
तितीर्षुर्लक्ष्मणो गङ्गां शुभां नावमुपाहरत् ।
गङ्गां संतारयामास लक्ष्मणस्तां समाहितः ।।[३]

गंगेच्या पैलतीरावर गेल्यावर लक्ष्मणाने सीतेला सांगितले की 'पौर-जनांच्या अपवादांना भिऊन रामाने मला जाह्नवीतीरावरील आश्रमाजवळ निर्दोष अशा तुला सोडण्याविषयी सांगितले आहे. हे ते गंगातीर. आमचे पिता राजा दशरथ यांचा परममित्र वाल्मीकि यांच्या आश्रयास जाऊन तू उपवास करीत एकाग्र चित्ताने रहा.'

सा त्वं त्यक्ता नृपतिना निर्दोषा मम संनिधौ ।
पौरापवादभीतेन ग्राह्यं देवि न तेऽन्यथा ।।
आश्रमान्तेषु च मया त्यक्तव्या त्वं भविष्यसि ।
राज्ञः शासनमादाय तथैव किल दौर्हृदम् ।।

---

३. वाल्मीकि–रामायण, उत्तरकाण्ड, ४६, २४–२७; ३२, ३३.

तदेतज्जाह्नवीतीरे ब्रह्मर्षीणां तपोवनम् ।
पुण्यं च रमणीयं च विषादं मा कृथाः शुभे ॥
राज्ञो दशरथस्यैव पितुर्मे मुनिपुङ्गवः ।
सखा परमको विप्रो वाल्मीकिः सुमहायशाः ॥
पादच्छायामुपागम्य सुखमस्य महात्मनः ।
उपवासपरैकाग्रा वस त्वं जनकात्मजे ॥[४]

लक्ष्मण गेल्यानंतर सीता ओक्साबोक्शी रडूं लागली. आश्रमातील शिष्यांकडून ते कळताच वाल्मीकि ऋषि तेथे आले आणि तिला आपल्या आश्रमात घेऊन गेले.

'वाल्मीकिरामायणा'वरून इतकीच माहिती आपणांस मिळते. मागे उद्धृत केलेल्या उताऱ्यांवरून असे दिसते की—

(१) वाल्मीकीचा आश्रम तमसातीरी होता.

(२) त्या आश्रमापासून जवळच गंगानदी वाहत होती.

(३) तो आश्रम गंगेच्या दक्षिण तीरापासून जवळ होता. कारण त्याच्या सन्निध जाण्यास लक्ष्मण आणि सीता यांना गंगानदी पार करावी लागली.

(४) तो आश्रम अयोध्येपासून फार दूर नव्हता. कारण तेथे रथातून जाण्यास लक्ष्मण व सीता यांना दोन–अडीच दिवस लागले होते.

आता या वर्णनावरून वाल्मीकीच्या आश्रमाचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करू.

त्या आश्रमाच्या स्थानाविषयी प्रचलित समजूत ही आहे की तो उत्तरप्रदेशात कानपूरपासून चौदा मैलांवर असलेल्या बिठूर येथे होता.

---

४. वाल्मीकिरामायण, उत्तरकांड, ४७, १३–१७.

नंदलाल दे हे 'आपल्या प्राचीन आणि मध्ययुगीन भौगोलिक कोशा'त त्या आश्रमाविषयी पुढील माहिती देतात—[५]

'कानपूरहून १४ मैलांवर बिठूर येथे वाल्मीकीचा आश्रम होता. या ठिकाणी रामपत्नी सीता परित्यागानंतर राहत होती. तिला कुश व लव असे दोन पुत्र झाले. वाल्मीकीचे देवालय गंगातीरी आहे, लक्ष्मण सीतेला घेऊन सीताघाट येथे गंगा पार करता झाला. बिठूर येथे ब्रह्मावर्त घाटाजवळील देवालयात एक हिरव्या रंगाचे बाणाचे टोक दाखवितात. त्याच्या विषयी आख्यायिका आहे की ते टोक अश्वमेधाच्या घोड्याकरिता येथे झालेल्या युद्धात लवाने रामाला मारलेल्या बाणाचे आहे. हे टोक काही वर्षांपूर्वी आश्रमाच्या समोर गंगेच्या पात्रात सापडले होते.'

अनेक प्राचीन दंतकथांप्रमाणे लवाच्या बाणाग्राची ही दंतकथा बिनबुडाची आहे. लवाचे वाल्मीकीच्या आश्रमाजवळ अश्वमेधाच्या घोड्याकरिता युद्ध झाल्याचे वर्णन 'रामायणा'त नाही. भवभूतीने वाल्मीकि-आश्रमाजवळ लवाचे लक्ष्मणपुत्र चन्द्रकेतुशी (रामाशी नव्हे) युद्ध झाल्याचे वर्णिले आहे खरे, पण ती केवळ कविकल्पना आहे. त्याला 'रामायणा'चा आधार नाही. इंपीरियल गॅझेटीयर मध्ये म्हटले आहे की बिठूर येथे प्रागैतिहासिक कालातील तांब्याचे बाणाग्र व कुऱ्हाडी सापडल्या होत्या.[६] त्यावरून ही दंतकथा पसरलेली दिसते.

बिठूर हे गंगेच्या काठी आहे खरे, पण त्याच्याजवळ 'रामायणा'त वर्णिल्याप्रमाणे तमसा नदी वाहत नाही. शिवाय अयोध्येहून तेथे रथाने दोन-अडीच दिवसांत पोचणे शक्य होणार नाही. त्यामुळे तेथे वाल्मीकीचा आश्रम असणे संभवनीय नाही.

---

५. Nunda Lal Dey, *The Geographical Dictionary of Ancient and Mediaeval India*, p. 20. विमलचरण लाहाही हा आश्रम बिठूर येथे होता असे एके ठिकाणी म्हणतात, तर इतरत्र तो पूर्व तमसेच्या किंवा दक्षिण तमसेच्या काठी होता असेही सांगतात. *Historical Geography of Ancient India*, pp. 133–34.

६. *Imperial Gazetteer*, VIII, p. 251.

वाल्मीकीच्या आश्रमाचे स्थान निश्चित करण्याकरिता तो ज्या तमसा नदीच्या काठी होता ती अगोदर निश्चित केली पाहिजे. उत्तर-भारतात तमसा नावाच्या तीन नद्या—उत्तर तमसा, पूर्व तमसा आणि दक्षिण तमसा अशा—आहेत. त्यांपैकी उत्तर तमसा ही जम्नोत्री पर्वतात यमुनेच्या उगमाच्या थोडे उत्तरेस उगम पावून पूर्वीचे टेहरी संस्थान आणि डेहराडून यांतून वाहत यमुनेला मिळते. ही नदी गंगेला मिळत नसल्यामुळे ती रामायणातील अगस्त्याश्रमाजवळची तमसा असणे शक्य नाही. पूर्वतमसा ही फैजाबादच्या पश्चिमेस उगम पावून घोगरा आणि गोमती या दोन नद्यांमधून उत्तरप्रदेशातून बलिया नगराच्या पश्चिमेस दोन मैलांवर गंगेला उत्तरेकडून मिळते. अयोध्येपासून १४ मैलांवर वाहत असल्यामुळे वनवासात जाताना रामाला ती प्रथम लागली. रामाबरोबर पुष्कळ ब्राह्मण जात होते. ते तमसेच्या काठाहून परत फिरले असे 'रामायणा'त म्हटले आहे.[७]

एवं विक्रोशतां तेषां द्विजातीनां निवर्तने ।
ददृशे तमसा तत्र वारयन्तीव राघवम् ।।

रामाने प्रथम तमसा, नंतर गोमती व स्यन्दिका, आणि शेवटी गंगा पार केली असे 'रामायणा'त वर्णन आहे.[८]

तत्र त्रिपथगां दिव्यां शीततोयामशैवलाम् ।
ददृशे राघवो गङ्गां रम्यामृषिनिषेविताम् ।।

तेव्हा ही तमसा शरयू आणि गोमती यांच्या मध्ये वाहत होती यात संशय नाही. ही अयोध्येपासून फार दूर नसल्याने दशरथाने तिच्या काठी अनेक यज्ञ केले असे कालिदासाने वर्णिले आहे—[९]

क्रतुषु तेन विसर्जितमौलिना भुजसमाहृतदिग्वसुना कृताः ।
कनकयूपसमुच्छ्रयशोभिनो वितमसा तमसासरयूतटाः ।।

---

७. रामायण, अयोध्याकाण्ड, ४५, ३२.

८. अयोध्याकाण्ड, ५०, १२.

९. रघुवंश ९, २०. हिचे अंतर शरयूपासून फक्त १४ मैल होते.

हिच्या काठच्या अरण्यात मृगयेला गेलेल्या दशरथाने पहाटे श्रावण नामक तापसकुमाराला हत्ती समजून लक्ष्यवेधी बाण मारून ठार केल्याची कथा 'रामायणा'त व 'रघुवंशा'त आली आहे.

वाल्मीकीचा आश्रम जिच्या काठी होता ती ही तमसा होय, असे काहींचे मत आहे,[१०] पण ते बरोबर नाही. कारण ही नदी गंगेला मिळत असली तरी ती उत्तरेकडून तिला मिळते. तिच्या काठच्या आश्रमास जाण्याकरिता गंगा नदी पार करण्याची आवश्यकता नाही. शिवाय, ही नदी अयोध्येपासून जवळच एक दिवसाच्या प्रवासानंतर लागणारी अशी आहे. तेथे रामाने सीतेला सोडण्याविषयी सांगितले असणे शक्य नाही.

पण तिसऱ्या दक्षिण तमसेला मात्र 'रामायणाती'ल वर्णन पूर्णपणे लागू पडते. ही तमसा नागोदच्या दक्षिणेस पूर्वीच्या महियार संस्थानात उगम पावून रेवा जिल्ह्याच्या उत्तर भागातून वाहत अलाहाबाद (प्रयाग)च्या आग्नेयेस १८ मैलांवर दक्षिणेकडून गंगेला मिळते. उच्चकल्प-वंशी महाराज शर्वनाथ याच्या गुप्तसंवत् १९३ (ई. स. ५१२–१३)च्या ताम्रपटात ह्या नदीच्या उत्तर तीरावरील आश्रमक नामक गाव दान दिल्याचा निर्देश आहे.[११]

ह्या तमसेच्या काठी वाल्मीकीचा आश्रम असावा. त्याचे नक्की ठिकाण या नदीचा गंगेशी संगम होतो त्याच्या जवळ असावे. म्हणून लक्ष्मणाने सीतेसह गंगा पार करून तिला सांगितले की येथून जवळच वाल्मीकीचा आश्रम आहे, तेथे तू संन्यस्तवृत्तीने रहा. भवभूतीच्या 'उत्तर-रामचरिता'तील शेवटच्या अंकात वाल्मीकिआश्रमात गर्भनाटकाचा प्रवेश घातला आहे. त्या नाटकाकरिता घातलेला मंडप गंगातीरी होता

---

१०. Pargiter, *J. R. A. S.* 1894, p. 235. P. V. Kane, *History of Dharmaśāstra*, Vol. IV, p. 812. डॉ. काणे यांनी पूर्व आणि दक्षिण तमसा नद्यांचा घोटाळा केला आहे.

११. Fleet, *Gupta Inscriptions* (*C. I. I.*, Vol. III) p. 127.

असे त्याने दाखविले आहे.[१२] गर्भनाटक संपल्यावर गंगा नदीच्या पाण्यात भयंकर खळबळ होऊन त्यातून गंगादेवी आणि पृथ्वीदेवी सीतेसह वर येतात, असे भवभूतीने वर्णन केले आहे. त्यावरूनही वाल्मीकीचा आश्रम गंगा व तमसा या दोन्ही नद्यांपासून जवळ होता. किंबहुना, तो ह्या दोन्ही नद्यांच्या संगमाजवळ प्रयागाच्या आग्नेयेस सुमारे १८ मैलांवर होता, असे सिद्ध होते.

पण वाल्मीकि–आश्रमाच्या या स्थानावर एक आक्षेप संभवतो. त्याचेही परीक्षण केले पाहिजे. अयोध्याकांडाच्या ५६ व्या सर्गात वनवासात जाताना रामादिकांना चित्रकूट पर्वताजवळच्या आश्रमात वाल्मीकि ऋषि भेटले असे वर्णन आले आहे.

राम लक्ष्मण व सीता यांसह यमुना नदी पार करून एक कोस गेल्यावर तेथे त्यांनी एक रात्र घालविली. प्रातःकाली उठून त्यांनी चित्रकूटाकडे प्रयाण केले.

तत उत्थाय ते सर्वे स्पृष्ट्वा नद्याः शिवं जलम् ।
पन्थानमृषिभिर्जुष्टं चित्रकूटस्य तं ययुः ॥
ततः संप्रस्थितः काले रामः सौमित्रिणा सह ।
सीतां कमलपत्राक्षीमिदं वचनमब्रवीत् ॥

* *

मातङ्गयूथानुसृतं पक्षिसंघानुनादितम् ।
चित्रकूटमिमं पश्य प्रवृद्धशिखरं गिरिम् ॥
मनोज्ञोऽयं गिरिः सौम्य नानाद्रुमलतायुतः ।
बहुमूलफलो रम्यः स्वाजीवः प्रतिभाति मे ॥

---

१२. लक्ष्मणः—आदिष्टश्चाहमार्येण—'वत्स लक्ष्मण, भगवता वाल्मीकिना स्वकृतिमप्सरोभिः प्रयुज्यमानां द्रष्टुमुपनिमन्त्रिताः स्मः । तद्गङ्गातीरमातोद्यस्थानमुपगम्य क्रियतां समाजसंनिवेशः' इति । 'उत्तररामचरित', ७.

मुनयश्च महात्मानो वसन्त्यस्मिञ्शिलोच्चये ।
अयं वासो भवेत्तात वयमत्र वसेमहि ।।

*   *

इति सीता च रामश्च लक्ष्मणश्च कृताञ्जलिः ।
अभिगम्याश्रमं सर्वे वाल्मीकिमभ्यवादयन् ।।
तान् महर्षिः प्रमुदितः पूजयामास धर्मवित् ।
आस्यतामिति चोवाच स्वागतं तं निवेद्य च ।।
ततोऽब्रवीन्महाबाहुर्लक्ष्मणं लक्ष्मणाग्रजः ।
संनिवेद्य यथान्यायमात्मानमृषये प्रभुः ।।

या श्लोकांत वाल्मीकि ऋषीचा आश्रम चित्रकूट पर्वतावर होता आणि तेथे त्या ऋषींनी रामादिकांचे स्वागत केले असे वर्णन आले आहे. चित्रकूट पर्वत गंगातमसासंगमाच्या पश्चिमेस कित्येक मैलांवर आहे. तेव्हा वाल्मीकी ऋषींच्या आश्रमाच्या या दोन स्थानांचा मेळ कसा घालावयाचा, ही अडचण उपस्थित होते.

या अडचणीचे निराकरण करणे कठीण नाही. बडोद्याच्या ओरिएंटल इन्स्टिटय़ूटने अलीकडे उत्तर व दक्षिण भारतांतून अनेक हस्तलिखिते जमवून रामायणाची चिकित्सक आवृत्ती प्रसिद्ध केली आहे. त्या आवृत्तीत वर उद्धृत केलेले 'मनोज्ञोऽयं गिरिः सौम्य–' इत्यादिपासून 'संनिवेद्य यथान्यायमात्मानमृषये प्रभुः' पर्यंत सर्व श्लोक गाळले आहेत. त्या अयोध्याकांडाचे संपादक डॉ. प. ल. वैद्य या श्लोकांवरच्या आपल्या चिकित्सक टिप्पणीत म्हणतात — **"This passage is found only in the Southern Recension. The referene to Vālmīki therein is certainly absurd."**[13]

(हे श्लोक रामायणाच्या दक्षिणभारतीय पाठातच आढळतात. त्यातील वाल्मीकीचा उल्लेख मूर्खपणाचा आहे).

---

१३. रामायण (निर्णयसागर प्रत), अयोध्याकांड, ५६, ४, ५, १०, १४, १७.

तेव्हा गंगा–तमसा–संगमाजवळ वाल्मीकीचा आश्रम होता हा आमचा सिद्धांत निरपवाद आहे.

अगस्त्याश्रम — आता आपण दक्षिणापथातील अगस्त्याश्रमाचे स्थान निश्चित करू. अगस्त्याचे उत्तर व दक्षिण भारतात अनेक आश्रम होते. एक आश्रम उत्तर भारतात गयेजवळ होता. त्याचे वर्णन 'महाभारता'च्या आरण्यकपर्वात आले आहे.[१४] एकदा मेरु पर्वताच्या असूयेने विन्ध्यपर्वत खूप उंच होऊन सूर्यादिकांचा आकाशातील मार्ग रोखू लागला. तेव्हा देवांच्या विनंतीवरून अगस्त्य ऋषी दक्षिणेत येण्यास निघाले. ते विन्ध्य पर्वताजवळ येताच तो त्यांच्या पुढे नम्र झाला. तेव्हा त्यांनी त्याला म्हटले, "मी दक्षिणेत जात आहे. मी परत येईपर्यंत असाच राहा." ते नंतर दक्षिणेतून परत आलेच नाहीत. त्यामुळे विन्ध्य पर्वत तसाच अद्यापि राहिला आहे. ही कथा 'महाभारता'त आली आहे.[१५] हिचे तात्पर्य असे की अगस्त्य हा आर्यांची दक्षिण भारतात वसाहत करणारा पहिला पुढारी. त्याच्या नंतर अनेक ऋषी दक्षिणेत येऊन त्यांनी गोदावरीच्या तीरी आश्रम स्थापले आणि आर्यसंस्कृतीचा दक्षिणेत प्रसार केला. त्यांच्या आश्रमांच्या सभोवार दंडकारण्य पसरले होते. पण त्यांच्या आश्रमामुळे तेथील प्रदेशात लोकांची वसती वाढून त्याला जनस्थान असे नाव प्राप्त झाले. नंतर दक्षिणेत अनेक राज्ये स्थापन झाली. अगस्त्याने विदर्भ देशाची राजकन्या लोपामुद्रा हिच्याशी विवाह केला. तिची कथा 'महाभारता'च्या आरण्यकपर्वात आली आहे.[१६]

नंतर अगस्त्य ऋषी दूर दक्षिणेत गेले. पूर्वीच्या त्रावणकोर संस्थानात अगस्त्यकूट किंवा अगस्त्यमलै नावाची टेकडी आहे. तेथे अगस्त्यांचा आश्रम होता अशी परंपरागत समजूत आहे. तेथे अगस्त्य ऋषि अद्यापि योगनिद्रेत आहेत असे म्हणतात. याशिवाय दक्षिणेत पांड्य देशात समुद्रतीरी व इतरत्रही अगस्त्याश्रम होते अशा दंतकथा आहेत. पण दक्षिणेतील

---

१४. आरण्यक पर्व (भांडारकर इन्स्टिटयूट आवृत्ती), ९४, १.
१५. पूर्वोक्त, १०२, १–१३.
१६. पूर्वोक्त, ९४, १६–२७; ९५, १–७.

या सर्व आश्रमांत दंडकारण्यातील गोदावरीजवळचा अगस्त्याश्रम फार प्राचीन असून त्याचा 'वाल्मीकिरामायणा'त तसेच 'रघुवंश', 'उत्तररामचरित' इत्यादि प्राचीन संस्कृत ग्रंथांत उल्लेख आहे. त्याचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

'रामायणा'तील वर्णनावरून असे समजते की अगस्त्याचा आश्रम विन्ध्य पर्वताच्या दक्षिणेस होता. आपल्या वनवासाची दहा वर्षे दंडकारण्यातील अनेक ऋषींच्या आश्रमांत राहून राम पुनः सुतीक्ष्णाच्या आश्रमात परत आला आणि त्यांना म्हणाला, 'या अरण्यात अगस्त्य ऋषींचा आश्रम आहे असे ऐकतो. त्यांना वंदन करण्याची माझी इच्छा आहे. त्यांच्या आश्रमाचा मार्ग मला सांगा.' तेव्हा सुतीक्ष्ण ऋषी म्हणाले, 'येथून दक्षिणेस चार योजनांवर अगस्त्याच्या भावाचा आश्रम आहे. तेथे तुम्ही जाऊन एक रात्र राहावे आणि नंतर तेथून दक्षिणेस एक योजन अंतरावर असलेल्या अगस्त्याश्रमास जावे.'[१७] त्याप्रमाणे लक्ष्मण व सीता यांसह राम अगस्त्याश्रमास गेला. तेथे अगस्त्यांना भेटून वंदन केल्यावर राम त्यांना म्हणाला, 'भगवन्, ज्या ठिकाणी विपुल जल आहे आणि सभोवार अरण्य आहे असा प्रदेश मला सांगा. त्या ठिकाणी आश्रम करून सुखाने राहण्याची माझी इच्छा आहे.' तेव्हा अगस्त्य ऋषी म्हणाले —[१८]

इतो द्वियोजने तात बहुमूलफलोदकः ।
देशो बहुमृगः श्रीमान् पञ्चवट्यभिविश्रुतः ॥
तत्र गत्वाश्रमपदं कृत्वा सौमित्रिणा सह ।
रमस्व त्वं पितुर्वाक्यं यथोक्तमनुपालयन् ॥

(येथून दोन योजनांवर विपुल कंदमुळे, फळे व जलाशय असलेला आणि हरिणांनी भरलेला असा रमणीय पञ्चवटी नामक प्रख्यात प्रदेश आहे. तेथे आश्रम करून लक्ष्मणासह तू पित्राज्ञेचे पालन करीत सुखाने राहावे).

---

१७. रामायण, अरण्यकाण्ड, ११, ३७–४१.

१८. पूर्वोक्त, अरण्यकाण्ड, १३, १३–१४.

नंतर त्यांनी त्याचा मार्गही रामाला सांगितला. ते म्हणाले, 'हे समोर मधूक वृक्षांचे वन दिसते आहे ना ? त्याच्या उत्तरेने वटवृक्षाजवळून तुम्ही जावे. नंतर तुम्हाला पर्वताच्या पायथ्यापासून फार दूर नसलेला गोदावरी नदीजवळ सदोदित फुलाफळांनी युक्त असा पंचवटी प्रदेश लागेल.'[१९]

'रामायणा'त सुतीक्ष्णाच्या आश्रमापासून अगस्त्याश्रमाचे व तेथून पंचवटीचे अंतर सांगितले आहे. पण सुतीक्ष्णाच्या आश्रमाचेच नक्की ठिकाण सांगितले नसल्यामुळे 'रामायणा'तील वर्णनावरून अगस्त्याश्रमाचे स्थान निश्चित करता येत नाही. पण येथे भवभूतीच्या 'उत्तररामचरिता'ची आपणांस मदत होते. भवभूति हा विदर्भातील कवी. त्याला दक्षिणेतील गोदावरीकाठच्या स्थलांची चांगली माहिती असली पाहिजे. त्याने 'उत्तररामचरिता'त अगस्त्याश्रम व पंचवटी यांविषयी बरीच माहिती दिली आहे. तिजकडे आता वळू.

'उत्तररामचरिता'च्या तिसऱ्या अंकाच्या आरंभी भवभूतीने मुरला आणि तमसा या दोन नदीदेवतांचा प्रवेश घातला आहे. संस्कृत नाट्यवाङ्मयात नदीदेवतांना रंगभूमीवर आणणारा पहिला नाटककार भवभूति हाच होय.[२०] त्याच्या पूर्वीच्या कालिदासाने आपल्या 'शाकुन्तला'त वनदेवतांनी झाडांच्या खोडातून मनगटापर्यंतचे आपले कोमल हात बाहेर काढून कण्वशिष्यांना शकुन्तलेसाठी अलंकार दिल्याचे वर्णन घातले होते, पण त्याने त्या वनदेवतांना रंगभूमीवर आणले नव्हते. भवभूतीने मात्र 'उत्तररामचरिता'च्या दुसऱ्या अंकात वासंती या दंडकारणातील वनदेवतेचा प्रवेश घातला आहे, आणि तिसऱ्या अंकाच्या आरंभीच्या विष्कंभकात तमसा आणि मुरला या नदीदेवतांच्या संभाषणात त्याने रामाने केलेल्या सीतात्यागानंतर घडलेल्या घटनांची माहिती दिली आहे. तमसा ही उत्तर भारतातील वाल्मीकि–आश्रमाजवळ गंगेला

१९. 'रामायण', अरण्यकाण्ड, १३, १८–२२.

२०. जयदेवाने 'प्रसन्नराघव' नाटकाच्या पाचव्या अंकात गंगा, यमुना, सरयू, गोदावरी आणि सागर यांचा असाच प्रवेश घातला आहे.

मिळणारी नदी. तिला गंगेने काही निमित्ताने गोदावरीला भेटण्यासाठी दंडकारण्यात येताना आपणाबरोबर आणली आहे, अशी कल्पना भवभूतीने केली आहे. सिंहस्थात गंगा गोदावरीला भेटण्यास येते ही सध्याची समजूत भवभूतिकालीही प्रचलित असावी. तिजवरून ही कल्पना भवभूतीला सुचलेली दिसते. तमसा ही वाल्मीकि–आश्रमाजवळ वाहणारी नदी. म्हणून तिला त्या आश्रमात घडलेल्या घटना माहीत आहेत. तसेच ती गंगेला मिळणारी नदी असल्याने गंगेला अयोध्येजवळ वाहणाऱ्या सरयू नदीकडून अयोध्येतील घटना कळल्या होत्या त्याही तिला माहीत आहेत आणि त्यांचा उल्लेख मुरलेशी झालेल्या तिच्या संभाषणात आला आहे.

गंगेला सरयूकडून कळते की धर्माच्या विरुद्ध तपश्चर्या करणाऱ्या शूद्रमुनि शम्बूकाला शासन करण्याकरिता राम दण्डकारण्यात जाणार आहे. त्या प्रसंगी त्याने पूर्वी जनस्थानातील ज्या ठिकाणी सीतेसह सुखाने कालक्रमणा केली त्या ठिकाणांना तो भेट देईल आणि त्यांच्या दर्शनाने पूर्वस्मृति जागृत होऊन त्याला पुनः पुनः दुःखोद्रेकाने मूर्च्छा येईल अशी शंका आल्यामुळे गंगेने आपणाबरोबर रामाला आपल्या स्पर्शाने सावध करू शकणाऱ्या सीतेला आणि पातालात तिची जिवलग मैत्रीण झालेल्या तमसेलाही आणले आहे. दंडकारण्यात गोदावरीला भेटण्याकरिता येण्यात गंगेचा हा हेतु आहे, असे या विष्कंभकावरून आपणांस कळते. 'तू अशी गडबडीने कोठे चाललीस ?' असे तमसा मुरलेला विचारते. तेव्हा ती सांगते की 'मीही त्याच कामाकरिता जात आहे.' मुरला ही अगस्त्याश्रमाजवळ वाहणारी नदी. रामाने शिरच्छेद केल्यावर शम्बूकाला दिव्य रूप प्राप्त झाले. तेव्हा तो स्वर्गात जाण्यापूर्वी अगस्त्य ऋषींना वंदन करण्याकरिता त्यांच्या आश्रमात येतो. त्याच्यामार्फत अगस्त्य ऋषी रामाला संदेश पाठवितात की 'आश्रमातील ऋषी तुला भेटण्यास उत्सुक आहेत. लोपामुद्रेनेही तुझ्या स्वागताची सिद्धता केली आहे. तेव्हा अयोध्येस परत जाण्यापूर्वी तू आश्रमास भेट द्यावी.' तेव्हा राम अगस्त्यांना भेटण्याकरिता त्यांच्या आश्रमी येतो. त्याचे कृश शरीर व म्लान मुख पाहताच लोपामुद्रेला धक्का बसतो. तो लौकरच पंचवटीला भेट देईल आणि तेथील पूर्वपरिचित स्थले पाहताना

त्याचे दुःख अनावर होऊन त्याला वरचेवर मूर्च्छा येईल, अशी भीती वाटून लोपामुद्रा आपल्या आश्रमाजवळ वाहणाऱ्या तमसा नदीच्या अधिष्ठात्री देवतेमार्फत गोदावरीला निरोप पाठविते की 'रामाला मूर्च्छा आल्यास तू आपल्या प्रवाहावरच्या शीतल आणि सुगंधित वायुलहरींनी त्याला सावध करावे.' असा तमसा आणि मुरला या नदीदेवतांचा प्रवेश भवभूतीने 'उत्तररामचरिता'च्या तिसऱ्या अंकाच्या आरंभी घातला आहे.

या प्रवेशावरून स्पष्ट होते की जसा वाल्मीकीचा आश्रम तमसातीरी होता तसा अगस्त्याचा आश्रम दंडकारण्यात मुरलातीरी होता आणि मुरला ही गोदावरीला मिळणारी नदी होती. ही माहिती अगस्त्याश्रमाचे स्थान ठरविण्यास अत्यंत महत्त्वाची आहे.

मुरला ही नदी सुप्रसिद्ध नाही. 'अमरकोशा'त तिचा उल्लेख नाही. 'अमरकोशा'चे परिशिष्ट म्हणून रचलेल्या 'त्रिकाण्डशेषा'त

'रेवा तु नर्मदा प्रोक्ता मुरला तु मरुन्दला ।'

अशी पंक्ती आली आहे आणि तिजवरून एका टीकाकाराने मुरला हे नर्मदेचे एक नाव आहे असे म्हटले आहे.[२१] पण ते चूक आहे. 'मुरला तु मरुन्दला' या भागातील 'तु' हे अव्यय दाखविते की त्याचा त्यापूर्वीच्या भागाशी काही संबंध नाही. 'त्वन्ताथादि न पूर्वभाक्' ही अमरकोशाची परिभाषा पहा. मुरला आणि मरुन्दला ही दोन्ही एकाच नदीची नावे होती, पण ती दोन्ही सारखीच अप्रसिद्ध असल्यामुळे आपणांस त्या नदीचे नक्की स्थान माहीत नाही. कालिदासाने 'रघुवंशा'त (४, ५५) एका मुरला नदीचा उल्लेख केला आहे,[२२] पण ती नदी केरळातील आहे. तिचा निर्देश दंडकारण्यातील आश्रमाजवळ येणे शक्य नाही.

---

२१. भिक्षु शीलस्कन्ध यांची 'त्रिकाण्डशेषा'वरील टीका पाहा — 'रेवा, पूर्वगङ्गा, मुरला, मरुन्दला इति चत्वारि नर्मदाया नद्याः ।'

२२. मुरलामारुतोद्धूतमगमत्कैतकं रजः । तद्योधवारबाणानामयत्नपटवासताम् ।। रघुवंश, ४, ५५.

मुरला ही गोदावरीला मिळणारी नदी होती, असे 'उत्तररामचरिता'वरून स्पष्ट दिसते. पण अशा नदीचा शोध आतापर्यंत लागला नव्हता. डॉ. बेलवलकरांनी आपल्या 'उत्तररामचरिता'च्या मराठी भाषांतरात ती पंचवटीजवळची नदी असावी असे अनुमान केले आहे. पण नाशिकजवळच्या पंचवटीच्या परिसरात त्या नावाची नदी नाही. शिवाय 'उत्तररामचरिता'तील वर्णनावरून ती पंचवटीजवळ वाहत नसून पंचवटीपासून काही योजने दूर असलेल्या अगस्त्याश्रमाजवळ वाहत होती, हे मागे दाखविले आहे.

अहमदनगर जिल्ह्याचा विस्तृत नकाशा पाहिल्यावर मुळा नावाची एक नदी गोदावरीच्या परिसरात वाहत असलेली मला आढळली. हीच प्राचीन मुरला असावी. मुळा हे मुरला या नदीनामाचे प्राकृत रूप होय.

ही मुळा नदी सह्याद्रीच्या पूर्व बाजूच्या उतारावर रतनगड आणि हरिश्चन्द्रगड यांच्यामध्ये उगम पावते. पहिले वीस मैल तिचा प्रवाह प्रवरानदीशी समांतर आहे. ती नंतर अहमदनगर जिल्ह्याच्या अकोला तालुक्यातील कोतूळ जवळून संगमनेर व पारनेर या तालुक्यांमधून राहुरीजवळ पोचते आणि शेवटी प्रवरानदीस संगम गावाजवळ मिळते.[२३] नंतर प्रवरा गोदावरीस मिळते ते ठिकाण प्रवरासंगम म्हणून पवित्र तीर्थ मानले गेले आहे.

'उत्तररामचरिता'वरून मुरला नदी ही गोदावरीस मिळणारी नदी होती, असे दिसते. कारण लोपामुद्रेचा निरोप ती गोदावरीस कळविणार होती. सध्या मात्र मुळा ही गोदावरीस साक्षात् मिळणारी नदी नसून ती प्रवरा नदीला मिळते आणि प्रवरा नंतर गोदावरीस मिळते. कदाचित् भवभूतीच्या काळी प्रवरेपेक्षा मुरलेला जास्त महत्त्व असून प्रवरा–मुरला संगमानंतर झालेल्या नदीला मुरला हेच नाव होते असा तर्क संभवतो. सध्या प्रवरेला जास्त महत्त्व आहे, पण 'महाभारता'तील अनेक ठिकाणच्या तीर्थांच्या वर्णनात प्रवरेचा किंवा प्रवरासंगमाचा उल्लेख नाही.

---

२३. अहमदनगर डिस्ट्रिक्ट गॅझेटीयर, पृ. ७.

याच्या उलट मुरलेचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो. मुरलेच्या तीरावरच्या प्रदेशाला मुरल असे नाव होते. राजशेखराने 'काव्यमीमांसे'त दक्षिणापथाच्या देशांमध्ये मुरलाचा उल्लेख केला आहे.[२४] त्याच्या 'विद्धशालभंजिके'त त्रिपुरीच्या युवराजदेवाने राष्ट्रकूट बद्दिग अमोघवर्ष याचा पक्ष घेऊन मान्यखेटवर चाल करण्याकरिता पाठविलेल्या सैन्याचे अचलपुराजवळ पयोष्णी (पूर्णा) नदीच्या काठी चतुर्थ गोविंद याच्या मांडलिकाशी झालेल्या घनघोर युद्धाचे वर्णन आहे. त्यामध्ये 'मुरलपरिवृढः कार्मुकप्रौढवाहः' (मुरलाधिपती आपल्या धनुष्याने प्रबल झाला होता) असे वर्णन आहे.[२५] त्याच्याही पूर्वी होऊन गेलेल्या दंडीने 'दशकुमारचरिता'च्या विश्रुतचरित नामक आठव्या उच्छ्वासात विदर्भाधिपतीचा मुरलेश नामक मांडलिक होता असा उल्लेख केला आहे.[२६] तेव्हा निदान ख्रिस्तोत्तर सातव्या ते दहाव्या शतकापर्यंत मुरल नामक देश दक्षिण महाराष्ट्रात प्रसिद्ध होता यात संशय नाही. या देशाचे नाव मुरला नदीवरून पडले होते हे स्पष्ट आहे. अर्थात त्या काळी तिला महत्त्व असून वरदा–मुरला संगमानंतर झालेल्या नदीला मुरला असेच नाव त्या काळी असावे असा तर्क होतो आणि 'उत्तररामचरिता'तील वर्णनावरून त्याला पुष्टी मिळते.

अगस्त्याचा आश्रम प्रवरा–मुळा संगमाजवळच असावा. म्हणून हा प्रदेश प्राचीन काळापासून पवित्र गणण्यात आला आहे. याच प्रदेशात नेवासे—जेथे श्रीज्ञानेश्वरांनी आपली गीतेवरची भावार्थदीपिका टीका लिहिली ते—वसले आहे. ज्ञानेश्वर सांगतात की नेवासेची पंचक्रोशी पवित्र आहे. 'ब्रह्मपुराणा'त याचे निवास असे नाव आले आहे

---

२४. काव्यमीमांसा, पृ. ९३.

२५. विद्धशालभञ्जिका, ४, १९.

२६. दशकुमारचरित (बॉम्बे संस्कृत सीरीज), पृ. १३८– 'तदावां संभूय मुरलेशं वीरसेनमृषीकेश्वरमेकवीरं कोङ्कणपतिं कुमारगुप्तं नासिक्यनाथं च नागपालमुपजपावः ।'

कारण येथे शिव व शक्ती यांचा निवास होता असे त्यांनी म्हटले आहे.[१] तेथील स्थलमहात्म्यात त्या स्थलनामाची दुसरीच व्युत्पत्ती दिली आहे. त्यात म्हटले आहे की तारकासुराच्या भयाने सर्व देव तेथे आपले निधी घेऊन आले म्हणून त्या स्थलाला निधिवास असे नाव पडले. तेथे मोठमोठे देव येऊन राहिले म्हणून त्याला महालय असेही म्हणू लागले. ज्ञानेश्वरांनी तेथील महालया देवीचा उल्लेख केला आहे.[२] नेवासे येथे अलीकडे केलेल्या उत्खननावरून त्या स्थलाची प्राचीनता प्रागैतिहासिक कालापर्यंत मागे गेली आहे.[३] तेव्हा या प्रदेशात अगस्त्याचा आश्रम असल्यास नवल नाही.

'रामायणा'त म्हटले आहे की पंचवटी अगस्त्याश्रमापासून दोन योजनांच्या (१८ मैलांच्या) अंतरावर होती. सध्याच्या पंचवटीचे प्रवरा–मुळा संगमापासून अंतर सुमारे ७५ मैल आहे. 'रामायणा'त निर्दिष्ट केलेली स्थलांची अंतरे वस्तुस्थितीशी जुळत नाहीत याचे हे एकच उदाहरण नाही. दुसरे उदाहरण हे की रामायणात चित्रकूट पर्वत गंगा–यमुना–संगम किंवा प्रयाग येथून दहा कोस होता असे म्हटले आहे. पण कामताजवळील चित्रकूट टेकडीचे प्रयागपासून अंतर सुमारे ६५ मैल आहे.[४]

अगस्त्याश्रमाचा पञ्चवटीच्या स्थलनिर्णयाशीही संबंध आहे. रामायणात वर्णिलेली पंचवटी ही नाशिकजवळची पंचवटी असे सामान्यतः मानण्यात येते. पण काहींच्या मते ती गोदावरीच्या उगमाजवळ नसून

---

१. ब्रह्मपुराण, अ. १०६, श्लो. ५३ --

शिवशक्त्योर्यतस्तस्मिन्निवासोऽभूत्सनातनः ।
अतो वदन्ति मुनयो निवासपुरमित्यदः ।।

२. 'ऐसें युगीं परी कळीं । आणि महाराष्ट्रमंडळीं । श्रीगोदावरीचां कूलीं । दक्षिणिलीं ।। त्रिभुवनैकपवित्र । अनादि पंचक्रोशक्षेत्र । जेथ जगाचें जीवसूत्र । श्रीमहालया असे ।।' ज्ञानेश्वरी, १८, १८०२–३.

३. Sankalia and Deo–*From History to Prehistory*, p. 2.

४. मिराशी, 'मेघदूतातील रामगिरी अर्थात् रामटेक', पृ. ७३.

आंध्र प्रदेशात त्या नदीच्या मुखाजवळ होती. 'उत्तररामचरिता'च्या दुसऱ्या अंकातील ३० व्या श्लोकातील --

अन्योन्यप्रतिघातसंकुलचलत्कल्लोलकोलाहलै-
रुत्तालास्त इमे गभीरपयसः पुण्याः सरित्सङ्गमाः ।।

हे वर्णन गोदावरीच्या उगमापासून फार दूर नसलेल्या पंचवटीजवळच्या प्रवाहाला लागू पडत नाही असे काहींचे म्हणणे आहे. पण वस्तुतः ते वर्णन पंचवटीजवळच्या गोदावरीचे नसून अगस्त्याश्रमाजवळच्या गोदा-मुरला (सध्याची प्रवरा) संगमाचे आहे व तेथे ते योग्यच आहे. एकंदरीत नेवाशाजवळ मुळेच्या काठी अगस्त्याश्रम असल्यास पंचवटी ही नाशकाजवळच असणे शक्य आहे--गोदावरीच्या मुखाजवळ नव्हे--यात संशय नाही.

अहमदनगर जिल्ह्यात अकोला येथे प्रवरानदीच्या काठी अगस्त्याश्रम होता अशी आख्यायिका आहे. डॉ. काणे तर सांगतात की अकोल्यापासून एक मैलावर अगस्त्याचे देवालय आहे.[१] पण त्यांनी त्याला प्रमाण दिले नाही. कै. य. रा. गुप्ते यांनी अकोल्याच्या प्राचीन अवशेषांचे सविस्तर वर्णन आपल्या एका लेखात केले आहे.[२] त्यांनी या आख्यायिकेचा उल्लेख केला आहे, पण देवळाचा निर्देश केला नाही. त्यामुळे त्याविषयी संशय वाटतो. कझेन्सनेही आकोल्याच्या एका मन्दिराचे वर्णन केले आहे. पण ते मन्दिर सिद्धेश्वराचे (शिवाचे) आहे.[३] भवभूतीच्या 'उत्तररामचरिता'तील वर्णन अकोल्याच्या विरुद्ध आहे. कारण त्यात अगस्त्याश्रम मुरला (मुळा) तीरी होता हे अभिप्रेत आहे, प्रवरातीरी नव्हे. त्या पुराव्यावरून तसेच 'दशकुमारचरिता'सारख्या प्राचीन ग्रंथातील मुरलदेशाच्या उल्लेखावरून अगस्त्याश्रम नेवाशापासून जवळच मुळा नदीच्या काठी होता असे निष्पन्न होते.

---

१. *History of Dharmaśāstra*, Vol IV, p. 730.

२. See Y. R Gupte's article "The Antiquities of Akola" in *B. I. S. M. Q.*, Vol. XXIX (Indian History Congress Number), pp. 38-44.

३. Cousens, *Mediaeval Temples of the Deccan*, pp. 53 f.

२. नैमिषारण्याच्या स्थानाचा शोध

वैदिक वाङ्मय, महाभारत, रामायण आणि पुराणे यांमध्ये नैमिषारण्याचे अनेक उल्लेख आढळतात. कृष्णयजुर्वेदाच्या काठकसहितेत (१,०६) म्हटले आहे की 'नैमिष्या वै सत्रमासत' (नैमिषारण्यातल्या लोकांनी यज्ञ केला). या अरण्यात राहणाऱ्या लोकांना पञ्चविंश ब्राह्मण (२५,६,४) आणि कौषीतकि ब्राह्मण (२६,५) यांत 'नैमिषीय' किंवा 'नैमिष्य' म्हटले आहे. शांखायन ब्राह्मणामध्येही नैमिषारण्यात एक मोठा यज्ञ झाल्याचा उल्लेख आहे. 'महाभारता'ला हल्लीचे स्वरूप नैमिषारण्यातच प्राप्त झाले. खालील उतारा पाहा–

लोमहर्षणपुत्र उग्रश्रवाः सौतिः पौराणिको **नैमिषारण्ये** शौनकस्य कुलपतेर्द्वादशवार्षिके सत्रे

सुखासीनानभ्यगच्छद् ब्रह्मर्षीन् संशितव्रतान् ।
विनयावनतो भूत्वा कदाचित्सूतनन्दनः ।।
तमाश्रममनुप्राप्तं नैमिषारण्यवासिनाम् ।
चित्राः श्रोतुं कथास्तत्र परिवव्रुस्तपस्विनः ।।

यामध्ये लोकहर्षणाचा पुत्र उग्रश्रवा हा नैमिषारण्यात चाललेल्या शौनकमुनीच्या द्वादशवार्षिक यज्ञात गेला होता. तेथे त्याने 'महाभारता'च्या कथा ऋषींना सांगितल्या असे म्हटले आहे.

रामाचा अश्वमेध यज्ञ गोमती नदीच्या तीरी नैमिषारण्यात झाला होता असे 'वाल्मीकिरामायणा'त (उत्तरकांड, ९१, ८–९ : १५) म्हटले आहे––

स तेषां द्विजमुख्यानां वाक्यमद्भुतदर्शनम् ।
अश्वमेधाश्रितं श्रुत्वा भृशं प्रीतोऽभवत्तदा ।।

विज्ञाय कर्म तत्तेषां रामो लक्ष्मणमब्रवीत् ।

*   *

तथैव तालावचरास्तथैव नटनर्तकाः ।
यज्ञवाटश्च सुमहान् गोमत्या नैमिषे वने ।।

यामध्ये रामाच्या अश्वमेधप्रसंगी नटनर्तकादि कलाकार गोमती नदीच्या काठी असलेल्या नैमिषारण्यात जमले होते, असे वर्णन आहे. त्यावरून ते अरण्य गोमती नदीच्या काठी होते ही महत्त्वाची माहिती मिळते.

पुराणांत तर नैमिषारण्याचा अनेकदा उल्लेख येतो. त्या अरण्यामध्यें सूताने शौनक ऋषीला अनेक आख्याने सांगितल्याचे वर्णन आहे. (उत्तरकांड, ७७–७९) 'पद्मपुराणा'त म्हटले आहे की नारद त्या अरण्यात आल्यावर त्यांचे ऋषींनी मोठे स्वागत केले. तसेच त्या अरण्यात द्वादशवार्षिक यज्ञ झाल्याचाही उल्लेख त्या पुराणात आला आहे.

नैमिषारण्य फार पवित्र गणले जात असे. त्यात अनेक तीर्थे आहेत असे 'महाभारता'त (आरण्यकपर्व, ३, ३) म्हटले आहे. तसेच त्यामध्ये धर्मचक्राची नेमी (धाव) मोडून पडल्यामुळे त्याला 'नैमिष' नाव प्राप्त झाले अशी त्या स्थलनामाची व्युत्पत्तीही दिली आहे. ही व्युत्पत्ती अर्थातच काल्पनिक आहे.

याप्रमाणे नैमिषारण्याचे उल्लेख अनेक ठिकाणी आले असले तरी त्याचे नक्की ठिकाण कोठे होते याविषयी फारच थोडे उल्लेख सापडतात. 'रामायणा'तील निर्देश वर दिला आहेत्यावरून ते गोमती–तीरी होते असे कळते. 'ब्रह्माण्डपुराणा'तही (१, २, ९) असाच उल्लेख आहे. पण डॉ. काणे यांनी म्हटले आहे की वायुपुराणात नैमिषारण्याच्या स्थानाविषयी भिन्न भिन्न विधाने आहेत. एके ठिकाणी (१, १४–१५) म्हटले आहे की महर्षींचे नैमिषारण्यांतील सत्र हे कुरुक्षेत्रात दृषद्वती नदीच्या काठी होते तर दुसऱ्या ठिकाणी ते गोमतीच्या काठी होते असे म्हटले आहे. या दोन विधांनाचा समन्वय करण्याकरिता डॉ. काणे यांनी असा उपाय सुचविला आहे की वास्तविक ते सत्र दृषद्वतीच्या काठीच झाले होते,

पण दृषद्वतीच्या आसमंतात गाईची खिल्लारे असल्याने तिला गोमती असेही नाव होते. डॉ. काणे यांचे हे मत मान्य केल्यास नैमिषारण्य वास्तविक दृषद्वतीच्या तीरी होते की गोमतीच्या हा प्रश्न उत्पन्न होतो. वाराणसीच्या 'पुराण' या नियतकालिकाचे संपादक श्री. आनन्दस्वरूप गुप्ता यांनी हा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविला आहे. ते म्हणतात, "हे दोन यज्ञ भिन्न होते. गोमतीच्या तीरी नैमिषारण्यात झालेला यज्ञ (वायुपुराण, २, ७–९ इत्यादि) पुरूरवा राजाच्या कारकीर्दीतील होता. त्या प्रसंगी वायुदेवाने आख्याने सांगितली होती. दृषद्वतीच्या काठचा यज्ञ नैमिषारण्यातील नव्हता. तसे वायुपुराणातही वर्णन नाही. तो यज्ञ असीमकृष्ण याच्या कारकीर्दीत झाला होता आणि त्या प्रसंगी लोमहर्षण सूताने आख्याने सांगितली होती. अर्थात् नैमिषारण्य गोमतीतीरी होते हे विधान निरपवाद आहे."

हे नैमिषारण्य लखनौच्या वायव्य दिशेस ४५ मैलांवरचे आणि सीतापूरपासून २० मैलांवरचे गोमती नदीच्या काठचे निमसर होय असे म्हणतात. ते पूर्वोत्तर रेल्वेचे स्टेशन आहे. या दोन नावांत सादृश्य आहे आणि रामायणातील आणि पुराणांतील नैमिषारण्याच्या वर्णनाप्रमाणे ते गोमती नदीच्या काठी आहे. म्हणून निमसर हेच नैमिषारण्य होय असे सामान्यतः मानले जाते.

पण नैमिषारण्याच्या या स्थानावर काही आक्षेप संभवतात. 'महाभारता'च्या आरण्यकपर्वात (८५, २-५) धौम्य ऋषीने त्याचा भारतातील पूर्वेकडील तीर्थांमध्ये उल्लेख केला आहे—

पूर्वं प्राचीं दिशं राजन्राजर्षिगणसेविताम् ।
रम्यां ते कीर्तयिष्यामि युधिष्ठिर यथास्मृति ।।
तस्यां देवर्षिजुष्टायां नैमिषं नाम भारत ।
यत्र तीर्थानि देवानां सुपुण्यानि पृथक् पृथक् ।।
यत्र सा गोमती पुण्या रम्या देवर्षिसेविता ।
यज्ञभूमिश्च देवानां शामित्रं च विवस्वतः ।।

पुढे धौम्यऋषी म्हणतात त्याच दिशेने गेले असता गयातीर्थ लागते.—

तस्यां गिरिवरः पुण्यो गयो राजर्षिसत्कृतः ।
शिवं ब्रह्मसरो यत्र सेवितं त्रिदशर्षिभिः ।।

*　　　　　　　　*

महानदी च तत्रैव तथा गयशिरोऽनघ ।
यत्रासौ कीर्त्यते विप्रैरक्षय्यकरणो वटः ।।
यत्र दत्तं पितृभ्योऽन्नमक्षय्यं भवति प्रभो ।
सा च पुण्यजला यत्र फल्गुनामा महानदी ।।
बहुमूलफला चापि कौशिकी भरतर्षभ ।
विश्वामित्रोऽभ्यगाद्यत्र ब्राह्मणत्वं तपोधनः ।।

यामध्ये धौम्य ऋषींनी गय नामक पर्वत, गयशिरस् तीर्थ, तेथे केलेल्या श्राद्धाचे अक्षय्यत्व, पवित्र फल्गुनदी आणि अक्षय्यवट यांचा निर्देश केला आहे. ही सर्व अद्यापि गयेस आढळतात. तेव्हा नैमिषारण्य भारताच्या पूर्व भागात गयेपासून थोड्याच अंतरावर होते, असे दिसते.

'महाभारता'तील दुसऱ्या एका संदर्भावरूनही नैमिषारण्याचे हे स्थान समर्थित होते. आरण्यकपर्वात (९३, १ इत्यादि) पांडवांच्या तीर्थयात्रेचे वर्णन आले आहे. वनवासात गेल्यावर ते प्रथम काम्यकवनात राहिले. 'महाभारता'त हे वन मरु देशांमध्ये सरस्वती नदीच्या तीरी होते असे म्हटले आहे. कनिंग्ह्यामने काम्यक वन हे कुरुक्षेत्राजवळचे कामोद होय असे म्हटले आहे. पण ते बरोबर नाही. काम्यक हे पूर्वीच्या भरतपूर संस्थानातील कामन नामक तहसिलीचे मुख्य ठिकाण कामन होय. याला कोरीव लेखाचा पुरावा आहे. तेथे सापडलेल्या ख्रिस्तोत्तर दहाव्या शतकातील एका शिलालेखात त्याचे काम्यक असे नाव आले आहे (एपि. इंडिका, २४, ३३५). तेथून पूर्व दिशेला जात जात पांडव नैमिषारण्याला पोचले असे 'महाभारता'त म्हटले आहे. खालील श्लोक पाहा—

ते तथा सहिता वीरा वसन्तस्तत्र तत्र ह ।
क्रमेण पृथिवीपाल नैमिषारण्यमागताः ।।
ततस्तीर्थेषु पुण्येषु गोमत्याः पाण्डवा नृप ।
कृताभिषेकाः प्रददुर्गाश्च वित्तं च भारत ।।

तत्र देवान् पितॄन् विप्रांस्तर्पयित्वा पुनः पुनः ।
कन्यातीर्थेऽश्वतीर्थे च गवां तीर्थे च कौरवाः ।।
वालकोटचां विषप्रस्थे गिरावुष्य च पाण्डवाः ।
बाहुदायां महीपाल चक्रुः सर्वेऽभिषेचनम् ।।
प्रयागे देवयजने देवानां पृथिवीपते ।
ऊषुराप्लुत्य गात्राणि तपश्चातस्थुरुत्तमम् ।।
गङ्गायमुनयोश्चैव संगमे सत्यसंगराः ।
विपाप्मानो महात्मानो विप्रेभ्यः प्रददुर्वसु ।।
तपस्विजनदुष्टां च ततो वेदीं प्रजापतेः ।
जग्मुः पाण्डुसुता राजन् ब्राह्मणैः सह भारत ।।
तत्र ते न्यवसन् वीरास्तपश्चातस्थुरुत्तमम् ।
सन्तर्पयन्तः सततं वन्येन हविषा द्विजान् ।।
ततो महीधरं जग्मुर्धर्मज्ञेनाभिसत्कृतम् ।
राजर्षिणा पुण्यकृता गयेनानुपमद्युते ।।
सरो गयशिरो यत्र पुण्या चैव महानदी ।
ऋषिजुष्टं सुपुण्यं तत्तीर्थं ब्रह्मसरोत्तमम् ।।

या उताऱ्यात नैमिषारण्य, प्रयाग आणि गया ही तीर्थे ओळीने वर्णिली आहेत. त्यावरून नैमिषारण्य प्रयाग आणि गया यांच्या दिशेतच (अर्थात पूर्व दिशेत) असून त्यांच्यापासून फार दूर नव्हते असे दिसते.

'महाभारता'तील हे दोन्ही उतारे नैमिषारण्याच्या निमसरशी समीकरणाच्या विरुद्ध जातात. मागे सांगितल्याप्रमाणे निससर हे लखनौच्या वायव्येस ४५ मैलांवर आहे. ते प्रयाग आणि गया यांच्या दिशेत आणि त्यांच्या जवळपास नाही. काम्यकवनातून (सध्याच्या कामनहून) पांडवांना तेथे जावयाचे असते तर उत्तर दिशेने जावे लागले असते, 'महाभारता'त सांगितल्याप्रमाणे पूर्व दिशेने नव्हे. तेव्हा नैमिषारण्य आणि निमसर यांच्यात उच्चारणसाम्य असले तरी ती दोन्ही एकच म्हणता येणार नाहीत.

'रामायणा'च्या उत्तरकांडात (सर्ग ९२ इत्यादि) रामाने नैमिषारण्यात केलेल्या अश्वमेध यज्ञाचे वर्णन आले आहे. रामाने लक्ष्मणाला

सुग्रीवादिकांना बोलावण्याची व गोमती नदीच्या तीरावर त्यांच्या निवासाकरिता अनेक तंबू उभे करण्याची आज्ञा केली. त्याच्या आमंत्रणावरून वाल्मीकी ऋषी कुशलवांसह तेथे आले होते. त्यांच्या निवासाकरिता काही पर्णकुटी उभारल्या होत्या.

> नैमिषे वसतस्तस्य सर्व एव नराधिपाः ।
> आनिन्युरुपहारांश्च तान् रामः प्रत्यपूजयत् ।।

*   *

> उपकार्या महार्हाश्च पार्थिवानां महात्मनाम् ।
> सानुगानां नरश्रेष्ठो ह्यादिदेश महाबलः ।।

*   *

> वर्तमाने तथा भूते यज्ञे च परमाद्‌भुते ।
> सशिष्य आजगामाशु वाल्मीकिर्भगवानृषिः ।।
> स दृष्ट्वा दिव्यसंकाशं यज्ञमद्‌भुतदर्शनम् ।।
> एकान्त ऋषिसंघातश्चकार उटजाञ्शुभान् ।।

'रामायणा'तील या वर्णनावरून रामाचा हा अश्वमेध अयोध्या आणि वाल्मीक्याश्रम या दोन्ही स्थलांपासून फार दूर नसलेल्या ठिकाणी नैमिषारण्यात केला होता असे दिसते. ख्रिस्तोत्तर नवव्या-दहाव्या शतकांत धीरनाग कवीने रचलेल्या 'कुन्दमाला' नामक संस्कृत नाटकात नैमिषारण्याचे असेच ठिकाण सांगितले आहे. त्या नाटकाच्या दुसऱ्या अंकात दाखविले आहे की रामाचा दूत वाल्मीकीच्या आश्रमात आला आहे. तेव्हा अशी जाहीर घोषणा होते की तेथून (वाल्मीक्याश्रमापासून) फार दूर नसलेल्या (नैमिषारण्यात) रामाचा अश्वमेध यज्ञ होणार आहे. तेव्हा सर्वांनी अविलंबेकरून तेथे जावे.

(नेपथ्ये)

भो भो आश्रमवासिजनाः ! शृण्वन्तु भवन्तः—इतो नातिदूरे महाक्रतुरश्वमेधः प्रवर्तते, संभृतानि यज्ञोपकरणानि, सन्निपतिताश्च नानादेशाश्रमवासिनो वसिष्ठात्रेयप्रभृतयो महामुनयः । केवलं भगवतो वाल्मीकेरागमन-

मुदीक्षमाणो नाद्यापि यज्ञदीक्षां प्रविशति महाराजः । आगतश्च वाल्मीकितपोवनवासिनामुपनिमन्त्रणार्थं रामदूतः । तस्मान्नैव परिलम्बितव्यम् ।

तीर्थोदकानि समिधः परिपूर्णरूपान्
दर्भाङ्कुरानविहतान् परिगृह्य सद्यः ।
अग्रे भवन्तु मुनयो मुनिकन्यकाश्च
कुर्वन्तु मङ्गलबलीनुटजाङ्गनेषु ।।

नंतरच्या (तिसऱ्या) अंकात कोमलाङ्गी सीता आपल्या लहानग्या कुशलवांसह संध्याकाळी यज्ञस्थानाला पोचली आहे, असे समजते. त्यांना या प्रवासाकरिता किती दिवस लागले हे तेथे सांगितले नाही, पण एकंदर वर्णनाचा रोख ध्यानात घेतला तर फार दिवस लागले नसावे. चौथ्या अंकातील एका श्लोकात म्हटले आहे की, इक्ष्वाकुवंशी राजे राज्यकारभार आपल्या पुत्रांवर सोपवून वृद्धापकाळी नैमिषारण्यात जातात.[1] या सर्व वर्णनावरून नैमिषारण्य हे अयोध्या आणि वाल्मीकीचा आश्रम या दोन्ही स्थलांपासून फार दूर नसावे. पण वाल्मीकीचा आश्रम कोठे होता ? मागील लेखात आम्ही सिद्ध केले आहे की, तो प्रयागच्या आग्नेयेस १८ मैलांवर गंगा आणि दक्षिण तमसा (सध्याच्या तोन्स) नदीच्या संगमाजवळ होता. नैमिषारण्य तेथून थेट उत्तरेस गोमती नदीच्या काठी असावे. हे अंतर सुमारे साठ मैल येईल. अयोध्येपासून त्याचे अंतर सुमारे ४० मैल भरेल. हे नैमिषारण्य सध्याच्या उत्तरप्रदेशातील सुलतानपुर जिल्ह्यात असावे. नैमिषारण्याचे निमसरशी समीकरण स्वीकारल्यास त्याचे वाल्मीक्याश्रमापासून अंतर सरळ रेषेत १६० मैल होईल. इतके अंतर ' रामायण ' व ' कुन्दमाला ' यांतील नैमिषारण्याच्या वर्णनास जुळणार नाही.

---

१. **आनाकमेकधनुषा भुवनं विजित्य**
पुण्यैर्दिवः क्रतुशतैर्विरचय्य मार्गम् ।
इक्ष्वाकवः सुतनिवेशितराज्यभारा
निःश्रेयसाय वनमेतदुपाश्रयन्ते ।।

कुन्दमाला, ४, ५.

नैमिषारण्य वर दाखविल्याप्रमाणे अयोध्येपासून सुमारे ४० मैल असल्यास 'कुन्दमाले'त वर्णिल्याप्रमाणे इक्ष्वाकुवंशी राजे आपल्या वृद्धापकाळी तेथे तपश्चर्येकरिता जात असणे, तसेच रामाने तेथे अश्वमेध यज्ञ करणे असंभवनीय साही. सुलतानपूर जिल्ह्यात नैमिषारण्याला जुळणारे एकादे स्थलनाम आहे काय हे माहीत नाही. वैदिक कालापासून आतापर्यंतचा हजारो वर्षांचा दीर्घ कालावधी लक्षात घेता तसे स्थलनाम सध्या विद्यमान नसल्यास आश्चर्य वाटावयास नको.

वरील विवेचनावरून नैमिषारण्य हे लखनौच्या वायव्येस ४५ मैलांवरचे निमसर नसून ते उत्तरप्रदेशात सुलतानपूर जिल्ह्यात गोमतीनदीच्या काठी होते असे दिसून येईल.

---

३. मूळ हरिवंशाचा काल

पुण्याच्या भांडारकर प्राच्य–विद्या–संशोधन मंडळाने सन १९१९ मध्ये 'महाभारता'ची चिकित्सक आवृत्ति संपादून प्रकाशित करण्याचा संकल्प केला आणि अनेक विद्वानांच्या साहाय्याने आणि सुमारे पन्नास वर्षांच्या अविरत परिश्रमाने ते कार्य पुरे केले. 'हरिवंशा'ला 'महाभारता'चे खिल पर्व किंवा परिशिष्ट पर्व मानण्यात येते. त्याचीही चिकित्सक आवृत्ति प्रकाशित झाल्याशिवाय 'महाभारता'चे संपादन पुरे झाले, असे म्हणता यावयाचे नाही. म्हणून 'महाभारता'चे तिसरे आणि शेवटचे संपादक डॉ. प. ल. वैद्य यांनी 'महाभारता'चे काम पूर्ण केल्यावर 'हरिवंशा'च्या संपादनाचे काम हाती घेतले. त्यांनी आता ते पुरे केले असून 'हरिवंशा'चा पहिला भाग नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यात प्रस्तावना, 'हरिवंशा'ची चिकित्सक आवृत्ति आणि टिप्पण्या अन्तर्भूत आहेत. दुसऱ्या भागात प्रक्षिप्त उतारे यावयाचे असून तो भाग अद्यापि प्रकाशित झाला नाही.

'हरिवंशा'च्या या चिकित्सक आवृत्तीकरिता डॉ. वैद्य यांनी त्या ग्रंथाच्या चार छापील आवृत्त्या आणि भारताच्या भिन्न भिन्न प्रदेशांतून मिळवलेली आठ लिपींत लिहिलेली ३६ हस्तलिखिते यांचा उपयोग केला आहे. 'हरिवंशा'चा मूळ पाठ ठरविण्याकरिता खालील अत्यंत प्राचीन अशा हस्तलिखितांचा फार उपयोग झाला. (१) शारदा लिपीत भूर्जपत्रावर लिहिलेले सुमारे पाचशे वर्षांपूर्वीचे हस्तलिखित. यातील पाठ उत्तर भारतात प्रचलित असावे. (२) नेपाळमध्ये मिळालेले नेवारी लिपीत ताडपत्र्यांवर लिहिलेले हस्तलिखित. हे सुमारे अकराव्या शतकातील असावे. यातील पाठ भारताच्या ईशान्य भागात प्रचलित असावे. (३) केरळमध्ये मलायलम लिपीत लिहिलेली ताडपत्रांवरील तीन हस्तलिखिते. यातील पाठ दक्षिण भारतात प्रचलित असावे.

हिंदुस्थानच्या भिन्न भिन्न भागांतून मिळविलेल्या ह्या हस्तलिखितांतील हरिवंशाच्या पाठात आश्चर्यकारक साम्य असून त्यात ते खिल पर्व सर्वांत लहान आकाराचे आढळते. म्हणून डॉ. वैद्यांनी आपली चिकित्सक आवृत्ति मुख्यत: त्या हस्तलिखितांवर आधारली आहे. उपोद्बलक प्रमाण म्हणून क्षेमेंद्राच्या 'भारतमञ्जरी'चा उपयोग केला आहे. क्षेमेन्द्र हा काश्मीरी कवि अकराव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. त्याने आपल्या 'भारतमंजरी'त 'हरिवंशा'सह 'महाभारता'ची संक्षिप्त आवृत्ति दिली आहे. त्यावरून त्याच्या काळी 'हरिवंशा'चा कोणता भाग प्रचलित होता याचे अनुमान करता येते. विशेष उल्लेखनीय गोष्ट ही की वरील प्राचीनतम हस्तलिखितांत आणि 'भारतमंजरी'त 'हरिवंशा'च्या विस्तारासंबंधी एकवाक्यता आहे. कालाच्या ओघात 'हरिवंशा'त अनेक आख्याने वगैरे प्रक्षिप्त केली गेली. ती जशी वरील हस्तलिखितांत आढळत नाहीत तशीच ती 'भारतमंजरीत'ही संक्षेपिलेली दिसत नाहीत.

डॉ. वैद्यांची ही चिकित्सक आवृत्ति हरिवंशाच्या छापील आवृत्त्यांपेक्षा पुष्कळच लहान आहे. छापील आवृत्तीत ३१८ अध्याय आणि १८००० श्लोक आहेत, तर चिकित्सक आवृत्तीत ११८ अध्याय व फक्त ६०५३ श्लोक आहेत. म्हणजे चिकित्सक आवृत्ति छापील आवृत्तीच्या सुमारे एकतृतीयांश आहे. मूळचे हरिवंश यापेक्षाही लहान असून त्यात चिकित्सक आवृत्तीतील पहिले ९८ अध्यायच असावे असा डॉ. वैद्यांचा तर्क आहे. पण पुढील २० अध्यायांस पूर्वोक्त प्राचीनतम हस्तलिखितांचा आधार असल्यामुळे त्यांनी ते चिकित्सक आवृत्तीत घेतले आहेत.

या मूळ हरिवंशात वेळोवेळी भर पडून कालाच्या ओघात त्याला सध्याचे विस्तृत स्वरूप प्राप्त झाले. या प्रक्षेपांचे स्वरूप खालील श्लोकात सांगितले आहे—

संग्रामश्च विवाहश्च स्तुतिर्देववरादिकम् ।
प्रक्षेपकारणान्याहुः पञ्चमं च फलश्रुतिः ॥

(युद्धाची जाणि विवाहाची वर्णने, देवादिकांची स्तुती, त्यांनी दिलेले वर आणि त्यामुळे झालेले अनर्थ आणि ग्रंथाच्या पठणाची आणि श्रवणाची

फलश्रुती या पाच कारणांनी मुख्यत्वेकरून ग्रंथात प्रक्षेप घातले जातात.) डॉ. वैद्यांनी अशा काही प्रक्षेपांची चर्चा प्रस्तावनेत केली आहे.

मूळ हरिवंशाचा काल

चिकित्सक आवृत्तीतील 'हरिवंश पर्व' ख्रिस्तोत्तर ४००च्या सुमारास लिहिले गेले असावे, असे डॉ. वैद्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे (प्रस्तावना, पृ. १५), तर इतरच हा काल सुसारे सन ३०० असा दिला आहे (प्रस्तावना पृ. ३९). त्या वेळी त्याचे पहिले ९८ अध्यायच असावे. नंतर सन १०५० पर्यंत त्यात ९९ ते ११८ या अध्यायांची भर पडलेली दिसते. त्यातील हा भाग क्षेमेन्द्राच्या 'भारतमंजरी'त आढळतो. छापील आवृत्तीतील इतर काही भाग सन १०५० नंतर प्रक्षिप्त झाले असावे. हे प्रक्षिप्त भाग चिकित्सक आवृत्तीच्या दुसऱ्या भागात दिले जातील.

मूळ 'हरिवंशा'च्या या कालाला डॉ. वैद्यांनी प्रस्तुत आवृत्तीत प्रमाण दिले नाही. तथापि त्याचे अनुमान करणे शक्य आहे.

इ. स. च्या पाचव्या शतकाच्या मध्यापासून कोरीव लेखातील दानपत्रांत भगवान् व्यासाचे शापाशीर्वादात्मक श्लोक दिलेले आढळतात. ते 'महाभारता'तून घेतले होते. सन ५३३-३४ च्या खोह येथील शर्वनाथाच्या दानपत्रात 'उक्तञ्च महाभारते शतसाहस्र्यां संहितायां परमर्षिणा पराशरसुतेन वेदव्यासेन ।' असा 'महाभारता'चा 'एक लक्ष श्लोकांची संहिता' म्हणून उल्लेख आला आहे.[१] तेव्हा इ. स. च्या पाचव्या शतकापूर्वी 'महाभारता'ला सध्याचे विशाल रूप प्राप्त झाले असावे. 'हरिवंशा'प्रमाणे 'महाभारता'तही वेळोवेळी अनेक भाग प्रक्षिप्त केले होते. पाचव्या शतकात 'महाभारता'ची श्लोकसंख्या एक लक्ष किंवा त्यासारखी विशाल झाली असल्यास त्यात त्यावेळी 'हरिवंशा'चा अंतर्भाव झाला असला पाहिजे. नाही तर या विशाल श्लोकसंख्येची उपपत्ती लावता येणार नाही. सध्या प्रचलित असलेल्या उत्तरभारतीय आवृत्तीत स्वर्गारोहणपर्वापर्यंत ८४००० श्लोक आहेत. यात 'हरिवंशा'च्या उत्तरभारतीय आवृत्तीतील १६०००

---

१. फ्लीट, गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृ. १३७.

श्लोक मिळविले असता लक्ष श्लोकसंख्या पुरी होते. दक्षिण भारतीय आवृत्तीत ही संख्या एक लक्ष वीस हजार होते. भांडारकर मंडळाने प्रकाशित केलेल्या चिकित्सक आवृत्तीत सुमारे ७३००० श्लोक आहेत. 'हरिवंशा'च्या चिकित्सक आवृत्तीत ६०७३ श्लोक आहेत हे मागे सांगितले आहे. या दोन श्लोकसंख्यांची बेरीज एक लक्ष होत नाही खरे, तथापि 'शतसाहस्री संहिता' याने पूर्ण लक्ष श्लोकसंख्या विवक्षित नसून 'फार मोठ्या श्लोकसंख्येचा ग्रंथ' एवढाच अर्थ अभिप्रेत असावा. अर्थातच ही संख्या 'हरिवंशा'शिवाय अशक्य असल्याने त्या काळी म्हणजे इ. स. च्या पाचव्या शतकात 'हरिवंश' प्रचलित असला पाहिजे. तेव्हा तो सुमारे इ. स. ३०० किंवा ४०० मध्ये रचला असावा असा डॉ. वैद्य यांचा तर्क दिसतो.

पण हा तर्क अनुमानाधिष्ठित आहे. यापेक्षा प्रबळ प्रमाणांवरून मूळ 'हरिवंशा'चा काळ ठरविता आल्यास ते इष्ट होईल. म्हणून तसा यत्न करू.

'हरिवंशा'मध्ये मुख्यत: भगवान् कृष्णाची वंशावळ व चरित्र आले आहे. त्या चरित्रात पारिजातहरण ही एक महत्त्वाची घटना आहे. कामरूपाचा (सध्याच्या आसामचा) राजा नरकासुर याने देवमाता अदितीची कुंडले बलात्काराने नेली होती ती परत मिळविण्याकरिता इंद्राने प्रार्थना केल्यावरून कृष्णाने सत्यभामेला घेऊन नरकासुराच्या प्राग्ज्योतिषपुर राजधानीवर चाल केली आणि नरकासुराला ठार मारून त्याने बंदीत टाकलेल्या गन्धर्व व असुर यांच्या कन्यांना बंधमुक्त केले. नंतर स्वर्गात जाऊन अदितीला ती कुंडले अर्पण केली, इंद्राच्या उद्यानातील पारिजात वृक्ष उपटून गरुडावर घातला आणि तो द्वारकेला परत आला अशी ही पारिजातहरणाची कथा आहे. कृष्णचरितात तो महत्त्वाची असल्याने कृष्णाला त्या कथेच्या वर्णनपर काही अध्यायांच्या पुष्पिकेत (Colophons मध्ये) 'पारिजात' म्हटले आहे.

या पारिजातहरणकथेची दोन रूपे 'हरिवंशा'च्या छापील आवृत्तीत (उदाहरणार्थ, चित्रशाळेते सन १९३६ मध्ये प्रकाशित केलेल्या आवृत्तीत)

आढळतात. एक विष्णुपर्वाच्या अध्याय ६४[1] मध्ये दिले आहे. अध्याय ६३मध्ये मागे सांगितल्याप्रमाणे कृष्णाचे साहाय्य मागण्याकरिता इंद्राचे द्वारकेत आगमन, कृष्णाला प्रार्थना, त्याने दिलेल्या गरुडावरून कृष्णाचे सत्यभामेसह प्राग्ज्योतिषपुरावर आक्रमण, नरकासुरवध, स्वर्गात जाऊन अदितीला कुंडलार्पण वगैरे वर्णिल्यावर खालील श्लोक आले आहेत--

स ददर्श महावीर आक्रीडे वासवस्य ह ।
दिव्यमभ्यर्चितं देवैः पारिजातं महाद्रुमम् ।।
नित्यपुष्पधरं दिव्यं पुण्यगन्धमनुत्तमम् ।
यमासाद्य जनः सर्वो जातिं स्मरति पौर्विकीम् ।।
उत्पाट्यारोपयामास विष्णुस्तं गरुडोपरि ।
सोऽपश्यत्सत्यभामा च दिव्यमप्सरसां गणम् ।।
श्रुत्वा तं देवराजस्तु कर्म कृष्णस्य तत्तदा ।
अनुमेने महाबाहुः कृतकर्मेति चाब्रवीत् ।।

या श्लोकांत कृष्णाने इंद्राच्या उद्यानात सदैव पुष्पित आणि सुगंधी असणारा परिजात वृक्ष पाहिला. नंतर तो उपटून त्याने गरुडावर घातला आणि तो सत्यभामेसह द्वारकेला आला. नंतर इंद्राला ते समजल्यावर 'झाले ते झाले' असे म्हणून त्याने त्याला संमति दिली.

परिजातहरणकथेचे हे रूप प्राचीन दिसते. ते चिकित्सक आवृत्तीच्या अध्याय ९२ मध्ये (श्लो. ६३–६७ मध्ये) आले आहे. हीच कथा 'महाभारता'च्या चिकित्सक आवृत्तीच्या द्रोणपर्वात (अध्याय १०, श्लो. २२–२३ मध्ये) आली आहे.

वैनतेयं समारुह्य त्रासयित्वामरावतीम् ।
महेन्द्रभवनाद्वीरः पारिजातमुपानयत् ।।

---

१. 'हरिवंशा'च्या छापील आवृत्तीत हरिवंशपर्व, विष्णुपर्व आणि भविष्यपर्व असे तीन भाग असून प्रत्येक भागातील अध्याय अलग मोजले आहेत. डॉ. वैद्यांच्या चिकित्सक आवृत्तीत या तीन पर्वांचा निर्देश असला तरी अध्याय आरंभापासून एकाच संख्येत दिले आहेत.

तच्च मर्षितवान् शक्रो जानंस्तस्य पराक्रमम् ।
राज्ञां चाप्यजितं कश्चित् कृष्णेनेह न शुश्रुम ।।

'हरिवंशा'ची चिकित्सक आवृत्ती आणि क्षेमेन्द्राची 'भारतमञ्जरी' यांत सर्वत्र साम्य आढळते असे मागे म्हटले आहे. ते याही बाबतीत आढळते. 'भारतमञ्जरी'तील खालील श्लोक (हरिवंश, श्लो. ११३५–३६) पाहा—

ददर्श नन्दनोत्तंसं सर्वकामप्रदं सदा ।
पारिजातं सुधाजातमभिजातमिवेश्वरम् ।।
तं दृष्ट्वा नयनानन्दबान्धवं माधवः स्वयम् ।।
समुत्पाट्य जहाराशु तच्चामन्यत वृत्रहा ।।

पारिजातहरणकथेचे रूप पूर्वोक्त प्राचीनतम हस्तलिखितांत, 'महाभारता'च्या चिकित्सक आवृत्तीतील द्रोणपर्वात व क्षेमेन्द्राच्या 'भारतमञ्जरी'त आढळत असल्यामुळे तेच प्राचीन होय असे डॉ. वैद्यांनी मानले आहे आणि 'हरिवंशा'च्या आपल्या चिकित्सक आवृत्तीत दिले आहे.

याहून बरेच निराळे असे दुसरेही पारिजात–हरण कथेचे रूप 'हरिवंशा'च्या छापील आवृत्तीत (चित्रशाळा प्रत, विष्णुपर्व, अध्याय ६५–७७) आले आहे. त्याकडे आता वळू.

कृष्ण एकदा आपल्या सर्व स्त्रीपुत्रांसह रैवतक (काठेवाडातील गिरनारजवळच्या) पर्वतावर रुक्मिणीच्या व्रतोद्यापनाकरिता गेला. तेथे तो सभेत रुक्मिणीसह बसला असता देवर्षि नारदाने त्याला स्वर्गीय पारिजातवृक्षाचे पुष्प दिले. कृष्णाने ते रुक्मिणीला अर्पण केले. तेव्हा ती अधिकच सुंदर दिसू लागली. नारदाने त्याबद्दल तिचे अभिनंदन करून म्हटले, 'हे पुष्प एक वर्षानंतर परत देवलोकात जाईल. हे दिव्य पुष्प कृष्णाने तुला दिले तेव्हा तू त्याचा दुसरा प्राणच आहेस हे मला समजले.' तेथे असलेल्या सत्यभामेच्या सेवकांनी हा वृत्तांत आपल्या स्वामिनीला निवेदन केला तेव्हा ती मत्सराने क्रुद्ध होऊन जळफळू लागली. कृष्णाला ते समजताच तो त्वरेने तिच्या महालात गेला. नाना प्रकारे तिची समजूत घालण्याचा त्याने प्रयत्न केला. पण ती त्याला टाकून बोलली. तेव्हा कृष्ण

म्हणाला, 'नारदाने दिलेले पारिजातपुष्प मी रुक्मिणीला दिले खरे. या माझ्या अपराधाची क्षमा कर.'

पारिजातकपुष्पाणि यदिच्छस्यतिकोपने ।
तदा दातास्मि सुश्रोणि सत्यमेतत् ब्रवीमि तम् ।
स्वर्गास्पदादानयित्वा पारिजातं द्रुमेश्वरम् ।
गृहे ते स्थापयिष्यामि यावत्कालं त्वमिच्छसि ।।

(तुला जर पारिजाताची पुष्पे पाहिजे असतील तर मी तो वृक्षच स्वर्गातून आणून तुझ्या घरी लावतो. तुला पाहिजे तितका काळ तो तुझ्या येथे राहील.)

नंतर कृष्णाने नारदाला बोलावून त्याची पूजा केली. तेव्हा नारदाने सांगितले की 'कश्यपाने अदितीच्या अलंकाराकरिता आणि गीतनृत्यादि मनोरंजनार्थ पारिजातवृक्षाला निर्माण केले. अदितीने पुण्यप्राप्तीकरिता मला त्याचे दान केले आणि नंतर त्याचे मूल्य देऊन तो परत घेतला. तसेच इंद्राणी, चन्द्रपत्नी रोहिणी, कुबेरपत्नी ऋद्धि यांनीही केले.' नंतर नारद स्वर्गात जाऊ लागला तेव्हा कृष्णाने इंद्राला संदेश पाठवला की 'माझ्या पत्न्या पारिजाताचे दान करू इच्छितात. तेव्हा तो वृक्ष द्वारकेला पाठवा.' तेव्हा नारद म्हणाला, "कृष्णा, इंद्र तो वृक्ष देणार नाही. समुद्रमन्थनाच्या प्रसंगी तो वृक्ष बाहेर आला. भगवान् शंकराने इंद्राच्या प्रार्थनेवरून शचीकरिता तो त्याला दिला. शंकर, पार्वती आणि मी याशिवाय कोणीही त्या उद्यानात प्रवेश करू शकत नाही. तेव्हा इंद्र तो वृक्ष तुला देणार नाही." तेव्हा कृष्ण म्हणाला, "मी तो वृक्ष सत्यभामेला देण्याची प्रतिज्ञा केली आहे. तिचा भंग मी करणार नाही. माझ्या विनंतीवरून इंद्र तो न देईल तर मी गदेने त्याच्या वक्षःस्थलावर प्रहार करीन."

नारदाने इंद्राला कृष्णाचा संदेश सांगितला. तेव्हा इंद्र म्हणाला, महर्षे, माझा हा प्रतिसंदेश कृष्णाला सांगा, 'आपण पृथ्वीचा भार हलका करण्याकरिता अवतार घेतला आहे. ते अवतारकृत्य पूर्ण झाल्यावर आपण स्वर्गात याल तेव्हा मी तो आपणास देईन. स्वर्गीय रत्ने मनुष्य-

लोकात क्षुद्र कारणाकरिता नेणे योग्य नाही.' नारदाने त्याची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण इंद्र ऐकेना. तो म्हणाला, 'कृष्णाला

पलाशपत्रार्धमपि त्वयाऽजितो
न पारिजातस्य तव प्रदास्यति ।

(माझा पराजय केल्याशिवाय पारिजातकाचे अर्धे पानही तुम्हाला मी देणार नाही) असे सांगा. नारदाने इंद्राचा संदेश कळविल्यावर कृष्ण म्हणाला, 'मी उद्याच इंद्राच्या अमरावतीवर हल्ला करीन. हे इंद्राला कळवा.'

नारदाने ते इंद्राला कळविताच इंद्राने बृहस्पतीला बोलावून त्याचा सल्ला विचारला. बृहस्पति म्हणाला, 'इंद्रा, आपल्या पुत्रासह कृष्णाशी युद्ध कर. मीही या प्रश्नाची न्याय्य सोडवणूक व्हावी म्हणून प्रयत्न करतो.' नंतर बृहस्पतीने तो वृत्तांत कश्यपाला सांगितला. कश्यपाने भगवान् शंकराकडे जाऊन त्यांना प्रसन्न करण्याकरिता प्रदीर्घ स्तुति केली (विष्णुपर्व, अध्याय ७२, श्लोक २९ ते ६०). तेव्हा शंकर प्रसन्न होऊन म्हणाले, 'इंद्राने पूर्वी मुनिपत्नीचा अभिलाष केला त्याचे हे फळ. कृष्ण पारिजात घेऊन जाईलच. तुम्ही दाक्षायणी (अदिति)सह तिकडे जावे. इंद्र आणि कृष्ण यांच्यात पुढे सलोखा होईल.'

नंतर कृष्णाने सात्यकीसह गरुडावर बसून इंद्राच्या नंदनवनावर स्वारी केली. प्रद्युम्नही त्याच्या मागून गेला. त्या वनातील रक्षकांसमक्ष कृष्णाने पारिजात वृक्ष उपटून गरुडावर घातला. तितक्यात इंद्राला ही बातमी लागून तो आपल्या जयंत पुत्रासह कृष्णावर चालून गेला. नंतर त्याचे कृष्णाशी आणि जयंताचे प्रद्युम्नाशी घनघोर युद्ध झाले. इंद्राचा मित्र आणि परशुरामाचा शिष्य प्रवर नामक ब्राह्मण पारिजातक हिसकावून घेऊ लागला तेव्हा सात्यकीने त्याचा प्रतिकार केला.

इंद्राने आपल्या वज्राने गरुडाचे एक एक पंख तोडण्यास आरंभ केला तेव्हा कृष्णाने प्रद्युम्नास द्वारकेस जाऊन दारुक सारथ्यासह आपला रथ आणण्यास सांगितले. नंतर कृष्ण त्या रथात बसून पारियात्र पर्वतावर ऐरावतारूढ इंद्र होता त्याच्याशी युद्ध करण्याकरिता गेला. प्रद्युम्न आणि सात्यकी हेही पारिजाताच्या रक्षणार्थ पारियात्र पर्वतावर गेले. तितक्यात

संध्याकाळ झाली. म्हणून कृष्णाच्या सूचनेवरून इंद्राने युद्ध थांबवले. मग पुष्करक्षेत्राजवळ इंद्र जाऊन राहिला. नंतर तेथे ब्रह्मदेव, कश्यप, अदिति, अश्विनीकुमार, आदित्य, रुद्र वगैरे सर्व देव आले. कृष्णही प्रद्युम्न व सात्यकि यांसह पारियात्र पर्वतावर राहिला. नंतर कृष्णाने ध्यान करताच गंगा तेथे आली. तिच्या जलाने स्नान करून कृष्णाने भगवान् शंकराची गंगोदक व बिल्वपत्र यांनी पूजा केली आणि त्याची स्तुति केली (विष्णु-पर्व, अध्याय ५४, श्लो. २२–३४). शंकरांनी प्रसन्न होऊन त्याला वर दिला. तेथील भगवान् शंकराच्या देवालयाला 'बिल्वोदकेश्वर' असे नाव पडले. त्या रात्री कृष्ण तेथे राहिला. नंतर त्याने पर्वताला वर दिला की जे कोणी तुझ्यावर चढून माझे दर्शन घेतील त्यांना गोसहस्रदानाचे पुण्य मिळेल.

नंतर इंद्र व कृष्ण यांचे पुनः तुमुल युद्ध झाले. पुढे ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून कश्यप व अदिति तेथे आले. त्यांना पाहताच दोघांनीही युद्ध थांबवले. नंतर अदितीने म्हटले, 'कृष्णा, तू आता द्वारकेला हा पारिजात घेऊन जा. सत्यभामेचे पुण्यक व्रत संपल्यावर तू त्या वृक्षाची नंदनवनात पुनः स्थापना करावी.'

नंतर कृष्ण, प्रद्युम्न व सात्यकि यांच्यासह, द्वारकेला आला. तेथील सर्व नागरिकांनी त्या अद्‌भुत वृक्षाला पाहिले. नंतर कृष्णाने त्याची सत्य-भामेच्या निवासस्थानी स्थापना केली. पुढे कृष्णाने ध्यान करताच नारद ऋषि तेथे आले. सत्यभामेने कृष्णाला त्या वृक्षाला बांधून सुवर्ण, रत्ने इत्यादिकांसह नारदाला दान दिले. नंतर हसून नारद म्हणाले, 'मला याच्या बदली सवत्स कपिला गाय, कृष्णाजिन, तिळाने भरलेले पात्र व सुवर्ण द्या म्हणजे मी कृष्णाला परत देतो.'[१] नंतर कृष्णाने पांडव, भीष्मक वगैरेंना तेथे बोलावून पारिजाताचे दर्शन करविले आणि एक वर्ष संपताच

---

१. यांच्याही पुढचे या कथेचे रूप पुढीलप्रमाणे आढळते. सत्य-भामेला पारिजात वृक्ष दिल्यावर रुक्मिणी रागावली. तेव्हा कृष्णाने तिची समजूत घातली की पारिजात वृक्ष सत्यभामेच्या अंगणात असला तरी त्याची फुले तुझ्या अंगणात पडतील ! श्रीधरकृत मराठी 'हरिविजय' अध्याय २६, ओव्या २०६–२०७.

तो वृक्ष स्वर्गात नेऊन इंद्राला परत केला.[१] यानंतरच्या ७७ व्या अध्यायात पुण्यकव्रताचे वर्णन आले आहे.

हरिवंशाच्या छापील आवृत्तीतील पारिजातहरणाचे हे वर्णन अत्यंत पाल्हाळाचे असून पुराणांतल्या सारखे आहे. त्याचा उद्देश पारियात्र गिरीवरील (अबूच्या पहाडावरील) बिल्वोदकेश्वर देवालय व नंदी आणि शेजारचे पुष्करतीर्थ यांचे माहात्म्य वर्णन करण्याचा दिसतो. ते एखाद्या सध्या अज्ञात असलेल्या पुराणातून घेतले असावे, असे डॉ. वैद्यांनी म्हटले आहे.

पारिजातहरणाच्या या दोन वर्णनांत जमीनअस्मानाचे अंतर आहे. चिकित्सक आवृत्तीतील पारिजातहरणाचा वृत्तांत केवळ पाच श्लोकांत (अध्याय ९२, श्लो. ६३–६७) संपला आहे. तो अगदी साध्या नीरस पद्धतीने सांगितला आहे. याच्या उलट छापील आवृत्तीतील पारिजात-हरणाच्या वृत्तांताने तेरा अध्याय (विष्णुपर्व, अध्याय ६४ ते ७६) (७५१ श्लोक) व्यापले आहेत. त्यात विप्रलंभ शृंगार, वीर, अद्भुत इत्यादि रसांचा परिपोष झाला आहे.

पारिजातहरणकथानकाला हे दुसरे रूप केव्हा प्राप्त झाले हे निश्चित करणारा पुरावा अलीकडे उपलब्ध झाला आहे. तो असा—

नवव्या शतकातील सुप्रसिद्ध साहित्यशास्त्रज्ञ आनंदवर्धन याने आपल्या 'ध्वन्यालोका'त म्हटले आहे की 'कवीने एखादे ऐतिहासिक कथा-नक आपल्या काव्याचा विषय म्हणून पसंत केले असल्यास त्यातील इष्ट-रसविरोधी प्रसंग गाळून तद्रसपरिपोषक अशा काल्पनिक प्रसंगांची योजना करावी. कारण कवीला आपल्या काव्यामध्ये इतिहास शिकवावयाचा नसतो.'[२] याची उदाहरणे म्हणून कालिदासाच्या प्रबंधांचा आणि सर्वसेनाच्या

१. महाराष्ट्रात ज्याला पारिजात म्हणतात तो शेफालिका वृक्ष होय. 'स्वप्नवासवदत्ता'तील (अंक ४) त्याच्या पुष्पगुच्छांचे वर्णन पाहा : 'ते (शेफालिकागुल्मकाः) कुसुमिता नाम प्रवालान्तरितैरिव मौक्तिकल-म्बकैराचिताः कुसुमैः।'

२. 'इतिवृत्तवशायातां कथञ्चिद्रसाननुगुणां स्थितिं त्यक्त्वा पुनरु-त्प्रेक्ष्याभीष्टरसोचितकथोन्नयो विधेयः यथा कालिदासप्रबन्धेषु। यथा च सर्वसेनविरचिते हरिविजये।'—ध्वन्यालोक, तृतीयोद्योत.

'हरिविजया'चा निर्देश आनंदवर्धनाने केला आहे. 'हरिविजया'त वर्णिलेले मूळ ऐतिहासिक कथानक कोणते आणि त्यात सर्वसेनाने कोणते बदल केले हे आनंदवर्धनाने सांगितले नाही, पण 'ध्वन्यालोका'चा टीकाकार अभिनवगुप्त याने ती माहिती खालील शब्दांत दिली आहे. तो म्हणतो 'हरिविजयातील पारिजातहरणादि प्रसंग पत्नीच्या अनुनयाकरिता घातलेले दिसतात, पण इतिहासावरून तसे दिसत नाही.[१]' अभिनवगुप्ताचे हे विधान फार महत्त्वाचे आहे. त्यावरून सर्वसेनाच्या 'हरिविजया'चे कथानक कृष्णाने इंद्रावर स्वारी करून पारिजातवृक्ष पृथ्वीवर आणला त्या प्रसंगाविषयी असून कृष्णाने ते कृत्य पत्नीच्या अनुनयाकरिता केले होते ही माहिती मिळते. कृष्णाची ही पत्नी सत्यभामा होय, यात संशय नाही. आनंदवर्धनाने 'हरिविजया'तील काही प्राकृत गाथा उद्धृत केल्या आहेत. त्यावरून माहाराष्ट्री प्राकृतातील त्या काव्याविषयी बरीच माहिती मिळते. धाराधिपति भोज (इ. स. च्या अकराव्या शतकाचा पूर्वार्ध) यानेही 'हरिविजया'तून काही गाथा आपल्या 'सरस्वतीकण्ठाभरणा'त व 'शृंगारप्रकाशा'त घेतल्या आहेत. त्यांपैकी खालील गाथा या संबंधात महत्त्वाची आहे.[२]

सुरकुसुमेहिं कलुसिअं जइ तेहिं चिअ पुणो पसाएमि तुमं ।
तो पेम्मस्स किसोअरि अवराहस्स अ ण मे कअं अणुरूवं ।।

(सुरकुसुमैः कलुषितां यदि तैरेव पुनः प्रसादयामि त्वाम् ।
ततः प्रेम्णः कृशोदरि अपराधस्य च न मे कृतमनुरूपम् ।।)

भोजाने या गाथेचा संदर्भ दिला नाही. तथापि तिच्या अर्थाकडे लक्ष देता ती कृष्णाने सत्यभामेस उद्देशून म्हटली होती आणि 'हरिविजया'तून घेतली होती हे उघड आहे. कृष्ण सत्यभामेस म्हणतो, 'हे कृशोदरी सत्यभामे, मी रुक्मिणीला पारिजातपुष्पे दिली म्हणून तू रागावलीस. आता तुला प्रसन्न करण्याकरिता मी तीच पुष्पे तुला आणून दिली तर ते माझे कृत्य तुझ्या प्रेमाला आणि माझ्या अपराधाला साजेसे होणार

---

१. हरिविजये कान्तानुनयाङ्गत्वेन पारिजातहरणादि निरूपितमितिहासेष्वदृष्टमपि ।– ध्वन्यालोकलोचन, तृतीयोद्योत.

२. सरस्वतीकण्ठाभरण (निर्णयसागर प्रत, १९२५), पृ. ५६७.

नाही. ' म्हणून मी पारिजात वृक्षच तुझ्या अंगणात लावतो, असा कृष्णाचा अभिप्राय दिसतो.

सर्वसेनाचे ' हरिविजय ' काव्य सध्या उपलब्ध नाही. तथापि आनंदवर्धन, भोज, अभिनवगुप्त, हेमचंद्र वगैरेंनी त्यातील अनेक गाथा आपल्या अलंकारविषयक ग्रंथांत उद्धृत केल्या आहेत किंवा त्यात वर्णिलेल्या विषयांचा निर्देश केला आहे त्यावरून त्या काव्याविषयी खालील माहिती मिळते—

'हरिविजय' हे काव्य आरंभापासून अखेरपर्यंत एकाच स्कन्धक नामक छंदात रचले होते. त्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटच्या गाथेत ' उत्साह ' शब्द ग्रथित केला होता. त्याचे कथानक सत्यभामेला प्रसन्न करण्याकरिता इंद्राचा पराजय करून कृष्णाने पारिजातवृक्ष स्वर्गातून पृथ्वीवर आणला असे होते. कृष्णाने प्रथम सात्यकीला आपला ' निसृष्टार्थ–दूत (वाटाघाटीकरिता संपूर्ण अधिकार दिलेला प्रतिनिधि) म्हणून शिष्टाई करण्याकरिता इंद्राकडे पाठविले होते. पण इंद्र त्याचे ऐकेना म्हणून त्याने त्यावर स्वारी केली. संस्कृत महाकाव्यातल्याप्रमाणे 'हरिविजया'त नगरवर्णन, नायकवर्णन, वसंतऋतुवर्णन, सूर्यास्तवर्णन, वादनवर्णन इत्यादि विषय आले होते.

या काव्याचा काळ अनिश्चित होता. सर्वसेन आनंदवर्धनाच्या (म्हणजे ख्रिस्तोत्तर नवव्या शतकाच्या) पूर्वी होऊन गेला हे 'ध्वन्यालोकां'तून उद्धृत केलेल्या 'हरिविजया'तील गाथांवरून स्पष्ट होते, पण त्याच्या काळाविषयी निश्चित माहिती नव्हती. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी आम्ही त्याचा काळ निश्चित केला.

सुप्रसिद्ध संस्कृत कवि दण्डी याचे ' अवन्तिसुन्दरीकथा ' नामक गद्यकाव्य सुमोर चाळीस वर्षांपूर्वी दक्षिणभारतीग्रंथथमालेत प्रसिद्ध झाले. त्याच्या आरंभी बाणाच्या ' हर्षचरिता 'तल्याप्रमाणे प्राचीन कवींच्या स्तुतिपर काही श्लोक आहेत. त्यामध्ये सर्वसेनाविषयी खालील श्लोक आला आहे—

राज्ञा श्रीसर्वसेनेन. . . . . ।
. . . . .विजयं हरेः ॥

या ग्रंथाचे एकच हस्तलिखित प्राप्त झाले आहे व त्याचा पुष्कळ भाग किड्यांनी खाऊन टाकल्यामुळे वाचता येत नाही. वरील श्लोकाचाही बराच भाग त्याच कारणाने नष्ट झाला आहे. तथापि सुदैवाने त्यातील अत्यंत महत्त्वाचा भाग अवशिष्ट राहिला आहे. त्यावरून 'हरिविजय' काव्य सर्वसेननामक **राजाने** रचले होते ही अन्यत्र दुष्प्राप्य अशी माहिती मिळते. या पद्यमय प्रस्तावनेतील इतर कविप्रशंसापर श्लोकांचे निरीक्षण केल्यास ते त्या कवींच्या कालक्रमानुसार घातले आहेत असे ध्यानात येते. सर्वसेनाच्या स्तुतिपर श्लोक भासाच्या प्रशंसेनंतर आणि कालिदासाच्या स्तुतीच्या पूर्वी आला आहे. त्यावरून सर्वसेन हा भासानंतर आणि कालिदासापूर्वी होऊन गेला असे दिसते.

सुमारे तीस वर्षांपूर्वीपर्यंत सर्वसेन नामक राजा सर्वस्वी अज्ञात होता. सन १९३९ मध्ये विदर्भाच्या अकोला जिल्ह्यातील वाशीम (पूर्वीचे वत्सगुल्म) येथे वाकाटकांचा एक ताम्रपट सापडला होता. तो आम्ही नंतर एपिग्राफिया इंडिका (व्हॉ. २६, पृ. १३९ इत्यादि) मध्ये प्रसिद्ध केला आहे. त्यावरून सर्वसेन हा महाप्रतापी वाकाटक सम्राट् पहिला प्रवरसेन (सन २७०–३३०) याचा पुत्र असून वत्सगुल्म शाखेचा संस्थापक होता, ही माहिती मिळाली. अजंटाच्या सोळा नंबरच्या लेण्यातही त्याचे नाव आले होते. पण तो लेख फार खराब झाल्याने त्या लेखाचे पूर्वीचे संपादक भाऊ दाजी, भगवानलाल इंद्रजी आणि बुल्हर यांना त्याचे नाव वाचता आले नव्हते. तोही लेख आम्ही इतरत्र संपादिला असून त्यात सर्वसेनाचे नाव कोठे आले होते हे दाखविले आहे. भारताच्या प्राचीन इतिहासात सर्वसेन नावाचा एकच राजा ज्ञात आहे. तो वाकाटक वंशातला असून सन ३३० ते ३५५ या कालात होऊन गेला, असे आता निश्चित झाले आहे.

आनंदवर्धनाच्या 'ध्वन्यालोका'तील पूर्वोक्त विधानावरून पारिजातहरणाची कथा आरंभी हरिवंशाच्या चिकित्सक आवृत्तीतल्याप्रमाणे अगदी साधीसुधी होती असे दिसते. सर्वसेनाने तिला आपल्या कथानकाचा विषय करताना तीत बराच कल्पनेचा मालमसाला घालून सजविले होते. सर्वसेनाचे काव्य माहाराष्ट्री प्राकृत मध्ये होते. त्यानंतर अकराव्या शतकापर्यंत 'हरि-

वंशा'तील पारिजातहरणकथेत काही बदल झाला नव्हता हे त्या काळी रचलेल्या क्षेमेन्द्राच्या 'भारतमञ्जरी'वरून स्पष्ट दिसते.[१] नंतर मात्र कोणा कवीने सर्वसेनाच्या 'हरिविजया'तल्यासारखे तिला रूप दिले. कृष्णाने पारिजात आणण्याकरिता स्वारी केली ती रुसलेल्या सत्यभामेला प्रसन्न करण्याकरिता, असे दाखविण्यात आले. काही ठिकाणी बदलही करण्यात आला. 'हरिविजया'त कृष्णाने पारिजात आणण्याकरिता शिष्टाई करण्यासाठी सात्यकीला पाठविले, असे सर्वसेनाने कल्पिले होते तर 'हरिवंशा'त त्या कथेचे विस्तृत रूप प्रक्षिप्त करणाऱ्या कवीने शिष्टाईची कामगिरी नारदावरच सोपविली होती. इतरही काही फेरफार त्याने केले असावे. तथापि 'हरिविजया'वरूनच पारिजातहरणाच्या विस्तृत आणि रसयुक्त वर्णनाची कल्पना त्याला सुचली असावी हे स्पष्ट आहे.[२]

सर्वसेनाच्या काळापर्यंत (सन ३३० पर्यंत) 'हरिवंशा'तील पारिजातहरणाचे स्वरूप चिकित्सक आवृत्तीतल्याप्रमाणे साधेसुधे होते. त्या काळी 'महाभारता'त 'हरिवंशा'चा अंतर्भाव होत होता हे मागे दाखविले आहे. तेव्हा 'महाभारत' आणि हरिवंश यांना चिकित्सक आवृत्तीतला आकार त्यापूर्वी निदान शंभर दीडशे वर्षे अगोदर आला असावा असे अनुमान करता येते. **तेव्हा मूळ हरिवंशाला चिकित्सक आवृत्तीतील रूप निदान सन २०० पूर्वी आले असले पाहिजे.** त्या मागे ही मर्यादा किती जाते हे सांगणे सध्याच्या परिस्थितीत अशक्य आहे.[३]

---

१. 'भागवतपुराणा'तही (दशमस्कंध, अध्याय ५९, श्लोक ३९-४०) हेच पारिजातकथेचे साधे रूप आढळते. त्या पुराणाचा काळ सुमारे दहावे शतक असा डॉ. विंटरनिट्झने मानला आहे.

२. कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतला'चे अनुकरण 'पद्मपुराणात' आणि 'कुमारसंभवा'चे 'शिवपुराणा'त केलेले आम्ही इतरत्र दाखविले आहे. पाहा : 'कालिदास,' पृ. ११५ आणि २०३.

३. पतंजलीच्या 'महाभाष्या'वरून कृष्णकथा ख्रिस्तपूर्व १५० च्या सुमारास प्रचलित होती, हे स्पष्ट दिसते. पण त्याकाळी 'हरिवंश' ग्रंथ रचला होता काय हे निश्चितपणे सांगता येत नाही.

४. 'मेघदूता'तील एक वादग्रस्त पाठ

कालिदासाचे 'मेघदूत' काव्य सर्वपरिचित आहे. त्यातील कथा अशी. अलका नगरीत कुबेराचा सेवक यक्ष याने काही प्रमाद केला. तेव्हा कुबेराने त्याला 'तुझा महिमा एक वर्षभर नष्ट होईल' असा शाप दिला. म्हणून त्याला अलका नगरी सोडावी लागली. नंतर तो जेथील जलाशय सीतेच्या स्नानामुळे पवित्र झाले आहेत अशा रामगिरीच्या आश्रमात येऊन राहिला. याप्रमाणे पत्नीवियोगात सुमारे आठ महिने घालविल्यावर वर्षाकालाच्या आरंभी रामगिरीवर आलेल्या मेघाला पाहताच त्याचे वियोगदुःख असह्य झाले. आपल्या प्रेमळ पत्नीचीही अशीच अवस्था झाली असावी असे वाटून त्याने त्या मेघालाच आपला दूत करून आपल्या कुशलाची वार्ता आपल्या पत्नीला पाठविण्याचे ठरविले आणि त्याला रामगिरीपासून अलकेचा मार्ग सांगितला. अलकेला पोचल्यावर त्याने त्याला आपल्या गृहाची खूण सांगून आपल्या पत्नीला सांगण्याचा संदेश दिला. त्यामध्ये तो म्हणतो--

शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शाङ्गंपाणौ
मासानन्यान्गमय चतुरो लोचने मीलयित्वा ।
पश्चादावां विरहगुणितं तं तमेवाभिलाषं
निर्वेक्ष्यावः परिणतशरच्चन्द्रिकासु क्षपासु ।।

'भगवान् विष्णु आपल्या सर्पशय्येवरून उठतील तेव्हा–अर्थात् कार्त्तिक शुक्ल एकादशीस–माझ्या शापाची समाप्ती होणार आहे. तेव्हा तू राहिलेले चार महिने डोळे मिटून दुःख सहन करीत घालव. नंतर आपण शरद ऋतूतील शुभ्र चांदण्यात पूर्वीच्या विरहाने ज्यांची गोडी वाढली आहे, अशा अनेक उपभोगांचे सेवन करू.'

कार्त्तिक शुक्ल एकादशीस यक्षाचा शाप संपणार होता. त्याच्या अगोदर चार महिने म्हणजे आषाढ शुक्ल एकादशीस त्याचा हा संदेश त्याच्या पत्नीस पोचावयाचा होता. त्या तिथीपूर्वी यक्षाने तो मेघास दिला होता, हे उघड आहे. यक्षाला मेघ केव्हा दिसला याचा निर्देश कालिदासाने मेघदूताच्या दुसऱ्याच श्लोकात केला आहे. त्यातील एका शब्दाचे दोन भिन्न पाठ टीकाकारांनी दिल्यामुळे यक्षाने खरोखरी मेघ केव्हा पाहिला याविषयी प्राचीन टीकाकारांत तसेच आधुनिक विद्वानांतही मतभेद उत्पन्न झाला आहे. त्या पाठांची चिकित्सा करून यक्षाच्या मेघदर्शनाचा दिवस प्रस्तुत लेखात निश्चित करावयाचा आहे. ते पाठ असे--

(१) **तस्मिन्नद्रौ कतिचिदबलाविप्रयुक्तः स कामी**
नीत्वा मासान् कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ।
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ॥ (मेघ. २)

यात 'आषाढाच्या पहिल्या दिवशी' अशा अर्थाचा पाठ आहे.

(२) याच्या उलट 'आषाढस्य प्रशमदिवसे' असा (आषाढाच्या शेवटच्या दिवशी या अर्थाचा) दुसरा पाठ काही टीकाकारांनी दिला किंवा चर्चिला आहे.

पहिला पाठ अत्यंत जुना आहे. ख्रिस्तोत्तर आठव्या शतकाच्या प्रथमार्धात होऊन गेलेल्या जिनसेन नामक जैन कवीने रचलेल्या 'पार्श्वाभ्युदय' या संस्कृत काव्यात सबंध 'मेघदूता'चा समस्यापूर्तिरूपाने उपयोग केला आहे. त्या काव्याच्या सातव्या श्लोकात 'आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुम्' असाच पाठ घेऊन समस्यापूर्ती केली आहे. त्यानंतर स्थिरदेव, दक्षिणावर्त, मल्लिनाथ, पूर्णसरस्वती, भरतमल्लिक इत्यादी अनेक टीकाकारांनी हाच पाठ दिला आहे. ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकातील क्षेमेन्द्राने आपल्या 'सुवृत्ततिलकां'त कालिदासाचा हा श्लोक उद्धृत केला आहे त्यात 'प्रथमदिवसे' असाच पाठ आहे. मल्लिनाथाने तर दुसऱ्या पाठाची चिकित्सा करून हाच पाठ ग्राह्य ठरविला आहे. आधुनिक विद्वानांपैकी बहुतेकांनी आपल्या 'मेघदूता'च्या आवृत्तीत हाच पाठ

स्वीकारला आहे. अलीकडे डॉ. सुशील कुमार दे यांनी अनेक हस्तलिखिते व आवृत्त्या जमवून 'मेघदूता'ची चिकित्सक आवृत्ती संपादिली आहे. तीत हाच पाठ शुद्ध म्हणून घेतला आहे.[१] याप्रमाणे बहुमत या पाठालाच अनुकूल आहे.

याच्या उलट 'प्रशमदिवसे' असा पाठ काही थोडचा टीकाकारांनी दिला आहे. त्यांतील सर्वात प्राचीन टीकाकार ख्रिस्तोत्तर दहाव्या किंवा अकराव्या शतकात होऊन गेलेला वल्लभदेव हा होय. याने हा पाठ देऊन शिवाय 'प्रथमदिवसे' असा चुकीचा पाठ कसा प्रचलित झाला याविषयी अनुमानही केले आहे. तो म्हणतो, 'केचित्तु शकारथकारयोर्लिपिसारूप्यमोहात् प्रथम इत्यूचुः...वर्षाकालस्य प्रस्तुतत्वादादिदिनमित्येतत्त्वतीव विरुद्धम्।' (श आणि थ यांचे साम्य असल्यामुळे काहीनी 'प्रशमदिवसे' याच्या ऐवजी 'प्रथमदिवसे' असे चुकीने वाचले आहे. आषाढाच्या अखेरीस वर्षाकाल असल्यामुळे आषाढाचा पहिला दिवस या अर्थाचा हा पाठ त्याला अगदीच विरुद्ध आहे.) यानंतर शाश्वत या टीकाकाराने आपल्या 'कवि-प्रिया' नामक टीकेत वल्लभदेवाचा उल्लेख करून हाच पाठ स्वीकारला आहे. त्याने 'प्रथमदिवसे' या पाठाचाही उल्लेख केला आहे. अलीकडे म. म. कृष्णशास्त्री घुले यांनी मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या एका सभेत वाचलेल्या निबंधात या प्रश्नाची सविस्तर चर्चा करून 'प्रशमदिवसे' हाच पाठ खरा असल्याबद्दल आपले मत व्यक्त केले होते.[२] त्यांच्या प्रमाणांचा पुढे विचार करू.

'प्रथमदिवसे' आणि 'प्रशमदिवसे' यांच्यापैकी कालिदासाचा पाठ कोणता हे ठरविण्यास 'मेघदूता'त दोनच अन्तःप्रमाणे उपलब्ध आहेत आणि त्यांच्याच बलावर दोन्ही पक्षांनी आपापल्या मताचे समर्थन केले आहे. ती प्रमाणे अशी— (१) चौथ्या श्लोकात 'प्रत्यासन्ने नभसि दयिता-जीवितालम्बनार्थी' या पादात यक्षाने मेघ पाहिला तेव्हा नभः म्हणजे

---

१. साहित्य अकादमीने प्रसिद्ध केलेली मेघदूताची आवृत्ती. पृष्ठ ४१.

२. निवडक निबंध, खंड १ (मध्यप्रान्त संशोधन मंडळ, १९४९) पृष्ठ १५–२१.

श्रावणमास जवळ आला होता असे कालिदासाने म्हटले आहे. 'प्रशमदिवसे' या पक्षाचे म्हणणे असे की यावरून यक्षाने मेघ आषाढाच्या शेवटच्या दिवशी पाहिला असे स्पष्ट दिसते; कारण त्यानंतर दुसऱ्या दिवशी श्रावण महिना सुरू होणार होता. शिवाय श्रावण महिन्यात पावसाळा सुरू होतो हे कालिदासाने सांगितले आहे.

रघुवंशाच्या बाराव्या सर्गातील २९ व्या श्लोकात

न जहार तयोर्मध्ये मैथिलीं लोकशोषणः ।
नभोनभस्ययोर्वृष्टिमवग्रह इवान्तरे ।।

(श्रावण व भाद्रपद या महिन्यांत अवर्षणाने वृष्टीला नाहीसे करावे त्याप्रमाणे त्या विराध राक्षसाने राम व लक्ष्मण यांच्यामध्ये असलेल्या सीतेचे हरण केले) असे कालिदासाने म्हटले आहे. कालिदासाच्या काळी आषाढ हा पावसाळचाचा महिना नसून ग्रीष्माचा होता हेही कालिदासाने रघुवंशातील (३,३) खालील श्लोकात सांगितले आहे—

तदाननं मृत्सुरभि क्षितीश्वरो रहस्युपाघ्राय न तृप्तिमाययौ ।
करीव सिक्तं पृषतैः पयोमुचां शुचिव्यपाये वनराजिपल्वलम् ।।

(जसा एखादा हत्ती आषाढाच्या अखेरीस मेघबिंदूंनी शिंपडलेल्या अरण्यातील डबक्याचा वास घेऊन तृप्त होत नाही, त्याप्रमाणे दिलीप राजा मृत्तिकाभक्षणाने सुगंधित झालेले आपल्या गरोदर सुदक्षिणा राणीचे मुख एकांतात हुंगून तृप्त झाला नाही.)

या श्लोकाच्या टीकेत मल्लिनाथाने 'शुचिव्यपाये' याचा अर्थ 'ग्रीष्मावसाने' (उन्हाळचाच्या अखेरीस) असा दिला आहे. पण कालिदासाच्या काळी 'शुचि' याचा अर्थ 'उन्हाळा' असा होत नव्हता; कारण 'अमरकोशा'त 'शुचि' याचा 'आषाढ' एवढाच अर्थ दिला आहे. 'ग्रीष्म' असा दिला नाही. तेव्हा 'प्रत्यासन्ने नभसि' या कालिदासोक्तीवरून 'आषाढस्य प्रशमदिवसे' हाच पाठ समर्थित होतो असे पं. कृष्णशास्त्री घुले यांनी म्हटले आहे.

दुसऱ्या 'प्रथमदिवसे' या पक्षाला हे प्रमाण आपल्या विरोधी आहे असे वाटत नाही. मलिनाथाने या प्रमाणाची सविस्तर चर्चा आपल्या

टीकेत केली आहे. तो म्हणतो " केचित् 'आषाढस्य प्रथमदिवसे' इत्यत्र 'प्रत्यासन्ने नभसि' इति वक्ष्मनाणनभोमासप्रत्यासत्त्यर्थं 'प्रशमदिवसे' इति पाठं कल्पयन्ति तदसंगतम् । प्रथमातिरेके प्रमाणाभावात् । नभोमासस्य प्रत्यासत्त्यर्थमित्युक्तमिति चेत्, न । प्रत्यासत्तिमात्रस्य मासप्रत्यासत्त्यैव प्रथमदिवसस्याप्युपपत्तेः । अत्यन्तप्रत्यासत्तेरुपयोगाभावेनाविवक्षितत्वात् । विवक्षितत्वे वा स्वपक्षेऽपि प्रशमदिवसान्तिमक्षणे मेघदर्शनकल्पनायां प्रमाणाभावेन तदसंभवात् । प्रत्युतास्मत्पक्ष एव कुशलसंदेशस्य भाव्यनर्थप्रतीकारस्य पुरत एवानुमानमुक्तं भवतीत्युपयोगसिद्धिः । याचा भावार्थ असा. मल्लिनाथ म्हणतो—" काही लोक 'आषाढस्य प्रथमदिवसे' असा कालिदासाचा पाठ असावा अशी कल्पना करतात. कारण पुढे कालिदासाने 'श्रावण मास जवळ आला असता' असे म्हटले आहे. पण हे बरोबर नाही. कारण श्रावण मास हा आषाढमासालाही जवळ आहेच. यक्षाने मेघ पाहिला, त्यानंतर लागलीच श्रावण महिना सुरू झाला असा अर्थ कवीला विवक्षित नाही. कारण त्याने 'आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवसाच्या शेवटच्या क्षणी' असे काही म्हटले नाही. शिवाय 'आषाढस्य प्रथमदिवसे' असा आमचा पाठ स्वीकारल्यास श्रावण महिन्यात मेघदर्शनाने यक्षपत्नीला जो दुःखाचा धक्का बसणार होता त्याचा प्रतिकार यक्षाने अगोदरच आषाढ महिन्याच्या आरंभीच आपल्या पत्नीला आपण कुशल असल्याचा संदेश मेघामार्फत पाठवून केला होता असे अनुमान करणे योग्य होईल."

'मेघदूताती ल कविविवक्षित पाठाबद्दल दोन्ही पक्षांचे म्हणणे वर दिले आहे. त्यावरून त्या दोघांनाही 'प्रत्यासन्ने नभसि' याचा 'श्रावणमास जवळ आला असता' असा अर्थ मान्य आहे, हे दिसून येईल. पण कालिदासाला तो अर्थ विवक्षित नसावा. संस्कृत वाङ्मयात विरही जनांची अनेक वर्णने आली आहेत. पण त्यात कोठेही श्रावण मास आल्याने त्यांच्या विरहदुःखाचा उद्रेक झाल्याचे वर्णन आढळत नाही. पावसाळ्याने त्यांचे दुःख असह्य होते असे मात्र सर्वत्र म्हटले आहे. याचे कारणही उघड आहे. प्राचीन काळी उद्योगाच्या निमित्ताने लोक परदेशी जात ते पावसाळ्याच्या आरंभी परत येत. तेव्हा मेघदर्शनाने आपल्या प्रियजनांची आठवण प्रवा-

शांना तसेच त्यांच्या प्रेयसींनाही होऊन त्यांचे विरहदु:ख वाढत असले तर त्यात आश्चर्य नाही. कालिदासानेही ही कल्पना मेघदूताच्या ९६ व्या श्लोकातील

'यो वृन्दानि त्वरयति पथि श्राम्यतां प्रोषितानां
मन्द्रस्निग्धैर्ध्वनिभिरबलावेणिमोक्षोत्सुकानि ।। '

या मेघवर्णनात केली आहे. तेव्हा 'प्रत्यासन्ने नभसि' याचा अर्थ 'पावसाळा जवळ आला असता' असा केला पाहिजे. हे कोणाही टीकाकाराच्या किंवा संशोधकाच्या ध्यानात आले नाही हे आश्चर्य आहे. संस्कृतमध्ये 'नभस्' याचा अर्थ 'वर्षाकाल' असाही होतो. 'विश्वकोशा'तील खालील श्लोक पाहा—

नभो व्योम्नि नभा मेघे श्रावणे च पतद्ग्रहे ।
घ्राणे मृणालसूत्रे च वर्षासु च नभाः स्मृतः ।।

यात नभस् याचा वर्षाकाल हा अर्थ दिला आहे. हा अर्थ घेतला असता तो 'आषाढस्य प्रथमदिवसे' या पाठाला ठीक जमतो. कारण आषाढ महिन्यातच पावसाळ्याचा आरंभ होत असे.

प्राचीन काळी वर्षाकालाचे चार महिने गणण्यात येत. या चातुर्मासात बौद्ध भिक्षूंनी बाहेर न हिंडता एखाद्या विहाराचा आश्रय करून तो काळ घालवावयाचा असे. याकरिता पर्वतांत लेणी कोरली असत व त्यांत चारी दिशांच्या भिक्षूंना आश्रय मिळे. भगवान् विष्णु आषाढ शुक्ल एकादशी (किंवा शयनी एकादशी) पासून कार्त्तिक शुक्ल एकादशी (किंवा प्रबोधिनी एकादशी) पर्यंत शेषशय्येवर निद्रित असतात, या समजुतीच्या मुळाशी हीच कल्पना होती. कालिदासानेही या कल्पनेचा निर्देश 'शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शाङ्‌र्गपाणौ' या पादात केला आहे.

कालिदासाने आषाढाला ग्रीष्माचा महिना मानला नाही. रघुवंशातील मागे उद्‌धृत केलेल्या 'शुचिव्यपाये' याचा अर्थ 'ग्रीष्म ऋतु संपल्यावर' असाच केला पाहिजे. आणि तसाच तो सर्व टीकाकारांनी केला आहे. 'आषाढाच्या अखेरीस' हा घुलेशास्त्र्यांनी सुचविलेला अर्थ येथे योग्य नाही व तशी कल्पना इतरत्र कोठे आढळत नाही.

कालिदासाने ऋतुसंहारात सहा ऋतूंचे वर्णन केले असले तरी सामान्यत: ग्रीष्म, वर्षा व हेमन्त असे चार चार महिन्यांचे तीनच ऋतू मानण्यात येत आणि या तिघांचाच निर्देश प्राचीन कोरीव लेखांत आढळतो—या ऋतूंचे दक्षिणेत प्रत्येकी आठ पक्ष आणि प्रत्येक पक्षाचे १५ दिवस आणि उत्तरेत चार महिने व प्रत्येक महिन्याचे तीस दिवस अशी गणना केली जात असे. खालील उल्लेख पाहा—

(अ) दक्षिण भारत—

(१) नाशिकच्या लेण्यांतील गौतमीपुत्र सातकर्णीचा लेख–[१] सवछरे १० (+) ८ वासपखे २ दिवसे १.

(२) नाशिकच्या लेण्यांतील यज्ञसातकर्णीचा लेख–[२] संवछरे सातमे ७ हेमताण पखे ततिये ३.

(आ) उत्तर भारत–

(१) कनिष्काचा सारनाथ येथील लेख–[३] सं ३ हे ३ दि २० (+) २

(२) हुविष्काचा मथुरेतील बुद्धमूर्तीवरील लेख–[४] सं ३० (+) ३ गृ १ दि. ३.

वर्षाकालाच्या चार महिन्यांचा उल्लेख कालिदासाने 'शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शाङ्‌र्गपाणौ । मासानन्यान्गमय चतुरो लोचने मीलयित्वा ' या श्लोकार्धात केला आहे. कार्त्तिक शुक्ल एकादशीस शाप संपावयाचा होता. त्याच्या अगोदर चार महिने यक्षाचा संदेश त्याच्या पत्नीला पोचावयाचा होता. अर्थातच मेघ आषाढ शुक्ल एकादशीस अलकेस पोचणार होता. तेव्हा यक्षाने रामगिरीवर मेघ आषाढ महिन्याच्या अखेरीस (श्रावण महिन्याच्या आरंभाच्या अगोदर एक दिवस) पाहिला असणे

---

१. *Ep. Ind.*, Vol. VIII, pp. 71 f.

२. *Ibid.*, Vol. VIII, pp. 94 f.

३. *Ep. Ind.*, Vol. VIII, pp. 173 f.

४. *Ibid.*, Vol XXXIII, p. 39.

शक्य नाही. म्हणून 'प्रत्यासन्ने नभसि' याचा अर्थ 'वर्षा ऋतू किंवा पावसाळा जवळ आला असता' असाच केला पाहिजे हे उघड आहे.

'शुचि' याचा ग्रीष्मऋतू, आणि 'नभस्' याचा वर्षाऋतू हे अर्थ 'अमरकोशा'त दिले नसले तरी इतर कोशांत दिले आहेत. ह्या शब्दांचे हे अर्थ कालिदासकाळी प्रचलित नव्हते असे मानण्यास प्रमाण नाही. रघुवंशातील (१२, २९) श्लोकात श्रावण व भाद्रपद महिन्यांतील अवर्षणाचा उल्लेख आहे खरा, पण त्यावरून आषाढ व आश्विन महिन्यांत वृष्टी होत नसे असे नाही. श्रावण–भाद्रपद महिन्यांतील वृष्टीला पिकांच्या दृष्टीने विशेष महत्त्व असल्याने त्या महिन्यांतील अवर्षणाचा कालिदासाने मुद्दाम उल्लेख केला आहे इतकेच.

तेव्हा 'प्रत्यासन्ने नभसि' हे प्रमाण 'आषाढस्य प्रथमदिवसे या पक्षाला मुळीच बाधक नसून उलटे साधकच आहे. कारण या पक्षात मेघदर्शनापासून कार्त्तिक शुक्ल एकादशीपर्यंत ४ महिने १० दिवस होतात, यांतील १० दिवस रामगिरीपासून अलकेपर्यंतच्या मेघाच्या प्रवासास लागणारा काळ होय.

(२) 'प्रत्यासन्ने नभसि' याचा अर्थ 'श्रावण मास जवळ आला असता' असा केल्यावर टीकाकारांच्या पुढे श्लोक १०७ मधील 'मासान्न्यान्गमय चतुरो लोचने मीलयित्वा' या निर्देशाची उपपत्ती कशी लावावयाची हा प्रश्न उभा राहिला. आणि त्या पक्षांनी त्याचे उत्तर आपापल्या परीने दिले. मल्लिनाथाने आपल्या 'संजीविनी' टीकेत याची चर्चा केली आहे. तो 'आषाढस्य प्रथमदिवसे' हा पाठ मानणारा आहे, हे मागे सांगितलेच आहे. तो म्हणतो, "कथं तर्हि 'शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शाङ्‌र्गपाणौ' इत्यादिना भगवत्प्रबोधावधिकस्य शापस्य मासचतुष्टयावशिष्टस्योक्तिः। दशदिवसाधिक्यादिति चेत्स्वपक्षेऽपि कथं सा विंशतिदिवसैर्न्यूनत्वादिति सन्तोष्टव्यम्। तस्मादीषद्वैषम्यमविवक्षितमिति सुष्ठूक्तं 'प्रथमदिवसे' इति।" (मल्लिनाथ म्हणतो, आषाढाच्या पहिल्या दिवशी यक्षाने मेघ पाहिला असे मानल्यास श्लोक १०७ मधील "माझा शाप भगवान् विष्णू सर्पशय्येवरून उठतील त्यावेळी म्हणजे कार्त्तिक शुक्ल एकादशीस संपेल. तेव्हा तू चार महिने वाट पाहा." या उक्तीशी तो

पाठ जमत नाही. कारण आषाढ महिन्याच्या आरंभापासून शयनी एकादिशीपर्यंत १० दिवस आणि तेथून पुढे प्रबोधिनी एकादशीपर्यंत चार महिने, असे चार महिने १० दिवस होतात. यक्ष तर आपल्या पत्नीला चार महिनेच वाट पाहण्यास सांगतो, असा आक्षेप आमच्या ' प्रथमदिवसे ' या पाठावर कोणी काढल्यास त्यावर आमचे उत्तर हे की ' प्रशमदिवसे ' असा तुमचा पाठ स्वीकारल्यास आषाढ महिन्याच्या अन्तापासून प्रबोधिनी एकादशीपर्यंत चार महिने पूर्ण होत नसून वीस दिवस कमी भरतात. आमच्या पक्षाप्रमाणे दिवसांची चूक कमी होत असल्याने ' प्रथमदिवसे ' हाच पाठ बरोबर आहे.) दुसरा एक टीकाकार भरतमल्लिक ह्याने आपल्या ' सुबोधा ' टीकेत दुसरीच उपपत्ती सुचविली आहे. त्याने ' प्रथमदिवसे ' हाच पाठ स्वीकारला आहे. तो बंगाली होता. बंगालात सौर मासगणना प्रचारात आहे. ' आषाढापासून कार्त्तिकापर्यंत पाच महिने होतात हे कसे ? ' या प्रश्नावर त्याचे उत्तर हे की यक्षाने मेघ पाहिला तरी त्याने लागलीच मेघाला संदेश दिला नाही. त्याने आषाढ महिना दुःखात कसा तरी घालवून श्रावण महिन्यात (प्रत्यासन्ने नभसि) यक्षाला संदेश सांगितला. भरतमल्लिक याचे हे उत्तर कोणास पटणार नाही. त्याने ' केचित्तु प्रथं ख्यातं, अदिवसे विष्णुदिवसे, शुक्लैकादश्याम् ' असेही दुसरे स्पष्टीकरण दिले आहे. पण तेही कोणास पटणार नाही. कारण असा शब्दच्छल कालिदासाच्या काव्यात कोठेही आढळत नाही.

पं. कृष्णशास्त्री घुले यांनी दुसरीच उपपत्ती सुचविली आहे. ते म्हणतात, " मल्लिनाथाने जी मासांची गणना केली आहे ती चान्द्र म्हणजे अमान्त मास धरून केली आहे हे उघड आहे. पण मासगणनापद्धती अमान्त ही एकच नसून दुसरी सौर म्हणजे पौर्णिमान्तही पद्धती आहे. आणि यक्ष व कालिदास हे दोघेही औदीच्य असल्यामुळे त्यांना तीच विवक्षित असली पाहिजे. तेव्हा त्या पद्धतीने विचार केल्यास आषाढाचा पहिला दिवस म्हणजे आपल्या कडील ज्येष्ठ वद्य प्रतिपदा होत असल्यामुळे तेथून कार्त्तिक शुद्ध एकादशीपर्यंत मोजल्यास ४ महिने २६ दिवस होतात. म्हणजे २६ दिवस अधिक होतात व आषाढाचा शेवटचा दिवस

म्हणजे आपल्याकडील आषाढ शुद्ध पौर्णिमा होत असल्यामुळे तेथून गणना केल्यास कार्त्तिक शुद्ध एकादशीपर्यंत ४ महिन्याला फक्त ४ च दिवस कमी होतात. पण मी हे कार्त्तिक शुक्ल एकादशी म्हणजे प्रबोधैकादशी हाच उत्थानदिवस होय हे समजून सांगत आहे. पण खरे पाहिले तर कालिदासाच्या काळी प्रबोधदिन कार्त्तिकाच्या अन्त्य दिनी होत असल्यास चार दिवसांचेही अंतर राहत नाही. अर्थात् या गणनेप्रमाणे 'आषाढस्य प्रशमदिवसे' हाच पाठ ग्राह्य ठरतो."

पं. कृष्णशास्त्री यांच्या लेखातील या उताऱ्यात अनेक विधाने चुकीची आहेत. अमान्त आणि पूर्णिमान्त मासगणनेच्या दोन्ही पद्धती चान्द्रच होत. पहिली चान्द्र आणि दुसरी सौर असा प्रकार नाही. सौरमासगणनापद्धतीत पक्षांना स्थान नाही व कालिदासाच्या कोणत्याही ग्रंथात किंबहुना कोणत्याही प्राचीन कोरीव लेखात सौरमासगणनापद्धतीचा उल्लेख नाही.[१] सध्या पूर्णिमान्त मासगणनापद्धती उत्तर भारतात प्रचलित आहे. यक्ष हा उत्तरेतील हिमालय पर्वतावरील अलकेत राहणारा. कालिदासही उत्तरेत उज्जयिनीत विक्रमादित्याच्या दरबारी होता. तेव्हा त्याने रचलेल्या मेघदूतास पूर्णिमान्त मासगणनापद्धती अनुसरिली असावी या पं. कृष्णशास्त्री यांच्या अनुमानास उत्तर हे की कालिदासाने मेघदूत काव्य दक्षिणेतील विदर्भात नागपूरपासून २७ मैलांवर असलेल्या रामगिरीवर (सध्याच्या रामटेकावर) किंवा त्याच्या जवळ तीन मैलांवर असलेल्या नन्दिवर्धन (सध्याचे नन्दरधन) या वाकाटकांच्या राजधानीत रचले, हे आम्ही इतरत्र सिद्ध केले आहे.[२] तेव्हा त्याने त्यात विदर्भात त्या काळी प्रचलित असलेली मासगणनापद्धती अनुसरिली असावी हे उघड आहे. आता आपण त्या काळी विदर्भात कोणती पद्धती प्रचलित होती ते पाहू. त्या काळी विदर्भात राज्य करणाऱ्या वाकाटक नृपतींचे अनेक लेख

१. हे प्रा. प्रबोधचन्द्र सेनगुप्तांनीही मान्य केले आहे. ते म्हणतात, 'I have not as yet come across any mention of solar months in Indian epigraphy (*Ancient Indian Chronology*, p. 271.)

२. मेघदूतांतील रामगिरी अर्थात रामटेक, पृ. २६–४५.

सापडले आहेत. त्यांपैकी बहुतेकांत शुक्लपक्षातील तिथींचे उल्लेख आहेत. शुक्लपक्ष हा पूर्णिमान्त आणि अमान्त या दोन्ही मासगणनापद्धतीत समान असल्यामुळे त्या तिथिनिर्देशांचा प्रस्तुत प्रश्नाच्या उत्तरास उपयोग नाही. दोन तिथिनिर्देश वद्य पक्षातील आहेत खरे, पण त्यांबरोबर ग्रहण, संक्रान्ति इत्यादिकांचा निर्देश नसल्याने त्यांचाही प्रस्तुत प्रश्ननिर्णयास काही उपयोग होत नाही.[1] पण वाकाटकांनंतर ज्याचे राज्य विदर्भात झाले त्या राष्ट्रकूटवंशी स्वामिराजाच्या नन्दिवर्धनातून दिलेल्या सन ५७३ च्या ताम्रपटातील कालनिर्देशाचा या बाबतीत उपयोग होतो. त्यात चैत्र महिन्यातील सूर्यग्रहणाचा उल्लेख आहे. तो अमान्त मासगणनेस जुळतो हे आम्ही इतरत्र दाखविले आहे.[2] यावरून कालिदासकाळीही विदर्भात अमान्तमासगणनापद्धती प्रचलित होती हे सिद्ध होते. तेव्हा 'मेघदूतातील कालोल्लेखावरून 'आषाढस्य प्रशमदिवसे' हाच पाठ ग्राह्य ठरतो' हे कृष्णशास्त्र्यांचे विधान लटके पडते.

शिवाय 'प्रशमदिवसे' हा शब्दप्रयोगही उचित वाटत नाही. 'अन्त' किंवा 'शेवट' या अर्थी 'प्रशम' या शब्दाचा कालवाचक शब्दाशी जोडून प्रयोग कालिदासानेच नव्हे तर कोणाही संस्कृत कवीने केलेला आढळत नाही. कालिदास त्याअर्थी 'अन्त' शब्द योजितो. 'दिनान्ते निहितं तेजः' (रघु. ४, १) इत्यादी प्रयोग पाहा.

'मेघदूता'तील (श्लो. १०७) 'मासानन्यान् गमय चतुरो' इत्यादी चार मासांचा उल्लेख आपण स्वीकारलेल्या 'प्रशमदिवसे' या पाठाला जुळावा म्हणून भगवान् विष्णूचा प्रबोधदिन कार्तिक शुक्ल एकादशीस न मानता कार्तिकाच्या अन्त्य दिनी मानावा अशी एक कल्पना कृष्णशास्त्र्यांनी मांडली आहे. पण ती ग्राह्य नाही. भगवान् विष्णू कार्तिक शुक्ल एकादशीस सर्पशय्येवरून उठतात ही कल्पना अत्यंत प्राचीन आहे. आणि म्हणूनच त्या एकादशीचे महत्त्व प्राचीन काळापासून आजतागायत

---

१. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, पृ. १०९.

२. *Inscriptions of the Kalachuri-Chedi Era* (C. I. I., Vol. IV, part ii), pp. 613 f.

चालू आहे. कालिदासाच्या काळीही ही एकादशी अत्यंत पवित्र गणली जात असे. वाकाटकांच्या उपलब्ध ताम्रपटांपैकी चार ताम्रपट कार्त्तिक शुक्ल द्वादशीस (एकादशीच्या उपोषणाच्या पारणाप्रसंगी) दिले होते.[१] त्यांपैकी एक तर रामगिरीवर भगवान् रामचन्द्राच्या पादुकांजवळ दिला होता.[२] (प्रभावती गुप्तेच्या ऋद्धपुर ताम्रपटातील 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' हा उल्लेख पाहा.) तेव्हा त्या तिथीचाच उल्लेख मेघदूतात आला असला पाहिजे. कार्त्तिक शुक्ल पौर्णिमेला प्रबोधन होत असे याला यत्किंचित्‌ही प्रमाण नाही.

मेघदूतातील आषाढ महिन्याच्या ह्या उल्लेखावरून काही विद्वानांनी कालिदासाचा काल ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत लेख संपविण्यापूर्वी त्याचाही विचार केला पाहिजे.

कलकत्ता विश्वविद्यालयाचे गणिताचे प्राध्यापक श्री. प्रबोधचंद्र सेनगुप्त यांनी कालिदासाच्या ग्रंथातील काही ज्योतिषविषयक उल्लेखांचे गणित करून इ. स. चे सहावे शतक हा त्या कवीचा काल ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पुढे मांडलेल्या प्रमाणांपैकी एक मेघदूतातील प्रस्तुत कालोल्लेखविषयक आहे.

त्यांनी 'आषाढस्य प्रशमदिवसे' असा पाठ स्वीकारून खालील अनुमान केले आहे–

कालिदासाने चान्द्रमास आषाढ याच्या एकादशीस मेघ पहिला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी श्रावण महिना सुरू होणार होता ('प्रत्यासन्ने नभसि' पाहा). तेव्हा त्या तिथीस संपणारा आषाढ सौर मास असला पाहिजे.[३] त्या दिवशी कालिदासकाळी दक्षिणायनारंभ होत असे व पावसाळ्यास सुरवात होई. या तीन उल्लेखांचे गणित केले असता हा दिवस

१. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, पृ. १०९.

२. पूर्वोक्त, पृ. २३९.

३. प्रा. प्रबोधचन्द्र सेनगुप्त या सौरमास-निर्देशाला अतिशय महत्त्व देतात व त्यावरून 'आषाढस्य प्रशमदिवसे' हाच कालिदासाचा पाठ असला पाहिजे, असे अनुमान करतात. ते म्हणतात, " The day on which

[पुढील पानावर]

२० जून इ. स. ५४१ हा येतो. म्हणून कालिदास सहाव्या शतकात होऊन गेला असावा[१].

प्रा. सेनगुप्त यांचे वरील अनुमान भ्रामक आहे. कालिदास आपल्या ग्रंथात कोठेही सौर मासांचा उल्लेख करीत नाही हे मागे सांगितले आहेच. तो मेघदूतात, प्रा. सेनगुप्त म्हणतात त्याप्रमाणे, सौर व चान्द्र मासांची भेसळ करील हे संभवत नाही. शिवाय कालिदासाचा खरा पाठ 'आषाढस्य

[मागील पानावरून]

the Yaksha is said to have addressed the cloud-messenger was that of the 11th tithi of lunar Āshāḍha. As this day can never be the first or the last day of the lunar Āshāḍha, and as this day can never fall on the first day of solar Āshāḍha, the real reading of the text is *praśama-divase*, and not *prathama-divase*, the month being solar and never the lunar Āshāḍha" (*A. I. C.*, p. 268).

१. कालिदासाने सौरमासाचा निर्देश केला असल्याने त्याचा काल शक संवत् ३९८ (इ. स. ४७६) मध्ये जन्मलेल्या आर्यभटाच्या पूर्वी असणे शक्य नाही. तो इ. स. ५४१-४६ च्या सुमारास असला पाहिजे याविषयी प्रा. सेनगुप्त यांचे ठासून केलेले पुढील विधान पाहा– "We have also shown that as the dates of all extant Hindu scientific *siddhāntas* cannot be earlier than 499 A. D., March 21, and that it may even be later than 522 A. D., the date of Kālidāsa cannot but be about 541-46 A. D., as he uses the phrase *Āshāḍhasya praśama-divase*, which cannot but mean the last day of the solar month of Āshāḍha. Even by the learned ancients such an expression, indicating the use of a solar month, was not possible before the time of Ārya-bhaṭa, so far as I have come to learn from my study of Hindu astronomy for more than three decades". *Ancient Indian Chronology*, p. 273.

प्रथमदिवसे' कसा आहे, आणि 'प्रत्यासन्ने नभसि' याचा अर्थ 'श्रावण मास जवळ आला असताना' असा नसून 'पावसाळा जवळ आला असताना' असा घेतला पाहिजे हेही मागे दाखविले आहे. त्यामुळे प्रा. सेनगुप्त यांच्या या प्रमाणाचा पायाच ढासळून पडला आहे.

कालिदास आषाढात वर्षाऋतूचा आरंभ मानीत असे हे मागे दाखविले आहे. ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकाच्या आरंभी होऊन गेलेला वराहमिहिरही आषाढातच वर्षाकालाचा आरंभ सांगतो.[१] सध्या तो ज्येष्ठ महिन्याच्या शुक्लपक्षात होतो. हा फरक गेल्या दीड हजार वर्षांतील अयनचलनाने (precession of equinoxes) झाला आहे. कालिदास गुप्तकालात वराहमिहिरापूर्वी सुमारे सवाशे वर्षे होऊन गेला. त्या काली वराहामिहिराच्या कालातीलच परिस्थिती असली तर त्यात आश्चर्य नाही. तेव्हा कालिदासकाली वर्षाऋतूचा आरंभ आषाढातच होत असला पाहिजे. म्हणून 'आषाढस्य प्रथमदिवसे' हाच पाठ ग्राह्य आहे.

'कालिदास' ग्रंथाच्या पिहल्या आवृत्तीत आम्ही 'आषाढस्य प्रथमदिवसे' हा पाठ ग्राह्य धरून विवेचन केले होते. पण दुसऱ्या आवृत्तीत 'प्रशमदिवसे' हा पाठ स्वीकारला होता. अलीकडे या प्रश्नाचा खोल विचार केल्यावर आणि उपलब्ध असलेल्या सर्व प्रमाणांचे परीक्षण केल्यावर कालिदासाचा मूळचा पाठ 'आषाढस्य प्रथमदिवसे' हाच होता याविषयी संशय राहत नाही. तद्विषयक प्रमाणे प्रस्तुत लेखात मांडली आहेत.[२]

---

१. पञ्चसिद्धान्तिका–आश्लेषार्धादासीद्यदा निवृत्तिः किलोष्णकिरणस्य । युक्तमयनं तदासीत्साम्प्रतमयनं पुनर्वसुतः ।।

२. हा लेख मंडळाच्या १९६५–६६ सालाच्या एका सभेत वाचला होता. तो लिहून झाल्यानंतर धारचे का. कृ. लेले आणि शि. का. ओक यांनी पुष्कळ वर्षांपूर्वी विविधज्ञानविस्तार, पु. ५३ मध्ये लिहिलेला लेख आमच्या वाचनांत आला. त्यांनीही 'प्रत्यासन्ने नभसि' याचा अर्थ 'पावसाळा जवळ आला असता' असा केल्याचे आढळले त्यांनी ठरविलेला कालिदासाचा काळ मात्र आम्हांस मान्य नाही. त्यासंबंधी विवेचन आमच्या 'कालिदास' ग्रंथात (द्वितीयावृत्ती, पृ. २५–३३) पाहावे.

५. कालप्रियनाथाच्या स्थानाचा शोध

'नवभारता'च्या जुलै १९६८ च्या अंकात तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी माझ्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'भवभूति' ग्रंथावर[१] अभिप्राय देताना म्हटले आहे की 'कालप्रियनाथ म्हणजे काल्पी येथील सूर्यदेव या निष्कर्षावरील पूर्वोत्तरपक्ष खूप घासाघासीने मांडला आहे. त्यातही मिराशींचा कयास स्वीकरणीय ठरतो.' भवभूतीच्या जीवन-चरित्रात कालप्रियनाथाचे स्वरूप आणि स्थान निश्चित करणे याला फार महत्त्व आहे. कारण त्याची तीन्ही नाटके कालप्रियनाथाच्याच यात्रेच्या प्रसंगी प्रथम रंगभूमीवर आली. हा कालप्रियनाथ म्हणजे उज्जयिनीचा महाकाल असे अनेक टीकाकारांनी आणि भवभूतीच्या नाटकांच्या वहुतेक सर्व संपादकांनी म्हटले होते. उदाहरणार्थ, मालतीमाधवाचा टीकाकार त्रिपुरारि म्हणतो, 'कालप्रियनाथस्य महाकालास्पदस्य शम्भोः ।' ज्यांनी इतके स्पष्ट विधान केले नाही त्या वीरराघवादि टीकाकारांनीही काल-प्रियनाथ म्हणजे शिव असेच मानले होते. उदाहरणार्थ, वीरराघव 'कालप्रियानाथस्य' असा पाठ घेऊन म्हणतो. 'कालप्रियानाथस्य कालप्रियानामिकाम्बिकापतेः ।' 'कालप्रियनाथस्य' असा पाठ घेतला तरी तोच अर्थ आहे हे त्याने पुढे दाखविले आहे. डॉ. बलवलकर, डॉ. काणे, प्रो. तोडरमल्ल, प्रो. करमरकर यांना कालप्रियनाथ म्हणजे भगवान् शंकर हाच अर्थ मान्य आहे. डॉ. बेलवलकर व डॉ. काणे तो उज्जयिनीचा महाकाल मानतात, तर प्रो. करमरकर तो पद्मावतीचा सुवर्णबिन्दु मानतात. श्री. मा. व्यं. लेले त्याचे देवालय काल्पी येथे होते असे म्हणत असले तरी कालप्रियनाथ म्हणझे शिव हाच अर्थ त्यांनाही संमत होता.

---

१. (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सन १९६८)

कालप्रियनाथाचे उल्लेख पुराणांत व कोरीव लेखांत येतात त्यावरून ते सूर्यदेवाचे नाव असून त्याचे सर्व भारतात प्रसिद्ध असे देवालय उत्तर-भारतात यमुनेच्या काठी काल्पी येथे होते, असे दिसते. अद्यापि काल्पीत 'कालप- देवका टीला' नावाचे टेकाड दाखवितात ते त्या देवालयाचे स्थान असावे, हे प्रस्तुत लेखकाने नागपूरच्या 'युगवाणी' मासिकात वीस वर्षापूर्वी दाखविले होते. तो लेख नंतर संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. ९५–१०३ वर पुनर्मुद्रित झाला आहे. त्या सिद्धांतावर म. म. डॉ. काणे यांनी घेतलेल्या आक्षेपाचे परीक्षण 'नवभारता'च्या डिसेंबर १९६५ च्या अंकात केले होते. तो लेख संशोधनमुक्तावलि, सर ५, पृ. ४८–५५ वर पुनर्मुद्रित झाला आहे. त्यातील विधानांची पुनरुक्ति न करता साझ्या सिद्धान्ताला उपोद्बलक असा आणखी पुरावा माझ्या नजरेस नुकताच आला आहे तो पुढे मांडतो—

भवभूतीच्या 'मालतीमाधव' नाटकाची चिकित्सक आवृत्ति डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी भारताच्या चारी दिशांतून त्या नाटकाची हस्तलिखिते जमवून प्रसिद्ध केली होती. ती आता दुर्मिळ झाल्यामुळे तिची नवी आवृत्ति काढण्याचे काम भांडारकर प्राच्यविद्यासंशोधन मंडळाने मजवर सोपविले आहे. त्या आवृत्तीची मुद्रिते तपासताना कालप्रियनाथा-संबंधी एका प्राचीन हस्तलिखितांतील महत्त्वाचा उतारा डॉ. भांडारकरांनी तळटीपेत दिलेला आढळला. त्याकडे अद्यापि कोणा संपादकाचे किंवा संशोधकाचे लक्ष गेलेले आढळले नाही. तो उतारा असा––

'मालतीमाधवा'च्या आरंभी प्रस्तावनेत भवभूतीच्या पूर्वजांविषयी व त्याच्या स्वतःच्या विद्वत्तादि गुणांविषयी माहिती दिल्यावर सूत्रधार म्हणतो–

अतो यदस्माकमर्पितं प्रियसुहृदा तत्रभवता काश्यपेन भवभूतिनाम्ना ब्राह्मणेन प्रकरणं स्वकृतं मालतीमाधवं नाम तदेव भगवतः कालप्रियनाथस्य सकलजगदेकचक्षुषो विश्वात्मनः सूर्यस्य पुरतो यथाप्रयोगेण प्रख्यापयितु-महमुद्यतः ।

भवभूतीच्या तीन्ही नाटकांत कालप्रियनाथाचा उल्लेख आला असला तरी त्यांमध्ये त्याचे वर्णन येत नाही. म्हणून टीकाकारांनी व त्या

नाटकांच्या सर्व संपादकांनी कालप्रिय हे शंकराचे नाव मानले होते. पण 'मालतीमाधवा'च्या एका हस्तलिखितातील वर दिलेल्या उताऱ्यात कालप्रियनाथाला भगवान सूर्य असे स्पष्ट म्हटले असून तो विश्वात्मा आणि सर्व जगताचा एकच एक डोळा आहे असे त्याचे वर्णन केले आहे, त्यावरून निदान त्या हस्तलिखिताच्या काळी कालप्रियनाथ म्हणजे सूर्यदेव अशी समजूत प्रचलित होती यात संशय नाही. इतर हस्तलिखितांत इतके स्पष्ट विधान नसले तरी त्याच्या विरुद्धही काही विधान नाही.

हे हस्तलिखित डॉ. भांडारकरांना मुंबईचे सुप्रसिद्ध संशोधक डॉ. भाऊ दाजी यांच्या संग्रहात सापडले. ते आता मुंबई एशियाटिक सोसाटीच्या ग्रंथसंग्रहालयात ठेवले आहे. त्यात 'संवत् १७६५ नभस्यामावास्यायां पूरितः' असा कालोल्लेख आहे. त्यावरून ते अडीचशे वर्षांपूर्वीचे आहे असे दिसते. डॉ. भांडारकरांनी आपल्या आवृत्तीकरिता उपयोजिलेल्या अत्यंत प्राचीन अशा हस्तलिखितांपैकी ते एक आहे. तेव्हा त्यातील कालप्रियनाथाविषयी वरील उल्लेख कोणी अलीकडे त्यात घुसडला असे म्हणणे शक्य नाही. कालप्रियनाथ म्हणजे सूर्यदेव असे वर्णन असलेला वरील उतारा त्या हस्तलिखितात विक्रम संवत् १७६५ (सन १७०८) या वर्षाच्या सुमारास घातला असणेही शक्य नाही. कारण कालप्रियनाथ हे सूर्याचे नाव होते याची जाणीव आज कित्येक शतके भारतीयांस असलेली दिसत नाही.

या शिवाय मालतीमाधवा'च्या प्रस्तावनेत वरील उतारा असलेले आणखी एक हस्तलिखित भाण्डारकर प्राच्यविद्यासंशोधन मंदिरातील संग्रहात आहे. त्याच्या विषयी माहिती त्या संग्रहाचे क्यूरेटर डॉ. ए. डी. पुसाळकर यांनी मला दिली आहे. हे हस्तलिखित उदयपुरचे असून त्यात (विक्रम) संवत् १७०३ आषाढ कृष्ण द्वादशी, रविवार असा लेखनकाल दिला आहे. याची इंग्रजी तारीख २८ जून सन १६४६ अशी येते. त्या दिवशी रविवार होता. हे हस्तलिखित पूर्वोक्त हस्तलिखितापेक्षाहि प्राचीन आहे.

वराहपुराण, भविष्यपुराण इत्यादि पुराणांत कालप्रिय (सध्याचे काल्पी) येथे भगवान् सूर्याचे सर्व भारतात सुप्रसिद्ध असे देवालय

होते व तेथे मध्याह्नी सूर्याचे सांनिध्य असते असे वर्णन येते हे मी आपल्या लेखात दाखविले आहे. ही पुराणे निदान हजार बाराशे वर्षांपूर्वीची आहेत. भवभूतीच्या ग्रंथांत कालप्रियनाथाचा उल्लेख येतो, त्याचा काळ आठव्या शतकाचा प्रथम पाद हा आहे. त्यानंतर कालप्रियाचे उल्लेख खंबायतच्या ताम्रपटात राष्ट्रकूट नृपति तृतीय इंद्र याच्या कनोजवरच्या स्वारीच्या वर्णनात येतो. ती स्वारी सुमारे सन ९१८ मध्ये झाली असावी. यानंतर कालप्रियाचा उल्लेख राजशेखराच्या काव्यमीमांसेत कनोजच्या दक्षिणेस असलेले शहर म्हणून येतो. राजशेखर दहाव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. यानंतर कालप्रियाचे किंवा कालप्रियनाथाचे उल्लेख आढळले नाहीत. तेव्हा कालप्रियनाथ म्हणजे सूर्यदेव अशा आशयाचे वर्णन दहाव्या अकराव्या शतकानंतर कोणी घातले असण्याचा संभव नाही.

किंबहुना, प्रस्तुत हस्तलिखितातील वरील वर्णन स्वतः भवभूतीनेच घातले असेही म्हणता येईल. डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी 'मालती-माधवा'च्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की हस्तलिखितांच्या पुराव्याचा विचार केल्यावर माझी अशी खात्री झाली आहे की भवभूति वेळोवेळी आपल्या नाटकातील पाठ बदलत असे. त्याचे काही पाठ काही हस्तलिखितांत तर दुसरे पाठ इतर हस्तलिखितांत आलेले दिसतात. पं. तोडरमल्ल यांनीही 'महावीरचरिता'च्या आपल्या चिकित्सक आवृत्तीत असेच मत व्यक्त केले आहे.

तेव्हा कालप्रियनाथाचे सूर्यरूपाने केलेले डॉ. भाऊ दाजी यांच्या आणि उदयपुरात मिळालेल्या अशा दोन हस्तलिखितातील वर्णन स्वतः भवभूतीनेच घातले असण्याचा संभव आहे. निदान कालप्रियनाथ म्हणजे उज्जयिनीचा किंवा इतर कोणा ठिकाणचा भगवान् शंकर नसून काल्पी येथे प्राचीन काळी ज्याचे सुप्रसिद्ध व विशाल आवाराचे देवालय होते तो सूर्यदेवच होय याविषयी तरी आता संशय राहू नये.

---

६. ‘ कुन्दमाले ’चा कर्ता आणि काल

सुमारे चार वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या आमच्या ‘ भवभूति ’ ग्रंथात ‘ कुन्दमाले’चा कर्ता दिङ्नाग नसून धीरनाग होता आणि त्या संस्कृत नाटकाचा काल ख्रिस्तोत्तर सातवे आणि अकरावे शतक यांमध्ये असावा, असे प्रतिपादिले होते. याच आशयाचा आमचा लेख इंग्रजीत आमच्या *Studies in Indology* Vol, I (second ed.), pp. 56 f. मध्ये प्रसिद्ध झाला आहे. ‘ भवभूति ’ ग्रंथाचे ‘ नवभारत ’ मासिकात परीक्षण करताना माझ्या एका प्रमाणावर तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आक्षेप घेतला होता. तसेच माझा इंग्रजी लेख पाहिल्यावर ‘ कुन्दमाले ’चे संपादक कलकत्त्याच्या संस्कृत कॉलेजातील संस्कृतचे प्राध्यापक डॉ. कालीकुमार दत्त यांनीही काही आक्षेप घेतले होते. त्यांसारखे आक्षेप इतरही अभ्यासकांना सुचणे शक्य आहे. सत्यान्वेषणार्थ त्यांचे परीक्षण केले पाहिजे.

(अ) ‘ कुन्दमाले ’चा कर्ता

‘ कुन्दमाले ’चा कर्ता धीरनाग होता या मतावर डॉ. कालीकुमार दत्त यांनी पुढील आक्षेप घेतले आहेत--

आक्षेप पहिला--‘ तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नासौ मुनिर्यस्य वचः प्रमाणम् । ‘धर्मस्य मूलं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः ।। ’ हा श्लोक वल्लभदेवाच्या ‘ सुभाषितावली ’त दिङ्नागाच्या नावावर दिला आहे. तो ‘ महाभारता ’च्या वनपर्वात आणि थोडया फरकाने ‘ पंचतन्त्रा ’तही आला आहे. त्यावरून तो लोकोक्तीत प्रचारात असावा हे मान्य केले तरी ज्या अर्थी वल्लभदेवाने तो दिङ्नागाच्या नावावर दिला आहे त्या अर्थी वल्लभदेवाला दिङ्नाग नामक कवी पूर्वी होऊन गेला असे

वाटत असावे, हे उघड आहे. तेव्हा दिङ्नाग नामक कवी झालाच नाही असे म्हणणे बरोबर नाही.

उत्तर—वल्लभदेवाला तसे वाटत असेल, पण त्याची समजूत चुकीची होती. तो पुष्कळ नंतरचा श्लोकसंग्राहक आहे. त्याने किंवा इतरही कोणी प्रस्तुत श्लोकाशिवाय ‘कुन्दमाले’तील किंवा इतरत्र आढळणारा एकही श्लोक दिङ्नागाच्या नावावर दिला नाही. यावरून वल्लभदेवाची चूक स्पष्ट होते.

आक्षेप दुसरा—‘सुभाषितरत्नकोष’कार विद्याकर ‘ज्वालेवोर्ध्वप्रसारिणी’ इत्यादी शिवस्तुतिपर नान्दीश्लोक ‘कुन्दमाले’तील म्हणून देतो, पण त्याच नाटकातील ‘द्यूते पणः’ इत्यादी श्लोक ‘कुन्दमाले’चा उल्लेख न करता धीरनागाच्या नावावर देतो. त्याला ‘कुन्दमाला’ नाटक उपलब्ध असते तर त्याने ते दोन्ही श्लोक धीरनागाचे म्हणून दिले असते. त्याने तसे केले नसल्यामुळे त्याची माहिती ऐकीव, अतएव अविश्वसनीय, ठरते. अर्थात् धीरनाग हा ‘कुन्दमाले’चा कर्ता होता हे सिद्ध होत नाही.

उत्तर—अशा उणीवा सर्व श्लोकसंग्रहांत आढळतात. पण तेवढ्यावरून त्यातीच स्पष्ट उल्लेखांचा पुरावा आपण अग्राह्य मानीत नाही. उदाहरणार्थ, विद्याकर आपल्या ‘सुभाषितरत्नकोषा’त भवभूतीचे ३१ श्लोक कविनामनिर्देशासह आणि १३ श्लोक तसा निर्देश न करता देतो. या १३ श्लोकांपैकी काही भवभूतीच्या ज्ञात नाटकात आढळतात. हे कविनामनिर्देशरहित श्लोक विद्याकराला भवभूतीचे होते हे माहीत नव्हते असे समजावयाचे काय ? अर्थात् नाही. तेव्हा मिळतील त्या कविनाननिर्देशांचा उपयोग करणे हाच उत्तम पक्ष. तेही शक्य तो पारखून घेतले पाहिजेत. विद्याकराने ‘कुन्दमाले’तून दोन श्लोक दिले आहेत. त्यांपैकी एकाशी त्याने ‘धीरनाग’ असे कविनाम संलग्न केले आहे. पण दिङ्नाणाच्या नावावर ‘कुन्दमाले’ तूनच काय, इतर ग्रंथांतूनही एकही श्लोक दिला नाही. तंजावरच्या हस्तलिखितात ‘कुन्दमाले’च्या कर्त्याचे नाव धीरनाग असे स्पष्टच दिले आहे. तेव्हा धीरनाग हाच ‘कुन्दमाले’चा कर्ता, याविषयी संशयाला जागा नाही.

आक्षेप तिसरा--'प्रसन्नसाहित्यरत्नाकर' या श्लोकसंग्रहातही पूर्वोक्त दोन श्लोक दिले आहेत, पण त्यांपैकी पहिल्याच्या कवीचे नाव वीरनाग आणि दुसऱ्याने हनूमत् असे दिले आहे. त्यावरून अशा श्लोकसंग्रहकारांना खरी माहिती नव्हती असे स्पष्ट दिसते आणि त्यांनी केलेल्या उल्लेखांना मुळीच महत्त्व राहत नाही.

उत्तर--सर्व श्लोकसंग्रहांत असे काही चुकीचे निर्देश आढळतात. पण म्हणून काही आपण त्यांचे सर्व निर्देश टाकाऊ मानीत नाही. दुसरे असे की 'वीरनाग' हे 'धीरनागा'चे चुकीने वाचलेले रूप होय, हे आम्ही दाखविले आहे. दहाव्या आणि अकराव्या शतकात 'व' आणि 'ध' ही अक्षरे सारखी होती. 'व' च्या डोक्यावर लहान शिरोरेषा असे आणि 'ध'च्या ती नसे, एवढाच फरक. तेराव्या शतकात 'ध'ला डावीकडे शिंग फुटून 'व' आणि 'ध' हे निराळे दिसू लागले. तेव्हा 'कुन्दमाले'च्या कर्त्याचे नाव 'प्रसन्नसाहित्यरत्नाकरा'च्या कर्त्याने 'धीरनागा' ऐवजी 'वीरनाग' असे वाचलेले दिसते. दुसऱ्या श्लोकाच्या कर्त्याचे नाव 'हनूमत्' असे दिले आहे, याचे कारण तो श्लोक त्या श्लोकसंग्रहकाराला 'हनूमन्नाटका'त आढळला असावा. तो 'कुन्दमाले'तही आहे हे त्याने पाहिले नसावे, म्हणून त्याने त्याच्या कर्त्याचा निर्देश 'हनूमत्' असा केला आहे.

आक्षेप चौथा--म्हैसूरच्या ताडपत्री हस्तलिखितात कवीचे नाव 'दिङ…' असे अपूर्ण दिले आहे. ते मूळचे दिङ्नागच असले पाहिजे. तंजावरच्या हस्तलिखितात ते 'धीरनाग' असे आढळते खरे, पण तेच का ग्राह्य मानावयाचे? तेव्हा आणखी हस्तलिखिते मिळतील तेव्हाच या प्रश्नाचा निकाल लागेल.

उत्तर--'दिङ…' हे दिङ्नागाचे अपूर्ण रूप खरे, पण तंजावरच्या हस्तलिखितांतील 'धीरनाग' हे त्याला विरोधी आहे. तसेच विद्याकराच्या 'सुभाषितरत्नकोषा'तील 'धीरनागस्य' असा स्पष्ट नामनिर्देश दिङ्नागाच्या विरोधी आहे. 'धीरनाग' असा कविनामनिर्देश इतरही काही सुभाषितसंग्रहांत आढळतो. दिङ्नागाचे नाव श्लोककर्ता म्हणून कोठेही

येत नाही. नवीन हस्तलिखिते उजेडात आली तरी त्यांमुळे अगोदरच दृढ झालेल्या या सिद्धान्ताला बाधा पोचणार नाही.

तेव्हा आमच्या मते **'धीरनाग हा कुन्दमालेचा कर्ता'** हे सिद्ध करण्यास आवश्यक तेवढा पुरावा आहे.

(आ) 'कुन्दमाले' चा काल

आता आपण 'कुन्दमाले' चा काल, या प्रश्नाकडे वळू. 'कुन्दमाला' ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकाइतकी प्राचीन नाही, हे दाखविण्याकरिता आम्ही त्या नाटकातील हेरम्बाच्या (गजाननाच्या) नान्दीश्लोकाचा उल्लेख केला होता. गुप्तकालीन एकाही कोरीव लेखात गजाननाचा उल्लेख नाही. भिल्सा (प्राचीन विदिशा) जवळच्या लेण्यात गंजाननाची मूर्ती अगदी ओबडधोबड प्रकारची आहे. नंतरच्या भूमरा (सन ४५०–५००) येथील प्राचीन देवळातील मूर्तीवरून गजाननपूजा गुप्तकालाच्या अखेरीस प्रचारात आली असावी असे आम्ही दाखविले होते. या आमच्या प्रमाणांवर पुढील आक्षेप घेण्यात आले आहेत—

आक्षेप पहिला—प्राचीन वैदिक वाङ्मयातील गजाननविषयक उल्लेख—

मैत्रायणी संहितेच्या शतरुद्रीय पाठात (सं. लिओपोल्ड फॉन श्रोडर, लायप्झिग, १९०३) (२, ९, १) हस्तमुख आणि कराट (करट ?) अशा दन्तीचा गायत्रीमंत्र आला आहे.[१] 'काठकसंहिता' (१७, ११), 'तैत्तिरीय-आरण्यक' (१०, १, ५) आणि 'मानवश्रौतसूत्र' (११, ५) (रुद्रजपप्रकरण) यांमध्येही तोच मंत्र आढळतो.

उत्तर—पं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीही आमच्या 'भवभूति' ग्रंथाच्या परीक्षणात (नवभारत, १९६८) असाच आक्षेप घेतला होता. ह्या गायत्रीमंत्राकडे अनेकदा गजाननपूजेच्या कालविषयक संदर्भात

---

१. तत्कराटाय विद्महे हस्तिमुखाय धीमहि ।
तन्नो दन्ती प्रचोदयात् ।

लक्ष वेधण्यात येते. तेव्हा या प्रमाणाचा जरा बारकाईने विचार केला पाहिजे.

वास्तविक या प्रश्नाची चर्चा नागपूरच्या ‘वागीश्वरी’ मासिकात (पु. ३, पृ. २७६ इत्यादी) यापूर्वीच होऊन गेली आहे. पण ती विद्वानांच्या दृष्टीस आलेली दिसत नाही. म्हणून ती येथे संक्षेपाने देऊन त्यात आणखी काही प्रमाणांची भर घालत आहो.

‘गाथासप्तशतीचा काल’ या विषयाची चर्चा श्री. अप्रबुद्ध आणि पं. कृष्णशास्त्री घुले यांच्यामध्ये चालू होती. त्या सप्तशतीत गजानन-वर्णनपर गाथा आहे. तिजवरून त्या प्राकृत गाथासंग्रहाचा काळ सहाव्या शतकापूर्वी जाऊ शकत नाही असे घुलेशास्त्र्यांनी प्रतिपादिले होते. याच्या उलट प्राचीन वैदिक वाङ्मयात गजाननविषयक गायत्री मंत्र आढळत असल्यामुळे त्या गाथासंग्रहाचा काळ इतका अलिकडे ओढण्याची जरूरी नाही, असा पक्ष श्री. अप्रबुद्ध यांनी मांडला होता. ‘गाथासप्तशती’च्या काळाची चर्चा आम्ही ‘संशोधनमुक्तावलि’, (सर १, पृ. १०४–१२३) मध्ये केली आहे. तीत आम्ही दाखविले आहे की ‘गाथासप्तशती’च्या अनेक आवृत्त्या भिन्नभिन्न काळी झाल्या होत्या. प्रत्येक आवृत्तीत काही गाथा गाळून त्यांच्या जागी दुसऱ्या घातल्या जात. तेव्हा एखाद्या गाथेचा काळ निश्चितपणे माहीत झाल्याशिवाय तिच्यावरून त्या गाथासंग्रहाच्या काळाविषयी अनुमान करणे योग्य नव्हे, असे आम्ही दाखविले होते. असो. त्या प्रश्नाचा विचार येथे कर्तव्य नाही.

‘मैत्रायणीसंहिते’तील पूर्वोक्त हस्तिमुखविषयक गायत्री मंत्र प्रक्षिप्त आहे, असे घुलेशास्त्र्यांनी दाखविले होते. ‘मैत्रायणीसंहिते’च्या त्या प्रकरणात विविधदेवताविषयक तेरा गायत्रीमंत्र आहेत. त्यांपैकी कित्येक देवता वैदिक नसून पौराणिक आहेत. उदाहरणार्थ, पुढील देवता पाहा : कुमार कार्त्तिकेय; कराट–हस्तिमुख दन्ती; चतुर्मुख ब्रह्मा; केशव–नारायण–विष्णु आणि परमात्मा–वैनतेय. हे देव वैदिक नाहीत. खऱ्या वैदिक वाङ्मयात त्यांची स्तुती, किंबहुना, उल्लेखही आढळत नाहीत. वैदिक काळानंतर बराच काळ लोटल्यावर त्यांची पूजा प्रचारात

आली. आणि हे नंतरच्या धार्मिकेतर वाङमय आणि कोरीव लेख यांवरूनही दाखविता येते. 'मैत्रायणीसंहिते'सारख्या 'काठक' व 'कपिष्ठल' संहिता आहेत त्यांमध्ये या गायत्री आढळत नाहीत. 'काठकसंहिते'त फक्त रुद्रगायत्री आढळते. 'कपिष्ठलसंहिते'त तीही दिसत नाही. शिवाय या गायत्रीतील काही रूपे (उदाहरणार्थ, परमात्माय)[१] आणि स्वरही[२] अनियमित आहेत. 'प्रचोदयात्' याचा स्वर पाहा. हे पद संबंधी वाक्यात आले नसल्यामुळे त्यात उदात्त स्वर नसावा. पण या गायत्रीत प्रचोदयात् या पदातील तिसरा स्वर उदात्त आहे. प्रक्षेपकाने हे मंत्र 'तत्सवितुर्वरेण्यं' इत्यादी सवितृविषयक गायत्रीमंत्राचे अनुकरण करून रचले आहेत. त्या मंत्रात प्रचोदयात् हे क्रियापद संबंधी वाक्यात येत असल्यामुळे त्यात उदात्त स्वर असणे योग्य आहे. तशी गोष्ट येथे नाही.

तैत्तिरीय–आरण्यकया आरण्यकात गायत्रीमंत्र अनेक ठिकाणी आढळतात (आनंदाश्रम प्रत, पृ. ६९९, ७५४–५५ आणि ७९६–९९ पाहा.). यांतील पहिल्या संदर्भातील गायत्रीमंत्रांवर (१०, १) भाष्य लिहिताना सायणाचार्य म्हणतात—

इत ऊर्ध्वं तेषु तेषु देशेषु श्रुतिपाठा अत्यन्तविलक्षणाः। तत्र विज्ञानात्मप्रभृतिभिः पूर्वनिबन्धकारैर्द्राविडपाठस्यादृतत्वाद्वयमपि तमेवादृत्य व्याख्यास्यामः । तत्र षड्भिर्गायत्रीभिरात्मप्राप्तिद्वारभूता देवताविशेषाः प्रार्थ्यन्ते ।

यावरून स्पष्ट दिसते की या गायत्रींचे अनेक पाठ प्रचलित होते. सायणाचार्यांनी सहस्राक्ष महादेव, महादेव रुद्र, वक्रतुण्ड दन्ती, सुवर्णपक्ष गरुड, कन्याकुमारी दुर्गा आणि वासुदेव विष्णु या देवतांविषयी गायत्रींचे व्याख्यान केले आहे. इतर पाठांत अन्य गायत्रीमंत्र असावे. याच आरण्यकाच्या नंतरच्या (१०, १) प्रकरणात वरील सहा देवतांशिवाय

---

१. तत्परमात्माय विद्महे वैनतेयाय धीमहि। तन्नः सृष्टिः प्रचोदयात्॥ मैत्रायणी संहिता २, ९, १.
२. पाणिनीची 'अष्टाध्यायी', ८, १, २८.

आणखी सहा देवताविषयक गायत्री आल्या आहेत. त्या देवता अशा— चक्रतुण्ड नन्दी, महासेन–षण्मुख, हिरण्यगर्भ–ब्रह्मा, तीक्ष्णदंष्ट्र नरसिंह, महाद्युतिकर आदित्य आणि वैश्वानर अग्नि.

महानारायणीय–उपनिषद् तैत्तिरीयशाखेचे असून त्यात आरण्यकातील बराचसा भाग आला आहे. या उपनिषदात अठरा गायत्री आल्या आहेत. त्यांमध्ये वरील देवतांशिवाय खालील देव–देवतांचे आवाहन केले आहे. सप्तजिह्व वैश्वानर, दिवाकर सूर्य, सहस्रकिरण भानु, वक्रपाद वृषभ, भगवती महादुर्गा, काममालिनी गौरी, चतुर्मुख ब्रह्मा इत्यादि.[1]

हे गायत्रीमंत्र भिन्नभिन्न कालांत जरूरीप्रमाणे रचून पूर्वोक्त वैदिक वाङ्मयात घुसडलेले दिसतात. त्यांत आवाहन केलेल्या देव–देवता वैदिक नाहीत, हे स्पष्ट आहे. अर्थात् या मंत्रांवरून ह्या देवतांची पूजा वेदकाली प्रचलित होती असे सिद्ध होत नाही.

'सामविधानब्राह्मणा 'त विनायक देवाच्या प्रसादनार्थ वैनायिकी संहिता आली आहे. हा विनायकही 'याज्ञवल्क्यस्मृतीत 'ल्या (२, २७१–२९४) विनायकाप्रमाणे दिसतो. त्या काळी त्याला नंतरचे स्वरूप प्राप्त झाले नसावे.

आक्षेप दुसरा—पुराणे–विष्णुधर्म पुराणात गणेशाच्या पूजेचा उल्लेख आहे. हे पुराण ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकापूर्वीचे आहे हे डॉ. आर. सी. हझरा यांनी दाखविले आहे.—

उत्तर—पुराणांत इतके प्रक्षेप झाले आहेत की त्यांतील एखादा भाग अमुक एका काळी रचला असावा असे सांगणे कठीण आहे.

---

१. 'महानारायणीय उपनिषदा 'चे संपादक म्हणतात, 'याशिवाय हिरण्यगर्भ ब्रह्मा आणि तीक्ष्णदंष्ट्र नरसिंह यांच्याविषयीच्या आणखी दोन गायत्री या उपनिषदाच्या काही प्रतींत आढळतात.'

आक्षेप तिसरा—हालाच्या 'गाथासप्तशती'त (४, ७२; ५, ३) गणपतीची पूजा आणि त्याची सोंड यांचे उल्लेख आले आहेत.

उत्तर—मागे सांगितल्याप्रमाणे 'गाथासप्तशती'ची अनेक संस्करणे झाली होती. वेबरने त्या प्राकृत गाथासंग्रहाची सात संस्करणे झाली होती असे दाखविले आहे. त्यांत फक्त ४३० गाथा समान आहेत. 'गाथा-सप्तशती'तील काही गाथा वाकाटक नृपति सर्वसेन (इ. स. ३३० ते ३५५) आणि द्वितीय प्रवरसेन (इ. स. ४२० ते ४५०) यांनी रचल्या होत्या. इतर काही भवभूतीचा समकालीन, 'गउडवहो' या काव्याचा कर्ता वाक्पतिराज (इ. स. चे आठवे शतक) याच्या आहेत असे गाथा-संलग्न कविनामांवरून दिसते. हे कवि ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकात होऊन गेलेल्या सातवाहनवंशी हालनृपतीनंतर कित्येक शतकांनंतर झाले, हे आता सिद्ध झाले आहे. तेव्हा गजाननवर्णनपर गाथांचा काल निश्चित झाल्याशिवाय त्यांचा पुरावा गजाननपूजेच्या प्राचीनत्वाबद्दल उपयोगी पडणार नाही.

गजाननपूजेची प्राचीनता सिद्ध करण्याकरिता मांडण्यात येणाऱ्या तथाकथित प्रमाणांत काही तथ्य नाही हे आतापर्यंत दाखविले. पुरातत्त्वीय पुराव्यावरून गजानन ही देवता पाचव्या शतकाच्या अखेरीस पुढे येऊ लागलेली दिसते. धार्मिकेतर संस्कृत वाङ्मयावरूनही हेच सिद्ध होते. ख्रिस्ती शकाच्या पूर्वीच्या आणि त्याच्या आरंभीच्या शतकांत गजानन या देवतेचे उल्लेख आढळत नाहीत. पतञ्जलीचे 'महाभाष्य', कौटिल्याचे 'अर्थशास्त्र', भास आणि कालिदास यांची काव्यनाटके, यांत गजाननाचे उल्लेख नाहीत. हे केवळ अभावात्मक प्रमाण (argumentum ex silentio) नाही. कारण पतञ्जलि स्कन्द आणि विशाख यांचा उल्लेख करतो. कौटिल्य सांगतो की शिव, वैश्वानर, जयन्त इत्यादि देवांची देवालये उभारावी. कुशाण आणि गुप्त नाण्यांवर स्कंद (कार्त्तिकेय), विशाख यांच्या आकृति आढळतात. पण गजाननाची आकृति किंवा उल्लेख पाचव्या शतकाच्या अखेरीपर्यंत आढळत नाही. तेव्हा सुप्रसिद्ध भारतीय कलाकोविद कुमारस्वामी यांनी सुचविल्याप्रमाणे

यक्षपूजेतून गजाननपूजा उत्क्रांत झाली असावी. कुशाणकालातील एका शिल्पपट्टात गजमुख यक्षांच्या आकृती दिसतात.[1] अश्वघोषाने आपल्या 'बुद्धचरिता'त गौतम बुद्धाच्या तपश्चर्येत विघ्न आणणाऱ्या माराच्या सेनेत काही गजवदन यक्षही होते असे वर्णिले आहे.[2] देवता म्हणून गजाननाची पूजा गुप्तकालाच्या अखेरीस प्रचारात आली असावी. नंतरच्या बाण (सातवे शतक), भवभूति (आठवे शतक) इत्यादिकांच्या ग्रंथांत गजाननाचे उल्लेख आढळतात. तेव्हा **हेरम्बाच्या (गजाननाच्या) स्तुतिपर नान्दीश्लोक ज्या 'कुन्दमाले'त आहे ते नाटक गुप्तकालातले असणे शक्य नाही.**

---

१. संशोधनमुक्तावलि, सर ५, पृ. ९० वर उल्लेखिलेला कै. डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांच्या पत्रातील उतारा पाहा.

२. बुद्धचरित, १३, १९–२१.

७. सोड्ढलाची उदयसुन्दरीकथा

सोड्ढलकवीची 'उदयसुन्दरीकथा' सुमारे पन्नास वर्षांपूर्वी कै. कृष्णमाचार्य यांनी बडोदा संस्थानातील पाटण येथील पार्श्वनाथ भांडाराच्या ग्रंथालयात सापडलेल्या एकमेव हस्तलिखितावरून गायकवाड ओरिएंटल सीरीजमध्ये १९२० साली प्रसिद्ध केली. संस्कृतातील उत्कृष्ट चम्पूकाव्यांमध्ये तिची गणना करण्यासारखी आहे आणि तिच्यात संस्कृत वाङ्मयेतिहासाला बहुमोल अशी बरीच माहिती आहे. तरी अभ्यासकांचे तिच्याकडे फारसे लक्ष गेलेले दिसत नाही. संस्कृत वाङ्मयेतिहासकारांनी तिच्या कवीचा आणि त्याच्या कालाचा उल्लेख याखेरीज काही माहिती दिली नाही.[१] काहींनी तर तिचा उल्लेखही केला नाही.[२] म्हणून तिच्याविषयी बरीचशी सविस्तर माहिती येथे देत आहे.

'उदयसुन्दरी कथा' हे एक चम्पूकाव्य आहे. संस्कृतात गद्य, पद्य आणि (गद्यपद्यमिश्रित) चम्पू असे काव्याचे तीन प्रकार मानले आहेत. त्यांतील तिसऱ्या प्रकाराचा हा ग्रंथ आहे. संस्कृतात वर्ण्य विषयास अनुसरून गद्य (आणि गद्यपद्यमिश्रित चम्पू) काव्यांचे आख्यायिका आणि कथा असे दोन प्रकार आहेत. पहिल्यातील गोष्ट ऐतिहासिक असते. तिचे उदाहरण बाणकवीचे 'हर्षचरित.' दुसऱ्यातील गोष्ट काल्पनिक असते. तिचे उदाहरण बाणाचीच 'कादम्बरी.' ऐतिहासिक गद्य काव्ये फारशी उपलब्ध नाहीत, पण काल्पनिक चम्पूकाव्ये मात्र अनेक विद्यमान आहेत. त्यांतील सर्वांत

१. Keith, *A History of Sanskrit Literature*, p. 336.

२. डॉ. एस्. के. दे यांनी आपल्या 'संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासात' 'उदयसुन्दरीकथे'चा उल्लेखही केला नाही.

प्राचीन उपलब्ध चम्पूकाव्य ख्रिस्तोत्तर दहाव्या शतकातील वैदर्भकवि त्रिविक्रमभट्ट याचे 'नलचम्पू' किंवा 'दमयन्तीकथा' हे होय. यानंतर अनेक कवींनी विशेषतः जैनांनी चम्पूकाव्ये लिहिली. त्यांपैकी काहींचे उल्लेख सोड्ढलाच्या ग्रंथात येतात हे पुढे दाखविले आहे.

सामान्यतः संस्कृत कवि स्वतःविषयी मुग्धता स्वीकारतात. त्यामुळे त्यांचे स्थल, काल, वंश वगैरे विषयी निश्चित माहिती मिळत नाही. सोड्ढल याला अपवाद आहे. त्याने आपला ग्रंथ बाणाच्या 'हर्षचरित' व 'कादंबरी' या गद्यकाव्यांना अनुसरून लिहिला आहे. 'हर्षचरिता'च्या आरंभी बाणाने स्वतःच्या वंशाविषयी व कुलाविषयी विस्तृत माहिती दिली आहे तशी सोड्ढलाने आपल्या ग्रंथाच्या आरंभी व शेवटी दिली आहे. त्यावरून असे समजते की तो वलभीच्या कायस्थ वंशात जन्मला होता. वलभी हे मैत्रक वंशातील राजांचे राजधानीचे नगर होते. ते आता काठेवाडातील पूर्वीच्या भावनगर संस्थानात 'वला' नामक खेड्याच्या रूपाने अवशिष्ट आहे. सोड्ढल आपल्या कायस्थ वंशाची पारंपरिक किंवा काल्पनिक कथा पुढीलप्रमाणे देतो—

वलभी राजधानीत शीलादित्य नामक राजा राज्य करीत होता. त्याला कलादित्य नावाचा शूर व विद्वान् असा धाकटा भाऊ होता. एकदा कलादित्याने धर्मपाल नामक शत्रूचा पराजय करून त्याला शरण यावयास लावले. आपल्या राज्यातील प्रधानादि मंत्री अविश्सनीय आहेत असे चारांकडून समजल्यामुळे चिन्ताग्रस्त झालेल्या राजाला राजलक्ष्मीने स्वप्नात येऊन सांगितले की "भगवान् शंकराच्या जलरूपी 'काया'च्या (शरीराच्या) सांनिध्यात राहणाऱ्या आणि म्हणून 'कायस्थ' नावाने विख्यात झालेल्या गणाने मन्दर पर्वताने घुसळल्यावर समुद्रातून उत्पन्न झालेल्या आणि त्याच्या जलात बुडत असलेल्या मला वर काढून देवांच्या स्वाधीन केले. त्या कायस्थगणाच्या क्षत्रिय वंशात उत्पन्न झालेला तुझा धाकटा भाऊ कलादित्य आहे. त्याला ही गरुडांकित मुद्रा देऊन त्यावर राज्यकारभार सोपव." राजाने त्याप्रमाणे केले. याप्रमाणे त्या शिवगणापासून 'वालभकायस्थ' वंश उत्पन्न झाला.

कायस्थ वंशाच्या उत्पत्तीविषयी अनेक काल्पनिक कथा आढळतात.[१] त्यासारखीच वरील कथा आहे. वलभी येथे ख्रिस्तोत्तर सातव्या आठव्या शतकात शीलादित्य नामक सात राजे होऊन गेले. सोड्ढलच्या काळी (अकराव्या शतकात) ते विद्यमान नव्हते, तथापि ते वलभी येथे राज्य करीत होते ही पारंपरिक माहिती सोड्ढलास होती असे दिसते. म्हणून त्याने आपल्या कायस्थ वंशाचा संबंध त्यांच्याशी जुळविलेला दिसतो.

सोड्ढलाने आपल्या पूर्वजांची, सहाध्यायांची, स्नेह्यांची, गुरूंची आणि स्वकालीन कवींची बरीच माहिती दिली आहे. त्याचे घराणे मूळचे लाट (दक्षिण गुजराथ) प्रदेशातील. तेथे त्याच्याकडे सिक्करहारीय–७२, वाहिरिहार–७०, अन्नापलीय–७० इत्यादी प्रदेशांची[२] ध्रुववृत्ति (मालगुजारी) होती. सोड्ढलाने चण्डपति, त्याचा पुत्र सोल्लपेय–त्याचा पुत्र सूर–अशी आपल्या पूर्वजांची नावे दिली आहेत.[३] सूराला पम्पावतीपासून सोड्ढल हा पुत्र झाला. लाटदेशाच्या चौलुक्य राजांची या घराण्यावर विशेष मर्जी होती असे दिसते. म्हणून सोड्ढलाच्या

---

१. दुसऱ्या एका कथेचा उल्लेख कलचुरि नृपति कर्ण याच्या रेवा शिलालेखात (सन ११४८–४९) आला आहे. *Corpus Inscriptionum Indicarum*, Vol. IV, pp. 266 f.

२. या प्रदेशांची सध्याची नावे अहमदाबादच्या शेठ भोलाभाई जेसिंगभाई संशोधन मंडळाचे संचालक डॉ. एच्. जी. शास्त्री यांनी पुढीलप्रमाणे सुचविली आहेत—अन्नापल्लीय सुरत जिल्ह्याच्या महुवा तालुक्यातील अनावल असावे. दक्षिण गुजराथेतील अनावल ब्राह्मणांचे हे मूलस्थान. मुरारजी देसाई हे अनावल ब्राह्मण होत. वाहिरिहार हे सुरत जिल्ह्याच्या ओलपाड तालुक्यातील विहारा किंवा त्याच जिल्ह्याच्या मंगरोळ तालुक्यातील वहार असावे. सिक्करहारी हे सुरत जिल्ह्याच्या वालोड महालातील सिकेर असावे. या प्राचीन प्रदेशनामांस जोडलेले संख्यावाचक उल्लेख त्या त्या प्रदेशांतील ग्रामसंख्येचे द्योतक समजले जातात.

३. उदयसुन्दरीकथा, पृ. १२.

बाल्यावस्थेतच त्याचा पिता वारला तेव्हा लाटनृपति गोग्गिराज[१] याच्या गंगाधर नामक पुत्राने त्याचे पालणपोषण केले. पुढे गोग्गिराजपुत्र कीर्तिराज हा गादीवर आला. तेव्हा त्याचा पुत्र सिंहराज याच्याबरोबर सोड्ढलाचे अध्ययन झाले. त्यांच्या गुरूचे नाव चंद्र. सोड्ढलाची काव्यप्रतिभा अध्ययन करता करताच प्रफुल्लित झाली. पुढे परिस्थिति बदलल्यामुळे तो लाटदेशातून उत्तर कोकणातील शिलाहारांची राजधानी स्थानक (ठाणे) येथे आला. तेथे त्याला शिलाहारनृपति छित्तराज याच्या दरबारी आश्रय मिळाला. एकदा सोड्ढलाने 'प्रदीप' शब्द असलेला एक सुंदर श्लोक रचला. त्यायोगे आनंदित होऊन छित्तराजाने त्याला 'कविप्रदीप' अशी पदवी दिली. अशा पदव्या कालिदास, भारवि इत्यादी कवींना त्या त्या काळी मिळालेल्या प्राचीन आख्यायिकांवरून माहीत झाल्या आहेत.[२] छित्तराजानंतर त्याचा भाऊ नागार्जुन व त्यानंतर दुसरा भाऊ मुम्मुणिराज हे गादीवर आले. त्यांनीही सोड्ढलाला मोठ्या आदराने वागविले.[३]

ठाण्यास असता सोड्ढलाला लाटदेशाधिपति पूर्वोक्त कीर्तिराजाचा पुत्र आणि कोंकणेशाचा परममित्र वत्सराज याने लाटदेशाला येण्याविषयी प्रेमाचे आमंत्रण दिले. त्यामुळे तो त्या देशाला परत गेला. एकदा वत्सराज आपल्या कविजनांसह दरबारात बसला असता एका व्यापाऱ्याने त्याला अनेक मोत्यांचा समूह दाखविला. तेव्हा राजा पुढील साभिप्राय आर्या म्हणता झाला–

---

१. 'उदयसुन्दरीकथे'च्या प्रकाशित आवृत्तीत हे नाव 'गोगिराज' असे आले आहे (शुद्धिपत्र, पृ. ९ पाहा). कोरीव लेखात ते गोग्गिराज असे येते. (Bhandarkar's *List of Inscriptions of Northern India*, Nos. 1088 and 1092.)

२. कालिदासाला 'संचारिणी दीपशिखेव' इत्यादि 'रघुवंशा'तील (६, ६७) श्लोकावरून 'दीपशिखाकालिदास' असे नाव मिळाले होते. तसेच भारवीला 'उत्फुल्लस्थलनलिनी–' इत्यादि 'किरातार्जुनीया'तील (५, ३९) श्लोकावरून 'छत्रभारवि' असे नाव प्राप्त झाले होते.

३. उदयसुन्दरीकथा, पृ. १२.

एकैकशः प्रकीर्णैर्मुक्तामणिभिः किमेभिरेभिस्तु ।
यं सृजसि हन्त हारं तस्यान्यः कोऽपि परिभोगः ।।

(अलग अलग असलेल्या या मोत्यांचा काय उपयोग ? त्यांचा जर हार बनवलास तर तो धारण करून मोठा आनंद होईल.)

या आर्येचा व्यंग्यार्थ राजसभेत असलेल्या सोड्ढलाच्या लागलीच लक्षात आला. पण तो काही बोलला नाही. घरी आल्यावर तो स्वतःशीच म्हणाला, "महाराजांनी माझ्या डोळ्यात झणाझणीत अंजन घातले आहे. त्यांचा आशय असा की फुटकळ मुक्तक स्वरूपाचे श्लोक न रचता तू एक भरीव काव्य रचावे. हे काव्य रचावयाचे तर ते केवळ गद्यात किंवा केवळ पद्यात न रचता ते गद्यपद्यमय किंवा चम्पू स्वरूपाचे असावे हे इष्ट आहे." नंतर अशा ग्रंथरचनेला अवश्य ते एकान्त स्थान असावे म्हणून तो आपल्या एका सुखसोईंनी युक्त अशा गावात जाऊन राहिला आणि त्याने काही दिवसांतच एक उदात्तनायकविषयक कथा पूर्ण केली. नंतर तिचे पुस्तक वस्त्रात बांधून तो परत यावयास निघाला. वाटेत अरण्यातील दुस्तर मार्गाने जाताना त्याला एक अत्यंत शुभ्र असे देवालय लागले. त्यातील भगवती सरस्वती देवीचे दर्शन न घेता जाणे इष्ट नव्हे म्हणून तो आत गेला[१] आणि त्याने त्या देवीची तत्कालरचित श्लोकाने स्तुति केली. तितक्यात संध्याकाळ झाल्यामुळे व बरोबरचे लोक पुढे गेल्यामुळे तो त्या देवळाच्या मण्डपातील मत्तवारणकात (बाजूच्या भागात)[२] विश्रांति घेण्याकरिता बसला. तेव्हा त्याला गर्भगृहाच्या दोन्ही बाजूस शिलानिर्मित दोन द्वारपालांच्या सुंदर मूर्ति दिसल्या. रात्री त्या मूर्तींच्या

१. हे देवालय भगवान् भार्गवाने बांधलेले होते असे म्हटले आहे. तेव्हा ते भृगुकच्छापासून फार दूर नसावे.

२. 'मत्तवारणक' शब्दाचा उपयोग सोड्ढलाने अनेक ठिकाणी केला आहे. हा शब्द भरताच्या नाट्यशास्त्रात 'विंग' या अर्थी प्रथम आढळतो. त्याचे विवेचन आम्ही अन्यत्र केले आहे. सभागृहातील मध्यभागापासून स्तंभांच्या रांगांनी वेगळे केलेले दोन्ही बाजूचे भाग (aisle) असा त्याचा अर्थ दिसतो. पुढे त्याचा व्हरांडा असा अर्थ झाला.

मध्ये एक तैलरहित दीपाची उज्ज्वल ज्योत उत्पन्न झाली. त्याबरोबर त्या मूर्तींतून दोन यज्ञोपवीत धारण करणारे दिव्य पुरुष प्रगट होऊन त्यांनी तत्काल एक श्लोक रचून भगवतीची स्तुती केली आणि ते समोरच्या मत्तवारणकात बसले. नंतर त्यांनी कवीला पाहून विचारले 'आपल्या या बिछान्यावर ठेवलेला ग्रंथ कसला आहे ?' कवीलाही त्या आश्यर्यकारी घटना पाहून त्यांच्याविषयी जिज्ञासा वाटली आणि तो म्हणाला, 'सांगतो, पण अगोदर तुम्ही कोण हे सांगा.' तेव्हा त्यांच्या पैकी एक युवक म्हणाला, "या महात्म्याचे नाव 'तिलक' नाणि माझे 'तालक'. सदैव भगवती सरस्वती देवीच्या सांनिध्यात असल्यामुळे आमच्यामध्ये कवित्वशक्ति जागृत झाली आहे. पण तुमचा हा ग्रंथ कसला हे सांगा." त्यावर कवि म्हणाला, 'हा माझाच काव्यग्रंथ आहे. पण तो एखादा सत्कवि श्रोता मिळेपर्यंत असाच बांधला राहील.' त्यावर त्या दोघांनी त्याला ते काव्य वाचून दाखविण्याचा आग्रह केला. तेव्हा कवि म्हणाला, 'मी आपल्या अनुचरांना दीपासाठी काटक्या आणण्याकरिता पाठविले होते. पण आता त्यांची जरूरी नाही. या देवालयाला जोडून असलेल्या क्षेत्रपालाच्या देवकुलीत जाऊन आपल्या शयनाची व्यवस्था करतो आणि नंतर मी तो तुम्हांस वाचून दाखवितो.' तसे केल्यावर त्याने पुनः त्या मत्तवारणकात येऊन ग्रंथ वस्त्रातून बाहेर काढून कथा वाचण्यास आरंभ केला (उच्छ्वासक १).

उदयसुन्दरीकथा

या समुद्रवलयांकित पृथ्वीवरील कुन्तल देशात गोदावरी नामक महानदीच्या तीरी प्रतिष्ठान[१] नावाचे सुंदर नगर सुप्रसिद्ध आहे. तेथे मलयवाहन नामक एक श्रेष्ठ राजा राज्य करीत होता. त्याने विभूतिवर्धन नामक आपल्या हुशार मंत्र्यावर राज्यकारभार सोपविला होता. एकदा

---

१. हल्लीचे औरंगाबादजवळचे पैठण. हे सातवाहनांचे राजधानीचे शहर होते. हे गोदावरीच्या उत्तर तीरावर आहे. सामान्यतः गोदावरीच्या दक्षिणेस कृष्णा नदीच्या खोऱ्यास कुन्तल असे नाव होते.

शरदृतूमध्ये तो सभेत बसला असता पूर्वी त्याची अनुज्ञा घेऊन आभीर देशातील[1] नन्दावर नामक नगरास[2] गेलेला वसन्तशील नावाचा उद्यान-पाल (बागवान) परत आल्याची वार्ता द्वारपालाने त्याला सांगितली. त्याला राजसभेत आणल्यावर राजाने त्याला आपल्या प्रवासात काही विशेष दृष्टीस पडले असल्यास सांगण्याची आज्ञा केली.

चित्रशिख शुकाची कथा

वसन्तशील म्हणाला, "मी आपले काम संपवून परत येत असता वाटेत एक बौद्ध देवालय पाहिले. सकाळी उद्यानाला जात असता ते स्फटिकासारखे शुभ्र दिसत होते, पण आता हिरवे दिसत आहे, हे पाहून मला आश्चर्य वाटले. तितक्यात कोणी तरी म्हटलेला खालील श्लोक मला ऐकू आला.

अहो वैचित्र्यमेतस्य संसारस्य किमुच्यते ।
गुणोऽपि क्लेशहेतुः स्याद्विश्रान्तः क्वापि देहिनि ।।

(अहो काय हे संसाराचे वैचित्र्य ! अंगी असलेला गुणही केव्हा केव्हा पीडाकारक होतो.)

"पाहतो तो मला त्या चैत्यातून बाहेर उडालेला एक उज्ज्वल कांतीचा शुक दिसला. त्याच्याच कांतीने ते चैत्य हिरवेगार दिसत होते आणि त्यानेच तो श्लोक म्हटला होता. त्याला पकडून महाराजांना अर्पण करावे म्हणून मी त्याच्या मागे लागलो. पण तो कसचा माझ्या

---

१. आभीरदेश म्हणजे सध्याचा खानदेश. यात अद्यापि आभीरांची (अहीरांची) वसती आहे. पुढे आलेला तापी नदीचा उल्लेख पाहा.

२. सोड्ढलाने काही प्रदेशांना काल्पनिक नावे दिली आहेत. पण हे नाव खरे दिसते. त्याला जुळणारी खानदेशाच्या रावेर तालुक्यातील नांदुरखेडे आणि अमळनेर तालुक्यातील नांदेड ही सध्याची ग्रामनामे दिसतात. त्यापैकी नांदेड हे तापी नदीला जवळ आहे. कथेतील वर्णना-वरून तेच प्राचीन नन्दावर असावे.

हाती येतो ! त्याच्या मागे धावता धावता मी तापी नदीच्या तीरी आलो. तेथे मला एक धान्य मळण्याच्या खळ्याजवळ झोपडी दिसली. संध्याकाळ झाली होती, म्हणून तेथे विश्रांति घेण्याकरिता बसलो असता डोक्यावर गवताचा भारा व हातात दोरीने बांधलेला तोच शुक घेतलेला एक शेतकरी आला. त्याने माझे स्वागत करून आग्रहाने आपली मीठ-भाकर मला खाऊ घातली. 'तुला हा शुक कोठे व कसा सापडला ?' असे मी विचारताच तो म्हणाला, 'मी चारा आणण्याकरिता गेलो असता हा एका भाताच्या कणसावर बसलेला मला दिसला. त्याला मी हळूच एका काठीला लावलेल्या जाळ्यात पकडला. आता मी त्याला माझ्या गरोदर पत्नीला खाण्याकरिता देणार आहे.' मी त्याला तो शुक मला देण्याविषयी वारंवार विनवले. पण त्याने ते न ऐकताच त्या शुकाकरिता काड्यांचा पिंजरा करण्यास आरंभ केला. इतक्यात तो शुक पुढील आर्या म्हणता झाला—

एकेन ध्रियमाणः पलायितोऽन्यस्य गोचरं पतितः ।
गतोऽन्यस्य मुखे किल यदहमहो बलवती नियतिः ॥

(एक मला पकडत असता मी उडून गेलो आणि दुसऱ्याच्या हातात सापडलो, आता तिसऱ्याच्या मुखात जाणार ! अहो दैव बलवान आहे !)

"तो शुक विद्वान् मनुष्याप्रमाणे संस्कृतात बोलत आहे असे पाहून तो शेतकरी भीतीने पळून गेला. त्या शुकाला घेऊन मी आलो आहे." नंतर त्याने पिंजऱ्यातून बाहेर सोडल्यावर शुक राजाला उद्देशून म्हणाला—

वृत्तिः संप्रति कार्पणी च किमपि त्यागप्रवीरे दृढं
विश्रान्ता त्वयि नाथ येन भवता ब्रह्माण्डनामा घटः ।
सद्यः सद्गुणरत्नराशिभिरसौ भृत्वा निधानीकृतः
क्वान्यत्रोपरि विस्फुरत्यनिभृतं ज्योतिःप्रतापस्तव ॥

(महाराज, आपण दातृत्वात श्रेष्ठ आहा. पण आपली काय ही कृपण वृत्ति ! कारण आपण आपल्या सद्गुणरूपी रत्नांच्या राशींनी हा ब्रह्माण्डाचा घट काठोकाठ भरून जपून ठेवला आहे आणि तो कोणी घेऊन

जाऊ नये म्हणून आपला पराक्रमरूपी प्रकाश सर्वत्र स्पष्टपणे पसरला आहे !)

नंतर राजाने त्याला आपला वृत्तांत सांगण्याची आज्ञा केली. तेव्हा तो म्हणाला, "मी सह्याद्रीवरील निबिड अरण्यात एका जुन्या वटवृक्षाच्या ढोलीत जन्मलो. जन्माच्या वेळीच माझ्या डोक्यावर ही शिखा (तुरा) उत्पन्न झाली. ते विलक्षण चिन्ह पाहून माझ्या मंडळींनी मला टाकून दिले. पण शारदी नामक वनदेवतेने माझे पालनपोषण करून माझे 'चित्रशिख' असे नाव ठेवले. ही शिखा वाढू लागली तसे मला सर्व शास्त्रांचे व पुराणकथादिकांचे ज्ञान होऊ लागले. नंतर शारदी देवीने मला इतरत्र जाण्याची अनुज्ञा दिली. त्याप्रमाणे उडत जात असता माझी ही शिखा पाहून मला इतर शुक आपल्या चोचींनी टोचून हैराण करू लागले. तेव्हा मी एका चैत्याच्या रंध्रात घुसलो आणि माझ्या डोक्यावर उत्पन्न झालेल्या शिखेला उद्देशून 'अहो वैचित्र्यमेतस्य' इत्यादि श्लोक म्हटला. त्यानंतर मला पकडू पाहाणाऱ्या या माळ्याला गुंगारा देऊन निसटलो. पण त्या शेतकऱ्याच्या हातात सापडलो. आता शारदी आदि-करून वनदेवतांनी ज्याला सौराज्याबद्दल आशीर्वाद दिले आहेत अशा आपल्या दर्शनाने आनंदित झालो आहे." ते ऐकून राजाने त्या चित्रशिख शुकाला रत्नजडित पिंजऱ्यात ठेवण्याची आज्ञा केली (उच्छ्वासक २).

काही काळ त्या शुकाशी सुखसंवाद करीत घालविल्यावर राजा एकदा त्याला घेऊन मृगयेला गेला. मृगया करीत करीत तो एका कुसुम-सुंदर नामक विलासोद्यानात पोचला. त्यामध्ये रत्ननिर्मित स्त्रीमूर्तींनी युक्त असा मंडप होता. त्यात प्रवेश करून तेथे त्या उद्यानातील तरु-लतादिकांची विविध रमणीय दृश्ये पाहत असता त्याच्या कानी पुढील श्लोक पडला—

हे चन्द्रोपलगौरि ! हे मरकतश्यामाभिरामाकृते
हे चामीकरभिन्नवर्णसुभगे ! हे पद्मरागाम्बरे ।
एषा पश्यत हन्त वज्रघटिता दूरे फलं वाञ्छितं
दत्ते नोत्तरमात्रमप्यतिशठा चाटूक्तिदीनस्य मे ॥

(हे चन्द्रकांत मण्याप्रमाणे गोऱ्या स्त्रिये, हे पाचूप्रमाणे श्यामवर्ण आणि मनोहर देहाच्या स्त्रिये, हे सुवर्णकान्ति असलेल्या सुंदर स्त्रिये, हे माणकाप्रमाणे लाल वस्त्र नेसलेल्या स्त्रिये, ही पहा हिऱ्यांनी निर्मिलेली तुमची अत्यंत लबाड अशी सखी मी मागितलेले फळ देण्याचे दूरच, पण माझ्या लाडीगोडीच्या भाषणाला उत्तरही देत नाही !)

ते ऐकून वसन्तशील राजाला म्हणाला, "महाराज ! मी सकाळच्या गडबडीने या चित्रशिख शुकाला खावयास घालण्यास विसरलो. आता या मंडपात हिरेजडित शालभञ्जिकेच्या हातातील कमळासारखे डाळिंब पाहून हा चित्रशिख तिच्या सखीरूपी शिल्पाकृतींना उद्देशून ही तक्रार करीत आहे." तितक्यात आपल्या पिंजऱ्याचे पोवळ्यांनी बनविलेले दार मोडून चित्रशिख बाहेर पडला आणि त्या पद्मरागनिर्मित डाळिंबाला चोच मारू लागला. त्यात त्याची चोच भंग पावली. त्याबरोबर काय आश्चर्य ! त्या शुकाच्या देहातून एक प्रमाणबद्ध सुंदर शरीराचा सुमारे अठरा वर्षे वयाचा तरुण उत्पन्न झाला ! तितक्यात त्या शुकाच्या शरीरातून भूमीवर पडलेली वस्तु उचलून घेऊन वसन्तशील पाहतो तों तो राजाची सुंदर मूर्ति असलेला चित्रपट होता. तितक्यात सैन्याधिपति सिंहलाङ्गद पुढे होऊन म्हणाला, "महाराज ! दिग्विजयाला निघालेल्या आपल्या पञ्चालसिंह नामक सेनापतीने हा महाराजांचा पट आपणाबरोबर नेला होता. तो एका द्वीपावर गडबडीत विसरला होता. तोच हा चित्रपट !"

तितक्यात राजाची दृष्टि दुसऱ्या एका तेथे पडलेल्या वस्तूवर गेली. ती उचलून पाहतात तों तोही एका अत्यंत सुंदर स्त्रीचा चित्रपट निघाला. या घटनांनी आश्चर्यचकित होऊन राजाने त्या युवकाला आपली कथा सांगण्याची विनंती केली (उच्छ्वासक ३). तेव्हा तो युवक म्हणाला—

कुमारकेसरीची कथा

"महाराज, मथुरा नावाची एक उत्तरापथात सुप्रसिद्ध नगरी आहे. तेथे कन्दर्पकेतु नामक राजा राज्य करीत आहे. त्याचा मी कुमारकेसरी

नामक पुत्र. मला द्यूताचे व्यसन लागून मी आपल्या पित्याचा सर्व खजिना त्यात घालविला. नंतर दक्षिणेस लंका नावाची सुवर्णनगरी आहे ती जिंकून लुटावी आणि द्यूताकरिता धन प्राप्त करून घ्यावे, या हेतूने मी आपल्या सेवकादिकांच्या नकळत एकटाच बाहेर पडलो. हिंडत हिंडत मी नर्मदातीरावरील एका वनात प्राप्त झालो. तेथे एका कात्यायनीच्या (चण्डिकेच्या) भग्न देवालयात रात्रीच्या वेळी आश्रय घेतला असता मला एक अस्थिकपालादिकांनी ज्याच्या जटा बांधल्या आहेत असा खट्वांगधारी, भस्मचर्चित शरीराचा कापालिक आलेला दिसला. त्याला मी आपला सर्व वृत्तांत सांगितला.[१] तेव्हा त्याने मला एक दिव्य खड्ग अर्पण केले. पुढे तेथे एका जुगाऱ्याबरोबर द्यूत खेळून मी ते खड्ग हरवले; पण त्याचे विमान जिंकून घेतले. त्यात बसून मी आकाशमार्गाने जाऊ लागलो. पुढे ते विमान समुद्रात जाऊन कोसळले. तेव्हा आता आपले मरण ओढवणार असे मला वाटले. पण तसे न होता मी अकस्मात् भगवान् शंकराच्या एका देवालयात उभा आहे, असे मला दिसले. त्या देवाची प्रार्थना केल्यावर मी तेथे एका मत्तवारणकात जाऊन बसलो. तितक्यात तेथे एक सुन्दर स्त्रियांचा घोळका आला. त्यामध्ये एक अत्यंत मनोहर अशी कुमारी युवती होती. ती नंतर एका पुष्पोद्यानात आपल्या सख्यांसह फुले वेचण्याकरिता गेली. तिच्या छत्रवाहिनीने छत्री मिटवून ती एका कोपऱ्यात ठेवली आणि दिव्य वस्त्राने वेष्टित असा एक पटही तेथेच सोडून ती इतर कुमारिकांमागून गेली. नंतर मी तो पट उघडून पाहतो तो त्यावर महाराजांची सुंदर आकृति पाहिली. तितक्यात तेथे ठेवलेल्या पूजेच्या माणिक्यशुक्तीवर माझा नकळत पाय पडून ती भग्न झाली. त्याबरोबर त्या देवालयातील वृद्ध तापसीने क्रोधाविष्ट होऊन मला खालील शाप दिला, "तू या माणिक्यशुक्तीचा भंग केलास म्हणून त्याच रंगाच्या चोचीचा शुक होशील आणि या पटाची तुझ्या डोक्यावर शिखा (तुरा) होईल." तितक्यात त्या तापसीचे ते मोठ्याने उच्चारलेले शापवचन ऐकून ती

१. येथे मूळ हस्तलिखितातील बराच भाग नष्ट झाला आहे (पृ. ६२, टिप्पणी पाहा). पुढील पृ. ८७–८८ वरून तो येथे जुळविला आहे.

कन्यका फुले वेचण्याचे टाकून आपल्या दोन तीन सख्यांसह तेथे आली आणि तिने त्या तापसीचे मला उश्शाप देण्याविषयी मन वळविले. तेव्हा ती तापसी 'शुकजातीमध्ये सुद्धा याला मनुष्याप्रमाणे आपला काल घालविता येईल आणि जेव्हा भगवान् शंकराच्या देवळात याची चोच भग्न होईल तेव्हा याला पूर्वरूप प्राप्त होईल' असा उश्शाप देती झाली. त्याप्रमाणे सर्व घडून आले आहे.

नंतर दक्षिणेतील आपल्या या कुन्तल देशाची कीर्ति ऐकून मी येथे आलो. त्या रूपसुन्दरी कन्यकेने आपला चित्रपट इतका संभाळून ठेवला होता त्याअर्थी ती आपणास निःसंशय प्राप्त होईल." नंतर राजा आपल्या परिवारासह नगराला परत आला (उच्छ्वासक ४).

मलयवाहन राजा त्या चित्रपटातील तरुणीवर अनुरक्त होऊन दिवसेंदिवस त्याची मदनबाधा वाढू लागली. एकदा चांदण्या रात्री एकदम चन्द्रप्रकाशाला दूर सारून एक अंधकाराचा लोळ त्याच्याजवळ आकाशातून खाली आला आणि तितक्यातच एक आर्त ध्वनिही राजास ऐकू आला. तो कोणाचा हे पाहण्याकरिता हातात खड्ग घेऊन राजा शोध करू लागला तेव्हा त्याला स्मशानातील एका शून्य अशा चण्डिकेच्या देवालयात एक भयंकर राक्षस एका चौदा वर्षे वयाच्या कन्या-तापसीला ठार मारण्यास उद्युक्त झालेला दिसला. तेव्हा त्या दोघांचे भीषण युद्ध झाले. आणि शेवटी त्यात राक्षसाचा पराजय होऊन तो राजाला शरण आला. तेव्हा त्याने राजाला आपले खड्ग देऊन "माझ्या हातून होण्यासारखे कार्य असेल तेव्हा आपण माझे स्मरण करावे. मी तत्काल तेथे उपस्थित होईन" असे राजाला सांगितले. राजाने त्याला त्याचा वृत्तान्त विचारला. तेव्हा तो म्हणाला—

मायाबलाची कथा

"दक्षिणेत लंका नामक अत्यन्त संपन्न अशी नगरी आहे. तेथे रामाने गादीवर बसविलेले बिभीषण महाराज राज्य करीत आहेत. त्यांचा मी मामेभाऊ. माझे नाव मायाबल. एकदा बिभीषण महाराज राजसभेत बसले असता कङ्कालक नामक पिशाच्च तेथे आला आणि त्याने मथुरेचा

शूर राजपुत्र कुमारकेसरी धनप्राप्तीकरिता लंकेकडे येण्यास निघाला असल्याचे सांगितले. तेव्हा बिभीषण महाराजांनी 'कङ्कालकाला घेऊन जा आणि त्याचा नाश कर' अशी मला आज्ञा केली. मी त्याच्या शोधात असता मलय पर्वतावरील एका चण्डिकादेवालयात तो मला दिसला. तितक्यात तेथे आलेल्या एका कापालिकाने त्याचा वृत्तान्त ऐकून त्याच्या साहसवृत्तीने संतुष्ट होऊन त्याला एक दिव्य खड्ग दिले, आणि तो स्वतः अन्तरिक्षमार्गाने निघून गेला. त्या खड्गाने तो अजिंक्य झाला असल्यामुळे ते त्याच्याकडून काढून घेण्याकरिता मी कङ्कालकाला विमानाचे रूप देऊन व स्वतः विद्याधर बनून तेथे गेलो, आणि त्याला द्यूताकरिता आव्हान दिले. नंतर कपटाने त्याला ते खड्ग द्यूतात हरविण्यास लावले आणि त्याला ते विमान जिंकू दिले. त्यालाही विमान मिळाल्याचा आनंद झाला आणि त्यात बसून तो लंकेकडे यावयास निघाला. कंकालकाने ते विमानाचे रूप घेतले होते. त्याने त्या विमानाला समुद्रात कोसळावयास लावले. पुढे कङ्कालकासह लंकेस जाऊन मी बिभीषण महाराजांना ही सर्व हकीकत सांगितली. त्यांनी मला ते खड्ग बक्षीस दिले. ते मी आता आपल्याला दिले आहे. ही कुमारतापसी मला लंकेत भटकत असता आढळली. तिच्यावर माझे प्रेम बसले. पण ती एकदम आकाशमार्गाने तेथून निघाली. तेव्हा तिचा पाठलाग करून मी तिला ठार मारण्यास प्रवृत्त झालो." हा वृत्तान्त ऐकल्यावर राजाने त्याला जाण्यास अनुज्ञा दिली.

नंतर त्या तरुण तापसीचा वृत्तांत ऐकण्याकरिता राजा तिला घेऊन नगरातील विश्वभूति नामक वृद्धतापसीच्या मठात आला (उच्छ्वासक ५).

तारावलीची कथा

राजाने विचारल्यावरून ती कुमारतापसी आपला वृत्तांत सांगू लागली, "स्वर्ग आणि भूलोक याशिवाय तिसरा एक पाताल नामक लोक आहे. तेथे वामनावतारात भगवान् विष्णूने ज्याला राज्य दिले होते तो बलिराजा राज्य करतो. त्या पातालात इन्दीवर नावाचे नगर आहे. तेथे शिखण्डतिलक नामक राजा राज्य करतो. त्याच्या विजयरेखा नावाच्या

सहधर्मचारिणीला उदयसुंदरी नामक कन्यारत्न प्राप्त झाले. तिच्या बालपणीच तिचा विवाह भगवान् विष्णूच्या अवताराशी होईल असे भविष्य ज्योतिष्यांनी वर्तविले होते. मी तिची समवयस्क अशी सखी, सेनापतीची मुलगी, तारावली. एकदा प्रातःकाळी मयूरक नावाच्या किन्नर-मिथुनाने तिच्यापुढे एक गुंडाळलेला चित्रपट टाकला. त्यातील मदनसदृश पुरुषाकृति पाहून उदयसुन्दरी आकृष्ट झाली आणि मदनपरवश होऊन झुरू लागली. एकदा पातालगण नामक वृद्ध तपस्व्याने तो चित्रपट पाहिल्यावर तिला सांगितले की, 'स्वर्गातून भगवान् हाटकेश्वराच्या पूजे-करिता कमले आणीत असता भूलोकावर या युवकाला मी पाहिले होते, पण मी त्या वेळी त्याची चौकशी केली नाही.' नंतर तारावलीने एका चित्रकाराकडून दुसऱ्या एका पटावर उदयसुन्दरीची आकृति काढविली. मातेच्या सांगण्यावरून उदयसुन्दरी हाटकेश्वराच्या दर्शनास जात असते. एकदा ती त्या देवाच्या पूजेकरिता सख्यांबरोबर पुष्पे वेचीत असता तिला तेथील तापसीने क्रोधाने उच्चारिलेले शापवचन ऐकू आले. तेव्हा तिने गडबडीने येऊन तिला शांत केले आणि उश्शाप देवविला. पण तिच्या दासीने तेथे ठेवलेले ते चित्रपट शापित शुकाच्या शिखारूपाने परिणत होऊन अदृश्य झाले. तेव्हा तिला अत्यंत दुःख झाले आणि ती विरहव्यथेने व्याकुळ झाली.

एकदा उदयसुन्दरी आपल्या सौधाच्या गच्चीवर झोपली असता एकदम अदृश्य झाली. तेव्हा तिच्या पित्याने शोधाकरिता सर्वत्र नाग-सेवकांना तिचे चित्रपट देऊन पाठविले. मला वाटले की हे एखाद्या राक्षसाचे कृत्य असावे. तेव्हा लंकेत याचा शोध लागेल म्हणून मी लंकेस गेले. पण तेथे मला हा राक्षस त्रास देऊ लागला. त्याच्या तावडीतून आपण मला मुक्त केले. आपणाला पाहिल्यावर उदयसुन्दरी ज्यांच्यावर अनुरक्त झाली आहे ते आपणच, अशी माझी खात्री झाली. पण हा प्रदेश कोणता हे माहित नाही. चक्रवर्तित्वाची लक्षणे असलेले आपण कोण ? आपली ही राजधानी काय ? आता तरी माझा उदयसुन्दरीच्या प्रिय-कराचा शोध लावण्याचा प्रयास संपेल काय ?" असे म्हणून ती तारावली

स्तब्ध झाली. नंतर राजाने तारावलीच्या राहण्याची सोय विश्वभूतीच्या मठात करून आपल्या निवासस्थानाकडे प्रयाण केले (उच्छ्वासक ६).

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर राजाने आह्निक कृत्ये व देवतार्चन केले आणि कुमारकेसरीला घेऊन तो विश्वभूतीच्या मठात गेला. तेथे तारावलीला कुमारकेसरीची ओळख पटली. ती म्हणाली, 'माझ्या स्वामिनीने ज्यांना उश्शाप देवविला तेच हे.' नंतर तारावलीला उदयसुन्दरीचा विरह असह्य होऊन ती पहाटे त्या मठातून फुले वेचण्याच्या मिषाने नकळत निघून गेली. तिच्या शोधात राजाने काही दिवस घालविले. नंतर एके दिवशी एका किरातराजाने दिव्य स्वरूपाची एक मनोहरांगी घोडी राजाकडे आणली. तो म्हणाला, 'आज विंध्यपर्वताच्या परिसरात हिंडत असता माझ्या समोर हरिततृणावर ही घोडी आकाशातून अकस्मात् उतरली. ही इतकी उत्कृष्ट आहे की हिच्यावर स्वार होण्याची कोणाही सामान्य मनुष्याची योग्यता नाही. खोगीर घालून मी हिला आणली आहे. हिचा आपण स्वीकार करावा.' कुमारकेसरीनेही तिच्या सुलक्षणांची प्रशंसा केली आणि राजाला तिच्यावर स्वार होण्याची विनंती केली. इतक्यात तेथील उद्यानपालक धावत येऊन एका भल्या मोठ्या व अद्भुत आकाराच्या वानराने उद्यानात भयंकर धुमाकूळ माजविल्याचे राजाला निवेदन केले. तेव्हा राजाला आश्चर्य वाटून त्याने त्या घोडीवर स्वार होऊन त्या वानराचा पाठलाग केला. त्याने त्याला झुकांड्या देत देत दूर एका महावनात नेले आणि आपण अदृश्य झाला. राजा त्याला शोधत शोधत एका तलावाच्या काठी येऊन पोचला. तितक्यात त्याला त्या घोडीच्या टापांनी उडालेला एक मनोहर मणी आढळला. पण त्याचा स्पर्श होताच त्या घोडीचे रूप बदलून ती तारावली झाली. ती लागलीच एका टेकाडाकडे धावू लागली. राजा तिकडे पाहतो तो त्याला त्या टेकाडात एका भिंतीच्या आड एक माणिक्य मंदिर दिसले. त्यातून उदयसुन्दरी बाहेर येऊन तिने तारावलीला मिठी मारली. नंतर ते सर्व एका वृक्षाच्या छायेत बसल्यावर उदयसुन्दरी म्हणाली, 'त्या दिवशी मी गच्चीवर झोपले होते. पण जागी होऊन पाहते तो एका महाकाय वानराने मला या सरोवराच्या काठी आणले आहे असे दिसले. त्या वानराने

पर्वतातील ही भिंत एकीकडे सारून या माणिक्यमंदिरात मला ठेवले.' तारावलीनेही आपला वृत्तांत सांगितला. ती म्हणाली, 'महाराजांचे वियोगदु:ख तुझा चित्रपट पाहिल्यावर द्विगुणित झाले. ते मला पाहवेना; म्हणून मी पहाटे फुले वेचण्याच्या मिषाने त्या मठातून निसटले आणि आकाशमार्गाने त्वरित गतीने जात असता मला एक तोयकुंड दिसले. तेथे उतरून मी पाणी पिते तोच माझे एका घोडीच्या रूपात परिवर्तन झाले. पुढे काय झाले ते मला माहित नाही.'

आपली प्रियसखी तारावली हिला आपल्यामुळे भयंकर दु:ख भोगावे लागले हे कळताच उदयसुन्दरी मूर्च्छित झाली. पण राजाने पूर्वोक्त मणि हातात घेऊन त्या सरोवरातील जल तिच्यावर शिंपडताच ती भानावर आली. राजा व उदयसुन्दरी यांचे त्या मण्याच्या प्रभावाने तेथे असे मधुर मीलन झाले आणि राजाने तिचे पाणिग्रहण केले. नंतर राजाने आपण विश्वभूतीच्या आश्रमातून तेथे कसे आलो, ते सविस्तर निवेदन केले (उच्छ्वासक ७).

राजाने उदयसुन्दरीला आपली केल्यामुळे क्रोधाविष्ट झालेला तो वानर राजावर चालून आला. पण राजाने त्याच्या गालावर चापट मारताच त्याचे एका दिव्य पुरुषात रूपांतर झाले. नंतर राजाने विचारल्यावरून तो आपला वृत्तान्त सांगता झाला.

ताराकिरीटाची कथा

तो म्हणाला, "मी एक विद्याधर आहे. ताराकिरीट हे माझे नाव. एकदा मी पातालातील नागलोकात भगवान् हाटकेश्वराच्या दर्शनाकरिता अष्टमीस गेलो असता एका सौधाच्या गच्चीवर झोपलेल्या या उदयसुन्दरीला पाहिले. तिच्या सौन्दर्याने आकृष्ट होऊन मी तिला उचलून आपल्या विमानात घातले आणि आकाशमार्गाने जात असता आकशगंगेच्या तीरी तपश्चर्या करणाऱ्या एका ऋषीला त्या विमानाचा धक्का लागला. त्याने क्रोधाविष्ट होऊन 'वानर हो' असा मला शाप दिला. पण नंतर हिला पाहिल्यावर त्याला दया येऊन त्याने म्हटले, 'रविशृंग

पर्वताच्या परिसरातील कुवलयामोद नामक सरोवराजवळ मी पर्वतामध्ये एक माणिक्यभवन आपल्या तपःप्रभावाने निर्माण करीत आहे. तेथे हिला ठेऊन तू हिचे रक्षण कर. हा समुद्रात उत्पन्न झालेला किरणकोश नामक मणि विषविकार, मूर्छा, रूपपरिवर्तन यांपासून हिचे रक्षण करील.' असे म्हणून त्याने तो मणि हिच्या केसांत घातला." नंतर तो दिव्य पुरुष अन्तर्धात पावला."

नंतर 'आपण कोठे आलो, प्रतिष्ठान नगराला परत कसे जावे' अशा चिंतेत राजा असताना तेथे दोन पक्षी आले. त्यांनी आपले पूर्वरूप धारण करून राजाला प्रदक्षिणा केली. नंतर त्यापैकी एक म्हणाला, 'महाराज, आपण ज्याला स्त्रीरत्नाचा शोध करण्याचा आदेश दिला होता तो मी मायाबल राक्षस, आणि हा उदयसुन्दरीच्या शोधार्थ तिच्या पित्याने पाठविलेला दम्भोलि नामक नागपुरुष. माझी आणि याची गाठ सौराष्ट्रात सोमनाथ येथे पडली. आम्हा दोघांचे एकच उद्दिष्ट असल्यामुळे आम्ही पक्ष्यांचे रूप घेऊन हिंडत असता आपणांस पाहिले.' नंतर मायाबलाने विमानाचे रूप घेतले आणि त्यात बसून सर्व मंडळी प्रतिष्ठान नगरास पोचली. पुढे मायाबल लंकेस गेला व दंभोलि घडलेला सर्व वृत्तांत उदयसुन्दरीच्या पित्याला सांगण्याकरिता पातालात गेला.

मलयवाहन उदयसुन्दरीसह नगरात प्रवेश करीत असता त्यांना पाहण्याकरिता पौर स्त्रियांच्या उडालेल्या गडबडीचे वर्णन सोड्ढलाने 'रघुवंशा'तल्याप्रमाणे, पण जास्त विस्ताराने, केले आहे.

नंतर प्रतिष्ठान नगरीत मोठा उत्सव झाला. त्या प्रसंगी नागराजाने तारावली कुमारकेसरीला अर्पण केली. राणी उदयसुन्दरी आणि मित्र कुमारकेसरी, तसेच त्याची पत्नी तारावली, यांच्या सहवासात मर्त्यलोकातील सर्व सुखांचा अनवरत उपभोग घेत मलयवाहन राजा असार अशा संसारालाही सारवान् करता झाला.

* * *

सोड्ढल कवीने अशी ही उदयसुन्दरी कथा वाचून दाखवून आपले पुस्तक पुनः वस्त्रात बांधले. तेव्हा तालकाने त्या प्रबन्धाची प्रशंसा केली.

तो म्हणाला, "आम्ही हा तुमचा प्रबंध ऐकला. यात पूर्वसूरींनी ज्या तऱ्हेचे गुण असावेत असे सांगितले आहे त्या सर्वांचा समावेश आहे. या कथेचा आरंभ आकर्षक आहे, संविधानकाच्या संधींमध्ये सुश्लिष्टता आहे, रससंपद् सुस्पष्ट आहे, पदरचना कानाला गोड लागणारी आहे, वर्णनामध्ये लौकिक व्यवहाराची कुशलतेने गुंफण केली आहे. किंबहुना, यात वैदर्भी किंवा कौकिली, गौडी किंवा मायूरी, आणि पाञ्चाली किंवा माराली या तीन्ही रीतींचा किंवा जातींचा यथोचित संनिवेश आहे." असे म्हणून त्याने त्यांचे एक एक उदाहरण सांगितले. तेव्हा कवीला मोठा विस्मय वाटला आणि त्याने त्याला नमस्कार करून विनयाने विचारले, 'आपण कोण आणि येथे मूर्तिरूपाने कसे आहा ?' तेव्हा तालक म्हणाला, "हा विश्वविख्यातकीर्ति, 'कादम्बरी' आणि 'हर्षचरित' यांचा कर्ता, वात्स्यायनगोत्री सरस्वतीशिष्य 'कवीन्द्रतिलक' बाण, आणि मी भगवान् ब्रह्मदेवाच्या सभेतील सामान्य देवर्षि तालक. एकदा ब्रह्मदेवाच्या दर्शनार्थ गेलो असता मी त्याची पुढील श्लोक रचून स्तुति केली.

ब्रह्मंस्त्वां स्तौमि तं यस्य पुष्पलिड्भिः प्रलक्षितम् ।
पाण्ड्वाभं वल्गु सुष्ट्वब्जं जन्मधिष्ण्यं च विष्टरम् ।।

(हे भगवान् ब्रह्मदेव ! भ्रमरांनी वेष्टिलेले सुंदर श्वेत कमल ज्यांचे जन्मस्थान तसेच आसनही आहे त्या तुमची मी स्तुति करतो.)

या श्लोकाच्या रचनेने आनंदित होऊन मी नंतर सरस्वतीभवनाच्या सभागृहात बाणकवीच्या अध्यक्षतेखाली कालिदासादि महाकवि, विक्रमादित्य, श्रीहर्ष, मुञ्ज, भोजदेवादि नृपति आणि वाक्पतिराज, मायुराज, विशाखदेव इत्यादि सामन्त काव्यचर्चा करीत होते तेथे गेलो आणि तेथे मी हा माझा श्लोक म्हटला. तेथील सर्वांनी माझे स्वागत केले आणि या श्लोकाबद्दल अभिनन्दन केले. फक्त बाणकवीने गर्विष्ठपणाने त्यात अश्रव्यपदाचा दोष[1] काढला. तेव्हा मलाही क्रोध येऊन, तो बाणकवि सरस्वतीदेवीचा लाडका शिष्य आहे हे ध्यानात न घेताच, मी त्याला शाप दिला.

---

१. त्या श्लोकातील 'पुष्पलिड्भिः', 'पाण्ड्वाभं', 'सुष्ट्वब्जं', 'धिष्ण्यं' ही पदे पाहा.

'हे कविबटो ! मी माझा श्लोक म्हणत असता तू शिलास्तंभाप्रमाणे निश्चल राहिलास; म्हणून तू मर्त्य लोकातील सरस्वतीच्या देवालयात पाषाणमूर्ति होऊन काही काळ राहशील.' तेव्हा सर्वत्र कोलाहल झाला. तेथे बसलेल्या कवींनी माझी उश्शापाकरिता प्रार्थना केली. तेव्हा 'हा बाणकवि त्या सरस्वतीच्या देवालयातील दीपप्रभेने सर्वशास्त्रज्ञ आणि कवितारहस्यवेत्ता होईल आणि रात्रीच्या वेळी याची शिलावस्था नाहीशी होऊन हा सुखी होईल. आणि जेव्हा हा सोड्ढलाची 'उदयसुन्दरीकथा' श्रवण करील तेव्हा याला पूर्वरूप प्राप्त होईल' असा मी उश्शाप दिला. नंतर सरस्वतीदेवीने आपल्या प्रिय बाणकवीला मी शाप दिलेला पाहून मलाही बाणासारखाच शाप दिला आणि मी अनुग्रहाकरिता प्रार्थना केली तेव्हा 'तू बाणाच्या सांनिध्यात राहशील आणि त्याच्या बरोबरच तुझीही शापातून मुक्तता होईल,' असा उश्शाप तिने दिला."[१] पुढे तालक म्हणाला, 'तेव्हापासून आम्ही दोघेही शिलामूर्ति बनून या सरस्वती-देवालयात आहोत. रात्री मात्र वनदेवता आमच्याकरिता दिव्य प्रकाशाची तजवीज करते. हे कवे ! तुझ्याविषयी आम्हाला पूर्ण माहिती आहे.' असे म्हणून त्याने सोड्ढलाचा वंश, त्याला मिळालेला राजाश्रय वगैरे माहिती सांगून तुझी मलाच नाही तर स्वर्गातील सर्व महर्षींना अगोदरच ओळख झाली आहे, असे सांगितले. बाणानंही त्याच्या काव्याची प्रशंसा केली आणि सांगितले की, 'तू हा प्रबन्ध सर्वांना वाचून दाखवू नको. फक्त सज्जनांना तो ऐकव. तू कवीन्द्रपदाला प्राप्त झाला आहेस' असे म्हणून ते दोघे सरस्वतीदेवीला नमस्कार करून विमानात बसून ब्रह्मलोकाला गेले.

नंतर सोड्ढलाने ती रात्र त्या मत्तवारणकात आपले पुस्तक उशाला घेऊन घालविली. स्वप्नात त्याने आपले नाव वाल्मीकीपासून उत्पन्न झालेल्या वंशावळीत लिहिलेले पाहिले. पहाटे उठल्यावर त्याने आपल्या सेवकांकडून खोदण्याचे वगैरे साहित्य मिळवून त्या देवालयाच्या पाचूच्या भिंतीवर कविप्रशस्ति कोरून ठेवली. त्या प्रशस्तीमध्ये सोड्ढलाने रचलेले

---

१. येथेही हस्तलिखितातील काही भाग गळला आहे (पृ. १५१ पाहा).

श्लोक—प्रथम भगवान् शंकराच्या स्तुतिपर मंगल श्लोक आणि नंतर वाल्मीकि, व्यास, गुणाढ्य, भर्तृमेण्ठ, कालिदास, बाण, भवभूति, वाक्पतिराज, अभिनन्द, यायावर (राजशेखर), कुमारदास इत्यादिकांच्या प्रशंसेचे श्लोक होते. आणि नंतर त्याने स्वत:विषयी म्हटले होते: —

तस्मिन् सुवंशे कविमौक्तिकानामुत्पत्तिभूमौ क्वचिदेकदेशे ।
कश्चित्कविः सोड्ढल इत्यजातनिष्पत्तिरासीज्जलबिन्दुरेव ।।
यो वत्सराजेन वरेण राज्ञां लाटावनीमण्डलनायकेन ।
सूक्ष्मादृढस्तोकगुणाश्रितोऽपि मित्रीकृतो भानुमतेव पद्मः ।।
जडेन तेनोदयसुन्दरीति कथा दुरालोकिनि काव्यमार्गे ।
सारस्वतालोकलवैकदृष्टा सृष्टा कविंमन्यमनोरथेन ।।
सा चात्र देवीभवने निवृत्तशापार्तिना बाणकवीश्वरेण ।
कविश्रमोद्भूतकृपेण सम्यक् श्रुता धृता हृद्यभिनन्दिता च ।।

[त्या वाल्मीकीपासून उत्पन्न झालेल्या सद्वंशांत—ज्यात कविरूपी मौक्तिके उत्पन्न होतात त्यात—मौक्तिक रूपाला न पोचलेल्या जलबिन्दूप्रमाणे एक सोड्ढल नामक कवि उत्पन्न झाला.

लाटदेशाधिपति नृपश्रेष्ठ वत्सराज याने याच्या ठिकाणचे गुण सूक्ष्म, अस्थिर आणि अल्प असले तरी त्याकडे लक्ष न देता, सूर्य जसा कमलाला आपला मित्र मानतो त्याप्रमाणे, त्याला मित्र मानले. त्या मन्दबुद्धि सोड्ढलाने कवि होण्याच्या महत्त्वाकांक्षेने दैदीप्यमान अशा काव्यसृष्टीमध्ये (न शोभणारी) सारस्वताच्या अल्प प्रकाशाने युक्त अशी ही उदयसुन्दरीची कथा रचली.

या सरस्वतीभवनात शापपीडेतून मुक्त झालेल्या कवीश्वर बाणाने कवीच्या श्रमामुळे दयार्द्र होऊन ती कथा ऐकली आणि अंत:करणपूर्वक प्रशंसिली.]

नंतर सरस्वतीदेवीची स्तुति व पूजा करून तो आपल्या नगराला परत गेला. तेथे 'अशोकवती' नामक कथेचा कर्ता चन्दनाचार्य नामक श्वेताम्बर जैन महाकवि, नागार्जुन राजाने 'खड्गाचार्य' पदवीने विभूषिलेला खड्गकाव्यकर्ता शीघ्रकवि विजयसिंहाचार्य, भाषात्रयवेत्ता दिगम्बरा-

चार्य महाकीर्ति, 'रत्नमञ्जरी'नामक चम्पूकथेचा कर्ता इन्द्र इत्यादि कवींनी त्याचा प्रबन्ध पाहून त्याची प्रशंसा केली.[1] काही दिवस गेल्यावर कोंकणच्या मुम्मुणिराजाने आपल्या दरबारच्या भाषात्रयाभिज्ञ आणि शूर अशा मधुरसाहार नामक कविमित्राला सोड्ढलाला आपणाकडे आणण्याकरिता पाठविले. तो सोड्ढलाची भेट घेऊन त्याला म्हणाला, "मुम्मुणिराजांना कळले आहे की तुम्ही 'उदयसुन्दरी'नामक कथा रचली आहे. ती तुम्ही निर्जन अशा अरण्यातील सरस्वतीच्या देवालयात बाणभट्टाला वाचून दाखविली आणि त्याने तिची प्रशंसा केली. मुम्मुणिराजाचे मित्र लाटदेशेश्वर वत्सराज यांनी शूर्पारक[2] नगरातून जात असता वाटेत एका सरस्वतीदेवालयात तुम्ही लिहिलेली प्रशस्ति पाहिली. तेव्हा त्यांना आपण म्हटलेल्या आर्येच्या संदर्भात ही लिहिली गेली असे वाटून त्यांनी तुम्हाला बोलाविले आणि तो प्रबन्ध प्रथम पाहिला. त्यांनी मुम्मुणिराजांना त्याबद्दल आणि बाणभट्टाने केलेल्या त्याच्या प्रशंसेबद्दल सर्व सांगितले. तो अत्यंत आश्चर्यकारक वृत्तांत ऐकून त्या राजांनी तुम्हाला आणण्यकरिता मला पाठविले आहे." नंतर सोड्ढल कवि त्याच्याबरोबर मुम्मुणिराजाच्या सभेत गेला. तेव्हा राजाने त्याला तो प्रबन्ध वाचण्यास सांगितले. त्याने पुस्तक वेष्टनातून काढून प्रथम सरस्वतीदेवीला वंदन केले आणि नंतर पूर्वसूरींचे स्मरण केले. तो म्हणाला—

वागीश्वरं हन्त भजेऽभिनन्द–
मर्थेश्वरं वाक्पतिराजमीडे ।
रसेश्वरं स्तौमि च कालिदासं
बाणं तु सर्वेश्वरमानतोऽस्मि ॥

(मी वागीश्वर अभिनन्दाला, अर्थेश्वर वाक्पतिराजाला, रसेश्वर कालिदासाला आणि सर्वेश्वर अशा बाणाला नमन करतो.)

---

१. या ग्रंथकारांची आणि त्यांच्या ग्रंथांची नावे इतरत्र येत नाहीत.

२. शूर्पारक म्हणजे ठाणे जिल्ह्यातील हल्लीचे सोपारे. हे कोकणचे अति प्राचीन राजधानीचे शहर होते. येथे अशोकाचे काही प्रस्तरलेख सापडले आहेत. शिलाहारांच्या राज्यातील एक प्रमुख नगर म्हणून याचा उल्लेख मंखकवीच्या 'श्रीकण्ठचरिता'त (२५, १०९) आला आहे.

हे चारी कवि सुप्रसिद्ध आहेत. अभिनन्द हा गौडातील कवि, 'रामरिता'चा कर्ता, नवव्या शतकाच्या द्वितीयार्धात होऊन गेला. याची अनेक सुभाषिते 'सुभाषितरत्नकोष' या आद्य सुभाषितसंग्रहात (सु. इ. स. ११००) घेतली आहेत. वाक्पतिराज हा सुप्रसिद्ध प्राकृत काव्य 'गउडवहो' (गौडवध) याचा कर्ता. त्याने 'मधुमथनविजय' नावाचे दुसरे एक प्राकृत काव्य रचले होते. ते आता उपब्ध नाही. पण त्यातील काही गाथा ध्वन्यालोकादि साहित्यशास्त्रविषयक ग्रंथांत उद्धृत केल्या आहेत. कालिदास आणि बाण हे तर सुविख्यात आहेत.

नंतर मुम्मुणिराजाने योग्य बिदागी देऊन त्याचा सत्कार केला. सभेतील लोकांनी त्याचे अभिनन्दन केले आणि त्याच्या कविमित्रांनी त्याला गाढ आलिंगन दिले. त्यामुळे त्याला त्रिभुवनाधिपत्यापेक्षा जास्त आनंद झाला. भगवान् शंकराच्या स्तुतिपर श्लोकाने सोड्ढलाने आपल्या कथेची समाप्ति केली आहे (उच्छ्वासक ८).

सोड्ढलाचा काल निश्चित आहे. त्याला उत्तर कोकणात स्थानक (ठाणे) येथे राज्य करणाऱ्या तीन शिलाहार नृपतींचा आश्रय होता. त्यांच्या ताम्रपटांवरून त्यांच्या कारकीर्दीची पुढील वर्षे ज्ञात झाली आहेत—

छित्तराज (ज्ञात वर्षे सन १०२६, १०३४)[1]
|
(बंधु)
नागार्जुन (ज्ञात वर्ष सन १०३९)
|
(बंधु)
मुम्मुणिराज (ज्ञात वर्षे सन १०४९, १०६०)[2]

---

१. *Epigraphia Indica*, Vol. XII, pp 250 f.; Z. D. M. G., Vol. XC, pp. 26 f.

२. संशोधनमुक्तावलि, सर ४, पृ. ११५ इ. *JBBRAS* (Old Series), Vol. XII, pp. 329 f.

तेव्हा सोड्ढल सुमारे सन १०३० पासून १०५५ पर्यंत ठाण्यास शिलाहारांच्या दरबारी राहिला असावा. त्याला लाट (दक्षिण गुजराथ) देशातील चौलुक्यांचाही आश्रय होता. 'उदयसुंदरीकथे'त आलेल्या चौलुक्यांची नावे त्यांच्या ज्ञात वर्षांसह खाली दिली आहेत—

गोग्गिराज
|
कीर्तिराज (सन १०१८)[१]
|
वत्सराज
|
[त्रिलोचनपाल (सन १०५१)][२]

गोग्गिराजाचा पुत्र गंगाधर आणि कीर्तिराजाचा पुत्र सिंहराज यांचाही उल्लेख सोड्ढलाने केला आहे, पण ते गादीवर बसले नव्हते. वत्सराजाचे ताम्रपट मिळाले नाहीत, पण त्याच्या पित्याच्या व मुलाच्या ताम्रपटांवरून तो सुमारे १०३० ते १०५० या काळात होऊन गेला असावा. अर्थात सोड्ढलाने म्हटल्याप्रमाणे तो शिलाहार नृपति मुम्मुणिराजाचा समकालीन होता. त्याच्या काळाने सोड्ढलाच्या वर ठरविलेल्या काळाला पुष्टि मिळत आहे.

सोड्ढलाची 'उदयसुन्दरीकथा' बाणाच्या 'कादम्बरी'कथेसारखी रचली आहे. बाणाचे 'हर्षचरित' आणि 'कादम्बरी' हे दोन्ही ग्रंथ त्याला माहीत होते. 'हर्षचरिता'तल्याप्रमाणे त्याने आपल्या ग्रंथाच्या आरंभी आपल्या वंशाच्या उत्पत्तीविषयी काल्पनिक कथा देऊन आपल्या पूर्वजांविषयी व आश्रयदात्यांविषयी माहिती दिली आहे. पण 'हर्षचरिता'पेक्षा 'कादम्बरी'ची छाप त्याच्या ग्रंथावर जास्त पडली आहे. हे दोन्हीं ग्रंथ 'कथा'रूपाचे आहेत. म्हणजे त्यांचे कथानक काल्पनिक आहे. दोन्हीतील कथा अतिशय गुंतागुंतीच्या आहेत. 'कादम्बरी'त भूलोक व

---

१. Bhandarkar, *List*, No. 1088.

२. *Ibid* No. 1092. याचे नाव उदयसुन्दरीकथेत आले नाही.

स्वर्गलोक या दोनच लोकांतील घटनांचा उल्लेख येतो तर, 'उदयसुन्दरी-कथे'तील काही घटना पातालातील नागलोकात घडल्या असे दाखविले आहे. दोन्हींत शापामुळे त्यांतील पात्रांना शुकाचा व अश्वाचा जन्म प्राप्त झाल्याचे दाखविले आहे. दोन्हीतील शुक विद्वान्, शास्त्रपुराणादिकांचे ज्ञान असलेले असे, आणि घोडा–घोडी वायुवेगासारखी चपळ वर्णिली आहेत. दोन्ही कथांची भाषा समासप्रचुर आहे. पण सोड्ढलाने बाणासारखा श्लेषांचा व विविध अलंकारांचा उपयोग केलेला दिसत नाही. त्याच्या कथेत उत्प्रेक्षांचेच प्राचुर्य आढळते. त्याच्या कल्पनेची भरारी बाणाच्यासारखी उच्च प्रतीची नाही. अनेक ठिकाणी त्याचे वर्णन ठरीव ठशाचे वाटते. त्याच्या कथेत जास्त पात्रे असून त्याची गोष्ट अधिक गुंतागुंतीची झाली आहे. तथापि शेवटी त्याने सर्व धागे समाधानकारक रीतीने उलगडून दाखविले आहेत.

सोड्ढलाच्या पुढे बाणाच्या 'कादम्बरी'चा आदर्श होता. म्हणून त्याने बाणाची स्तुति तर केली आहेच, पण त्याला शापित रूपाने पृथ्वीवर आणून त्याच्याकडून आपल्या ग्रंथाची प्रशंसाही करविली आहे.

सोड्ढलाने आपल्या कथेत वैदर्भी, गौडी आणि पाञ्चाली या तीन्ही रीतींचा यथोचित उपयोग केला आहे. त्यांना तो अनुक्रमे कौकिली (कोकिळस्वराची), मायूरी (मयूरस्वराची) आणि माराली (हंसस्वराची) अशी नावे देतो. सामान्यतः पद्यात तो वैदर्भी किंवा पाञ्चाली रीतीचा आणि गद्यात गौडी रीतीचा उपयोग करतो. त्याच्या गद्यातील समासांनी कित्येकदा पानेच्या पाने भरली आहेत. त्याने विविधरसव्यंजक रचना केली आहे. विरही मलयवाहन आणि उदयसुंदरी यांच्या वर्णनात विप्रलंभ शृंगार, कापालिक व राक्षस यांच्या वर्णनात भयानक, स्मशानवर्णनात बीभत्स आणि विमानवेगवर्णनात अद्भुत अशा विविध रसांचा परिपोष झालेला त्याच्या कथेत आढळतो. तत्कालीन पद्धतीप्रमाणे त्याने समासांचा प्राचुर्याने उपयोग केला असला तरी त्यांत श्लेष नसल्यामुळे त्याची शैली दुर्बोध झाली नाही. त्याने उद्यान, वन, सरोवर इत्यादिकांच्या वर्णनात आपली सृष्टिसौन्दर्याची आवड व सूक्ष्म निरीक्षणशक्ति ही व्यक्त केली

आहेत. त्याच्या शैलीचे उदाहरण म्हणन खालील रात्रीच्या विमान-प्रवासाचे वर्णन पाहा—

आरूढे मयि झगित्येवोत्पत्य हरगलगरलकज्जलमलीमसं सुदूर-मन्तरशिरोभागमारुरोह । ततः परमुपक्रान्तं प्रयातुम्, अनन्तरमार-चितगुरुवेगनिर्गमप्रसरं परितो विस्फुरन्तीभिरतिधवलवैजन्तीभिर्गगनग-ङ्गाडिण्डीरवल्लरीपटलमिव मरुता नीयमानम्, अनणुमणिकर्मनिर्मलो-द्योतडम्बरेण प्रदीपतन्त्रमिव तिमिरविग्रहेणोच्चालितम्, उच्छलत्किं-किणीरणत्कारनिःस्वनैर्वेगोज्झितसमीरमिवारब्धविजयकोलाहलम्, उल्ल-लद्ध्वजपटफटत्कारितोपकण्ठकनकदण्डिकादारितनभस्तलम्, उल्लो-ठिताध्वजलधरम्, उत्सारिताग्रतारकं, स्वरूपमविकृत्य त्वरितमन्तरि-क्षेण गच्छतस्तस्य तिमिरपटलोन्मूलितालोकवृत्तिरहमन्येन नीयमानो-ऽन्ध इव, क एष ककुभो विभागः, कियदतिक्रान्त पश्चात्, अग्रेऽपि कियद्गन्तव्यम्, कीदृशी चासौ वसुमती, कीदृशा हि गिरिसरित्का-न्तारपरिगताः पन्थानः, कीदृशोऽप्यसौ जनपदप्रचार इति न जानामि, केवलं चरणचङ्क्रमणपीडाभिरुज्झितः पदे पदे मृदुसमीरलहरीनिवेश-शीतलोचनो यानेन गतिसुखमनुभूतवानस्मि ।

(मी रात्री त्या विमानात बसल्यावर ते एकदम उड्डाण करून शंकराच्या गळयातील विषासारख्या काळयाभोर अन्धकारात आकाशात उंच गेले. नंतर त्याने आपल्या प्रवासाला आरंभ केला. अत्यंत वेगाने ते जात असता त्याच्या अतिशय शुभ्र अशा पताकांमुळे आकाशगंगेच्या फेसाचा गोळाच जणू काय वाऱ्याने नेला जात आहे असे वाटले. त्यातील अनेक रत्नांच्या प्रकाशामुळे जणू काय अंधकारच प्रदीपाला उंच धरीत आहे असा भास झाला. त्याला लावलेल्या लहान घंटांच्या योगाने ते आपल्या वेगाने वाऱ्यालाही मागे टाकून जयशब्दकोलाहल करीत आहे असे दिसले. फडफडणाऱ्या ध्वजाच्या सुवर्णदंडांमुळे ते जणू काय आकाश फाडत होते, मार्गात आलेल्या ढगांना दूर सारीत होते, वरच्या तारकांना बाजूला लोटत होते. अन्तरिक्षातून ते वेगाने जात असता माझी दृष्टि अन्धकारामुळे निकामी होऊन एखाद्याने आंधळयाला न्यावे त्याप्रमाणे

मी जात होतो. ही कोणती दिशा, किती मार्ग आक्रमिला, पुढे किती जावयाचे आहे, ही पृथ्वी कशी आहे, पर्वत, नद्या, वने यांवरून जाणारे हे मार्ग कोणते, हा देश कोणता, हे काही मला समजले नाही. केवळ पायांनी चालून जाण्याचे श्रम न होता वाऱ्याच्या मंजुळ झुळकांनी डोळ्यांना गारवा भासत असता मी गमनसुखाचा अनुभव घेत होतो.)

सोड्ढल कधी विमानात बसला नव्हता. तथापि त्याने कल्पनाशक्तीने केलेले हे वर्णन सध्या विमानातून प्रवास करणाऱ्यांच्या अनुभवाचे आहे. त्यावरून त्याच्या कल्पनेची भरारी आणि वर्णनाची शक्ति यांची प्रतीति येते.

सोड्ढलाने अनेक प्राचीन सूरींचा आणि स्वकालीन ग्रंथकारांचा उल्लेख केला आहे. त्याचा स्वतःचा काल निश्चित असल्यामुळे त्या कवींच्या कालाची उत्तरमर्यादा निश्चित होते. त्यांपैकी वाल्मीकि, व्यास, गुणाढ्य, भर्तृमेण्ठ, कालिदास, बाण, भवभूति, वाक्पतिराज, राजशेखर यांचे काल इतर प्रमाणांवरून निश्चित झाले आहेत. तथापि त्यांपैकी काहींविषयी त्याने दिलेली माहिती नवीन आहे. वाक्पतिराज, मायुराज आणि विशाखदेव हे सामन्त होते असे सोड्ढल सांगतो. एका सुभाषितावरून मायुराज हा कलचुरि वंशातला राजा होता हे माहीत झाले आहे.[1] तथापि वाक्पतिराज[2] आणि विशाखदेव यांच्या विषयी ही माहिती नवीन आहे. विशाखादेव बहुधा 'मुद्राराक्षस' आणि 'देवीचन्द्रगुप्त' या नाटकांचा कर्ता विशाखदत्त[3] असावा.

सोड्ढलाने स्वकालीन श्वेताम्बर व दिगम्बर जैन कवींचा आणि त्यांच्या ग्रंथांचा उल्लेख केला आहे. त्यावरून त्या काळी लाटदेश हा जैन

---

१. 'भवभूति', पृ. ३५.

२. पूर्वोक्त, पृ. २८, २९.

३. 'मुद्राराक्षसा'त विशाखदत्त हा सामन्त वटेश्वरदत्ताचा पौत्र आणि महाराज भास्करदेवाचा पुत्र होता असे म्हटले आहे. एका हस्तलिखितात त्याचे नाव 'विशाखदेव' असे आले आहे.

साहित्याविषयी सुप्रसिद्ध होता असे दिसते. पण दुर्दैवाची गोष्ट ही की या ग्रंथांपैकी एकही सध्या उपलब्ध नाही. संस्कृत चम्पूकाव्यांत त्याची 'उदयसुन्दरीकथा' आरंभीच्या कालातील आहे. त्याच्या पूर्वी वैदर्भ कवि त्रिविक्रमभट्ट याची 'नलचम्पू' किंवा 'दमयन्तीकथा' (दहाव्या शतकाच्या प्रथम पादातील) आणि दिगम्बर जैन सम्प्रदायाची 'यशस्तिलकचम्पू' (सन ९५३) ही दोन चम्पूकाव्ये रचलेली अद्यापि उपलब्ध आहेत. पण त्यांचा निर्देश सोड्ढलाच्या कथेत येत नाही. तो स्वत: श्वेतांबर जैन कवि चन्दनाचार्याची 'अशोकवती' आणि इन्द्रकवीची 'रत्नमञ्जरी' या दोन चम्पूकाव्यांचा निर्देश करतो पण ती दोन्ही कालाच्या ओघात नष्ट झाली आहेत. पुढे 'रामायणचम्पू,' 'भारतचम्पू,' 'भागवतचम्पू,' 'विश्वगुणादर्शचम्पू' इत्यादि अनेक चम्पूकाव्ये निर्माण झाली. पण सोड्ढलाच्या 'उदयसुन्दरीकथे'सारखे गुंतागुंतीचे कथानक त्यात दिसत नाही. श्लेषादिकांच्या प्राचुर्याने त्यांची शैली जास्त जास्त क्लिष्ट होत गेली. आरंभीच्या चम्पूकाव्याचे उदाहरण म्हणून सोड्ढलाच्या 'उदयसुन्दरीकथे'ला त्या काव्याच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.

——

८. मत्तवारणी

भरताचे 'नाटचशास्त्र' हा ग्रंथ केवळ संस्कृत वाङ्मयातच नव्हे तर जागतिक वाङ्मयात अद्वितीय आहे. त्यात नाटचासंबंधी विविध विषयांचे– नाटकांपासून आपणांस होत असलेल्या आनंदाचे सोपपत्तिक विवेचन, प्रेक्षागृहाची निर्मिति, नाटकांतील नृत्ते, नटांचे अभिनय व भाषणे, नाटकांचे प्रकार, त्यांचे विभाग, त्यांतील शैली, त्यांतील वाद्य, गीत व नृत्य, त्यांचे ध्येय इत्यादिकांचे–सविस्तर विवेचन केले आहे. नंतरच्या कालात 'दशरूपक,' 'साहित्यदर्पण,' 'नाटचदर्पण' इत्यादि ग्रंथ निर्माण झाले. पण त्यांतील एकातही नाटचाचे असे सर्वंकष विवेचन आढळत नाही. विशेषतः प्राचीन भारतीय प्रेक्षागृहांविषयी (थिएटरांविषयी) माहिती इतरत्र कोठेही आढळत नाही. त्यांतील एका विवाद्य प्रश्नाची चर्चा प्रस्तुत लेखात करावयाची आहे.

भरताच्या 'नाटचशास्त्रा'चा काल निश्चित नाही, तथापि ते ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकानंतरचे नाही असे संशोधकांचे मत आहे. म्हणजे त्याच्या निर्मितीला आता दीड हजाराहून अधिक वर्षे झाली. या दीर्घ कालात त्या ग्रंथावर अनेक टीका झाल्या. पण त्यांपैकी एकच–ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकाच्या आरंभी होऊन गेलेल्या अभिनवगुप्ताची 'अभिनवभारती' ही आता उपलब्ध आहे.[१] अभिनवगुप्त भरतानंतर निदान आठशे वर्षांनंतर होऊन गेला त्यामुळे तो अत्यंत विद्वान् आणि रसिक असला तरी त्यालाही भरताच्या ग्रंथाचा अर्थ बरोबर लागला नाही. त्याने काही ठिकाणी वैकल्पिक अर्थ दिले आहेत, त्यावरून हे स्पष्ट दिसते. अलीकडील

---

१. नाटचशास्त्र, भाग १ (गायकवाड्स ओरिएंटल सीरीज), द्वितीयावृत्ति, पृ. ३९

एका स्थापत्यशास्त्रकोविद (प्रोफेसर डी. सुब्बाराव) यांनी भरताच्या प्रेक्षागृहविषयक श्लोकांचा निराळा अर्थ लावून म्हटले आहे.—[१]

अभिनवगुप्तोऽप्यनुभवलुप्तो ह्यनुमितमर्थं वितरति यत्र ।
अभिनवदृष्टया समुदितमर्थं प्रमुदितबुद्धया विमृशत तत्र ।।

त्यांचे म्हणणे असे की भरताने वर्णिलेल्यासारखी प्रेक्षागृहे नंतरच्या कालात बांधली होती याला पुरावा नाही. आतापर्यंत झालेल्या कोणत्याही उत्खननात त्यांचे अवशेष सापडले नाहीत. अभिनवगुप्तानेही त्यासारखी प्रेक्षागृहे पाहिली नसावी. त्याने भरताच्या तद्विषयक श्लोकांचा अर्थ अनुमानाने लावला आहे. तो कित्येक ठिकाणी चूक आहे. तेव्हा भरताला इष्ट अशा प्रेक्षागृहाची रचना समजण्याकरिता आपणांस ' नाटच-शास्त्रा 'तील श्लोकांचा अर्थ स्वतंत्र रीत्या लावला पाहिजे. त्यांनी तो तसा लावण्याचा प्रयत्न केला आहे. ' नाटचशास्त्रा 'त रंगपीठ, रंगशीर्ष, मत्त-वारणी, षड्दारुक, द्विभूमिक इत्यादि अनेक तांत्रिक संज्ञा आल्या आहेत. प्रो. सुब्बारावांनी केलेला त्यांचा अर्थ इतरांच्यापेक्षा भिन्न आहे. त्या सर्वांचा येथे विचार करावयाचा नाही. पण त्यांतील ' मत्तवारणी ' या संज्ञेच्या अर्थाबद्दल विद्वानांत मतभेद असल्यामुळे त्याविषयी चर्चा करावयाची आहे.

' नाटचशास्त्रा 'त ' मत्तवारणी ' संज्ञेचा उल्लेख अनेक ठिकाणी आला आहे. संस्कृत प्रेक्षागृहांचे विकृष्ट (समकोणी), चतुरस्र (चौरस) आणि त्र्यस्र (त्रिकोनी) असे तीन प्रकार भरतांनी सांगितले आहेत. त्यातील रंगपीठ (स्टेज), नेपथ्यगृह (पात्रे सजविण्याची खोली), प्रेक्षकगृह (ऑडिटोरियम) यांविषयी माहिती दिल्यावर भरत म्हणतात[२]—

रङ्गपीठस्य पार्श्वे तु कर्तव्या मत्तवारणी ।
चतुःस्तंभसमायुक्ता रङ्गपीठप्रमाणातः ।।

---

१. पूर्वोक्त, परिशिष्ट ६, पृ. ४५४

२. प्रस्तुत लेखातील संदर्भ नाटचशास्त्राच्या पहिल्या भागाच्या पूर्वोक्त द्वितीयावृत्तीतून दिले आहेत.

अध्यर्धहस्तोत्सेधेन कर्तव्या मत्तवारणी ।
उत्सेधेन तयोस्तुल्यं कर्तव्यं रङ्गमण्डपम् ॥
(२-६३-६५)

पुढे रङ्गपीठाविषयी आणखी माहिती देताना म्हटले आहे--

अष्टहस्तं तु कर्तव्यं रङ्गपीठप्रमाणतः ।
चतुरस्रं समतलं वेदिकासमलङ्कृतम् ॥
पूर्वप्रमाणनिर्दिष्टा कर्तव्या मत्तवारणी ।
चतुःस्तम्भसमायुक्ता वेदिकायास्तु पार्श्वतः ॥
(२, ९८-९९)

ब्रम्हदेवाने सर्व जातींच्या मनोरंजनार्थ नाटचवेद उत्पन्न करून भरताला नटांना तो शिकविण्यास सांगितले, नाटकांना आवश्यक अशा नटींकरिता अप्सरांची उत्पत्ति केली आणि इतर सर्व गोष्टींची सिद्धता झाल्यावर नाटचमंडपामध्ये नाटकाला आरंभ केला. पण त्यात दानवांनी विघ्ने आणली. इन्द्राने आपल्या ध्वजाने त्यांना जर्जर केले. तेव्हापासून त्या ध्वजाला जर्जर नाव पडले व त्याचो पूजा प्रचलित झाली. पण तरीही राक्षस त्रास देण्याचे सोडीनात. तेव्हा ब्रह्मदेवाने विश्वकर्म्याला नाटचगृह निर्माण करण्यास आज्ञा केली आणि ते तयार झाल्यावर त्याच्या विविध भागात रक्षणासाठी त्या त्या देवांची स्थापना केली. त्या प्रसंगात म्हटले आहे--


पार्श्वे च रङ्गपीठस्य महेन्द्रः स्थितवान् स्वयम् ।
स्थापिता मत्तवारण्यां विद्युद्दैत्यनिषूदिनी ॥
स्तम्भेषु मत्तवारण्याः स्थापिताः परिपालने ।
भूतयक्षपिशाचाश्च गुह्यकाश्च महाबलाः ॥ (१, ९०-९१)

या श्लोकांत मत्तवारणीच्या संरक्षणार्थ विद्युल्लतेला आणि तिच्या स्तंभांच्या रक्षणार्थ यक्षादिकांना नेमल्याचा उल्लेख आहे. पुढे तिसऱ्या अध्यायात या देवतादिकांची पुष्प, मधु, पायस इत्यादिकांनी पूजा करावी असे सांगितले आहे. या संदर्भात म्हटले आहे--

अनेनैव विधानेन सम्पूज्या मत्तवारणी ।
पक्वामेन तु मांसेन सम्पूज्या रक्षसां गणाः ।।

या सर्व उल्लेखांवरून भरताच्या नाट्यगृहात मत्तवारणीला महत्त्वाचे स्थान होते असे दिसून येईल.

पण या मत्तवारणीचा अर्थ काय, याविषयी विद्वानांत तीव्र मतभेद आहेत. अनेकांनी तो रंगपीठाचा भाग मानला आहे आणि त्याचे स्थान पुढील आकृतीतल्याप्रमाणे दाखविले आहे.[१]—



अनेक विद्वानांना मत्तवारणीची ही स्थाने मान्य आहेत. या कक्ष्यांना 'मत्तवारणी' हे नाव का पडले याविषयी मात्र मतभेद आहेत. काहींनी या नावाची काहीच व्युत्पत्ति दिली नाही, तर इतरांनी त्याचा हत्तीशी संबंध जोडला आहे. 'मत्त' या शब्दाने त्यापुढील 'वारण' शब्दाचा हत्ती हा अर्थ सुचविला असावा. कारण हत्ती मदोन्मत्त होतात. म्हणून मत्तवारणीचा हत्तीशी काही संबंध असावा असे अनुमान केले असावे. कोणी म्हणतात, तेथे हत्तींच्या विशाल आकृति स्तंभांच्या पीठावर होत्या म्हणून त्या भागाला मत्तवारणी म्हटले आहे.[२]

१. इंडियन हिस्टॉरिकल क्वॉटर्ली, व्हॉ. ८, पृ. ४८१.

२. डॉ. पी. एस्. शास्त्री यांचा 'डॉ. मिराशी फेलिसिटेशन व्हॉल्यूम्' मधील लेख पाहा.

डॉ. दिवेकर यांनी या संबंधात साटमारीचा किंवा हस्तिक्रीडेचा उल्लेख केला आहे.[1] या क्रीडेसाठी मध्ये वेदी किंवा उंच पीठ आणि तिच्या दोन बाजूस दोन हत्तींकरिता मंडप उभारीत. क्रीडा सुरू होण्यापूर्वी हत्तींना परस्परांना पाहता येऊ नये म्हणून समोर पडदा असे. क्रीडेच्या वेळेस पडदा दूर सारून दोन मत्त हत्तींना समोरच्या वेदीवर युद्ध करण्यास लावत. जो आपल्या प्रतिस्पर्ध्यास मंडपात परत पिटाळू शके त्याला विजयी गणण्यात येई. या क्रीडेचा उल्लेख कालिदासाच्या 'रघुवंशा'त (१२, ९३) आला आहे, असे डॉ. दिवेकरांनी दाखविले आहे. मत्त हत्तींकरिता उभारलेल्या मंडपास 'मत्तवारणी' अशी संज्ञा असे. नाटयगृहातील रंगपीठाच्या दोन्ही बाजूंस असलेल्या कक्ष्यांना तीच संज्ञा लावली आहे, अशी या 'मत्तवारणी' संज्ञेची उपपत्ति डॉ. दिवेकर यांनी लावली आहे.

पण प्रा. सुब्बाराव यांना 'मत्तवारणी'चा कक्ष्या हा अर्थ मान्य नाही. ते 'मत्तवारणी' हे 'श्रेणि' (ओळ) याचे विशेषण समजतात आणि 'मत्तवारणी' याचा अर्थ 'मदोन्मत्त हत्तींची रांग' असा करतात[2]—

'रंगपीठस्य पार्श्वे तु कर्तव्या मत्तवारणी' याचा अर्थ 'रंगपीठाच्या समोर त्याच्या पीठावर (प्लिथवर) अशा हत्तींची रांग (frieze) बनवावी' असा ते घेतात. या हत्तींच्या आकृतींची उंची अध्यर्धहस्त म्हणजे अर्ध्या हातापेक्षा (अर्थात् ९ इंचापेक्षा) मोठी असावी असे ते समजतात. या मत्तवारणीत चार स्तंभ सांगितले आहेत ते आवश्यकच आहेत; कारण हत्ती मदोन्मत्त असल्याने त्यांच्या मागील पायांना बांधण्याकरिता चार स्तंभ दाखविले असावे, असे त्यांचे म्हणणे आहे.

प्रा. सुब्बाराव हे विख्यात स्थापत्यशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी काही ठिकाणी नाटयशास्त्रातील श्लोकांचा जास्त चांगला अर्थ लावला आहे.[3]

---

१. जर्नल ऑफ दि ओरिएंटल इन्स्टिटयूट, व्हॉ. १०, पृ. ४३५–४३७.

२. नाटयशास्त्र, भाग १ (द्वितीयावृत्ति), पृ. ४४०.

३. उदाहरणार्थ, त्यांचे रंगपीठ, षड्दारुक इत्यादींचे अर्थ पाहा.

पण प्रस्तुत श्लोकाचा त्यांचा अर्थ मान्य करता येत नाही. ' रंगपीठस्य पार्श्वे ' याचा अर्थ ' रंगपीठाच्या बाजूस ' असा केला पाहिजे. ' रंगपीठाच्या बैठकीवर ' असा करणे योग्य दिसत नाही. शिवाय रंगपीठाच्या दोन बाजूंस दोन मत्तवारणी भरताला विवक्षित होत्या हे खालील श्लोकावरून स्पष्ट होईल—

अध्यर्धहस्तोत्सेधेन कर्तव्या मत्तवारणी ।
उत्सेधेन तयोस्तुल्यं कर्तव्यं रङ्गमण्डपम् ।।

या श्लोकात ' तयोः ' म्हणजे रंगपीठाच्या दोन बाजूंस (पार्श्वे) असलेल्या मत्तवारणी दीड हात उंच असाव्या आणि रंगमंडपाची किंवा स्टेजची उंचीही तितकीच असावी असा विवक्षित दिसतो.[१] अध्यर्ध म्हणजे दीड. प्रा. सुब्बाराव समजतात त्याप्रमाणे 'अध्यर्धापेक्षा अधिक' नव्हे. मागे सांगितल्याप्रमाणे नाटचशास्त्रात या मत्तवारणींच्या आणि त्यांच्या स्तंभांच्या संरक्षणार्थ उपाययोजना केली होती, आणि त्यांची गंधमधुपायसादिकांनी पूजा विहित होती रंगपीठावर भूषणार्थ कोरलेल्या हत्तींच्या रांगेची पूजा व संरक्षण करण्यात काही प्रयोजन दिसत नाही.

शिवाय ' मत्तवारणी ' या सामासिक शब्दात वारण याचा अर्थ हत्ती असणे संभवनीय नाही. दोन्ही पक्ष हा शब्द बहुव्रीही आहे असे समजतात, आणि ' मत्ता वारणा यस्यां सा मत्तवारणी, कक्ष्या श्रेणिर्वा ।' असा त्याचा विग्रह करतात. पण तसा अर्थ विवक्षित असता तर त्या समासाचे स्त्रीलिंगी रूप ' मत्तावारणा ' असे पाणिनीच्या ' अजाद्यतष्टाप् ' या सूत्रान्वये झाले असते.[२] तेव्हा येथे ' वारण ' याचा अर्थ हत्ती असणे शक्य नाही.

---

१. प्रो. सुब्बाराव याचा अर्थ मत्तवारणी व रंगशीर्ष यांची उंची परस्परांना अनुरूप असावी असा करतात. तो बरोबर नाही. 'तयोः' याने मत्तवारणी आणि रंगमंडप असा अर्थ विवक्षित असणे शक्य नाही. डॉ. दिवेकरांनीही त्यांच्या विवेचनावर खरपूस टीका केली आहे. जर्नल ऑफ दि ओरिएंटल इन्स्टिटयूट, व्हॉ. १०, पृ. ४३१–४३७ पाहा.

२. ' वारण ' शब्द ' ल्यु ' प्रत्यय लागून बनला आहे. ' वारणः– वारयति शत्रुबलम् । ल्युः (पा. ३–२–१३४)' ही अमरकोशावरील भानुजी दीक्षित यांच्या टीकेतील व्युत्पत्ति पाहा.

मग 'मत्तवारणी' याचा अर्थ कोणता ? तो शब्द तत्पुरुष समास घ्यावा. 'मत्तानां (राक्षसादीनां) वारणी मत्तवारणी कक्ष्या'. येथे ल्युट् प्रत्यय लागल्याने 'वारणी' असे स्त्रीलिंगी रूप योग्य आहे.

भरताच्या नाटचशास्त्रात रंगमंडपाच्या किंवा प्रेक्षागृहाच्या संरक्षणाकरिता अत्यंत चिंता वाहिलेली दिसते. त्याच्या विविध भागांच्या ठिकाणी देवांची स्थापना, तसेच त्यांची पुष्पे, उचित अन्न इत्यादिकांनी पूजा सांगितली आहे. रंगमंडपात पुढे प्रेक्षकवर्ग आणि मागील बाजूस नेपथ्यगृहात नटवर्ग असल्याने त्या दोन बाजूंस संरक्षणाची विशेष जरूरी नव्हती. पण रंगपीठाच्या दोन बाजूनी मदोन्मत्त राक्षसांचा हल्ला होण्याचा संभव होता. त्यांचे निवारण करण्याकरिता त्या दोन बाजूच्या मत्तवारण्या आरंभी विवक्षित असाव्या. त्या प्रयोजनाला अनुसरून त्या कक्ष्यांची नावे पडली असावी.

या मत्तवारणींचा कसा उपयोग केला जात असे याविषयी नाटचशास्त्रात उल्लेख नाही. तथापि नेपथ्यगृहातून रंगपीठावर येण्याकरिता भरतांनी दोन दरवाजे सांगितले आहेत.[1] त्यांचा उपयोग या मत्तवारणीत येण्याकरिता होत असावा. तसे नसते तर दोन दरवाजांची आवश्यकता वाटली नसती. एकानेच काम भागले असते. याशिवाय रंगपीठाच्या मागील बाजूस पडदा (यवनिका) असे.

नाटचशास्त्रात रंगपीठ आणि रंगशीर्ष अशा दोन संज्ञा वापरल्या आहेत. अभिनवगुप्त त्यांनी स्टेजचे दोन निरनिराळे भाग दाखविले जातात असे सांगतो. तर सर्व वेषभूषा झाल्यावर रंगशीर्षात आपल्या कामाच्या वेळेची वाट पाहत असत असे त्याने एके ठिकाणी म्हटले आहे. दुसऱ्या एका ठिकाणी त्याने तेथे नट विश्रांती घेतात असे म्हटले आहे.[2] काही विद्वानांच्या मते रंगपीठ आणि रंगशीर्ष या दोन्ही संज्ञा स्टेजच्याच

---

१. नाटचशास्त्र, २, ३९.

२. अष्टहस्तं रङ्गशिरः । प्रविशतां पात्राणां चान्तःस्थानम् । तत्पात्राणां विश्रान्त्यै आगच्छतां च गुप्त्यै रङ्गस्य शोभायै रङ्गशिरः । पृ. ५६.

होत्या. भरताने त्या भिन्न मानल्या नाहीत. तसे असल्यास अभिनवगुप्ताने जो रंगशीर्षाचा उपयोग मानला आहे तोच मत्तवारणीचा होत असावा. तेथे नट येऊन आपल्या कामाच्या वेळेची वाट पाहत असावे. हल्लीच्या रंगभूमीच्या विंग्जसारखा त्यांचा उपयोग होत असावा.

मागे सांगितल्याप्रमाणे भरतानंतरच्या नाटचविषयक ग्रंथांत नाटचगृहांचा उल्लेख किंवा वर्णन येत नाही. अर्थातच त्यांत मत्तवारणीचाही उल्लेख नाही. पण नंतरच्या काही संस्कृत ग्रंथांत 'मत्तवारणी'चे किंवा त्यासारख्याच 'मत्तवारणका'चे उल्लेख आढळले आहेत. त्याकडे अद्यापि संशोधकांचे लक्ष गेलेले दिसत नाही. ते येथे दाखवतो.

अलीकडे भवभूतीच्या नाटकांचा उत्तरकालीन नाटककारांवर काय परिणाम झाला याचा अभ्यास करताना मला राजशेखराच्या 'बालरामायणा'चे परिशीलन करावे लागले. राजशेखर स्वतःस भवभूतीचा अवतार म्हणवतो.[१] त्याने भवभूतीच्या नाटकांतील अनेक प्रसंगांचे अनुकरण केले आहे.[२]

'बालरामायणा'च्या चौथ्या अंकात रामाने केलेला परशुरामाचा पराभव वर्णिला आहे. आरंभीच्या विष्कंभकात परशुरामाचा भवभूति नामक शिष्य विद्याध्ययनाकरिता दुसऱ्या एका उपाध्यायाकडे आल्याचे दाखविले आहे. अशा तऱ्हेची वाल्मीकीची प्रौढ विद्यार्थिनी आत्रेयी दंडकारण्यातील अगस्त्यादि ऋषींजवळ वेदान्तविद्येच्या अध्ययनाकरिता आल्याचा प्रवेश भवभूतीच्या 'उत्तररामचरिता'त घातलेला संस्कृतज्ञ वाचकांस माहीत असेल. 'बालरामायणा'तील प्रवेशात भवभूति बटु म्हणतो, 'परशुराम आचार्य शिवधनुर्भंगाची वार्ता ऐकल्यावर युद्धमदाने पछाडले गेल्यामुळे मला अनेक प्रकारच्या बाणांचे भारे इकडून तिकडे न्यावयास लावू लागले. त्यामुळे मी पूर्वी गजाननासारखा स्थूल तुंदिलतनु होतो, पण आता भृंगरिटीसारखा अस्थिपंजर झालो आहे. म्हणून तेथून हळूच निसटून मी आपणांकडे आलो आहे.' नंतरच्या मुख्य अंकात परशु-

१. बालरामायण, १, १६.

२. वा. वि. मिराशी, 'भवभूति', पृ. ३६४–३६९.

रामाचा लौकरच रामाशी झगडा होईल या भीतीने इंद्राने सुरकार्याकरिता स्वर्गात बोलाविलेल्या दशरथ राजाला आपल्या रथातून सारथी मातलि आणि चामरधारिणी सौदामिनी यांसह पृथ्वीवर परत पाठविल्याचा प्रवेश घातला आहे. वाटेत दशरथ मातलीला विचारतो, 'इंद्राच्या मनात परशुरामाच्या कृत्याबद्दल आदर आहे काय ?' तेव्हा मातलि उत्तरतो, 'इंद्राला परशुरामाच्या कृत्यांबद्दल महान् आदर वाटतो.

आस्थानसद्मनि विलासगृहे विमाने
जैत्रे रथे च सततं सुरचक्रवर्ती ।
रामस्य चित्रलिखितानि कुतूहलेन
वीरो विलोकयति पूर्वविचेष्टितानि ।।

(तो शूर इंद्र परशुरामांच्या पूर्व पराक्रमांची चित्रे आपल्या सभागृहात, विलासगृहात, विमानात, विजयी रथात काढलेली मोठ्या कुतूहलाने सारखा पाहत असतो.)'

नंतर तो म्हणतो, 'यदस्यैव पुरन्दरस्यन्दनस्य चतुर्दिशं मत्तवारणीफलकेषु रामचित्रं लिखितम् । (अङ्गुल्या निर्दिशन्) तत्तावदितो दीयतां दृष्टिः । इयं प्ररोचना भृगुपतिपराक्रममहानाटकस्य यदुत भगवतस्त्र्यम्बकात् कार्मुकोपनिषल्लाभः ।

(ही पहा याच इंद्ररथाच्या चारी बाजूंस मत्तवारणीफलकांवर काढलेली परशुरामाची चित्रे. भगवान् शंकराकडून त्याला धनुर्वेदाची झालेली ही प्राप्ति त्याच्या पराक्रमरूपी महानाटकाची नान्दीच होय.)

असे म्हणून तो दशरथाला त्याचे चित्र दाखवतो. यानंतर परशुरामाचे कार्त्तिकेयाशी झालेले युद्ध, त्यात पार्वतीचे मध्ये पडणे, नंतर शंकरांनी त्याला आपल्या परशूचा तुकडा देणे, त्याने केलेला आपल्या रेणुका मातेचा शिरच्छेद आणि नंतर तिचे पुनरुज्जीवन, त्याने केलेला सहस्रार्जुनाचा आणि नंतर एकवीस वेळां केलेला क्षत्रियांचा संहार इत्यादिकांची चित्रे मातलि दशरथाला दाखवतो.

'बालरामायणा'च्या या उताऱ्यात ही चित्रे रथाच्या मत्तवारणी फलकांवर लावल्याचे वर्णन आहे. येथे मत्तवारणी म्हणजे रथाचे बाजूचे

गॅलरीसारखे भाग असा अर्थ विवक्षित दिसतो. 'मत्तवारणी' ही संज्ञा राजशेखराने अर्थातच भरताच्या 'नाट्यशास्त्रा'तून घेतली आहे हे उघड आहे. आणि त्यावरून 'मत्तवारणी' म्हणजे अलंकरणाकरिता काढलेली हत्तींच्या आकृतींची रांग (frieze) हा अर्थ जमत नाही हे उघड आहे. 'रंगपीठाच्या बाजूच्या कक्ष्या' असाच त्या शब्दाचा अर्थ घेतला पाहिजे.

'मत्तवारणी'सारख्याच अर्थाचा पण किंचित् बदललेल्या 'मत्तवारणक' स्वरूपाचा शब्द उत्तर कोकणात राज्य करणाऱ्या शिलाहार राजांच्या आश्रयास ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकात असलेल्या सोड्ढल कवीच्या 'उदयसुन्दरीकथे'च्या खालील उताऱ्यांत आढळतो.[१]

पृ. १५–स्वयं पुनः प्रविश्य.. तदेव पटतल्पाच्छादितमुपरिविन्यस्तपुस्तकं मत्तवारणकमध्यासितः प्रदीपचिन्तया तस्थौ ।

पृ. १६ द्वावपि तौ... देवीं..स्तुत्वा च पुनः पुनर्भालफलकाहतमहीतलं प्रणम्य निराकुलीभूतावगत्य द्वितीयं मत्तवारणकमध्यास्योपविष्टौ ।

पृ. १७ ततश्चासौ तदेव मत्तवारणकमनुसृत्योपविष्टः ।

पृ. १८. छायार्थी सौगतमवाप्य हृद्यमायतनं तस्मिन्बहिरेव द्वारमत्तावारणके समुपाविशम् ।

पृ. १५३–तस्मिन्नेव मत्तवारणके पुस्तकमुच्छीर्षकीकृत्य सुप्तवान् ।

या उताऱ्यांत 'मत्तवारणक' याचा अर्थ सभागृहाचा दोन्ही बाजूंस स्तंभपंक्तींनी विभक्त केलेला भाग (aisle) हा विवक्षित दिसतो. नाट्यशास्त्रातल्या 'मत्तवारणी'च्या अर्थासारखाच हा अर्थ आहे.

काही संस्कृतग्रंथांत 'मत्तवारण' याचा निराळाच अर्थ विवक्षित दिसतो. दामोदरगुप्ताच्या (ख्रिस्तोत्तर आठवे शतक) 'कुट्टनीमता'त वाराणसीचे वर्णन करताना खालील श्लोक आला आहे.[२]

विन्ध्यधराधरभूरिव सा राजति मत्तवारणोपेता ।
बहुलनिशीथवतीव प्रोज्ज्वलधिष्ण्योपशोभिता या च ॥

१. उदयसुन्दरीकथा (गायकवाड्स ओरिएंटल सीरीज) (१९२०).

२. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी या उल्लेखाकडे माझे लक्ष वेधले. मी त्यांचा आभारी आहे.

वाराणसीचे हे वर्णन श्लोकमय आहे. "मत्तवारणांनी (व्हरांड्यांनी किंवा अंगणांनी) युक्त अशी ती वाराणसी नगरी मत्तगजांनी युक्त अशा विन्ध्यपर्वताच्या भूमीप्रमाणे दिसत होती. तसेच सुंदर प्रासादांनी युक्त अशी ती नगरी तेजस्वी नक्षत्रांनी शोभत असलेल्या कृष्णपक्षातील रात्री-प्रमाणे वाटत होती." 'विश्वप्रकाश' कोशामध्ये 'मत्तवारणा'चे पुढील अर्थ दिले आहेत–'मत्तवारणमिच्छन्ति दानक्लिन्नकरे द्विपे । महाप्रासादवीथीनां वरण्डे चाप्यपाश्रये ।।

या मत्तवारणाचा नाटचशास्त्रातील मत्तवारणीशी काही संबंध नाही. या शब्दातील 'वारण' याचा अर्थ हत्ती. मोठमोठ्या प्रासादांच्या समोर हत्ती झुलत असल्यामुळे मत्तवारण याचा अर्थ वरण्ड (व्हरांडे) किंवा अंगण असा दुसरा अर्थ संस्कृत भाषेत प्रचलित झाला आणि म्हणून तोही संस्कृत कोशात दिला आहे.

जैन वाङ्मयातील वर्णनावरून डॉ. सन्देसारा आणि डॉ. शहा यांनी 'मत्तवारण' याचा 'वाड्यातील बाल्कनी किंवा झरोका, जेथे बसून स्त्रियांना रस्त्यावरची दृश्ये पाहता येत तो भाग' असा अर्थ केला आहे.[१] या अर्थात हत्तीचा संबंध येणे शक्य नाही. म्हणून 'मत्ताः प्रमादिनः पतन्तो वार्यन्तेऽनेनेति मत्तवारणः ।' (जेथून खाली पडू नये अशी व्यवस्था केली असते तो भाग) अशी त्या संज्ञेची व्युत्पत्ति एका टीकाकाराने दिली आहे. ती नाटचगृहाच्या 'मत्तवारणी' कक्ष्येच्या मागे सांगितलेल्या व्युत्पत्ती-सारखी आहे.

स्टेन कोनो,[२] कीथ[३] वगैरेंनी नाटचशास्त्रातील 'मत्तवारणी'चा व्हरांडा हा अर्थ दिला आहे. या दोघानीही तेथे प्रेक्षक बसत असे म्हटले आहे. पण ते चूक आहे. 'मत्तवारणी' आणि 'मत्तवारण' हे दोन शब्द भिन्न आहेत. नाटचशास्त्रातील 'मत्तवारणी'चा हत्तीशी काहीही संबंध नाही हे मागे दाखविले आहे.

---

१. जर्नल ऑफ दि ओरिएंटल इन्स्टिटयूट, व्हॉ. १०, पृ. ४३८ इ.

२. Sten Konow–*Das Sanskrit Drama.*

३. Keith–*Sanskrit Drama.*

९. पहिला मराठी कोरीव लेख कोणता ?

मराठी भाषेचा उद्गम केव्हा झाला आणि ती लेखनात केव्हा आली याविषयी आपणांस कुतूहल असते. मराठी भाषेत अगदी पहिले समजले जाणारे महानुभावीय ग्रंथ तेराव्या शतकातील आहेत. त्यामध्ये मराठी भाषा चांगली परिणतावस्थेत आलेली दिसते. त्याच्यापूर्वी कित्येक शतके तिचा उद्गम झाला असावा. मराठीतील आरंभीचे ताडपत्रे, कागद वगैरे-वरचे लेख कित्येक शतकांच्या दीर्घ कालानंतर आतापर्यंत अस्तित्वात असणे शक्य नसण्यामुळे मराठीतील कोरीव लेखांच्या प्रमाणाला विशेष महत्त्व येते.

गोम्मटाच्या मूर्तीवरील लेख

वि. का. राजवाडे आणि आबा चांदोरकर यांनी शालिवाहन शके ४१० चे म्हणून चार ताम्रपट प्रसिद्ध केले, पण ते आता बनावट ठरले आहेत. तीच कथा राजवाडे यांनी संपादिलेल्या शके ६५८ च्या चिकुर्डे ताम्रपटाची आहे. त्यामुळे श्रवण बेळगोळ येथील गोम्मटाच्या मूर्तीवरील 'श्रीचावुण्डराजे करवियले' हा कोरीव लेख मराठीतील पहिला लेख मानण्यात येत असे. त्या लेखात कालाचा उल्लेख नाही; पण चामुण्डराय हा पश्चिम गंग नृपति राजमल्ल याचा मंत्री होता. या राजमल्लाचा शासनकाल इ. स. ९७४ ते ९८४ असा आहे. तेव्हा त्या कालातच श्रवण बेळगोळचा हा मराठी लेख कोरला गेला असावा असे म्हणता येते. याच्याही पुढे जाऊन तो लेख इ. स. ९७८ च्या पूर्वी कोरला गेला नसावा असेही अनुमान करता येते. कारण चामुण्डरायाने आपल्या 'चामुण्डराय-पुराणा'त आपल्या इतर महत्कार्यांचा उल्लेख केला आहे. पण त्यात गोम्मटाच्या मूर्तीच्या स्थापनेचा उल्लेख नाही. तेव्हा त्या मूर्तीची स्थापना आणि अर्थातच तिच्यावरील पूर्वोक्त लेख ही इ. स. ९७८ नंतरची सुमारे

इ. स. ९८३ ची असावी असे अनुमान होते. तेव्हा मराठीतील हा पहिला कोरीव लेख इ. स. च्या दहाव्या शतकाच्या शेवटच्या पादातील होय, असे मानण्यात येत असे.

पण गोम्मटाच्या मूर्तीवरील पूर्वोक्त लेख 'एपिग्राफिया इंडिका' (पु. ७, पृ. १०८) मध्ये संपादन करणाऱ्या डॉ. हुल्ट्शच्या मते तो लेख त्यानंतरचा असावा. त्या मूर्तीवर 'श्रीगंगराजे सुत्ताले करवियले' (श्रीगंगराजाने सभोवारचा तट बांधविला) असा दुसरा लेख आहे. हा गंगराज होयसळनृपती विष्णुवर्धन (इ. स. ११०६–११५२) याचा सेनापति होता. या दुसऱ्या लेखाचा काल सुमारे इ. स. १११७ हा आहे. चामुण्डराय्राचा लेख इ. स. ९८३ चा मानल्यास गोम्मटाच्या मूर्तीवरील या दोन लेखातील अंतर १३४ वर्षांचे येते. पण या दोन्ही लेखांची अक्षरवटिका अगदी एकसारखी आहे. १३४ वर्षांच्या दीर्घ कालावधीत अक्षरवटिकेत बिलकुल फरक पडला नसेल हे असंभवनीय आहे. तेव्हा हे दोन्ही लेख इ. स. १११७ च्या सुमारास म्हणजे बाराव्या शतकाच्या प्रथम पादात कोरले असावे. श्रवण बेळगोळ हे ठिकाण कानडी मुलुखात असले तरी महाराष्ट्रातूनही अनेक भाविक जैन गोम्मटाच्या दर्शनाकरिता तेथे जात असत. त्यांना तो पुतळा कोणी करविला व त्याच्या भोवतालचा तट कोणी बांधविला हे माहीत व्हावे म्हणून हे दोन्ही लेख सेनापती गंगराज याच्या काळी म्हणजे सन १११७ च्या सुमारास एकदमच कोरविले असावे असे हुल्ट्श्चे मत होते. दोन्ही लेखांतील अक्षरवटिकेचे सादृश्य लक्षात घेता ते मत सयुक्तिक वाटते.[१]

चामुण्डरायाच्या लेखाचा काल इ. स. १११७ हा मानल्यास तो लेख मराठीतील पहिला कोरीव लेख होणे शक्य नाही. कारण त्याच्या अगोदरचे काही मराठी कोरीव लेख सापडले आहेत. अलीकडे डॉ. मो. गं. दीक्षित यांनी शके ९८२ (इ. स. १०६०) चा दिवे आगर (रत्नागिरी जिल्हा) ताम्रपट प्रकाशित केला आहे.[२] तो मराठीतील पहिला कोरीव

---

१. प्राचीन मराठी कोरीव लेख (प्रा. म. को. ले.), प्रतिमा पृ. ४.

२. एपिग्राफिया इंडिका (ए. इं.), पु. २८, पृ. १२१,

लेख असे त्यांचे म्हणणे आहे. याच्या उलट डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी आपण प्रसिद्ध केलेला शिलाहार नृपति प्रथम केशिदेव याचा शके ९३४चा अक्षी शिलालेख हा मराठीतील पहिला कोरीव लेख असे आग्रहाने प्रतिपादिले आहे.[१] तेव्हा सत्यनिर्णयार्थ या दोन्ही लेखांचा बारकाईने विचार केला पाहिजे.

अक्षी येथील शिलालेख

प्रथम अक्षी-शिलालेख घेऊ. हा लेख कुलाबा जिल्ह्यातील अलिबाग गावापासून दक्षिणेस तीन मैलांवरच्या अक्षी गावास लागून असलेल्या रस्त्याच्या बाजूस जमिनीत पुरलेल्या शिलेवर आहे. हा लेख कित्येक वर्षांपासून माहीत आहे; पण त्याचे ठसे घेऊन व वाचन करून तो प्रथम प्रसिद्ध करण्याचे श्रेय डॉ. शं. गो. तुळपुळे यांना आहे.[२] त्यांनी हा लेख 'मराठी संशोधन पत्रिका,' वर्ष ६, पृ. ११–१५ वर 'पहिला कालोल्लिखित मराठी लेख' या शीर्षकाखाली छापासह प्रसिद्ध केला. या लेखाची शिला आज अनेक वर्षे उन्हापावसात उघड्यावर असल्यामुळे हा लेख अतिशय खराब झाला आहे. डॉ. तुळपुळे यांनी त्याचे वाचन मोठ्या परिश्रमाने करून त्याची चर्चा केली असली तरी त्यांच्या पहिल्या वाचनात अनेक चुका झाल्या होत्या. त्यामुळे त्यांची चर्चाही चुकली होती. त्यांनी आपल्या लेखाच्या सुट्या प्रती काही विद्वानांकडे अभिप्रायार्थ पाठविल्या होत्या. त्यांपैकी डॉ. मो. गं. दीक्षित यांनी एक महत्त्वाची दुरुस्ती सुचविली. ती डॉ. तुळपुळे यांनी 'मराठी संशोधन पत्रिका,' वर्ष ६, पृ. ११६–१७ वर स्वीकारली. डॉ. दीक्षित यांनी स्वतः हा लेख छापासह 'मराठी संशोधन पत्रिका', वर्ष ९, पृ. १९–२० वर प्रसिद्ध केला आहे. त्यापूर्वी त्यांनी हा लेख नागपूरच्या 'सुषमा' मासिकात (वर्ष ११, मे १९५९, पृ. २९–३१) छापाशिवाय प्रसिद्ध करून त्याची सविस्तर चर्चा केली होती. त्यांनी हा लेख शके ११३२, प्रभव संवत्सराचा आणि उत्तर कोकणात राज्य करणाऱ्या

---

१. प्रा. म. को. ले., पृ. ५–६.
२. पूर्वोक्त, पृ. १.

द्वितीय केशिदेव याच्या काळचा असून त्यात त्या राजाचा प्रधान भइर्जु याने महालक्ष्मीच्या यज्ञानिमित्त एक पुष्करिणी खोदविली असा उल्लेख असल्याचे दाखविले होते. डॉ. तुळपुळे यांनी नंतर हा लेख सन १९६३ मध्ये प्रकाशित झालेल्या आपल्या 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या बृहद्ग्रंथात पृ. १–७ वर छापासह पुन: प्रकाशित केला आहे. त्यांच्या मते हा लेख शके ९३४ प्रधावी (परिधावी) संवत्सराचा व शिलाहार नृपति प्रथम केशिदेव याच्या काळाचा असून त्यात त्याच्या भइर्जु नामक प्रधानाने अधिक (ज्येष्ठ) मास, द्वितीय पक्ष, शुक्रवार (अष्टमी) या दिवशी देवीच्या बोडणासाठी नऊ कवली धान्य नेमून दिले असा उल्लेख आहे. हा मराठीतील पहिला कालोल्लिखित लेख होय, असा त्यांचा दावा आहे.

डॉ. तुळपुळे यांच्या विनंतीवरून त्यांच्या पूर्वोक्त ग्रंथाला पुरस्कार लिहिण्यापूर्वी तो चाळत असता त्यातील या पहिल्याच कोरीव लेखाच्या कालाविषयी या दोन विद्वानांतील हा मोठा मतभेद माझ्या ध्यानात आला आणि त्याचा उल्लेख मी आपल्या पुरस्कारात केला आहे. तथापि त्या वेळी या लेखाचा बारकाईने अभ्यास करणे शक्य नव्हते. त्यानंतर अलीकडे काही निमित्ताने शिलाहारांच्या कोरीव लेखांचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा योग आल्यामुळे येथे या लेखाची सविस्तर चर्चा करण्याचे योजिले आहे.

शिलाहार नृपतींची वंशावळ

प्रस्तुत लेख एका शिलाहार नृपतीचा असल्यामुळे पुढील विवेचन समजण्यासाठी उत्तर कोकणच्या शिलाहारांची वंशावळ प्रथम देतो. (राजवटींचे कंसातील काल अदमासाने दिले आहेत.)

प्रथम कपर्दी (सन ८००–८२५)
|
पुल्लशक्ति (सन ८२५–८५०)
|
द्वितीय कपर्दी (सन ८५०–८८०)

- द्वितीय कपर्दी (सन ८५०–८८०)
  - वप्पुवन्न (सन ८८०–९००)
    - झंझ (सन ९१०–९३०)
    - गोग्गि (सन ९३०-९४५)
      - प्रथम वज्जड (सन ९४५–९६५)
        - अपराजित (सन ९७५-१०१०)
          - द्वितीय वज्जड (सन १०१०–१०१५)
          - अरिकेसरी (प्रथम केशिदेव) (सन १०१५–१०२५)
            - छित्तराज (सन १०२५ –१०४०)
            - नागार्जुन (सन १०४० –१०४५)
              - अनन्तदेव (सन १०७०–१११०)
                - प्रथम अपरादित्य (सन १११० – ११४०)
                  - हरिपालदेव (सन ११४० – ११५५)
            - मुम्मुणि (सन १०४५ १०७०)
      - छद्वैदेव (सन ९६५–९७५)

हरिपालदेव (सन ११४०–११५५)
|
मल्लिकार्जुन
(सन ११५५ – ११७०)
|
द्वितीय अपरादित्य
(सन ११७० – ११९५)
|
द्वितीय केशिराज
(सन ११९५–१२४०)
|
सोमेश्वर
(सन १२४० – १२६५)

अक्षीलेखाच्या कालाविषयी भिन्न मते

शिलाहार वंशाच्या तीन शाखा होत्या. एक शाखा दक्षिण कोकणात (रत्नागिरी जिल्हा व गोव्याचा काही भाग यांत) प्रथम चन्द्रपुर (गोव्यातील चांदोर) आणि नंतर वलीपत्तन (रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण) येथून राज्य करीत होती. दुसरी शाखा दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर, सातारा व बेळगाव जिल्ह्यांवर कोल्हापूर येथून आणि तिसरी उत्तर कोकणात (ठाणे व कुलाबा जिल्ह्यांवर) स्थानक (ठाणे) येथून राज्य करीत होती. या तिन्ही शाखांचा संक्षिप्त इतिहास 'संशोधन-मुक्तावलि', सर ५ (पृष्ठे १७९ ते २२६) मध्ये दिला आहे. उत्तर कोकणातील शाखेची स्थापना राष्ट्रकूट नृपति तृतीय गोविंद याने प्रथम कपर्दी याला त्या प्रांताची गादी देऊन केली. यादव नृपति महादेव याने तेराव्या शतकात सोमेश्वराचा पराभव करून तिचा शेवट केला. अक्षीचा लेख डॉ. तुळपुळे यांच्या मते अकराव्या शतकाच्या प्रथम पादातील प्रथम केशिदेव याच्या काळचा आहे तर डॉ. दीक्षित यांच्या मते तो तेराव्या शतकाच्या प्रथमार्धातील द्वितीय केशिदेव याच्या काळातील आहे. या दोन काळांतील अंतर सुमारे दोनशे वर्षांचे आहे. यांपैकी कोणते मत बरोबर आहे याची सप्रमाण चर्चा करावयाची आहे.

डॉ. तुळपुळे यांचे अक्षीलेखाचे वाचन

प्रथम डॉ. तुळपुळे यांचे या लेखाचे वाचन देऊ.[५]

१. गी सुष संतु । स्वस्ति ओं । पसीमस-
२. मुद्राधीपती । स्री कोंकणाचक्री-
३. वर्ती । स्री केसीदेवराय । महाप्रधा-
४. न भइर्जु सेणुई तसीमीनी काले
५. प्रव्रतमाने । सकु संवतु : ९३४ प्रधा-
६. वी संवसरे अधीकु दीवे सुक्रे बौ-
७. लु । भइर्ज्वें तथा बोडणा तथा नऊ
८. कुवंली अधोर्यु प्रधानु । महलषु-
९. मीची वआण । लुनया कचली ज-

या लेखाचा ते असा अर्थ करतात "स्वस्ति ओम्. पश्चिमसमुद्राधिपती श्री केशिदेवराय (राज्य करीत असताना) त्याचा महाप्रधान भइर्जु सेणुई (म्हणजे सेनापती ?) असताना त्या काळी शक संवत् ९३४, परिधावी संवत्सर, अधिक (ज्येष्ठ) मास, द्वितीय पक्ष, शुक्रवार (अष्टमी ?) या दिवशी भइर्जुवाने (देवीच्या) बोडणासाठी नउ कवली (धान्य) नेमून दिले. त्यास (म्हणजे त्या दानास) अध्वर्यु म्हणजे अध्यक्ष प्रधान होय. (हे दान मोडील त्यास) महालक्ष्मीची आण. लुनया कचली म्हणजे कोरक्या (हा हे शिलालिखित कोरणारा होय.) जगात सुख असो."

या लेखातील कालनिर्देश पिल्लेजंत्रीप्रमाणे बरोबर आहे असे दाखविण्याचा प्रयत्न डॉ. तुळपुळे यांनी केला आहे. दक्षिण पद्धतीप्रमाणे

---

५. प्रा. म. को. ले., पृ. ७. यात प्रस्तुत लेखाच्या शेवटी अपूर्ण असलेले वाक्य आरंभी पूर्ण केले आहे. 'जगी सुष संतु' असे विवक्षित आहे असे डॉ. तुळपुळे आणि डॉ. दीक्षित दोघेही म्हणतात. लेखाच्या आरंभी इतकी जागा कोरी ठेवली होती व तीत मागाहून अपूर्ण वाक्य पूर्ण करण्यात आले हे चमत्कारिक दिसते.

शके ९३४ ला परिधावी संवत्सर येतो त्या वर्षी एक अधिक मासही होता. (त्याचे नाव ज्येष्ठ हे लेखात दिले नाही.) त्यातील बौलु (बहुल) म्हणजे कृष्णपक्षातील शुक्रवारी हे दान दिले. तिथीचाही निर्देश लेखात नाही. पण ती महालक्ष्मीची तिथी अष्टमी असावी. इंग्रजी कालगणने-प्रमाणे या लेखाचा काल शुक्रवार ता. १६ मे इ. स. १०१२ असा ठरेल. केशिदेवाचा ताम्रपट शके ९३९ (सन १०१७)चा सापडला आहे. तेव्हा हा लेख त्याच्या कारकीर्दीत पडतो. 'सारांश, लेखातील कालोल्लेखाचा पिल्ले जंत्रीच्या आधारे दिसून येणारा मेळ, राजवटीचा जुळता निर्देश आणि एकंदर लेखाचे स्वरूप यांवरून तो शके ९३४ (इ. स. १०१२)चा आहे याबद्दल शंका उरत नाही' असे डॉ. तुळपुळे यांनी म्हटले आहे.[१]

डॉ. तुळपुळे यांच्या मताचे परीक्षण

डॉ. तुळपुळे यांच्या वाचनातील या लेखाचा कालनिर्देश मला सकृद्दर्शनीच विलक्षण वाटला व त्याविषयी त्यांच्या ग्रंथाच्या पुरस्कारात मी खालीलप्रमाणे लिहिले– "शक संवत् ९३४ ला प्रधावी (परिधावी) संवत्सर येतो खरा, आणि त्यात एक महिना (ज्येष्ठ) अधिक होता हेही खरे; पण त्या महिन्याचा उल्लेख 'अधीकु' बरोबर यावयास नको का ? छापावरून दीने असा पाठ असावा असे दिसते. 'बौलु' हे वाचन सकृद्दर्शनीच असंभवनीय वाटते. छापावरून त्या शब्दाचे पहिले अक्षर 'बै' असे दिसते. डॉ. तुळपुळे 'बौलु' हा शब्द 'बहुल'पासून व्युत्पादितात. पण 'बहुल' शब्दाचा प्रयोग नंतरच्या संस्कृत लेखांतही क्वचितच आढळतो. शिवाय बहुल किंवा कृष्णपक्ष विवक्षित असता तर त्याचा उल्लेख तिथीपूर्वी यावयास पाहिजे होता; पण प्रस्तुत लेखात तिथीचा पत्ताच नाही. हा लेख महालक्ष्मीच्या प्रीत्यर्थ असल्याने ती तिथी अष्टमी असावी असा डॉ. तुळपुळे यांचा तर्क आहे. पण ती कृष्णपक्षातील का ?

१. प्रा. म. को. ले., पृ. ३.

असा प्रश्न उपस्थित होतो. तेव्हा डॉ. तुळपुळे यांचे या लेखाच्या मितीचे वाचन निर्विवाद वाटत नाही[१]. "

अक्षीलेख शके ९३४ इतका प्राचीन नाही

संवत्सराचे ९३४ हे वाचनही बरोबर वाटत नाही त्यासंबंधी चर्चा पुढे करू. पण लेखाच्या अक्षरवटिकेवरून व इतरही काही प्रमाणांवरून प्रस्तुत लेख शके ९३४ इतका प्राचीन वाटत नाही. त्यांचा विचार प्रथम करू.

अक्षीलेखाची अक्षरवटिका

प्रथम अक्षरवटिकेच्या प्रमाणाचा विचार करू. डॉ तुळपुळे यांनी 'इ' या अक्षराचा त्या बाबतीत आवर्जून उल्लेख केला आहे. ते म्हणतात–' विशेषत: दोन पोकळ शून्ये व त्याखाली उकारचिन्ह (॰ु) यांनी सिद्ध होणारी इ (उदाहरणार्थ भइर्जु, ओ. ४; सेणुई, ओ. ४; भुइर्जुवे, ओ. ७) हे या लेखाच्या प्राचीनत्वाचे निर्णायक गमक होय.' असा इकार प्राचीन होय हे खरे, पण त्याचे चिह्न अकराव्या शतकानंतर प्रचारातून गेले असे नाही. उदाहरणार्थ, शेवटचा शिलाहारनृपति सोमेश्वर याच्या रानवड शिलालेखातही (ओ. ४) ते आले आहे. (प्रा. म. को. ले., प्रतिमा, पृ. ३४ पाहा.) तो लेख शके ११८१ (सन १२५९) चा आहे. त्यापूर्वीच्या शिलाहारनृपति मल्लिकार्जुनाच्या शके १०७८ च्या चिपळूण लेखातही (ओ. ११) ते आढळते. (पूर्वोक्त प्रतिमा, पृ. १० पाहा). हे दोन्ही लेख प्रथम केशिदेवानंतर अनेक वर्षांनी कोरले गेले. यांपैकी पहिला लेख तर द्वितीय केशिदेवाच्याही नंतरचा आहे. तेव्हा इकाराच्या आकृतीवरून अक्षीचा शिलालेख शके ९३४ इतका प्राचीन आहे असे सिद्ध होत नाही.[२]

---

१. प्रा. म. को. ले., पुरस्कार, पृ. १५.

२. प्रा. म. को. ले., प्रस्तावना, पृ. ५० वरील संदर्भ पाहा.

दुसरे महत्त्वाचे अक्षर 'ध' होय. याचा आकार प्राचीन काळी 'व' सारखा असे. 'व' ला नागरीत डोक्यावर आडवी रेघ असे, पण ती 'ध' ला नसे, एवढाच फरक. 'धा' आणि 'वा' मध्ये फरक असावा म्हणून 'धा'च्या उभ्या दंडांना मध्यभागी आडव्या रेषेने जोडीत असत. असा 'ध' शके ९८२च्या दिवे आगर ताम्रपटात ('मधुवै', ओ. ८) आला आहे. (प्रा. म. को. ले., प्रतिमा, पृ. २ पाहा.) पुढे 'ध' ला डाव्या बाजूला शिंग उत्पन्न झाले. शके १०६६च्या उदयादित्याच्या आंबे शिलालेखात 'ध'चे हे दोन्ही प्रकार आढळतात. 'चरणाराधन' (ओ. ३) आणि '–र्व्वसुधा' (ओ. १०) पाहा. मल्लिकार्जुनाच्या शके १०७८च्या चिपळूण शिलालेखातही असेच 'ध' चे दोन्ही प्रकार[1] दिसतात. त्यापूर्वीच्या शके ९७१च्या मुम्मुणिराजाच्या ताम्रपटात[2] तसेच प्रथम अपरादित्याच्या शके १०४९च्या वडवली ताम्रपटात[3] सर्वत्र प्राचीन शृंगरहित 'ध' आढळतो. तेव्हा 'ध' ला हे शिंग शके १०५० नंतर फुटलेले दिसते. अक्षी लेखात सर्वत्र 'ध' शृंगयुक्त दिसतो. 'समुद्राधीपती' (ओ. २) 'महाप्रधान' (ओ. ३–४), 'प्रधानु' (ओ. ८) पाहा. तेव्हा तो लेख शके ९३४ इतका प्राचीन असणे शक्य नाही.

तिसरे महत्त्वाचे अक्षर 'भ' होय. याच्या प्राचीन रूपात डाव्या बाजूचा भाग हात न उचलता लिहिलेला (cursive) असतो. त्याला उघडया तोंडाचा 'भ' म्हणतात. कालान्तराने डाव्या बाजूला उभी रेष होऊन ती त्या अक्षराच्या उजव्या बाजूच्या दंडाला जोडलीं जाऊ लागली.

---

१. प्रा. म. को. ले., प्रतिमा, पृ. ५.

२. ए. इं., पु. २५, पृ, ५६ समोरील छापाच्या नवव्या ओळीतील 'दुग्धाम्बुधि' शब्द पाहा.

३. जर्नल ऑफ दि बाँबे ब्रँच ऑफ रॉयल एशिॲटिक सोसायटी (पुरातन माला), पु. २१. नवव्या ओळीतील वरील शब्द पाहा.

शके ९८२ दिवे आगर ताम्रपटात[1] तसेच त्यापूर्वीच्या शके ९७१ च्या मुम्मुणिराजाच्या तामम्रपटात[2] हा उघडया तोंडाचा 'भ' आढळतो तर शके १०४९च्या अपरादित्याच्या वडवली ताम्रपटात[3] नंतरचा 'भ' दिसतो. तेव्हा 'भ' या अक्षरातील हा फरक शके १०००च्या सुमारास झाला असावा. अक्षी लेखातील 'भ' उघडया तोंडाचा नसून नंतरच्या प्रकारचा आहे. ('भइर्जु', ओ. ४ व ७ पाहा.) म्हणून तो लेख शके ९३४ इतका प्राचीन असणे शक्य नाही.

अक्षरवटिकेच्या पुराव्यावरून अक्षीचा लेख शके ९३४ इतका प्राचीन असणे शक्य नाही, हे आपण पाहिले. या तऱ्हेचा अक्षरवटिकेचा पुरावा अगदी निर्विवाद असतो असे नाही. म्हणून यापेक्षा प्रस्तुत प्रकरणी बलवत्तर पुरावा मिळतो काय पाहू.

अक्षीलेखात उल्लेखिलेला केशिदेव

अक्षीलेख केशिदेवाच्या काळचा हे डॉ. दीक्षित व डॉ. तळपुळे या दोघांनाही मान्य आहे. पण डॉ. दीक्षित तो दुसऱ्या केशिदेवाचा, तर डॉ. तुळपुळे तो पहिल्या केशिदेवाचा असे मानतात. अक्षीलेखात 'पसीमसमुद्राधीपती' (पश्चिम समुद्राचा अधिपती) व स्रीकोकणचक्रीवर्ती (श्रीकोंकणचक्रवर्ती) अशी दोन बिरुदे केशिदेवाला लावण्यात आल्यामुळे तो उत्तर कोंकणच्या शिलाहारवंशातील होय यात संशय नाही. या वंशात दोन केशिदेव होऊन गेले.

---

१. प्रा. म. को. ले. प्रतिमा, पृ. २, ओ. ३ मधील 'भट्ट' शब्द पाहा.

२. ए. इं., पृ. ५६. समोरील छापातील ओ. ९ मधील '–प्यभवत्' शब्द पाहा.

३. ज. बॉं. ब्रँ. रॉ. ए. सो. (पुरातन माला), पु. २१, यातील या लेखाच्या पहिल्या ओळीतील 'लभते' शब्द पाहा.

यांपैकी अक्षी लेखातील केशिदेवाला 'पश्चिमसमुद्राधिपति' आणि 'श्रीकोंकणचक्रवर्ती' अशी दोन बिरुदे लावली आहेत. सामान्यतः शिलाहार राजे आपल्या पूर्वजांच्या सारखी बिरुदे धारण करीत. क्वचित् एखाद्याने नवे बिरुद धारण केले तर त्याचा उत्तराधिकारी ते पुढे चालवीत असे 'पश्चिमसमुद्राधिपति' हे बिरुद अपराजितदेवाच्या शकसंवत् ९१५ च्या जंजिरा ताम्रपटात प्रथम आढळते.[१] अक्षी लेखाचा काल शकसंवत् ९३४ असल्यास त्यातील केशिदेवाने ते बिरुद धारण केले असल्यास आश्चर्य वाटणार नाही. पण 'कोंकणचक्रवर्ती' या दुसऱ्या बिरुदाची गोष्ट तशी नाही. ते बिरुद द्वितीय अपरादित्याच्या शकसंवत् ११०८च्या परळ शिलालेखात प्रथम दृष्टीस पडते.[२] शक-संवत् ९३४ च्या प्रथम केशिदेवाने ते धारण केले असणे संभवनीय वाटत नाही द्वितीय केशिदेव द्वितीय अपरादित्यानंतर होऊन गेला असल्यामुळे त्याच्या अक्षी लेखात ते आढळले तर त्यात आश्चर्य नाही. त्याच्या नंतर गादीवर आलेल्या शेवटच्या शिलाहारनृपति सोमेश्वराने आपल्या शके ११८१च्या रानवड शिलालेखात[३] आणि शके ११८२च्या चांजे शिलालेखात[४] 'कोंकणचक्रवर्ती' हे बिरुद धारण केलेले दिसते. तेव्हा हे बिरुद इ. स. च्या अकराव्या शतकानंतर शिलाहार नृपतींनी धारण केलेले दिसते. त्यापूर्वीच्या शिलाहारांच्या कोणत्याही लेखात ते आढळत नाही. तेव्हा हे बिरुद धारण करणारा केशिदेव अकराव्या शतकानंतर होऊन गेला असावा. अर्थात् अक्षीलेखात या बिरुदाचा उल्लेख असल्यामुळे त्या लेखाचा काल शके ९३४ (सन १०१२) असणे संभवनीय वाटत नाही.

---

१. *Important Inscriptions from the Baroda State*, pp. 35 f.

२. प्रा. म. को. ले., पृ. ८३.

३. पूर्वोक्त, पृ. १५९.

४. पूर्वोक्त, पृ. १६४.

डॉ. दीक्षित यांचे अक्षीलेखाचे वाचन

मग अक्षीलेखाचा खरा काळ कोणता असा प्रश्न उपस्थित होतो. त्याची चर्चा करण्यापूर्वी डॉ. दीक्षितांनी केलेले त्याचे वाचन व त्याचा अर्थ देऊ.[1]

वाचन

१. गी सुष संतु । स्वति ओं पसीमस–
२. मुद्राधीपती । श्रीकोकणचक्री–
३. वर्ती । श्रीकेषीदेवर(रा)य । महाप्रधा–
४. न भइर्जु सेणुई तसीमीनी क(का)ले
५. प्रव्रतम(मा)ने सकु संवतु ११३२ प्रभ–
६. वा संवसरे : अक्षि(?)कडी[ल*] धर्मुका बौ–
७. लु । भईर्जु—तळा—त न्हान उ–
८. करली अघोर्गु (?) प्रधानु । मह(हा)लषु–
९. मीची यज्ञा कलु(रु)न पोकरली । ज–

अर्थ

स्वस्ति. पश्चिमसमुद्राधिपति श्रीकोंकणचक्रवर्ती श्रीकेशिदेव व त्याचा प्रधान शेणवी भइर्जु यांच्या राज्यात शकसंवत् ११३२ प्रभव संवत्सरात अक्षीकडील धर्मकृत्याविषयी सांगितले जात आहे. भइर्जु याच्या......न्हान म्हणजे पुष्करिणी उकरली गेली तिचा कर्ता प्रधान (म्हणजे भइर्जु) होता. महालक्ष्मीच्या यज्ञानिमित्त ती पोखरली (म्हणजे खणली) गेली. सर्व जगात सुख होवो.

डॉ. दीक्षित यांनी प्रस्तुत लेखाचा काळ शके ११३२ प्रभव संवत्सर असा वाचला आहे, व हा लेख द्वितीय केशिदेवाच्या काळचा मानला आहे. यावर डॉ. तुळपुळे यांनी पुढील टीका केली आहे[2]:— 'पिल्ले जंत्रीप्रमाणे

---

१. मराठी संशोधन पत्रिका, वर्ष ९, पृ. २०.
२. प्रा. म. को. ले., पृ. ३, तळ टीप २.

किंवा अन्य कोणत्याही कोष्टकाने शक ११३२ (गत किंवा चालू) या वर्षी प्रभव संवत्सर नाही. गत शक ११३२ त प्रमोद व चालू शक ११३२ त शुक्ल संवत्सर आहे......तात्पर्य, शक ११३२ वाचून शकसंवत्सराचा मेळ बसतो हे डॉ. दीक्षितांचे मत बरोबर नाही.'

अक्षीलेखाचा खरा काळ

डॉ. तुळपुळ्यांची टीका बरोबर आहे. पण त्यांनी दाखविलेली अडचण दुर्लंघ्य नाही. अक्षीलेखातील संवत्सराचे वाचन ११३२ नसून ११३१ आहे. संवत्सरसंख्येतील शेवटचा आकडा २ नसून १ आहे. तो २ असता तर त्याला गाठ असती. दिवे आगर ताम्रपटाच्या ९८२ संवत्सरातील शेवटच्या आकड्याची आकृति पाहा. तेव्हा हा लेख शके ११३१ चा आहे. सामान्यतः शकसंवत्सराची संख्या गतवर्षाची द्योतक असते. पण क्वचित् तिने वर्तमान (चालू) शकही दाखविला जातो. याची अनेक उदाहरणे मी माझ्या कलचुरी व गंग संवतांच्या कालगणनेच्या परीक्षेत दाखविली आहेत.[1] तेव्हा अक्षी लेखातील ११३१ वर्ष चालू मानल्यास सर्व अडचण दूर होते. तसेच संवत्सराचे नाव विभव आले आहे.[2] चालू शक वर्ष ११३१ म्हणजे गत शक वर्ष ११३० ला षष्टिसंवत्सरचक्रातील विभव संवत्सर होते हे पिल्ले जंत्रीत दिले आहे.

शके ११३० म्हणजे इ. स. १२०८–०९ हे वर्ष द्वितीय अपरादित्याचा पुत्र द्वितीय केशिदेव याच्या कारकीर्दीत पडते; कारण त्याचे दोन कोरीव लेख शके ११२५[3] व ११६२ चे[4] सापडले आहेत. त्याचा पिता द्वितीय

---

१. कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. ४, प्रस्तावना, पृ. ११ इ.; स्टडीज् इन इंडॉलॉजी, पु. ४, पृ. १७८ इ.

२. 'विभव' यातील 'व' त्याच ओळीतील 'संवतु' मधील 'व' सारखा आहे.

३. प्रा. म. को. ले., पृ. ९८ इ.

४. ॲनाल्स ऑफ दि भांडारकर इन्स्टिटयूट, पु. २३, पृ. ९८–१०२.

अपरादित्य याने 'कोंकणचक्रवर्ती' ही पदवी धारण केली होती हे त्याच्या शके ११०८ च्या परळ लेखावरून कळते.[१] तीच पदवी द्वितीय केशिदेवाचा उत्तराधिकारी सोमेश्वर यानेही आपल्या शके ११८१ च्या रानवड[२] आणि शके ११८२ च्या चांजे[३] शिलालेखात उल्लेखिली आहे. या दोन राजांच्या मध्ये होऊन गेलेल्या केशिदेवाने ती पदवी आपल्या अक्षीलेखात उल्लेखावी हे साहजिक आहे. त्याच्या लोणद शिलालेखातही ती आढळते.[४]

तेव्हा अक्षीलेख दुसऱ्या केशिदेवाच्या काळातील शके ११३१ चा आहे यात शंका नाही. त्यात महिना, पक्ष, तिथी व वार यांचा उल्लेख आढळत नाही. तो लेख अत्यंत खराब झाल्यामुळे त्याचा नक्की आशय काय हे सांगणे कठीण आहे डॉ तुळपुळे आणि डॉ. दीक्षित यांनी त्यासंबंधी भिन्न भिन्न तर्क केले आहेत. पण त्यांपैकी कोणाचेच वाचन निर्विवाद नाही. तथापि छापावरून आठव्या ओळीच्या शेवटी आणि नववीच्या आरंभी मह(हा)लषुमीची हा शब्द वाचता येतो. तसेच नवव्या ओळीच्या शेवटी डॉ. तुळपुळे यांच्या 'लुनया कचली' च्या ऐवजी पोकरली हे डॉ. दीक्षितांचे वाचन ग्राह्य वाटते तेव्हा केशिदेवाचा प्रधान भइर्जु याने महालक्ष्मीच्या देवालयाजवळ विहीर किंवा पुष्करिणी खोदविली असा प्रस्तुत लेखाचा आशय दिसतो.

पहिला मराठी कोरीव लेख कोणता ?

तेव्हा अक्षीच्या शिलालेखाला 'पहिला मराठी कोरीव लेख' म्हणता येणार नाही. डॉ. दीक्षितांनी प्रसिद्ध केलेल्या दिवे आगर ताम्रपटात तत्कालीन राजाचा उल्लेख नसला तरी त्याचा काळ शक-संवत् ९८२, शार्वरी संवत्सर, मार्गशीर्ष पौर्णमासी, शुक्रवार, हा अगदी बरोबर आहे.

---

१. प्रा. म. को. ले., पृ. ८३.

२. पूर्वोक्त, पृ. १५९.

३. पूर्वोक्त, पृ. १६४.

४. अॅ. भां. ओ. री. इ., पु. २३, पृ. १०२.

त्याची इंग्रजी तारीख १० नोव्हेंबर सन १०६० अशी येते. त्या तारखेस शुक्रवार होता. सध्याच्या माहितीप्रमाणे हाच मराठीतील पहिला कोरीव लेख ठरतो.

वरील चर्चा केवळ सत्यान्वेषणाच्या हेतूने केली आहे. तीत डॉ. तुळपुळे यांचे अक्षी लेखाचा काळ व आशय याविषयी मत स्वीकारले नसले तरी त्यांच्या 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या बृहद्ग्रंथाचे महत्त्व मुळीच कमी होत नाही. कोरीव लेख खराब स्थितीत असला तर तो वाचणे अतिशय कठीण असते. त्यात मतभेदाला पुष्कळ अवकाश असतो. जुन्या लेखांची सूक्ष्म चिकित्सा केल्यावर पूर्वीचे ग्रह बदलावे लागतात. हा अनूभव सर्व संशोधकांस येतो.

प्रस्तुत प्रश्नाच्या चर्चेकरिता डॉ. तुळपुळ्यांचा पुर्वोक्त ग्रंथ त्यात दिलेल्या कोरीव लेखांच्या उत्कृष्ट छापांमुळे अत्यंत उपयोगी झाला हे नमूद करणे अवश्य आहे.[२]

---

१. संशोधनमुक्तावलि, सर ५ पृ. २०२.

२. प्रस्तुत लेखात निर्दिष्ट अक्षीलेखाचा छाप पुणे विद्यापीठाच्या अनुमतीने संदर्भाकरिता साभार छापला आहे.

१०. गुप्तकालातील एक समस्या—रामगुप्त

प्रास्ताविक

गुप्तकाल हे प्राचीन भारतीय इतिहासातील सुवर्णयुग मानले जाते. या कालात समुद्रगुप्त, चन्द्रगुप्त, कुमारगुप्त, स्कन्दगुप्त असे एकापेक्षा एक शौर्यादि गुणांत वरचढ असे अनेक राजे होऊन गेले. त्यांनी उत्तर हिंदुस्थानात हिंदूंचे एकछत्री साम्राज्य स्थापन केले, हिंदुधर्माचे पुनरुज्जीवन केले, विद्या आणि कला यांना उत्तेजन दिले, राष्ट्रातील शूर, विद्वान् आणि कर्तबगार लोकांच्या गुणांस विस्तृत क्षेत्र मिळवून दिले, आणि देशात शांतता स्थापून व परदेशाशी व्यापार वाढवून देशाला समृद्ध आणि लोकांना सुखी केले. पण भारतीयांच्या इतिहासविषयक अनास्थेमुळे या लोकोत्तर राजांची नावेही प्राचीन वाङ्मयात आढळत नाहीत. गुप्तकालावर विस्मृतीचा जाड पडदा पडला होता. गेल्या शंभर वर्षांतील अनेक पाश्चात्य आणि भारतीय संशोधकांच्या अविरत प्रयत्नांमुळे तो हळू हळू दूर होऊन त्या कालातील ऐतिहासिक घटनांचे थोडेबहुत ज्ञान आपणास होत आहे अद्यापि त्या कालातील अनेक समस्या उलगडल्या नाहीत. त्यांपैकी एका समस्येविषयी नुकताच उपलब्ध झालेला पुरावा वाचकांपुढे मांडावयाचा आहे.

रामगुप्ताविषयी पुरावा

सुमारे पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत गुप्तवंशांतील आरंभीच्या राजांची पुढील वंशावळ निश्चित झाली होती.

प्रथम चंद्रगुप्त (इ. स. ३२०–३३५)
|
(पुत्र)
समुद्रगुप्त (इ. स. ३३५–३७५)
|
(पुत्र)
द्वितीय चंद्रगुप्त (इ. स. ३७५–४१३)
|
(पुत्र)
कुमारगुप्त (इ. स. ४१३–४५५)

सन् १९२३ मध्ये विख्यात फ्रेंच संशोधक सिल्व्हाँ लेव्ही यांनी ‘ जूर्नल एशियातिक ’ या फ्रेंच नियतकालिकात रामचंद्र आणि गुणचंद्र यांच्या ‘ नाटचदर्पणा ’तील ‘ देवीचन्द्रगुप्तम् ’ या संस्कृत नाटकातून घेतलेले काही उतारे प्रसिद्ध करून त्या नाटकाचे कथानक गुप्त नृपति द्वितीय चन्द्रगुप्त याच्याविषयी आहे असे प्रथम दाखविले. त्यानंतर सुप्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ राखालदास बॅनर्जी यांनी सन १९२४ मध्ये बनारस हिंदु विश्वविद्यालयात दिलेल्या आपल्या व्याख्यानात त्या उताऱ्यांवरून गुप्तकालावर काय प्रकाश पडतो हे दाखविले. समुद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र रामगुप्त हा गादीवर आला होता. एका शकनृपतीने त्याचा पराभव करून त्याला अशा कचाटचात पकडले की आपली राणी ध्रुवदेवी हिला त्या शकनृपतीकडे पाठविण्याची अत्यंत अपमानास्पद अट त्याला कबूल करावी लागली. पण त्याचा धाकटा भाऊ चंद्रगुप्त याला ती अट मान्य नसल्यामुळे तो स्वतः ध्रुवदेवी राणीचा वेश घेऊन आणि स्त्रीवेश धारण केलेले शूर सैनिक स्वतःबरोबर घेऊन शकनृपतीकडे गेला, योग्य संधी पाहून त्याने त्याला कंठस्नान घातले आणि स्वतःच्या अनुयायांसह तो सुखरूपपणे परत आला. पुढे त्याने रामगुप्ताला ठार मारून गादी बळकावली आणि ध्रुवदेवीशी विवाह केला. या घटना राखालदास बॅनर्जींनी आपल्या व्याख्यानात विशद केल्या.[1] त्यानंतर श्री. आर्. सरस्वती यांनी इंडियन्

---

१. राखालदास बॅनर्जी, दि एज ऑफ दि इम्पीरिअल गुप्ताज् (१९३३), पृ. २६ इत्यादि.

अँटिक्वरी (१९२३), पृ. १८१ मध्ये धाराधिपति भोज याच्या 'शृंगारप्रकाश' या अप्रकाशित ग्रंथातून याच घटनेविषयी आणखी तीन उतारे प्रसिद्ध केले. त्यानंतर बाणाच्या 'हर्षचरिता'त व त्यावरील शंकरार्य याच्या टीकेत, तसेच राजशेखराच्या 'काव्यमीमांसे'त आणि राष्ट्रकूट नृपति प्रथम अमोघवर्ष यांच्या संजान येथे सापडलेल्या ताम्रपटात आलेले एतद्विषयक उल्लेख दाखवून डॉ. अ. स. अळतेकर यांनी सर्व उपलब्ध साधनांचा साकल्याने विचार करून रामगुप्तचरित्राविषयी आपला विस्तृत लेख बिहार अँड ओरिसा सोसायटीच्या जर्नल (व्हॉ. १४, पृ. २२३–२५३) मध्ये प्रसिद्ध केला. नंतर त्यांनी त्याच जर्नलच्या पुढील व्हॉल्यूममध्ये (पृ. १३४ इ.) मजमुलुत्-तवारीख या ग्रंथात आलेल्या याच प्रकारच्या एका गोष्टीकडे लक्ष वेधले. पुढे डॉ. देवदत्तपंत भांडारकर यांनी मालवीय कॉमेमोरेशन व्हॉल्यूम (पृ. १८९–२११) मध्ये श्री. रामकृष्ण कवि यांनी शृंगारप्रकाशातून काढलेला आणखी एक उतारा प्रकाशित करून या विषयावर विस्तृत लेख प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी काच नृपतीची सोन्याची नाणी वस्तुतः रामगुप्ताचीच असावी अशी कल्पना पुढे मांडली. आम्हीही या विषयावर दोन लेख– इंडियन् अँटिक्वरी (व्हॉ. ५२, पृ. २०१ इ.) आणि इंडियन हिस्टॉरिकल क्वॉर्टर्ली (व्हॉ. १०, पृ. ४८ इ.)–मध्ये प्रसिद्ध केले. पहिल्या लेखात रामगुप्ताचा शत्रु माळवा-काठेवाडात राज्य करणारा पश्चिम क्षत्रप नसून पंजाबातील कुशाण नृपति होता आणि त्याने रामगुप्ताला कैचीत धरले ते ठिकाण हिमालयाच्या परिसरातील जालंधर असावे असे दाखविले. दुसऱ्या लेखात राष्ट्रकूट नृपति चतुर्थ गोविंद याच्या खंबायत व सांगली येथे सापडलेल्या ताम्रपटांत आलेल्या साहसाङ्कविषयक श्लोकाने या वादावर काय प्रकाश पडतो ते दाखविले.

रामगुप्ताची नाणी

तोपर्यंत रामगुप्ताची नाणी सापडली नव्हती. त्यामुळे असा एखादा राजा गुप्तवंशात होऊन गेला काय याबद्दल विद्वानांना संशय वाटत होता. पण सन १९५० मध्ये डॉ. प्यारेलाल गुप्ता यांनी विदिशेला सापडलेली

'रामगुप्त' नाव असलेली तांब्याची नाणी प्रकाशित केली. पुढे डॉ. एच्. व्ही. त्रिवेदी यांनी विदिशेस आणि प्रो. कृष्णदत्त वाजपेयी यांनी विदिशा व एरण या ठिकाणी सापडलेली रामगुप्ताची आणखी नाणी प्रकाशित केली.[१] प्रो. वाजपेयी यांनी प्रकाशित केलेल्या काही नाण्यांच्या मागील बाजूवर गरुडाची आकृति आहे. गुप्त सम्राटांचा ध्वज गरुडांकित होता हे त्यांच्या अनेक सोन्याच्या नाण्यांवरून माहीत झाले आहे. म्हणून ही नाणी गुप्तवंशी रामगुप्ताचीच असावी हा समज दृढ झाला. तथापि त्यावरही काही विद्वानांनी आक्षेप घेतले. त्यांच्या आक्षेपांचे मुख्य कारण रामगुप्ताची सोन्याची नाणी का सापडली नाहीत हे होते. शिवाय आपल्या वडील भावाला ठार मारून गादी बळकावणारा आणि त्याच्या विधवा पत्नीशी विवाह करणारा द्वितीय चन्द्रगुप्त पुढे विक्रमादित्य नावाचा आदर्शनृपति बनला असेल हे असंभवनीय वाटत होते. विशेषतः भारतातल्या सुवर्ण-युगात अशी घटना घडली असेल हे मानण्यास पुष्कळांचे मन धजत नसे. उलट बाजूस या घटनेस उपोद्बलक असा साहित्यातील आणि कोरीव लेखांतील भक्कम पुरावा उपलब्ध झाला होता. म्हणून 'हा प्रश्न सध्या अनिर्णीत ठेवावा. पुढे मागे रामगुप्तविषयक प्रबळ पुरावा उपलब्ध झाल्यावर त्याचा निर्णय करण्यात यावा' असे अनेक विद्वानांनी म्हटले होते.[२]

रामगुप्ताचे कोरीव लेख

सुदैवाने या बाबतीत आवश्यक तो निर्विवाद पुरावा नुकताच उपलब्ध झाला आहे. विदिशेपासून सुमारे दोन मैल अंतरावर दुर्जनपुर नामक खेड्यात बुलडोझरने शेतातील जमीन साफ करताना जैन तीर्थंकरांच्या तीन मूर्ति अलीकडे सापडल्या होत्या. त्यांच्या पीठावर अत्यंत महत्त्वाचे

१. जर्नल ऑफ दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया, व्हॉ. १२, पृ. १०३ इ.; व्हॉ. १३, पृ. १२८ इ.; व्हॉ. २३, पृ. ३४० इ.

२. हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल, व्हॉ. ३, पृ. १८.

असे तत्कालीन लेख आहेत. बुलडोझरच्या आघाताने मूर्तींचा शिरोभाग भग्न झाला आहे, पण त्यांच्या पीठांवरील लेख बरेच शाबूत आहेत. त्यावरून त्यापैकी दोन मूर्ति चंद्रप्रभाच्या आणि तिसरी पुष्पदन्ताची आहे असे समजते. न्या मूर्तीवरचे लेख भारत सरकारचे प्रमुख लेखशास्त्रज्ञ डॉ. जी. एस्. गाय यांनी बडोद्याच्या ओरिएंटल इन्स्टिटयूटच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या भागात (व्हॉ. १८, पृ. २४७ इ.) प्रकाशित केले. आहेत. त्यांपैकी एका मूर्तीच्या पीठावरील शाबूत असलेल्या लेखाचे वाचन पुढे दिले आहे—

१ भगवतोर्हतः चन्द्रप्रभस्य प्रतिमेयं कारिता म-
२ हाराजाधिराजश्रीरामगुप्तेन उपदेशात्पाणिपा-
३ त्रिकचन्द्रक्षमाचार्यक्षमणश्रमणप्रशिष्य - आचार्य्य-
४ सर्प्पसेनक्षमणशिष्यस्य गोलक्यान्त्यासत्पुत्रस्य चेलूश्रमणस्येति ।।

(पाणिपात्रिक क्षमणश्रमण चन्द्रक्षमाचार्य यांचा प्रशिष्य आणि क्षमण आचार्य सर्पसेन यांचा शिष्य गोलक्यान्त्येचा सत्पुत्र चेलूक्षमण याच्या उपदेशावरून महाराजाधिराज श्रीरामगुप्त याने भगवान् अर्हत् चन्द्रप्रभ याची ही प्रतिमा करविली.)

चन्द्रप्रभाच्या दुसऱ्या एका मूर्तीच्या तसेच पुष्पदन्ताच्या मूर्तीच्या पीठावर अगदी असेच लेख आहेत. फक्त मूर्तींच्या नावांत फरक आहे. या लेखांत रामगुप्ताची वंशावळ दिली नाही. पण रामगुप्ताच्या 'महाराजाधिराज' या सम्राट्पदनिदर्शक पदवीचा स्पष्ट उल्लेख आहे. अक्षरवटिका समुद्रगुप्ताच्या एरण येथील शिलालेखातल्याप्रमाणे आहे. त्यावरून रामगुप्त हा गुप्तसम्राट् होता याविषयी संशय राहत नाही. 'देवीचन्द्रगुप्ता'तील, तसेच 'हर्षचरित' व 'काव्यमीमांसा' यातील उतारे आणि राष्ट्रकूटनृपति प्रथम अमोघवर्ष आणि चतुर्थ गोविंद याच्या ताम्रपटांतील तद्विषयक श्लोक यांवरून यापूर्वीच ज्ञात झालेला समुद्रगुप्ताचा ज्येष्ठ पुत्र रामगुप्त याचेच हे लेख होत याविषयी संशय घेण्यास आता जागा नाही.

रामगुप्ताच्या ऐतिहासिकत्वावर संभाव्य आक्षेप व त्यांचे निराकरण

विदिशेजवळ सापडलेल्या या तीन लेखांवरून रामगुप्ताचे ऐतिहासिकत्व निर्विवादपणे सिद्ध झाले असले तरी आक्षेपकांना त्यावर आणि त्यांच्या चरित्रावर काही आक्षेप अद्यापिही घेता येतील.[1] अशा संभाव्य आक्षेपांचा प्रथम विचार करू.

(१) 'इतर गुप्तकालीन लेखांत रामगुप्ताचा व त्याची राणी ध्रुवदेवी किंवा ध्रुवस्वामिनी हिचा उल्लेख नाही हे कसे ?'

याचे उत्तर सोपे आहे. गुप्तांच्या कोरीव लेखांत सबंध वंशावळ देण्याची पद्धत नव्हती. फक्त तत्कालीन राजाच्या सरळ पूर्वजांचा (उदाहरणार्थ, पिता, पितामह, प्रपितामह वगैरेंचा) नामनिर्देश केला जात असे गुप्त राण्यांचे उल्लेख फक्त गादीवर आलेल्या त्यांच्या पुत्रांच्या वर्णनात येतात. रामगुप्तानंतर त्याचा पुत्र गादीवर आला नव्हता. तेव्हा त्याचा आणि त्याची राणी म्हणून ध्रुवस्वामिनीचा उल्लेख गुप्तकालीन लेखांत आढळला नाही तर त्यात आश्चर्य नाही.

शिवाय रामगुप्ताची कारकीर्द ही गुप्तवंशाला कलंकभूत झाली होती म्हणून त्याचे नाव गुप्तकालीन लेखांत कटाक्षाने टाळले असावे.

(२) 'रामगुप्ताची सोन्याची नाणी अद्यापि सापडली नाहीत. त्याचे गुप्तकालीन नाव रामगुप्त आता सिद्ध झाल्यामुळे काच नृपतीची सोन्याची नाणी त्याने पाडली असणे शक्य नाही. माळव्यात सापडलेली तांब्याची नाणी त्याचीच कशावरून ?'

रामगुप्ताची सोन्याची नाणी अद्यापि सापडली नाहीत हे खरे, पण त्याच्या विदिशा व एरण येथे सापडलेल्या काही तांब्याच्या नाण्यांच्या मागील बाजूवर गरुडाची आकृति दिसते. गुप्तांचा ध्वज गरुडांकित होता. द्वितीय चन्द्रगुप्त व प्रथम कुमारगुप्त यांची काही गरुडांकित तांब्याची

१. हि. क. इं. पी., व्हॉ. ३, पृ. १७–१८.

नाणी माळव्यात सापडली आहेत. नुकत्याच सापडलेल्या मूर्तिलेखांवरून एरण-विदिशा प्रदेश गुप्तनृपति महाराजाधिराज रामगुप्ताच्या राज्यात अंतर्भूत होता हे सिद्ध झालें आहे त्या प्रदेशात दुसरा कोणी रामगुप्त नामक राजा राज्य करीत होता याला पुरावा नाही. तेव्हा एरण-विदिशा या प्रदेशात सापडलेली ही तांब्याची नाणी गुप्तनृपति रामगुप्त याचीच होत याविषयी आता संशय राहू नये. त्याची कारकीर्द अल्पकाल टिकल्यामुळे त्याला सोन्याची नाणी पाडण्यास अवश्य तो काल मिळाला नसावा.

(३) 'समुद्रगुप्ताने स्थापिलेल्या विशाल साम्राज्याचा अधिपति रामगुप्त याचा एका शकनृपतीने इतका उच्छेद करावा की त्याला आपले राज्य, सैन्य, किंबहुना आपली राणी, यांचे रक्षण करता येऊ नये हे असंभवनीय वाटते.'

यात असंभवनीय असे काही नाही. पुढे दाखविल्याप्रमाणे रामगुप्ताचा पराभव त्याच्या राजधानीत किंबहुना त्याच्या राज्यातही झाला नसून त्याने साहसाने केलेल्या कुशाण नृपतीवरील स्वारीत दूरच्या हिमालयप्रदेशात झाला होता. तेथे त्याला कोणा मित्राचे साहाय्य झाले नसावे.

(४) 'द्वितीयचन्द्रगुप्ताने प्रत्यक्ष आपल्या वडील भावास ठार मारून त्याच्या विधवा राणीशी विवाह केला ही गोष्ट आमच्या सामाजिक नीतिमत्तेला आणि धार्मिक भावनांना जबरदस्त धक्का देणारी आहे. असा हा चन्द्रगुप्त पुढे विक्रमादित्य म्हणून भारतीय राजांना आदर्श झाला हे शक्य वाटत नाही.

उपलब्ध पुराव्यावरून चन्द्रगुप्ताने ही दोन्ही कृत्ये केली हे स्पष्ट दिसते. तत्कालीन परिस्थितीत गुप्त साम्राज्य टिकविण्यास त्याच्यासारखा शूर, धोरणी व कर्तबगार असा दुसरा कोणी राजपुत्र नसल्यामुळे त्याच्या प्रजाजनांनी त्याच्या आक्षेपार्ह कृत्यांकडे दुर्लक्ष केले असावे. कालिदासाने म्हटले आहे की 'एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः ।' (चन्द्राच्या शुभ्र किरणांमुळे जसा त्याचा कलंक लक्षात येत नाही तसा अनेक गुणांमध्ये एखादा दोष ध्यानात येत नाही.)[१] तसाच प्रकार या बाबतीत घडला असावा.

१. कुमारसंभव, १, ३.

तथापि नंतरच्या काळात चन्द्रगुप्ताच्या या दुष्कृत्यांकडे काना-डोळा केला गेला नव्हता, असे कोरीव लेखांतील काही उल्लेखांवरून स्पष्ट दिसते.

संजान येथे सापडलेल्या राष्ट्रकूटनृपति प्रथम अमोघवर्ष याच्या शक संवत् ७९३ (सन ८७१) मध्ये दिलेल्या ताम्रपटात त्या राजाविषयी खालील श्लोक आला आहे.[१]

हत्वा भ्रातरमेव राज्यमहरद्देवीं च दीनस्ततो
लक्षं कोटिमलेखयत्किल कलौ दाता स गुप्तान्वयः ।
येनात्याजि तनुः स्वराज्यमसकृद्बाह्यार्थकैः का कथा
ह्रीस्तस्योन्नतराष्ट्रकूटतिलको दातेति कीर्त्यामपि ।।

[ज्याने आपल्या प्रत्यक्ष भावाला ठार मारून त्याचे राज्य आणि नंतर त्याची राणीही बळकावली, जो लाख, कोटि अशा आपल्या दानांच्या रकमा (केवळ) लिहवीत असे, (वस्तुतः त्या देत नसे) त्या गुप्त राजाला ह्या कलियुगात लोक दाता म्हणतात. म्हणून ज्याने आपल्या शरीराचा (प्रजाजनांच्या आपत्तीच्या निवारणार्थ) त्याग केला, तसेच आपले राज्यही अनेकदा सोडले – मग इतर बाह्य वस्तूंची गोष्ट कशाला ? – त्या (अमोघवर्षाला) ‘ उच्च अशा राष्ट्रकूट वंशाला भूषणभूत असा हा राजा दाता आहे. ’ अशी कीर्ति झाली असता लज्जा वाटते.]

अमोघवर्षाने एका मोठ्या लोकोपद्रवाच्या (साथीच्या) निवारणार्थ कोल्हापूरच्या महालक्ष्मीस आपली डावी करंगळी अर्पण केली होती आणि तो कित्येकदा राज्यत्याग करून जैन मठात जाऊन राहत असे. त्याचा अनेक विद्वानांना उदार आश्रय होता. त्याला अनुलक्षून या श्लोकातील

---

१. एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. १८, पृ. २४८

वर्णन आहे.[१] यात ज्या गुप्तराजाशी तुलना करून त्याचे श्रेष्ठत्व प्रतिपादले आहे तो द्वितीय चन्द्रगुप्तच होय. कारण त्याने आपल्या (रामगुप्त) भावाला ठार मारून त्याची राणी ध्रुवस्वामिनी हिच्याशी विवाह केला होता, ही घटना आता ‘देवीचन्द्रगुप्त’ नाटकावरून ज्ञात झाली आहे. तसेच त्याच्या दातृत्वाच्या वर्णनपर गाथा ‘गाथासप्तशती’त आलेली आम्ही इतरत्र दाखविली आहे.[२] तेव्हा या श्लोकावरून ख्रिस्तोत्तर नवव्या शतकाच्या अखेरीपर्यंत तरी चन्द्रगुप्ताच्या आक्षेपार्ह कृत्यांचे लोकांस विस्मरण झाले होते असे दिसत नाही.

यानंतरच्या काळातही चन्द्रगुप्ताविषयी अशीच समजूत प्रचलित होती हे राष्ट्रकूट नृपति चतुर्थ गोविंद याच्या शक संवत् ८५२ (सन ९३०) च्या खंबायत ताम्रपटात[३] आणि शक संवत् ८५५ (सन ९५३) च्या सांगली ताम्रपटात[४] आलेल्या खालील श्लोकावरून दिसून येईल—

> सामर्थ्ये सति निन्दिता प्रविहिता नैवाग्रजे क्रूरता
> बन्धुस्त्रीगमनादिभिः कुचरितैरावर्जितं नायशः ।
> शौचाशौचपराङ्मुखं न च भिया पैशाच्चमङ्गीकृतं
> त्यागेनासमसाहसैश्च भुवने यः साहसाङ्कोऽभवत् ।।

[त्या चतुर्थ गोविन्दाने सामर्थ्य असताही आपल्या वडील भावाशी निंद्य असे क्रूर वर्तन केले नाही, आपल्या भावाच्या स्त्रीशी समागमासारख्या दुष्कृत्यांनी अपकीर्ति संपादन केली नाही आणि ज्यात शिवाशिवीचा विधिनिषेध पाळला जात नाही असे पिशाचकृत्य भीतीने अंगीकारले नाही. पण तो आपल्या केवळ दातृत्वाने आणि निरुपम अशा साहसी कृत्यांनी जगात ‘साहसाङ्क’ नावाने प्रख्यात झाला.]

---

१. ए. इं., व्हॉ. १८, पृ. २४८.
२. संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. १२१.
३. ए. इं. व्हॉ. ७, पृ. ३६ इ.
४. इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. १२, पृ. २४९ इ.

चन्द्रगुप्ताला त्याने एकटचाने शकनृपतीला त्याच्या वाडचात जाऊन ठार केले होते म्हणून 'साहसांक' पदवी प्राप्त झाली होती. या श्लोकात त्याचा नामोल्लेख नसला तरी त्यात त्याचेच वर्णन आहे, यात संशय नाही. चतुर्थ गोविन्दाने चन्द्रगुप्ताप्रमाणे भ्रातृहत्या, भ्रातृस्त्रीगमन, पिशाचकृत्य इत्यादि दुष्कृत्ये केली नव्हती, पण तो आपल्या केवळ दातृत्वाने आणि असामान्य धैर्याने चन्द्रगुप्तासारखा 'साहसाङ्क' नावाने विख्यात झाला, असा या श्लोकाचा भावार्थ आहे. चन्द्रगुप्त शकनृपतीच्या वधासाठी वेतालसाधन करण्याकरिता श्मशानात गेला होता असा उल्लेख 'देवीचन्द्रगुप्त' नाटकातील एका उताऱ्यात आढळतो.[1] त्याला अनुलक्षून प्रस्तुत श्लोकाच्या तृतीय पादातील वर्णन दिसते. या श्लोकावरून खिस्तोत्तर दहाव्या शतकापर्यंत चन्द्रगुप्ताची साहस आणि दातृत्व यांबद्दल ख्याति होती तरी त्याची इतर दुष्कृत्ये विसरली गेली नव्हती, हे स्पष्ट दिसते.

विक्रमादित्यविषयक सांप्रदायिक कथा

यानंतर मात्र विक्रमादित्यविषयक सांप्रदायिक कथा लोकांत प्रचलित होऊन तो सर्व भरतखंड जिंकणारा, आपल्या साहसाने वेतालादिकावर विजय मिळवून लोकांस साहाय्य करणारा, असामान्य दातृत्वाचा, परोपकारी आणि न्यायी असा आदर्श राजा म्हणून सुप्रसिद्ध झाला. त्याच्या दरबारी कालिदासादि नवरत्ने होती ही आख्यायिकाही प्रचलित झाली. विक्रमादित्याचे या तऱ्हेचे वर्णन कथासरित्सागर, बृहत्कथामंजरी, ज्योतिर्विदाभरण इत्यादि नंतरच्या ग्रंथांत आढळते. या ग्रंथांत चन्द्रगुप्ताचा

---

१. 'शृंगारप्रकाशा'तील खालील उतारा पहा.– 'यथा देवीचन्द्रगुप्ते शकपतिना परं कृच्छ्रमापादितं रामगुप्तस्कन्धावारमनुजिघृक्षुः उपायान्तरागोचरे निशि वेतालसाधनमध्यवस्यन् कुमारचन्द्रगुप्त आत्रेयेण विदूषकेणोक्तः ।' मालवीय कॉमेमोरेशन व्हॉल्यूम, पृ. २०७. तसेच आमचे स्टडीज् इन इंडॉलॉजी, व्हॉ. १ (१९६८), पृ. १७६ पाहा.

किंवा रामगुप्ताचा उल्लेख येत नाही. तेव्हा त्यांत चंद्रगुप्ताच्या विवाद्य कृत्यांचा निर्देश नाही यात आश्चर्य नाही.

द्वितीय चन्द्रगुप्ताने काही आक्षेपार्ह कृत्ये केली असताही त्याची आदर्श राजा म्हणून ख्याति कशी झाली याची उपपत्ति ही अशी आहे.

* * *

येथपर्यंत भ्रातृवधादि दुष्कृत्ये करणाऱ्या द्वितीय चन्द्रगुप्ताची कालांतराने आदर्श राजा विक्रमादित्य म्हणून कशी प्रसिद्धि झाली हे दाखविले. बडोद्याचे डॉ. यू. पी. शहा यांनी याची दुसरी उपपत्ति सुचविली आहे तिचेही परीक्षण या संदर्भात केले पाहिजे. त्यांची उपपत्ति अशी[१]:–

डॉ. शहांची उपपत्ति

"रामगुप्ताला चन्द्रगुप्ताबद्दल अत्यंत प्रेम वाटत होते. त्याचे चन्द्रगुप्ताला उद्देशून काढलेले पुढील उद्‌गार पाहा[२].–

(१) त्यजामि देवीं तृणवत्त्वदन्तरे ।

(२) त्वय्युपारोपितप्रेम्णा त्वदर्थे यशसा सह ।
परित्यक्ता मया देवी जनोऽयं जन एव मे ।।

ध्रुवस्वामिनीचा वेष घेऊन शक नृपतीकडे जाण्यास निघालेल्या चन्द्रगुप्तास त्याचा भाऊ रामगुप्त म्हणतो—'तुझ्यावरील प्रेमामुळे मी राणीचा तृणाप्रमाणे त्याग करीत आहे व आपल्या कीर्तीलाही तिलांजलि देत आहे.'

---

१. जर्नल ऑफ दि ओरिएंटल इन्स्टिटयूट, बरोडा, व्हॉ. ४, पृ. २१८ इ.

२. नाटयदर्पण (गायकवाडस् ओरिएंटल सीरीज) (१९५९), पृ. १२५–२६

तेव्हा रामगुप्त हा अत्यंत सुसंस्कृत मनुष्य होता. आपल्या प्रजेच्या आणि भावाच्या रक्षणाकरिता तो आपल्या सर्वस्वाचा–आपली पत्नी, कीर्ति वगैरेंचा—त्याग करण्यास तयार झाला होता. चन्द्रगुप्ताने शकनृपतीला ठार मारल्यानंतर ध्रुवदेवीला आपल्या पतीच्या क्लीबत्वाबद्दल घृणा वाटू लागली, असे दिसते. वास्तविक तो क्लीब नव्हता. त्याच्या मन्त्र्यांनी गुप्तसाम्राज्याच्या संरक्षणाकरिता त्याला स्वतःला शकनृपतीकडे जाण्यास अनुमति न दिल्यामुळे त्याने आपल्या पत्नीला त्याच्याकडे पाठविण्याची अट कबूल केली असावी.

संजान ताम्रपटात चन्द्रगुप्ताने आपल्या भावास ठार मारले असे म्हटले आहे खरे, पण त्या लेखाच्या कर्त्याने आपला आश्रयदाता अमोघवर्ष याला श्रेष्ठ नृपति चन्द्रगुप्त विक्रमादित्य याच्यापेक्षा वरचढ ठरविण्याकरिता ते कपोलकल्पित विधान केले असावे. चन्द्रगुप्ताने खरोखरीच भ्रातृवध केला असता तर 'देवीचन्द्रगुप्त' नाटकाचा कर्ता विशाखदत्त याने त्याला त्या नाटकाचा नायक केले नसते. विशाखदत्त गुप्तकालात होऊन गेला असावा. तो आपल्या नाटकात अशी घटना घालील हे संभवनीय वाटत नाही.

आपली राणी ध्रुवस्वामिनी हिच्या मनात चन्द्रगुप्ताविषयी प्रेम उत्पन्न झाले आहे, हे रामगुप्ताच्या ध्यानात आले होते. त्याला कीर्तीचा किंवा राज्याचा लोभ नव्हता. आपल्या भावाला सुखी करण्याकरता आणि गुप्त साम्राज्याच्या रक्षणाकरिता त्याने राज्यत्याग करण्याचा निश्चय केला.

रामगुप्त भारतीय आख्यायिकांत सुप्रसिद्ध असलेला, वाक्यपदीय, शतकत्रय इत्यादिकांचा कर्ता, भर्तृहरि होय. खालील श्लोक पाहा–

ब्राह्मण्यामभवद्वराहमिहिरो ज्योतिर्विदामग्रणी
राजा भर्तृहरिश्च विक्रमनृपः क्षत्रात्मजायामभूत् ।
वैश्यायां हरिचन्द्रवैद्यतिलको जातश्च शङ्कुः कृती
शूद्रायाममरः षडेव शबरस्वामिद्विजस्यात्मजाः ।।

या श्लोकात मीमांसक शबरस्वामीला ब्राह्मणस्त्रीपासून श्रेष्ठ ज्योतिषी वराहमिहिर, क्षत्रिय स्त्रीपासून भर्तृहरि आणि विक्रमादित्य, वैश्य स्त्रीपासून हरिचन्द्र नामक श्रेष्ठ वैद्य आणि कुशल शङ्कु, आणि शूद्र स्त्रीपासून अमर झाल्याचा उल्लेख आहे. यातील विक्रमादित्य म्हणजे चन्द्रगुप्त आणि भर्तृहरि म्हणजे रामगुप्त होय. या सहांना शबरस्वामीचे 'आत्मज' म्हटले असले तरी ते त्याचे पुत्र नसून शिष्य होते. शबरस्वामी आणि भर्तृहरि हे ख्रिस्तोत्तर ३५० च्या सुमारास होऊन गेल्याचे आता सिद्ध झाले आहे. तेव्हा ते द्वितीय चन्द्रगुप्ताचे समकालीन होते यात संशय नाही. या श्लोकात चन्द्रगुप्ताचा विक्रमादित्य म्हणून उल्लेख आल्यामुळे भर्तृहरि म्हणजे रामगुप्तच होय. 'नीतिशतका'तील 'यां चिन्तयामि सततं मयि सा विरक्ता' इत्यादि श्लोकावरून भर्तृहरीची पत्नी त्याच्याशी एकनिष्ठ नव्हती असे दिसते. तीच कथा रामगुप्ताची होती.

'देवीचन्द्रगुप्ता'तील एका उताऱ्यात चन्द्रगुप्त शत्रूच्या भीतीने वेड्याचे सोंग घेऊन राजकुलात (राजवाड्यात) जात असलेला दाखविला आहे. त्यावरून असे दिसते की प्रजेतील एक गट त्याच्या विरुद्ध होता. झालेल्या घटनांत आणि राजकुलात होऊ घातलेल्या रामगुप्ताच्या राज्यसंन्यासात आपला काही हात नाही हे दाखविण्यासाठी चन्द्रगुप्ताने वेड्याचे ढोंग केले असावे. पुढे राज्यसंन्यास करतेवेळी रामगुप्ताने चन्द्रगुप्ताला उद्देशून पुनः मागील उद्गार काढले असावे—

"त्वय्युपारोपितप्रेम्णा त्वदर्थे यशसा सह ।
परित्यक्ता मया देवी जनोऽयं जन एव मे ।। "

—असे म्हणून तो संन्यास घेऊन अरण्यात गेलेला दिसतो. नंतर चन्द्रगुप्ताने ध्रुवस्वामिनीशी विवाह केला असावा. पति संन्यासी झाल्यास स्त्रियांना पुनर्विवाह करण्याची अनुमति धर्मशास्त्राने दिली आहे. पुढील श्लोक 'पराशरस्मृती'प्रमाणे 'नारदस्मृती'तही[१] (पाचवे शतक) आढळतो.

---

१. नारदस्मृति, १२, ९७.

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ।
पंचत्स्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ।।

अशा स्त्रीने इतर जनांपेक्षा स्वतःच्या देवरादिकांना (दीर वगैरेंना) पसंत करावे असे ' नारदस्मृती 'त म्हटले आहे—[१]

मृते भर्तरि संप्राप्तान्देवरादीनपास्य या ।
उपागच्छेत् परं कामात्सा द्वितीया प्रकीर्तिता ।।

तेव्हा ध्रुवस्वामिनीचा चन्द्रगुप्ताशी झालेला विवाह त्या काळी निषिद्ध नव्हता.

गुप्तकालातील ही घटना. म्हणजे त्या काळच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे. रामगुप्त आणि चन्द्रगुप्त ह्या दोघांनीही आपल्या आयुष्यात आलेल्या बिकट प्रसंगांना धैर्याने तोंड दिले. म्हणून गेली दीड हजार वर्षे त्यांची नावे भारतीयांच्या हृदयात चिरस्थायी होऊन राहिली आहेत."

डॉ. शहा यांनी मांडलेली उपपत्ती शक्य तो त्यांच्या शब्दांत दिली. आता आपण तिचे परीक्षण करू.

डॉ. शहांच्या उपपत्तीचे परीक्षण

रामगुप्तचरित्रविषयक माहितीचा मुख्य आधार ' देवीचन्द्रगुप्त ' हे संस्कृत नाटक आहे. दुर्दैवाने ते अद्यापि पूर्णपणे उपलब्ध झाले नाही. त्यातील काही उतारे अकराव्या शतकातील धाराधिपति भोज याच्या ' शृंगारप्रकाश ' नामक साहित्यशास्त्रविषयक ग्रंथात आणि बाराव्या शतकातील रामचन्द्र व गुणचन्द्र यांच्या ' नाटचदर्पण ' नामक नाटचशास्त्रीय ग्रंथात घेतलेले प्रसिद्ध झाले आहेत. त्यांवरून रामगुप्ताची कथा संशोधकांनी जमविली आहे. रामगुप्ताच्या कारकीर्दीतील या घट-

१. नारदस्मृति, १२, ५०

नेचा उल्लेख बाणाच्या 'हर्षचरिता'त (सातवे शतक) प्रथम आढळतो.[१] बाणाला ही माहिती 'देवीचन्द्रगुप्त' नाटकातून किंवा दुसऱ्या आधारावरून मिळाली हे आपणास माहीत नाही. भारतातील इतिहास ग्रंथांचा अभाव लक्षात घेता यांपैकी पहिलाच पक्ष अधिक संभवनीय वाटतो. त्या घटनेचा उल्लेख करणाऱ्या इतरांनी मात्र तद्विषयक माहिती 'देवीचन्द्रगुप्त' नाटकातूनच घेतली होती यात संशय नाही. ते नाटक बाराव्या शतकापर्यंत उपलब्ध होते. पण त्याचा कर्ता विशाखदत्त याला तरी रामगुप्त–चरित्राविषयी खरी माहिती होती काय ? तो केव्हा होऊन गेला ? त्याच्या काळाविषयी विविध मते संशोधकांनी प्रदर्शित केली आहेत. जयस्वालच्या मते त्याचा काळ पाचवे शतक, विंटर्निट्झ्च्या मते सहावे शतक, आणि कीथ व याकोबी यांच्या मते नववे शतक असा असावा. त्याच्या 'मुद्राराक्षस' नाटकाच्या भरतवाक्यात त्याच्या आश्रयदात्याचा उल्लेख आला होता. पण तेथील पाठ संदिग्ध आहे.

म्लेच्छैरुद्वेज्यमाना भुजयुगमधुना संश्रिता राजमूर्तेः
स श्रीमद्बन्धुभृत्यश्चिरमवतु महीं पार्थिवश्चन्द्रगुप्तः।।

—या पाठाप्रमाणे तो चन्द्रगुप्ताच्या दरबारी होता, असे वाटते. पण त्याच्या कारकीर्दीत या श्लोकात म्हटल्याप्रमाणे म्लेच्छांची (म्हणजे बहुधा हूणांची) स्वारी भारतावर झाली नव्हती. शिवाय विशाखदत्त गुप्तकालीन असता तर पुढे दाखविल्याप्रमाणे चन्द्रगुप्ताच्या दोषार्ह कृत्यांचे वर्णन असलेले 'देवीचन्द्रगुप्त' हे नाटक लिहिता ना. म्हणून –

'स श्रीमद्बन्धुभृत्यश्चिरमवतु महीं पार्थिवोऽवन्तिवर्मा ।।'

–हा पाठ योग्य दिसतो. 'मुद्राराक्षसा'तच चन्द्रगुप्त मौर्याच्या विरुद्ध चालून आलेल्या सैन्यात विशाखदत्ताने हूणांचा उल्लेख केला आहे.

---

१. उच्छ्वास, ६–'अरिपुरे च परकलत्रकामुकं कामिनीवेशगुप्तश्चन्द्रगुप्तः शकपतिमशातयत् । यावर शंकरार्याची टीका पाहा— शकानामाचार्यः शकाधिपतिः । चन्द्रगुप्तभ्रातृजायां ध्रुवदेवीं प्रार्थयमानश्चन्द्रगुप्तेन ध्रुवदेवीवेशधारिणा स्त्रीवेशजनपरिवृत्तेन व्यापादित इति ।'

त्यांत कालविपर्यास हा दोष असला तरी त्या उल्लेखावरून विशाखदत्त ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात हूणांच्या भारतावर स्वाऱ्या होऊ लागल्या त्यानंतर झाला असावा असे अनुमान करता येते. सहाव्या शतकाच्या द्वितीयार्धात झालेल्या हूणांच्या स्वाऱ्यांना ठाणेश्वरचा प्रभाकरवर्धन आणि कनोजचा मौखरि अवन्तिवर्मा यांनी पायबंद घातला होता. मौखरींनी आपल्या हस्तिसैन्याने हूणांचा धुव्वा उडवला होता. त्याचा उल्लेख त्यांचे शत्रू मगधातील उत्तरकालीन गुप्तनृपति यांच्याही कोरीव लेखांत येतो.[१] विशाखदत्त मौखरिनृपति अवंतिवर्म्याच्या काळी होऊन गेला असल्यास त्याला सुमारे दीडशे वर्षांपूर्वी झालेल्या घटना माहीत असणे असंभवनीय नाही. शिवाय त्याच्या काळी 'देवीचन्द्रगुप्त' नाटक रंगभूमीवर आले असणे अशक्य नाही. तेव्हा 'देवीचन्द्रगुप्ता'तील रामगुप्तचरित्रविषयक घटना ऐतिहासिक असाव्या.

'देवीचन्द्रगुप्ता' तील उताऱ्यांचा अन्वयार्थ लावताना डॉ. शहांनी आपल्या कल्पनाशक्तीवर फार भिस्त ठेवली आहे. त्यापेक्षा उत्तरकालीन लेखकांनी त्या घटनांचे कसे वर्णन केले आहे हे पाहणे जास्त उपयुक्त ठरेल. संजान ताम्रपटाच्या लेखकाने 'चन्द्रगुप्ताने प्रत्यक्ष आपल्या भावाला ठार मारून त्याची राणी व राज्य यांचे अपहरण केले' असे म्हटले आहे. पण डॉ. शहा म्हणतात की त्या कवीने आपल्या अमोघवर्ष या आश्रयदात्याच्या स्तुतीकरिता तसे केले असावे. पण या तऱ्हेचे हे एकच वर्णन नाही. सुमारे पस्तीस वर्षांपूर्वी याच तऱ्हेचे वर्णन राष्ट्रकूट नृपति चतुर्थ गोविन्दाच्या खंबायत व सांगली ताम्रपटांतही आले आहे, असे आम्ही दाखविले होते. त्या ताम्रपटांतील वेतालसाधनाच्या उल्लेखावरून तर त्याच्या लेखकाने आपली माहिती 'देवीचन्द्रगुप्ता'तूनच घेतली होती,

---

१. उत्तरकालीन गुप्तनृपति दामोदरगुप्त याचे अफसड शिलालेखातील (फ्लीट, गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृ २०३) खालील वर्णन पाहा –

यो मौखरेः समितिषूद्धतहूणसैन्या
वल्गद्घटा विघटयन्नुरुवारणानाम् ।

असे स्पष्ट दिसते, हे आम्ही मागे दाखविले आहे. 'देवीचन्द्रगुप्ता'त रामगुप्ताने राज्यसंन्यास करून चन्द्रगुप्तास आपले राज्य व राणी दिली असे कथानक असता या दोन्ही ताम्रपटांच्या कर्त्यांनी चन्द्रगुप्ताने आपल्या भावास ठार मारून त्याचे राज्य व राणी बळकावली इतका त्याचा विपर्यास आपल्या आश्रयदात्याच्या गौरवार्थ केला असणे शक्य आहे काय याचा विचार वाचकांनी करावा.

रामगुप्ताने राज्यसंन्यास करून अरण्यात जाताना चन्द्रगुप्ताला उद्देशून खालील उद्‌गार काढले असावे असे अनुमान डॉ. शहांनी केले आहे –

त्वय्युपारोपितप्रेम्णा त्वदर्थे यशसा सह ।
परित्यक्ता मया देवी जनोऽयं जव एव मे ।।

पण हे अनुमान सयुक्तिक वाटत नाही. वरील श्लोक 'देवीचन्द्रगुप्त' नाटकाच्या दुसऱ्या अंकात ध्रुवदेवीचा वेष घेऊन चन्द्रगुप्त शकनृपतीच्या वधाकरिता जाऊ लागला असता त्याला त्या साहसापासून परावृत्त करण्याकरिता केलेल्या रामगुप्ताच्या भाषणात आला आहे.[१] त्या प्रवेशात विशाखदत्ताने शब्दांचा मोठ्या कौशल्याने उपयोग केल्यामुळे रामगुप्ताचे भाषण आडून ऐकणाऱ्या ध्रुवदेवीला तो एका स्त्रीचे मन स्वतःकरिता वळवीत आहे असे वाटते असा प्रसंग घातला आहे. त्या ठिकाणचा श्लोक नाटकाच्या शेवटी राज्यसंन्यास करताना रामगुप्ताने चन्द्रगुप्ताला उद्देशून म्हटला याला प्रमाण नाही. शिवाय तशी गोष्ट असती तर त्या प्रसंगी रामगुप्त 'मी तुझ्या करिता राज्याचा त्याग करतो' असे म्हणता, 'राणीचा त्याग करतो' म्हणाला नसता. शिवाय त्या कृत्याने त्याची दुष्कीर्ति कशी होणार होती ? आपल्या भावाकरिता

---

१. नाटचदर्पण, पृ. १२४ वरील उल्लेख पाहा–यथा देवीचन्द्रगुप्ते द्वितीयेऽङ्के प्रकृतीनामाश्वासनाय शकस्य ध्रुवदेवी-सम्प्रदानेऽभ्युपगते राज्ञा रामगुप्तेनारिवधार्थं यियासुः प्रतिपन्नध्रुवदेवीनेपथ्यः कुमारचन्द्रगुप्तो विज्ञपयन्नुच्यते ।

राज्य सोडून गेल्यामुळे त्याची सत्कीर्तिच झाली असती. तेव्हा डॉ. शहा यांच्या अनुमानाला आधार तर नाहीच, पण संभवनीयताही नाही.

तीच गोष्ट त्यांच्या रामगुप्त आणि भर्तृहरि यांच्या ऐक्यविषयक अनुमानाची. त्यांनी उद्धृत केलेल्या शबरस्वामीच्या सहा पुत्रांविषयीच्या श्लोकाने संशोधनात विनाकारण घोटाळा माजविला आहे. हे सहा ग्रंथकार कोणत्याही एका काळी विद्यमान नव्हते. भर्तृहरि चौथ्या शतकातला मानल्यास तो सहाव्या शतकाच्या आरंभी होऊन गेलेल्या वराहमिहिराचा समकालीन कसा होणार?[१] तेव्हा रामगुप्त म्हणजे भर्तृहरि हे सिद्ध करण्यास तो श्लोक निरुपयोगी आहे.

तसेच चन्द्रगुप्ताच्या विरुद्ध राज्यातील एक गट होता. म्हणून त्याने वेड्याचे ढोंग केले असे मानण्यासही काही पुरावा नाही.

इ. स. च्या सातव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत झालेल्या लेखकांनी चंद्रगुप्ताने आपल्या भावाचा वध करून त्याचे राज्य बळकावले आणि त्याच्या विधवा राणीशी विवाह केला असे वर्णन केले आहे. त्याला आधार 'देवीचन्द्रगुप्त' हाच असावा. तेव्हा विशाखदत्ताने त्या नाटकातील कथानक त्याप्रमाणेच रंगविले होते असे मानण्यास हरकत नाही. रामगुप्ताविषयी माहिती आपणांस प्रथम 'देवीचन्द्रगुप्ता' तील उताऱ्यांवरूनच मिळाली. रामगुप्ताचे ऐतिहासिकत्व नुकत्याच सापडलेल्या कोरीव लेखांवरून सिद्ध झाले आहे. तेव्हा विशाखदत्ताने वर्णिलेल्या इतर घटनाही तसाच घडल्या असाव्या असे अनुमान करणे अयोग्य होणार नाही. त्या कशा होत्या हे मागे साहित्यातील व कोरीव लेखांतील उताऱ्यांवरून दाखविले आहे.

चन्द्रगुप्ताची कृत्ये समर्थनीय कशी वाटली ?

चन्द्रगुप्ताने अशी आक्षेपार्ह कृत्ये केली असली तरी तत्कालीन विचारी लोकांनी राज्याच्या रक्षणाच्या दृष्टीने त्यालाच पाठिंबा दिला

१. वराहमिहिराचा 'पञ्चसिद्धान्तिका' ग्रंथ बहुधा शक संवत् ४२७ (सन ५०५) मध्ये लिहिला गेला असावा. शं. बा. दीक्षित–'भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास' (१९३१), पृ. २११.

असावा. 'देवीजन्द्रगुप्ता'चा शेवटचा भाग कसा रंगविण्यात आला होता याची आपणास निश्चित माहिती नाही. कदाचित् त्या भागात चन्द्रगुप्ताच्या बाजूने काही परिस्थिति वर्णिली असेल आणि तिच्यामुळे त्याचे भ्रातृवधाचे कृत्य लोकांस समर्थनीय वाटले असेल. या अनुमानाला उपोद्‌बलक असे 'देवीचन्द्रगुप्ता' तील काही उतारे सुदैवाने उपलब्ध झाले आहेत. त्यांचा आता विचार करू.

त्या नाटकाच्या पाचव्या अंकातील पुढील उतारा पाहा[१] –

यथा वा देवीचन्द्रगुप्ते पञ्चमेऽङ्के –

"एसो सियकरवित्थरपणासियासेसवेरितिमिरोहो।
नियविहिवसेण चंदो गयणंगणं लंघिऊं विसइ ॥"
(एष सितकरविस्तरप्रणाशिताशेषवैरितिमिरौघः।
निजविधिवशेन चन्द्रो गगनाङ्गणं लङ्घितुं विशति ॥)

इयं स्वापायशङ्किनः कृतकोन्मत्तस्य कुमारचन्द्रगुप्तस्य चंन्द्रोदयवर्णनेन प्रवेशप्रतिपादिका।

अंकाच्या आरंभी पात्राच्या प्रवेशाची सूचना देणाऱ्या श्लोकाला किंवा गाथेला 'प्रावेशिकी ध्रुवा' अशी संज्ञा आहे. 'देवीचन्द्रगुप्ता'च्या पाचव्या अंकाच्या आरंभी चन्द्रगुप्ताच्या प्रवेशाची सूचना देताना वरील गाथा आली आहे. तीत म्हटले आहे की आपल्या सुदैवाने सर्व शत्रूंचा ज्याने नाश केला आहे असा हा चन्द्रगुप्त आता प्रवेश करीत आहे. हे शत्रु शकनृपति किंवा त्याचे हस्तक नव्हत. चन्द्रगुप्ताने शकनृपतीला ठार मारल्याचा वृत्तांत तिसऱ्या अंकातच येऊन गेला असावा. कारण चन्द्रगुप्त ध्रुवदेवीचा वेष घेऊन शकनृपतीच्या वधाकरिता जात असल्याचे 'देवीचन्द्रगुप्ता'च्या दुसऱ्या अंकात दाखविले होते. या गाथेच्या स्पष्टीकरणात आपल्याला अपाय होईल अशा भीतीने चन्द्रगुप्ताने वेडयाचे सोंग घेतल्याचा उल्लेख आहे. तेव्हा पूर्वी ज्या शत्रूंचा उच्छेद त्याने केल्याचा उल्लेख आहे ते दुसऱ्या कोणी, बहुधा रामगुप्ताने, त्याच्या नाशाकरिता

१. नाट्यदर्पण, पृ. १७२.

पाठविले असावे. आपल्या सुदैवाने चन्द्रगुप्ताला त्यांचा उच्छेद करण्यात यश मिळाले, असे त्या गाथेत म्हटले आहे.

पाचव्या अंकात कोणत्या घटना दाखविल्या होत्या ते आपणांस माहीत नाही. पण त्या अंकाच्या शेवटी चन्द्रगुप्त रंगभूमीवरून जात असताना खालील नैष्क्रामिकी ध्रुवा आली आहे[1] –

यथा देवीचन्द्रगुप्ते पञ्चमाङ्कान्ते –

" बहुविहकज्जविसेसं अइगूढं णिण्हवेइ मयणादो ।
णिक्खलइ खुद्दचित्तउ रत्ताहुत्तं मणो रिउणो ॥ "
(बहुविधकार्यविशेषमतिगूढं निह्नुते मदनात् ।
निस्सरति क्षुब्धचित्तो रक्ताक्षिप्तं मनो रिपोः ॥)

इयमुन्मत्तस्य चन्द्रगुप्स्य मदनविकारगोपनपरस्य मनाक् शत्रुभीतस्य राजकुलगमनार्थं निष्क्रमसूचिका ।

वरील गाथेतील शेवटच्या तीन शब्दांचा अर्थ नीट ध्यानात येत नाही. तथापि त्या गाथेमध्ये शत्रूची किंचित् भीति वाटल्यामुळे वेडयाचे सोंग घेतलेला चन्द्रगुप्त आपला मदनविकार लपवून अत्यन्त गूढ अशा अनेकविध कार्यांकरिता क्षुब्धचित्त असा राजकुलाकडे (राजवाडयाकडे) जात आहे असे म्हटले आहे. त्यावरून पुढील म्हणजे सहाव्या अंकात त्याने आपल्या शत्रूचा (रामगुप्ताचा ?) निःपात केल्याचा प्रसंग दाखविला किंवा वर्णिला असावा. राजकुलात गेल्यावर चन्द्रगुप्ताने आपल्यावर मारेकरी घातल्याचा आरोप रामगुप्तावर केला असेल. त्या दोघांत बाचाबाची झाल्यावर रागाच्या भरात चन्द्रगुप्ताच्या हातून त्याचा वध झाला असेल, असे अनुमान संभवते. ‘ देवीचन्द्रगुप्ता ’तील एतद्विषयक उताऱ्यांच्या अभावी ते सध्या केवळ अनुमान आहे. पण वरील दोन ध्रुवा आणि ‘ नाटयदर्पणा ’ तील त्यांची स्पष्टीकरणे लक्षात घेता ते सयुक्तिक आहे, असे दिसेल.

---

१. नाटयदर्पण, पृ. १७३,

चन्द्रगुप्ताने रागाच्या भरात (क्षुब्धचित) स्वसंरक्षणार्थ भावाचा वध केला असल्याने तत्कालीन लोकांनी तो क्षम्य मानला असेल. तसेच तत्कालीन 'नारदस्मृती 'वरून आपल्या पतीच्या मृत्यूनंतर आपल्या दिराशी विवाह करण्याची अनुज्ञा धर्मशास्त्राने स्त्रियांना दिली असल्याने ध्रुवस्वामिनीच्याविवाहात तत्कालीन लोकांना काही दोष दिसला नसेल. नंतरच्या काळात आपल्या सामाजिक नीतिकल्पनांत बदल झाल्यामुळे तसला विवाह निंद्य मानला गेला आहे.

डॉ. अळतेकरांची उपपत्ति

चन्द्रगुप्त आदर्श राजा कसा मानला गेला याची निराळीच उपपत्ति डॉ. अ. स. अळतेकरांनी मांडली आहे.[१] ते म्हणतात, 'शकनृपतीच्या वधानंतर लज्जा आणि अपकीर्ति यामुळे रामगुप्ताचा मृत्यु लवकर घडून आला असावा. किंवा सैन्यातील एका गटाने बंड करून त्याला ठार केले असावे. चन्द्रगुप्ताने त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यानेच आपल्या भावाचा वध केला अशी अफवा पसरली असावी.' पण या तर्काला काही आधार नाही.

शकवधाची घटना कोठे घडली ?

(२) रामगुप्त समस्येतील दुसरा वादग्रस्त प्रश्न शकवधाची घटना कोठे घडली आणि तो शकनृपति कोण होता हा होय, याविषयी अनेक मते विद्वानांनी प्रदर्शित केली आहेत. डॉ. अळतेकरांनी प्रथम असे म्हटले होते की तो प्रसंग शकनृपतीच्या स्वारीच्या वेळी पाटलीपुत्रात घडला असावा. तो शकनृपति माळवा व काठेवाड या प्रांतांवर राज्य करणारा तत्कालीन पश्चिम क्षत्रप असावा. राखालदास बॅनर्जींनी ती घटना मथुरेत घडली आणि रामगुप्ताचा शत्रु कुशाणवंशी असावा, असे अनुमान केले होते[२]. इतर काहींनी ती घटना एरण किंवा विदिशा येथे घडली असे

१. कॅटलॉग ऑफ दि गुप्त गोल्ड कॉइन्स् ऑफ दि बयाना होर्ड, पृ. २६.

२. एज् ऑफ दि इम्पीरियल गुप्ताज्, पृ. ३०.

मानले आहे.[१] पण या सर्व तर्कांना आधार नाही. 'हर्षचरिता'त या घटनेचे स्थान अरिपुर किंवा अलिपुर आणि 'शृंगारप्रकाशा'त अलिपुर असे दिले आहे. 'शृंगारप्रकाशा'त 'शत्रोः स्कन्धावारं अलिपुरं' असे म्हटले आहे. तेथे 'शत्रोः स्कन्धावारं अरिपुरम्' असे विवक्षित असते तर पुनरुक्तिदोष आला असता. तेव्हा 'अलिपुरम्' हाच पाठ योग्य वाटतो. पण हे अलिपुर तरी कोठे होते ? राजशेखराच्या 'काव्यमीमांसे'त या घटनेविषयी पुढील श्लोक आला आहे[२] –

> दत्त्वा रुद्धगतिः शकाधिपतये देवीं ध्रुवस्वामिनीं
> यस्मात्खण्डितसाहसो निववृते श्रीरामगुप्तो नृपः ।
> तस्मिन्नेव हिमालये गिरिगुहाकोणक्वणत्किन्नरे
> गीयन्ते तव कार्त्तिकेय ! नगरस्त्रीणां गणैः कीर्तयः ।।

या श्लोकात म्हटले आहे की "ज्या हिमालयात शत्रूने अटकाव केल्यामुळे रामगुप्ताला आपली राणी ध्रुवस्वामिनी हिला शकाधिपतीला देऊन (किंवा देण्याचे कबूल करून) परत फिरावे लागले त्याच, किन्नरांच्या आलापांनी ज्यांच्या गुहा निनादित झाल्या आहेत अशा, हिमालयात, हे कार्त्तिकेय राजा, नगरस्त्रिया तुझ्या कीर्तीचे गायन करीत असतात." या श्लोकावरून ती घटना रामगुप्ताच्या पाटलीपुत्र राजधानीत, मथुरेत, एरणमध्ये किंवा विदिशेतही घडली नसून दूरच्या हिमालयात रामगुप्ताच्या साहसी स्वारीत घडली होती असे कळते. त्याच ठिकाणी नंतरच्या कालात कार्त्तिकेय राजाने नेत्रदीपक विजय मिळविला होता. हा कार्त्तिकेय कोण याचा पत्ता लागल्यास आपणास या घटनेच्या स्थलाचा शोध करण्यास साधन मिळेल. डॉ. अळतेकरांनी हा कार्त्तिकेय म्हणजे कुमारगुप्त असे म्हटले होते. पण रामगुप्ताची कारकीर्द गुप्तवंशाला इतकी लांछनास्पद झाली होती की कोणीही गुप्तराजसभेतील कवि आपल्या आश्रयदात्याची या श्लोकातल्या सारखी त्याच्याशी तुलना

---

१. ज. न्यू. सो. इं., व्हॉ. २३, पृ. ३४४.

२. काव्यमीमांसा, पृ. ४७.

करण्याचे मनात आणील असे वाटत नाही. तेव्हा हा कार्त्तिकेय गुप्तेतर वंशातला असला पाहिजे. सुमारे पस्तीस वर्षांपूर्वी आम्ही तो राजा प्रतीहारवंशी महीपाल होय हे साधार दाखविले होते. या राजाच्या सभेतील आर्यक्षेमीश्वर कवीने आपल्या 'चण्डकौशिक' नाटकाच्या प्रस्तावनेत त्याचा 'महीपाल' म्हणून आणि भरतवाक्यात 'कार्त्तिकेय' म्हणून उल्लेख केला आहे.[१] पण या राजाने हिमालयात एखादा विजय मिळविल्याचा उल्लेख आहे काय ? या संबंधात तत्कालीन राजशेखर कवीच्या 'बालभारत' किंवा 'प्रचण्डपाण्डव' या नाटकांतील त्याच्या विजयाचे वर्णन करणारा पुढील श्लोक पाहा –

नमितमुरलमौलिः पाकलो मेकलानां
रणकलितकलिङ्गः केलितट् केरलेन्दोः ।
अजनि जितकुलूतः कुन्तलानां कुठारो
हठहृतरमठश्रीः श्रीमहीपालदेवः ।।

या श्लोकात महीपालाच्या कुलूत देशातील विजयाचा उल्लेख आहे कुलूत देशात बिआस आणि सतलज या नद्यांमधील (दोआब) प्रदेशाचा अंतर्भाव होतो. या प्रदेशात जालंधर हे शहर पूर्वीपासून राजधानी म्हणून सुप्रसिद्ध आहे. चिनी यात्रेकरू ह्यूएनत्संग याने आपल्या काळी तेथील राजा 'उत्तर भारताचा स्वामी' म्हणून प्रसिद्धि पावला होता असे म्हटले आहे.[२] या ठिकाणीच रामगुप्ताचा पराभव झाला असावा.

तो शकनृपति कोण ?

ज्या शकनृपतीने त्या ठिकाणी रामगुप्ताचा पराभव केला तो पश्चिम क्षत्रपवंशी असणे शक्य नाही. कारण त्या क्षत्रपांचे राज्य माळवा–काठे-

१. प्रस्तावना– 'आदिष्टोऽस्मि श्रीमहीपालदेवेन ।
भरतवाक्य– 'येनादिश्य प्रयोगं घनपुलकभृता नाटकस्यास्य हर्षात्
वस्त्रालङ्कारहेम्नां प्रतिदिनमकृशा राशयः सम्प्रदत्ताः ।
तस्य क्षत्रप्रसूतेर्भ्रमतु जगदिदं कार्त्तिकेयस्य कीर्तिः
पारे क्षीराख्यसिन्धोरपि कवियशसा सार्धमग्रेसरेण ।।

२. वॅटर्स–ऑन युवन च्वांग, व्हॉ. १, पृ. २९७ इ.

वाडापुरते मर्यादित होते. ते उत्तरेत हिमालयापर्यंत पसरले नव्हते. तेव्हा रामगुप्ताचा शत्रु पंजाबात राज्य करणारा कुशाण नृपति असावा. त्याचा 'देवपुत्र–शाहि–शाहानुशाही' असा उल्लेख समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद प्रशस्तीत आला आहे. त्याने समुद्रगुप्ताचे स्वामित्व कबूल केले असले तरी त्याचा पुरता बीमोड झाला नव्हता. समुद्रगुप्ताच्या निधनानंतर रामगुप्ताने आपल्या पित्याचे अनुकरण करण्याच्या ईर्ष्येने कुशाण नृपतीच्या प्रदेशावर स्वारी केली. या स्वारीत त्याला विजयाची इतकी खात्री होती की नंतरच्या काळात राष्ट्रकूट नृपति तृतीय गोविन्द[1] आणि भाऊसाहेब यांनी केल्याप्रमाणे त्याने आपली राणी ध्रुवस्वामिनी व इतर स्त्रीपरिवारही आपणाबरोबर घेतला होता. या अविचारी कृत्याला राजशेखराने उद्‌धृत केलेल्या श्लोकात 'साहस' म्हटले आहे ते योग्य आहे. या साहसाबद्दल रामगुप्ताला जबर किंमत द्यावी लागली.

पण यावर एक आक्षेप संभवतो. तो हा की 'देवीचन्द्रगुप्ता'त व इतरत्रही रामगुप्ताच्या शत्रूला शक म्हटले आहे, कुशाण नाही. या आक्षेपाचे उत्तर देणे कठीण नाही. संस्कृत वाङ्मयात कुशाणांनाही शकच म्हटले आहे. 'कुशाण' असे वंशवाचक नाम कोठेही आढळत नाही. कुशाणवंशी कनिष्काने स्थापिलेला संवत् 'शकराजाचा संवत्' म्हणून कोरीव लेखात व साहित्यात उल्लेखिलेला आहे. तेव्हा रामगुप्ताचा शत्रु कुशाण असणे असंभवनीय नाही.

गादीवर आल्यावर लौकरच चन्द्रगुप्ताने पंजाबवर स्वारी करून गुप्त राणीच्या मागणीचे धाष्टर्य करणाऱ्या कुशाण राजाचे पारिपत्य केले. दिल्लीजवळ मेहेरौली येथे चन्द्रराजाच्या विजयाचे वर्णन करणारा लोहस्तंभावरील लेख अद्यापि विद्यमान आहे. त्यातील वर्णन द्वितीय चन्द्रगुप्ताविषयीच आहे असे मानण्यात येते. त्यात म्हटले आहे की

---

१. तृतीय गोविन्दाचा अमोघवर्ष हा पुत्र त्याच्या उत्तरभारतातील स्वाऱ्यांत त्याचा मुक्काम गुजराथेत श्रीभवन (सध्याचे सारभोण) येथे असताना झाला होता. एपि. इंडि., व्हॉ. २३, पृ. २०९ पाहा.

१०

चन्द्रनृपतीने सिंधुनदीला मिळणाऱ्या सातही उपनद्या पार करून बाल्हिकांचा पराजय केला.[1] हा विजय तत्कालीन कुशाण नृपतीवरच मिळविला असावा. कारण त्या काळी पंजाबात त्याचेच राज्य होते.

आतापर्यंतच्या विवेचनावरून खालील गोष्टी स्पष्ट झाल्या असतील–

१. सर्व उपलब्ध पुरावा ध्यानात घेतल्यास चन्द्रगुप्ताने आपल्या रामगुप्त नामक वडील भावास मारले किंवा मारविले, आणि नंतर त्याच्या विधवा राणीशी विवाह केला, असेच मानावे लागते.

२. ज्या परिस्थितीत ही घटना घडून आली तीत चन्द्रगुप्ताचा अपराध क्षम्य मानण्यास कारण असावे.

३. त्या काळी विधवा स्त्रीने आपल्या देवराशी विवाह करणे धर्मशास्त्रसंमत होते.

४. रामगुप्ताचा शत्रु तत्कालीन कुशाण नृपति असून, त्यांची लढाई कुलूत प्रदेशात जालंधर जवळ झाली असावी.

---

१. 'तीर्त्वा सप्तमुखानि येन समरे सिन्धोर्जिता बाल्हिकाः। फ्लीट् – गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृ. १४१.

११. विष्णुकुंडींच्या इंद्रपुर दानपत्रांवर नवीन प्रकाश

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासात विष्णुकुंडींच्या राजवटीला महत्त्वाचे स्थान आहे. ते मी यापूर्वी 'प्राचीन महाराष्ट्रातील विष्णुकुंडी राजवट' या आपल्या लेखात[१] दाखविले आहे. विदर्भात वाकाटकांचा अस्त झाल्यावर आंध्रनृपति विष्णुकुंडी प्रथम माधववर्म्याचे राज्य दक्षिण कोसल (छत्तीसगड), विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि कर्नाटक या प्रदेशांवर पसरले होते. पश्चिम महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील खानापूर गावी या माधववर्म्याचा एक ताम्रपट सापडला होता. तो कै. य. रा. गुप्ते आणि मी मिळून प्रकाशित केला आहे[२]. या माधववर्म्याच्या द्वितीय माधववर्मन् नामक नातवाच्या ताम्रपटात त्याचे वर्णन 'त्रिकूटमलयाधिपतिः' (नाशिक जवळच्या त्रिकूट पर्वतापासून मलय पर्वतापर्यंतच्या विशाल प्रदेशाचा स्वामी) असे केले आहे[३]. प्रथम माधववर्म्याला दोन पुत्र होते. त्यांपैकी एकाचा अंमल पश्चिम महाराष्ट्रात आणि दुसऱ्याचा आंध्र प्रदेशावर होता, असे दिसते. विदर्भावरही विष्णुकंडींचे राज्य होते हे चार वर्षांपूर्वी वर्धा जिल्ह्यातील पवनार येथे केलेल्या उत्खननात सापडलेल्या विष्णुकुंडींच्या नाण्यांवरून सिद्ध झाले आहे.[४] विष्णुकुंडींची आतापर्यंत ज्ञात झालेली वंशावळ खाली दिली आहे—

---

१. संशोधनमुक्तावलि, सर २, पृ. १०१–११०.

२. एपिग्राफिया इंडिया, व्हॉ. २७, पृ. ३१२–३१८.

३. पूर्वोक्त, व्हॉ. १७, पृ. ३३८.

४. विष्णुकुंडी माधववर्म्याचे राज्य काही काळ विदर्भावर होते हे मी पंचवीस वर्षांपूर्वी (युगवाणी, १९४६) 'दशकुमारचरिता'तील 'विश्रुतचरिता' वरून दाखविले होते (संशोधनमुक्तावलि, सर २, पृ. ८९–१००). ते आता या नाण्यांवरुन समर्थित झाले आहे. *Paunar Excavation* (1967) (pub. by Nagpur university), पृ. १४, प्लेट १७ व १८. पवनार येथे या नाण्यांचा मोठा संचय सापडला आहे.

विक्रममहेन्द्र
|
महाराज गोविंदवर्मन्
|
सार्वभौम प्रथम माधववर्मन्
|

देववर्मन्	प्रथम विक्रमेन्द्रवर्मन्
महाराज द्वितीय माधववर्मन्	महाराज इन्द्रवर्मन्
	महाराज द्वितीय विक्रमेन्द्रवर्मन्

प्रथम माधववर्म्याने दीर्घकाल (सुमारे ५० वर्षे) राज्य केले. त्याचे पुत्र देववर्मा आणि विक्रमेन्द्रवर्मा त्याच्या हयातीत कालवश झाले असावे. त्यामुळे त्याच्या नंतर त्याचे नातू गादीवर आलेले दिसतात. त्यांच्यामध्ये त्याच्या साम्राज्याची वाटणी झाली होती. द्वितीय माधववर्म्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात आणि विदर्भात कलचुरींची सत्ता स्थापित झाली, पण आंध्रात विष्णुकुंडींचा अंमल बदामीच्या चालुक्यवंशी द्वितीय पुलकेशीने इ. स. ६१५मध्ये तो प्रदेश जिंकून घेईपर्यंत चालू होता.

सुमारे १५ वर्षांपूर्वी विष्णुकुंडींचे दोन ताम्रपट आन्ध्र प्रदेशाच्या नालगोंडा जिल्ह्यांत तुमलगुडेम या गावी सापडले होते. ते श्री. बी. एन्. शास्त्री यांनी 'भारती' या तेलगू नियतकालिकाच्या सन १९५५च्या जून व जुलै महिन्यांच्या अंकांत छापांसह प्रसिद्ध केले होते. त्यानंतर डॉ. राम राव यांनी त्यांचे वाचन छापांशिवाय 'जर्नल ऑफ इंडियन् हिस्टरी,' व्हॉ ४३, पृ. ७३३ इ. मध्ये देऊन त्यांतील ऐतिहासिक माहितीची चर्चा केली. नंतर नागपूरचे डॉ. अजयमित्र शास्त्री यांनी त्यांचा सुसंगत अर्थ लावण्याचा प्रयत्न केला[1] व त्यावर डॉ. राम राव यांनी पुन: आपले मत

१. जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी, व्हॉ. ४४, पृ. २१७ इत्यादि.

मांडले.[1] हे ताम्रपट अद्यापि छापांसह 'एपिग्राफिया इंडिका'सारख्या प्रमाणभूत जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले नाहीत. त्यांचा आणखी चिकित्सक अभ्यास होणे जरूर आहे. त्यावर नवीन प्रकाश टाकण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

हे दोन्ही ताम्रपट इंद्रपुर नगरी दिलेले दिसतात. त्यांपैकी पहिला ताम्रपट विष्णुकुंडी नृपति द्वितीय विक्रमेन्द्रवर्मन् याने दिला असून त्यात खालील वंशावळ दिली आहे. महाराज गोविंदवर्मन्–त्याचा पुत्र महाराज प्रथम माधववर्मन् (ज्याने अकरा अश्वमेध व अनेक श्रौत याग केले होते आणि वाकाटक राजकन्येशी विवाह केला होता)–त्याचा पुत्र महाराज प्रथम विक्रमेन्द्रवर्मन्–त्याचा पुत्र इन्द्रभट्टारकवर्मन् (जो चक्रवर्ति क्षेत्राचा अधिपति होता आणि ज्याने अनेक चतुर्दन्त गजांसह युद्ध केले होते)–त्याचा प्रिय पुत्र द्वितीय विक्रमेन्द्रभट्टारकवर्मन् (ज्याचे अनेक सामंत होते). या शेवटच्या राजाने एका माधवराजाला आपल्या प्रिय पुत्राप्रमाणे वागविले होते. या माधवराजाने अनेक राजांचा उच्छेद केला होता. तो स्वतः रूपाने सुंदर आणि राजनीति व पराक्रम या गुणांनी युक्त असा होता, असे म्हटले आहे. पण त्याचा उल्लेख कोणत्या संदर्भात केला आहे ते समजत नाही. नंतर या ताम्रपटात म्हटले आहे की श्रीगोविंदराजाच्या महाराज पृथ्वीमूलाच्या राजवंशात जन्मलेल्या परमभट्टारिका महादेवीने इंद्रपुर येथे परमभट्टारिकामहाविहार बांधला होता. विक्रमेन्द्रभट्टारकाने सिंहवर्मा नामक पल्लव नृपतीवर विजय मिळवून आल्यावर इंद्रपुर येथे मुक्काम असताना आपल्या कारकीर्दीच्या अकराव्या वर्षी, शक संवत् ४८८, कार्त्तिक वद्य अष्टमीस इंद्रपुरच्या पूर्वोक्त महाविहारास इरुण्डेर नामक गाव तेथील भिक्षुसंघाच्या परिभोगाकरिता दिला, असे त्यात म्हटले आहे. शेवटी मूलराज नामक लेखकाचा नामनिर्देश आला आहे.

दुसरा ताम्रपट विष्णुकुंडीनृपति गोविंदवर्म्याचा असून त्यांत खालील वंशावळ आली आहे. महाराज इन्द्रवर्मन्–त्याचा पुत्र महाराज माधववर्मन्-

१. ज. इं. हि., व्हॉ. ४६, पृ. २१७ इ.

त्याचा पुत्र महाराज गोविन्दवर्मन् (ज्याने अनेक देवळांना व विहारांना दाने दिली होती). या शेवटच्या राजाने आपल्या कारकीर्दीच्या सदतिसाव्या वर्षी वैशाख पौर्णिमेला आपल्या राणीच्या विनंतीवरून परममहादेवीच्या विहाराला बुद्धमूर्तीची पूजा, भिक्षूंचे अन्न, पान व औषधे, आणि विहाराची डागडुजी याकरिता द्रावेर्म्बदल उर्फ पेण्क नामक ग्राम इंद्रपुरच्या विहाराला दान दिला.

हे दोन्ही ताम्रपट अत्यंत महत्वाचे आहेत. पहिल्यांतील गोविन्दवर्म्यापासून विक्रमेन्द्रभट्टारकवर्मापर्यंतची वंशावळ यापूर्वी सापडलेल्या विष्णुकुंडी ताम्रपटावरून ज्ञात होती. पण त्या सर्व ताम्रपटांत त्या राजांच्या कारकीर्दीचीच वर्षे दिलेली असल्यामुळे विष्णुकुंडी राजाचे काळ केवळ अनुमानाने ठरवावे लागत होते. आता पहिल्या इंद्रपुर ताम्रपटाचे शक संवत् ४८८ (इ. स. ५६६–६७) हे वर्ष द्वितीय विक्रमेन्द्रभट्टारकवर्म्याच्या कारकीर्दीचे अकरावे वर्ष होते ही अत्यंत महत्त्वाची माहिती मिळाल्याने विष्णुकुंडी राजांच्या कालांना थोडा निश्चितपणा आला आहे.

या दोन ताम्रपटांवरून खालील प्रश्न उपस्थित होतात.—

१. पहिल्या इंद्रपुर ताम्रपटात निर्दिष्ट केलेला माधवराज कोण होता? त्याचा त्या दानाशी कोणता संबंध होता?

२. दुसऱ्या ताम्रपटात निर्दिष्ट केलेल्या राजांचा पहिल्या ताम्रपटातील राजांशी कालक्रमदृष्ट्या कसा पूर्वापर संबंध होता?

३. पहिल्या ताम्रपटातील गोंविदराज आणि दुसऱ्या ताम्रपटातील गोंविदवर्मन् हे एक किंवा भिन्न?

४. गोंविदराजाची राणी परमभट्टारिका महादेवी ज्या राजवंशात जन्मली होती त्याचा मूळ पुरुष पृथ्वीमूल आणि गोदावरी ताम्रपटात[१] उल्लेखिलेला पृथ्वीमूल हे एक किंवा भिन्न?

---

१. जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रँन्च ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, व्हॉ. १६, पृ. ११४ इ.

या प्रश्नांची उत्तरे इतर संशोधकांनी भिन्न भिन्न दिली आहेत. त्यांची चर्चा येथे करणे स्थलाभावास्तव शक्य नाही. येथे फक्त स्वतःची उत्तरे सप्रमाण मांडतो.

१. पहिल्या इंद्रपुर दानपत्रातील १७ ते २० या ओळींतील लेखांत काही शब्द गळलेले दिसतात. 'श्रीमाधवराजम्' हे द्वितीयान्त पद अधांतरी राहिले आहे. या माधवराजाने अनेक राजांचा उच्छेद करून विष्णुकुण्डी साम्राज्य वाढविण्यात पुढाकार घेतला होता. द्वितीय विक्रमेन्द्र-भट्टारकवर्मा त्याला आपल्या पुत्राप्रमाणे मानत असे, असे या ताम्रपटात म्हटले आहे. त्याच्या विनंतीवरून किंवा त्याला खूश करण्याकरिता ते दान दिले असावे. तसे असल्यास 'माधवराजम्' नंतर 'अनुरुध्य' यासारखे पद गळले असावे.[1]

२. दुसऱ्या ताम्रपटातील राजांचा पहिल्या ताम्रपटातील राजांशी जवळच्या नात्याचा संबंध होता हे खालील तन्निर्दिष्ट वंशावळींवरून दिसून येईल—

पहिला ताम्रपट	दुसरा ताम्रपट
इन्द्रभट्टारकवर्मन्	इन्द्रवर्मन्
|	|
(पुत्र)	(पुत्र)
विक्रमेन्द्रभट्टारकवर्मन्	माधववर्मन्
	|
	(पुत्र)
	गोविंदवर्मन्

तेव्हा माधववर्मा हा विक्रमेन्द्रभट्टारकवर्म्याचा भाऊ असून त्याचाच निर्देश पहिल्या ताम्रपटात माधवराज या नावाने केलेला आहे, हे स्पष्ट दिसते. विक्रमेन्द्रभट्टारकववर्म्याचे त्याच्यावर पुत्रनिर्विशेष प्रेम होते. तो

---

१. 'अनुरुध्य' याचा या अर्थी उपयोग 'उत्तररामचरित' (अंक ३, श्लोक ६) यांतील 'इत्यादिभिः प्रियशतैरनुरुध्य मुग्धाम्' हा चरण पहा.

बहुधा निपुत्रिक वारला असावा. म्हणून त्याच्यानंतर माधवराज 'माधव-वर्मा' या नावाने गादीवर आला.

३. पहिल्या ताम्रपटात उल्लेखिलेला परमभट्टारिका महादेवीचा पति गोंविदराज हा या वंशातील आरंभीचा स्वतंत्र राजा (प्रथम माधव-वर्म्याचा पिता) गोंविदवर्मा होय. त्याच्या विषयी त्याच्या वंशजांना परमादर असल्याने त्याच्या राणीचा 'परमभट्टारिका महादेवी' असा गौरवात्मक उल्लेख केला आहे. तिने आपल्या नावे इन्द्रपुर येथे बौद्ध विहार बांधला होता. त्याला ही दोन्ही दाने दिली होती. तो दुसऱ्या ताम्रपटातील गोंविदवर्म्याहून भिन्न असून त्याचा पाचवा पूर्वज होता.

४. या गोंविदराजाची पट्टराणी परमभट्टारिका महादेवी ज्या पृथ्वीमूल राजवंशात जन्मली होती त्याचा संस्थापक पृथ्वीमूल हा गोदावरी ताम्रपटात निर्दिष्ट केलेल्या पृथ्वीमूलाचा समाननामधारी पूर्वज होता. हा पृथ्वीमूल राजवंश विष्णुकुण्डी घराण्याचा सन्मान्य मांडलिक होता, असे पहिल्या ताम्रपटावरून दिसते.

या ताम्रपटांवरून आतापर्यंत अनुमानाने ठरविलेल्या विणुकुंडी राजांच्या कालांत थोडाफार फरक करावा लागेल. प्रथम माधववर्म्याने दीर्घकाल (सुमारे ५० वर्षे) राज्य केले होते. म्हणून त्याचा पुत्र प्रथम विक्रमेन्द्रवर्मा त्याच्या हयातीत मृत्यु पावला असावा. त्यानंतरच्या इंद्र-भट्टारकवर्म्याच्या ताम्रपटावरून[१] त्याने निदान २७ वर्षे राज्य केले होते, असे माहीत झाले आहे. त्याचा पुत्र द्वितीय विक्रमेन्द्रभट्टारकवर्म्याने आपल्या कारकीर्दीच्या अकराव्या वर्षी शकसंवत् ४८८ (इ. स. ५६६–६७) मध्ये पहिला इंद्रपुर ताम्रपट दिला होता. इ. स. ५६६ मधून प्रथम माधववर्मा (५० वर्षे), इंद्रभट्टारकवर्मा (२७ वर्षे) आणि विक्र-मेन्द्रभट्टारकवर्मा (११ वर्षे) यांच्या ज्ञात वर्षांची बेरीज ८८ वर्षे ही वजा केल्यास माधववर्मा इ. स. ४७८ पूर्वी गादीवर आला असावा असे स्पष्ट दिसते. माधववर्मा आणि इन्द्रभट्टारकवर्मा यांच्या कारकीर्दीची संपूर्ण वर्षे माहीत नसल्याने यांत फार तर ७–८ वर्षांचा फरक पडेल.

१. ए. इं., व्हॉ. १२, पृ. १३३ इत्यादि.

म्हणजे विष्णुकुण्डी प्रथम माधववर्म्याचा राज्यकाल सुमारे इ. स. ४७० ते ५२० असा दिसतो. तो वाकाटक नृपति हरिषेण (सुमारे इ. स. ४७५–५००[1]) याचा समकालीन होता. त्याने वाकाटक राजकन्येशी विवाह केला होता. (ती कदाचित् हरिषेणाचीच कन्या असेल), या प्रस्तुत ताम्रपटातील उल्लेखाशी हा काल जमतो.

द्वितीय विक्रमेंद्रभट्टारकवर्म्यानंतर द्वितीय माधववर्मा आणि द्वितीय गोविंदवर्मा हे गादीवर आले. या माधववर्म्याचा राज्यकाल माहीत नाही. पण गोविंदवर्म्याने दुसरा इंद्रपुर ताम्रपट आपल्या कारकीर्दीच्या ३७ व्या वर्षी दिला होता. इ. स. ५६६ + ३७=इ. स. ६०३. यांत द्वितीय विक्रमेन्द्रभट्टारकवर्मा, द्वितीय माधववर्मा आणि द्वितीय गोविंदवर्मा यांच्या कारकीदीची अज्ञात वर्षे मिळविली पाहिजेत. तसे केल्यास हा द्वितीय गोविंदवर्मा इ. स. ६१५ मध्ये बदामीच्या चालुक्यवंशी द्वितीय पुलकेशीने ज्याचा उच्छेद करून आंध्रप्रांत आपल्या राज्यास जोडला तो शेवटचा विष्णुकुण्डी राजा असला पाहिजे. आतापर्यंत त्याचे नाव माहीत नव्हते.

याप्रमाणे प्रस्तुत दोन ताम्रपटांनी विष्णुकुंडींच्या कालावर महत्त्वाचा प्रकाशझोत टाकला आहे. या ताम्रपटांवरून इतरही काही प्रश्नांवर प्रकाश पडतो. पण त्यांची चर्चा इतरत्र करू.

---

१. मिराशी–वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, पृ. १२.

१२. हरिश्चन्द्रगडाच्या नावाचा शोध

'विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिक १९७०' मधील लेखात डॉ. कोलते यांनी हरिश्चन्द्र गडावरील लेण्यांत कोरलेल्या प्राचीन लेखांचे संपादन केले आहे. त्या गडाला हे नाव केव्हा व कसे पडले हा एक कुतूहलाचा विषय आहे. त्याची थोडी चर्चा येथे करू.

हरिश्चन्द्र हा पौराणिक परंपरेनुसार सूर्यवंशातील त्रिशंकूचा पुत्र. त्याची राजधानी उत्तर भारतात अयोध्या येथे होती. तेथून दक्षिण भारतात असलेल्या दूरच्या अहमदनगर जिल्ह्यातील अकोल्याच्या नैर्ऋत्येस १८ मैलांवरच्या पर्वतावर किल्ला बांधून त्याने त्याला आपले नाव दिले असेल हे संभवनीय वाटत नाही या बाबतीत नाशिक जिल्ह्यातील अंजनेरी येथे पंचवीस वर्षांपूर्वी सापडलेल्या हरिश्चंद्रवंशी भोगशक्ति राजाच्या दोन ताम्रपटांची सहजच आठवण होते. हे ताम्रपट आम्ही आपल्या 'कलचुरि-चेदि वंशाचे कोरीव लेख' या इंग्रजी ग्रंथात (कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, व्हॉ. ४, भाग १, पृ. १४६–१५९) संपादिले आहेत.

त्यात खालील वंशावळ आली आहे—

स्वामिचन्द्र
|
सिंहवर्मन्
|
भोगशक्ति ऊर्फ पृथिवीचन्द्र

स्वामिचन्द्राला 'हरिश्चन्द्रवंशस्यालङ्कारभूतः' (हरिश्चन्द्रवंशाला भूषण झालेला) असे विशेषण लावले आहे. त्यावरून हरिश्चन्द्र हा त्याचा पूर्वज दिसतो. या ताम्रपटांपैकी एकात कलचुरि–चेदि संवत्

४६१ (इ. स. ७१०–११) चा उल्लेख आहे. त्या ताम्रपटाचा उद्देश भोगशक्तीने जयपुरनगरात बांधलेल्या भगवान् नारायणाच्या (विष्णूच्या) पूजेकरिता, मार्गशीर्ष महिन्यातील त्याच्या यात्रेकरिता, देवळाच्या डागडुजीकरिता व त्याच्याशी संलग्न असे अन्नसत्र चालविण्याकरिता नाशिक जिल्हा आणि उत्तर कोंकण या भागातील काही प्रदेशांवर बसविलेल्या करांचा निर्देश करणे, हा आहे. दुसऱ्या, कालोल्लेख नसलेल्या, ताम्रपटात नाशिक जिल्ह्यातील उद्ध्वस्त झालेल्या समगिरिपट्टनातील व्यापाऱ्यांस दिलेल्या काही सवलतींचा व तेथील गुन्ह्यांकरिता अपराध्यांस करावयाच्या दंडांचा निर्देश आहे.

स्वामिचन्द्राचा पूर्वज हा सूर्यवंशातील तन्नामक राजा असणे शक्य नाही. तथापि तो राजा त्याचा खरोखरी पूर्वज नसला तरी त्याचा मानीव पूर्वज असणे शक्य आहे. कारण भारताच्या अनेक मध्ययुगीन राजांनी आपला वंश सूर्य, चन्द्र, अग्नि इत्यादि देव, कौरव, पांडव, इत्यादि पुराणप्रसिद्ध राजवंश, किंवा लक्ष्मण, कर्ण यांसारखे सुप्रसिद्ध ऐतिहासिक व्यक्ति यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न केलेला प्राचीन कोरीव लेखांत आढळतो. मध्ययुगीन सूर्यवंशी व सोमवंशी राजकुलांची अनेक नावे आपणास माहीत आहेत. परमार राजे अग्निकुलात गणले जात होते. कन्नोजचे गुर्जरप्रतीहार आपणास लक्ष्मणाचे, आणि गुजराथचे गुर्जर स्वतःस कर्णाचे वंशज म्हणवीत असत. स्वामिचंद्राचा मानीव पूर्वज हरिश्चन्द्र हा असाच पुराणप्रसिद्ध राजा असावा असे सकृद्दर्शनी वाटते. पण डॉ. कोलते यांच्या लेखातील काही माहितीवरून तो ऐतिहासिक पुरुष होता, असे अनुमान करणे शक्य आहे.

हरिश्चन्द्राचे केवळ नावच अहमदनगर जिल्ह्यामधील अकोल्याजवळच्या पर्वताला दिले होते, असे नाही, तर तेथे हरिश्चन्द्रेश्वर नावाचे शिवालय अद्यापि विद्यमान आहे आणि ते आजकालचे नसून निदान तेराव्या शतकाइतके प्राचीन आहे हे डॉ. कोलते यांनी चांगा वटेश्वराच्या तत्त्वसार ग्रंथातून जो उतारा दिला आहे त्यावरून स्पष्ट आहे. हे देवालय हरिश्चन्द्रनामक ऐतिहासिक राजपुरुषाने बांधून तेथे प्रतिष्ठापना केलेल्या भगवान् शंकराच्या लिंगाला आपले नाव दिले होते असे दिसते. भारताच्या

प्राचीन इतिहासात देवालये बांधणारांनी त्यातील देवतांना आपल्या नावांवरून बनविलेली नावे दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. देवालये शंकराची असल्यास ती 'ईश्वरान्त' आणि विष्णूची असल्यास 'स्वामिपदान्त' असत. उदाहरणार्थ, गुप्तनृपति प्रथम कुमारगुप्त याचा मन्त्री पृथिवीषेण याने शंकराचे देवालय स्थापून त्यातील लिंगाला 'पृथिवीश्वर' असे नाव दिले होते. विदर्भातील रामगिरीवरच्या भगवान् रामचंद्राला 'रामगिरिस्वामी' आणि बंगाल्यातील भगवान् विष्णूच्या मूर्तीला 'श्वेतवराहस्वामी' अशी नावे होती. याला काही अपवादही आढळतात. पण ते फार थोडे. तेव्हा हरिश्चन्द्रगडाचे नाव आणि तेथील शंकराच्या लिंगाला 'हरिश्चन्द्रेश्वर' हे नाव हरिश्चन्द्रनामक ऐतिहासिक राजपुरुषावरून पडले असावे.

ह्या हरिश्चन्द्र राजाचे राज्य अहमदनगर आणि नाशिक या जिल्ह्यांवर होते असे दिसते. कारण त्याच्या नावाने विख्यात झालेला हरिश्चन्द्रगड अहमदनगर जिल्ह्यात आणि त्याच्या वंशाचे ताम्रपट नाशिक जिल्ह्यात सापडले आहेत. पुढे त्या वंशाचे राज्य उत्तर कोंकणावर पसरले, असे दिसते.

हा हरिश्चन्द्र केव्हा होऊन गेला हे निश्चित करणे कठीण आहे. त्याचा भोगशक्ति नामक वंशज इ. स. च्या आठव्या शतकाच्या आरंभी राज्य करीत होता. त्याच्या पूर्वोक्त ताम्रपटांत त्याच्या दोन पूर्वजांचा उल्लेख आहे. त्यांच्या अगोदर किती पिढ्यांपूर्वी हरिश्चन्द्र होऊन गेला हे निश्चितपणे माहीत नाही. इ. स. च्या पाचव्या शतकाच्या अखेरीपर्यंत नाशिकजवळचा प्रदेश त्रैकूटक राजांच्या अमलाखाली होता. पुढे तो माहिष्मतीच्या कलचुरींच्या साम्राज्यात अंतर्भूत झाला. तथापि त्यांची राजधानी दूरवर नर्मदेच्या काठी माहिष्मती (सध्याचे महेश्वर) येथे असल्यामुळे त्यांनी उत्तर महाराष्ट्र प्रदेश विदर्भाप्रमाणे आपल्या मांडलिकाच्या स्वाधीन केला असणे शक्य आहे. या कालात (सुमारे इ. स. ५५० ते ६२५) त्यांनी तो प्रदेश आपल्या हरिश्चन्द्र नामक मांडलिकाच्या व त्याच्या वंशजांच्या स्वाधीन केला असावा. सध्याच्या परिस्थितीत यापेक्षा जास्त निश्चित विधान करणे शक्य नाही.

१३. माळव्याच्या प्राचीन इतिहासावर नवीन प्रकाश

प्राचीन भारतीय संस्कृत आणि प्राकृत वाङमयात कालाचे उल्लेख क्वचितच आढळतात. त्यामुळे मोठमोठ्या ग्रंथकारांचे काळ अजमासाने ठरवावे लागतात. काही जैन ग्रंथकार मात्र याला अपवाद आहेत. त्यांपैकी जैन 'हरिवंशपुराणा'चा कर्ता जिनसेन हा एक आहे. या पुराणाचे ६६ सर्ग आहेत. त्यामध्ये बावीसावे तीर्थंकर नेमिनाथ यांचे चरित्र सांगितले आहे. ग्रंथाच्या शेवटी आपण कोणत्या वर्षी आणि कोठे ग्रंथ समाप्त केला आणि त्या काळी त्या स्थानाच्या चारी दिशांना कोण कोण राजे राज्य करीत होते याविषयी खालील दोन श्लोकांत जिनसेनाने फार महत्त्वाची माहिती दिली आहे—

शाकेष्वब्दशतेषु सप्तसु दिशं पञ्चोत्तरेषूत्तरां
पातीन्द्रायुधनाम्नि कृष्णनृपजे श्रीवल्लभे दक्षिणाम् ।
पूर्वां श्रीमदवन्तिभूभृति नृपे वत्सादिराजेऽपरां
सौराणामधिमण्डले जययुते वीरे वराहेऽवति ।।
कल्याणैः परिवर्धमानविपुलश्रीवर्धमाने पुरे
श्रीपार्श्वालयनन्नराजवसतौ पर्याप्तशेषः पुरा
पश्चाद्दोस्तटिकाप्रजाप्रजनितप्राज्यार्चनावर्धने
शान्तेः शान्तगृहे जिने सुरचितो वंशो हरीणामयम् ।।

[शक संवत् ७०५ मध्ये– इन्द्रायुध हा उत्तरेत, कृष्णराजाचा पुत्र श्रीवल्लभ दक्षिणेत, अवन्तिभूपति पूर्वेस आणि वत्सराज, तसेच सौरांच्या मण्डलावर शूर जयवराह पश्चिमेस राज्य करीत असता—

अनेक कल्याणकारक वस्तूंनी ज्याचे ऐश्वर्य वृद्धिगत होत आहे अशा विख्यात वर्धमानपुरात श्रीपार्श्वनाथाच्या नन्नराजवसतीत (जैन देवालयात) पूर्वी जवळ जवळ पूर्ण झालेला हा हरिवंश नंतर दोस्तटिका येथील

लोकांनी केलेल्या मोठ्या उत्सवात शान्तिनाथाच्या शांत देवालयात उत्तम रीतीने समाप्त झाला.]

या दोन श्लोकांत जिनसेनाने भारताच्या प्राचीन इतिहासाला अत्यंत महत्त्वाची पण अन्यत्र दुष्प्राप्य अशी माहिती दिली आहे. त्याने आपले 'हरिवंशपुराण' वर्धमानपुर येथे नन्नराजवसति नामक पार्श्वनाथ तीर्थंकराच्या देवालयात बरेचसे रचले होते. नंतर काही कारणाने त्याने तेथून दोस्तटिका गावास जाऊन शांत अशा शांतिनाथाच्या देवालयात तेथील लोकांनी केलेल्या उत्सवप्रसंगी त्याची सांगता केली.

या श्लोकांत उल्लेखिलेल्या राजांच्या बाबतीत गेल्या पाउणशे वर्षांत विद्वानांनी भिन्न भिन्न मते प्रकट केली आहेत. शके ७०५ (इ. स. ७८३-८४) मधील भारतातील राजकीय परिस्थितीचे वर्णन पहिल्या श्लोकात केले आहे. जिनसेन ज्या वर्धमानपुरात आपले काव्य रचीत होता त्याच्या उत्तरेस इन्द्रायुध राजा राज्य करीत होता. हा कनोजचा तत्कालीन राजा होय. याच्या पूर्वीचा वज्रायुध आणि नंतरचा चक्रायुध अशी दोन आयुध–पदान्त राजनामे अनुक्रमे राजशेखराच्या 'कर्पूरमंजरी'त (अंक ३) आणि कोरीव लेखात[१] आली आहेत. ते राजे याच वंशाचे असावे. चक्रायुधानंतर कनोज येथे गुर्जर–प्रतीहारांचे राज्य झाले.

त्या काळी दक्षिणेत कृष्णराजाचा पुत्र श्रीवल्लभ हा राज्य करीत होता. 'श्रीवल्लभ' ही पदवी राष्ट्रकूटांनी धारण केली होती. म्हणून तत्कालीन अरब प्रवाश्यांनी 'बल्हारांचे राज्य दक्षिण भारतात होते' असे म्हटले आहे. तत्कालीन राष्ट्रकूट राजाचे नाव जिनसेनाने दिले नाही. राष्ट्रकूट नृपति प्रथम कृष्ण याला द्वितीय गोविंद आणि ध्रुव असे दोन पुत्र होते. ध्रुवाने ख्रिस्तोत्तर ७८० च्या सुमारास आपल्या वडील भावास पदच्युत करून गादी बळकावली होती. तेव्हा तोच या (सन ७८३ मधील) काळात दक्षिणेत महाराष्ट्रात राज्य करीत होता आणि म्हणून प्रस्तुत श्लोकात विवक्षित असावा.

---

१. नारायणपालाचा भागलपूर ताम्रपट पाहा. इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. १५, पृ. ३०५.

त्याकाळी पूर्वेस कोण राजा राज्य करीत होता याविषयी विद्वानांत मतभेद आहेत. काही विद्वान् 'अवन्तिभूभृति' याचा 'वत्सादिराजे' याच्याशी संबंध लावून त्याकाळी प्रतीहारवंशी वत्सराज अवन्ति किंवा माळवा येथे राज्य करीत होता असे म्हणतात. आणि त्याकाळी गुर्जर प्रतीहार माळव्यात राज्य करीत होते हे सिद्ध करण्याकरिता राष्ट्रकूट नृपति दन्तिदुर्ग याने उज्जयिनी येथे केलेल्या हिरण्यगर्भ महादानाच्या खालील वर्णनाचा निर्देश करतात[१]—

हिरण्यगर्भं राजन्यैरुज्जयिन्यां यदासितम् ।
प्रतीहारीकृतं येन गुर्जरेशादि राजकम् ।।

पण या श्लोकात दन्तिदुर्गाने उज्जयिनी येथे केलेल्या हिरण्यगर्भदानाच्या प्रसंगी केवळ गुर्जरेशासच नव्हे तर इतर राजांनाही त्याचे द्वारपालपद (प्रतीहारिपद) स्वीकारावे लागले होते असे म्हटले आहे. त्यावरून केवळ गुर्जरवंशी प्रतीहार राजाचाच बोध होत नाही. अर्थात् त्या काळी माळव्यात गुर्जर प्रतीहार राजा राज्य करीत होता हे सिद्ध होत नाही. तेव्हा 'वत्सादिराजे' याचा 'अवन्तिभूभृति' याच्याशी संबध न जोडता त्यापुढील 'अपरां' या शब्दाशी जोडला पाहिजे आणि 'गुर्जरप्रतीहारनृपति वत्सराज हा पश्चिमेस राज्य करीत असता' असा अर्थ केला पाहिजे. जिनसेनाने पूर्वेच्या राजाचा 'अवन्तिभूभृत्' असा मोघम उल्लेख केला आहे. त्याचे नाव सांगितले नाही. पुढे दाखविल्याप्रमाणे तो अवन्ति राज्यात (माळव्यात) च त्यावेळी राहत असल्यामुळे त्याला त्या राजाच्या नामनिर्देशाची जरूरी वाटली नसावी.

पश्चिमेस दोन राजे राज्य करीत होते. त्यापैकी एक गुर्जर–प्रतीहार नृपति वत्सराज हा होता. त्याची राजधानी राजपुतान्यातील श्रीमाल किंवा भिनमाल ही होती. जिनसेनाच्या 'हरिवंशा'पूर्वी पांचच वर्षे (शके ७०० मध्ये) पूर्ण झालेल्या उद्द्योतनसूरीच्या 'कुवलयमाला' नामक प्राकृत कथेत हा वत्सराज जाबालिपुर (राजपुतान्यातील जालोर) येथे

१. एपि. इंडिका, व्हॉ. १८, पृ. २४३.

राज्य करीत होता, असे म्हटले आहे.[१] तेव्हा तो पश्चिमेत (राजपुतान्यात) राज्य करीत होता, यात संशय नाही.

जिनसेनाने पश्चिमेच्या आणखी एका राजाचा उल्लेख केला आहे. तो राजा सौराष्ट्र (काठेवाड) देशावर राज्य करणारा जयवराह हा होय. याचा वंशज चापनृपति धरणीवराह हा वर्धमानपुर येथे राज्य करीत होता असा एका कोरीव लेखात उल्लेख आहे.[२] हे वर्धमानपुर म्हणजे सौराष्ट्रातले सध्याचे वढवाण हे होय.

जिनसेनाने ज्या वर्धमानपुरात आपले 'हरिवंशपुराण' रचले ते सौराष्ट्रातले वढवाण होय, असे सामान्यत: समजले जात असे; पण त्याला वरील श्लोकांतील दिशांचे उल्लेख जमत नाहीत. उदाहरणार्थ, कन्नोजच्या इन्द्रायुधाचे राज्य त्याच्या उत्तरेस पडत नाही. तीच स्थिति पश्चिमेच्या म्हणून वर्णिलेल्या राजपुतान्यातील वत्सराजाच्या राज्याची. म्हणून जिनसेनाचे वर्धमानपुर सौराष्ट्रातील वढवाण नसून माळव्यातील धारच्या उत्तरेस १५ मैलांवर असलेले सध्याचे बध्नावर येथे असावे असे मत डॉ. हीरालाल जैन यांनी पुढे मांडले होते.[३] यानंतर बध्नावर येथे अनेक जैन देवळांचे अवशेष सापडले आहेत. शिवाय ज्या दोस्तटिका गावी जाऊन जिनसेनाने 'हरिवंशपुराण' पूर्ण केले ते गाव बध्नावर गावाच्या पश्चिमेस १० मैलांवर अद्यापि दोतरिया नांवाने विद्यमान आहे. बध्नावर गावाच्या भौगोलिक स्थितीला वरील पहिल्या श्लोकात उल्लेखिलेल्या पांची राज्यांचे निर्देश जमतात. त्याच्या उत्तरेस कन्नोज येथे इंद्रायुध, दक्षिणेस महाराष्ट्रात राष्ट्रकूट ध्रुव, पश्चिमेस राजपुतान्यात वत्सराज आणि सौराष्ट्रात जयवराह, आणि पूर्वेस अवन्तिराज हे राजे त्या काळी राज्य करीत होते. अवन्तिदेशाधिपतीचे नाव जिनसेनाने दिले नाही खरे, पण अवन्ति (उजयिनी) बध्नावरच्या पूर्वेस आहे यात संशय नाही. तेथील राजाचा शोध पुढे करू.

---

१. कुवलयमाला, भाग १, पृ. २८३,

२. इं. अँ., व्हॉ. १२, पृ. १९५.

३. इंडियन कल्चर, व्हॉ. १२, पृ. १६१ इ.

वर्धमानपुर हे सौराष्ट्रातील वढवाण नसून माळव्यातील बध्नावर होय, हे सिद्ध करण्यास आम्ही आणखी एक प्रमाण पुढे मांडले होते. माळव्यात प्राचीन वर्धमानपुर नामक स्थान होते, हे प्राचीन कोरीव लेखाच्या पुराव्यावरून दाखविता येते. धाराधीश भोजाचा बंधु उदयादित्य याचा वंशज परमारनृपति जयवर्मदेव याचा वर्धमानपुराहून दिलेला एक अपूर्ण ताम्रपट पुष्कळ वर्षांपूर्वी डॉ. कील्हॉर्नने प्रसिद्ध केला होता.[1] त्यात उल्लेखिलेले वर्धमानपुर कोठे होते याचा शोध त्याला लावता आला नव्हता. ते वर्धमानपुर सध्याचे माळव्यातील बध्नावरच होय.

जिनसेनाचे वर्धमानपुर माळव्यात होते याचा आणखी एक पुरावा 'हरिवंशा'तील 'नन्नराजवसति' या पार्श्वनाथ तीर्थंकराच्या देवालयाचा उल्लेख हा होय नन्नराज नामक राजाने ते देवालय बांधून त्याला आपले नाव दिले होते, हे उघड आहे. प्राचीन काळी देवालये बांधून त्यांना किंवा त्यांतील मूर्तींना आपले नाव देण्याची पद्धत होती. याची अनेक उदाहरणे प्राचीन कोरीव लेखांत येतात. हा नन्नराज कोण याविषयी डॉ. हीरालाल जैन यांनी विविध तर्क केले होते. त्याकाळी नन्नराज नावाचे चार राजे होऊन गेले होते हे त्यांनी दाखविले होते—(१) दक्षिण कोसलचा नन्नराज–ज्याचा कोरीव लेख भांदकजवळ सापडला आहे; (२) कटच्चुरि (कलचुरि) नन्नराज, ज्याच्या तरलस्वामी नामक पुत्राने वडोदा जिल्ह्यातील मांकणिका गाव दिले होते; (३) उदयनाचा नातू नन्न, ज्याचा प्रस्तर लेख कालंजर येथे आहे; (४) नन्नराज, ज्याचा सन ७०९ चा ताम्रपट विदर्भात मुलताई येथे सापडला होता. पण या चारांपैकी एकाचाही अंमल त्याकाळी किंवा त्यापूर्वी माळव्यात नव्हता. शिवाय त्यांच्यासंबंधी इतरही आक्षेप घेता येतात.

तर मग 'नन्नराजवसती'चा निर्माता कोण? या प्रश्नाचे उत्तर आता देणे शक्य आहे. अलीकडे माळव्याच्या मन्दसोर जिल्ह्याच्या भानपुरा

---

१. इं. अँ. व्हॉ. १९. पृ. ३४९ इ.

तहसिलीतील इन्द्रगड येथे राष्ट्रकूटवंशी भामान याचा पुत्र नन्नप्प याचा विक्रम संवत् ७६७ (इ. स. ७१०–११) चा शिलालेख सापडला होता तो प्रसिद्ध झाला आहे.[१] त्यात त्या राजाच्या कारकीर्दीत पाशुपतपंथी आचार्य दानराशि याने तेथे शिवालय बांधले होते, असा उल्लेख आहे. इंद्रगड हे बध्नावरच्या उत्तरेस सुमारे १०० मैलांवर आहे. तेव्हा नन्नप्प याचा अंमल बध्नावर (प्राचीन वर्धमानपुर) येथेही होता, यात संशय नाही. त्या राजाने तेथे पार्श्वनाथमंदिर उभारून त्याला 'नन्नराजवसति' असे नाव दिलेले दिसते.

वरील अनेक प्रमाणांवरून जिनसेनाने आपले 'हरिवंशपुराण' माळव्यात बध्नावर येथे रचले होते, असे सिद्ध होते.

तथापि या सिद्धान्तावर अलीकडे डॉ. आ. ने. उपाध्ये यांनी काही आक्षेप घेतले आहेत त्यांचाही विचार केला पाहिजे –

आक्षेप १ – वर्धमानपुर याचे बध्नावर असे रूप झाले असे म्हणणे म्हणजे स्वरव्यञ्जनपरिवर्तनाची कसरत करणे होय.

उत्तर – यात कोणतीही कसरत नाही. असे बदल अनेक स्थलनामांत आढळतात. उदाहरणार्थ, प्राचीन 'माहिष्मतीपुरा'चे हल्लीचे 'महेश्वर' रूप पाहा[२]. त्या प्राचीन स्थलनामातील मती ही अक्षरे लुप्त होऊन महेश्वर रूप बनले आहे. तसाच प्रकार वर्धमानपुराच्या बाबतीत झाला आहे. त्यातील रेफ आणि मा ही लुप्त झाली आहेत.

आक्षेप २ – बध्नावर येथे सापडलेल्या कोरीव लेखांत त्या स्थळाचे नाव वर्धनपुर असे आढळते, वर्धमानपुर असे नाही.

---

१. एपि. इंडिका, व्हॉ. ३२, पृ. ११२ इ; स्टडीज इन इंडॉलॉजी, व्हॉ. २, पृ. १८५ इ.

२. महेश्वर येथील काही कोरीव लेखांत त्याचे 'माहिष्मतीपुर' हे नाव आले आहे. पोतदार गौरव ग्रंथ, पृ. ३१७ इ.

उत्तर– त्या लेखांचा काळ पाहिला पाहिजे. बहुधा ते लेख ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकानंतरचे असावे.[१] तसे असल्यास वर्धमानपुर–वर्धनपुर–बध्नावर अशी त्या स्थलनामाची परिवर्तने संभवतात.

आक्षेप ३ – बध्नावर येथील कोणत्याही कोरीव लेखांत जिनसेन ज्या पुन्नाट संघाचा अनुयायी होता त्याचा उल्लेख नाही.

उत्तर–हे प्रमाण अभावात्मक (argumentum ex silentio) आहे. ते निर्णायक होऊ शकत नाही. असे उल्लेख पुढे सापडण्याची शक्यता आहे.

आक्षेप ४–बध्नावर येथे कोणी 'वराह' नृपति राज्य करीत होता याला पुरावा नाही.

उत्तर–आमचेही म्हणणे जयवराह हा बध्नावर येथे राज्य करीत होता असे नाही. तो सौराष्ट्रात राज्य करीत होता, असेच आम्ही म्हणतो. म्हणून हा आक्षेप गैरलागू आहे.

आक्षेप ५–बध्नावरचे मूळ रूप 'पुर' पदान्त असले पाहिजे. पण जिनसेन तर 'श्रीवर्धमाने' असे म्हणतो. म्हणून त्याचे रूपान्तर वढवाण असेच झाले पाहिजे.

उत्तर–हा आक्षेप बालिश आहे. जिनसेन 'श्रीवर्धमाने पुरे' असे म्हणतो. त्याचे रूपान्तर 'बध्नावर' होऊ शकेल.

आक्षेप ६–कोणाही नन्नराजाने बध्नावर येथे जैनवसति बांधल्याचा उल्लेख नाही.

उत्तर–प्राचीन भारतीय इतिहासाची साधने अत्यल्प आहेत. आपणांस आवश्यक तो सर्व पुरावा उपलब्ध होईलच असे नाही. तशी शक्यता असली म्हणजे पुरे. इंद्रगडचा नन्नप्प जिनसेनाच्या अगोदर सुमारे शंभर

---

१. बध्नावर येथील काही लेखांत त्याचे वर्धनपुर असे नाव आले आहे. त्यांचे काल विक्रम संवत् १२१६ आणि १२१९ असे आहेत. इं. क., व्हॉ. ११, पृ. १६७–६८.

वर्षांपूर्वी माळव्यात राज्य करीत होता, हे मागे दाखविले आहे. त्याने ते जिनालय बांधले असणे सुतराम् संभवनीय आहे.

आक्षेप ७–जयवर्मदेवाच्या ताम्रपटात वर्धमानपुराचा उल्लेख आहे खरा, पण ते वर्धमानपुर बध्नावरच कशावरून ? त्या ताम्रपटातील इतर गावांचा शोध लागला नाही. कदाचित् जयवर्मदेवाने राज्यभ्रष्ट झाल्यावर काठेवाडातील वर्धमानाहून ताम्रपट दिला असेल.

उत्तर–हा जावईशोध आहे. त्या ताम्रपटात जयवर्मा हा आपला 'परमभट्टारक', 'महाराजाधिराज', 'परमेश्वर' अशा सम्राट्पदनिदर्शक पदव्यांसह निर्देश करतो. तेव्हा तो त्यावेळी पदच्युत झाला नव्हता आणि पुढेही झाला याला पुरावा नाही. त्याचे राज्य सौराष्ट्रावर कधीही नव्हते. तेव्हा त्याच्या शिबिराचे वर्धमानपुर हे स्थान माळव्यातच शोधले पाहिजे. ते बध्नावरच असणे संभवनीय आहे. कारण त्या ताम्रपटात उल्लेखिलेली इतर काही गावे आम्हांस बध्नावरच्या परिसरात सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशात सापडली आहेत.[1] त्या ताम्रपटात जयवर्मदेव म्हणतो की आपण पूर्वी चन्द्रपुरी येथे असताना ते दान दिले होते. हे गाव बध्नावरच्या उत्तरेस ७ मैलांवरचे चन्दोरिया होय. तो ताम्रपट अपूर्ण असल्यामुळे त्यात दान दिलेल्या गावाचे नाव येत नाही, पण ते त्यात उल्लेखिलेल्या वटखेटक–३६ या विभागातील मायमोडक असावे. हे मायमोडक सध्याचे बध्नावरच्या वायव्येस १० मैलावरचे मादरपाडा असेल. वटखेटक हे बध्नावरच्या ईशान्येस ४ मैलावरचे बडमंडळ असेल ज्याला दान दिले होते तो ब्राह्मण मूळचा अद्रियलविदावरीचा होता. या ग्रामनामाचा पहिला भाग आता लुप्त झाला आहे. शेवटचा विदावरी म्हणजे बध्नावरच्या उत्तरेस ६ मैलांवरचे बिडवई असावे. याप्रमाणे त्या ताम्रपटांत उल्लेखिलेली बहुतेक गावे बध्नावरच्या परिसरात अद्यापि ओळखता येतात. म्हणून बध्नावर हे पूर्वीचे वर्धमानपुर याविषयी संशय राहत नाही.

---

१. सर्व्हे ऑफ इंडियाचा नकाशा, क्र. ४६ एम् पाहा.

प्रस्तुत ताम्रपट सौराष्टातील वर्धमानपुराहून (सध्याच्या वढवाण-हून) दिला असणे शक्य नाही; कारण, (१) परमारवंशी जयवर्म्याचे त्या काळी सौराष्ट्रावर राज्य नव्हते आणि (२) त्या ताम्रपटात उल्लेखिलेली गावे वढवाणच्या परिसरात सापडत नाहीत. तेव्हा जिनसेनाने ज्या गावी 'हरिवंशपुराण' लिहिले ते वर्धमानपुर म्हणजे सध्याचे बध्नावरच होय. नंतर त्याने ज्या दोस्तटिका गावी जाऊन ते पुरे केले, ते सध्याचे बध्नावर पासून १० मैलावर असलेले दोतरिया होय.

डॉ. उपाध्ये यांनी बध्नावर पक्षावर घेतलेले आक्षेप दुधारी तरवारीसारखे त्यांच्या वढवाण पक्षावर तसेच, किंबहुना त्यापेक्षा जास्त जोराने, घेता येतात. त्यापैकी महत्त्वाचे आक्षेप येणेप्रमाणे–

(१) 'हरिवंशा'त उल्लेखिलेल्या राजांच्या प्रदेशांच्या दिशा वढवाणाला जुळत नाहीत. इंद्रायुधाचे कन्नोज आणि वत्सराजाचे भिन्नमाल वढवाणाच्या अनुक्रमे उत्तरेस आणि पश्चिमेस नाहीत. जिनसेन आपल्या निवासस्थानाच्याच दिशांचे उल्लेख करीत आहे. तो काही भारताचा भूगोल लिहीत नव्हता.

(२) वढवाणजवळ दोस्तटिका ग्रामनामाला जुळेल असे गाव नाही. तशीच जयवर्म्याच्या ताम्रपटातील इतरही गावे आढळत नाहीत.

(३) वढवाणजवळच्या प्रदेशावर इ. स. ७८३ पूर्वी कोणी नन्नराज नामक राजा राज्य करीत होता याला पुरावा नाही. म्हणून तेथे 'नन्नराजवसति' नामक जिनालय असणे संभवनीय नाही.

तेव्हा जिनसेनाने आपल्या 'हरिवंशात' उल्लेखिलेले वर्धमानपुर हे सध्याचे धारच्या उत्तरेस १५ मैलांवर असलेले बध्नावर होय, याविषयी आता संशय राहू नये.

हा लेख संपविण्यापूर्वी अवन्तिदेशावर कोण राजा राज्य करीत होता याचा विचार करू. जिनसेनाने त्याचा नामनिर्देश केला नाही, पण कोरीव लेखांच्या साहाय्याने तद्विषयक अनुमान करणे शक्य आहे. इ. स. ७१० मध्ये नन्नप्प त्या प्रदेशावर राज्य करीत होता हे आपण पाहिले आहे. जिनसेनाने 'हरिवंशपुराण' सन ७८३ मध्ये पूर्ण केले. त्यानंतर सुमारे

१२ वर्षांनी महाराष्ट्राच्या राष्ट्रकूटवंशी तृतीय गोविंदाने उत्तर भारतावर स्वारी केली. त्याने वाटेत (मध्य भारतात–माळव्यात) नागभट आणि चन्द्रगुप्त यांचा पराभव केल्याचा उल्लेख त्याचा पुत्र प्रथम अमोघवर्ष याच्या ताम्रपटात येतो. यापैकी नागभट हा गुर्जर प्रतीहारवंशी वत्सराजाचा पुत्र होय यात संशय नाही. त्याचा मित्र चंद्रगुप्त हा छत्तीसगडातील सोमवंशी तन्नामक राजा असावा असा तर्क संजान ताम्रपटाचे संपादक देवदत्त भांडारकर यांनी केला होता. पण तो बरोबर नाही. कारण तो सोमवंशी चन्द्रगुप्त त्यापूर्वी सुमारे दोनशे वर्षे अगोदर होऊन गेला होता. तृतीय गोविंदाने पराजित केलेला चन्द्रगुप्त हा माळव्याचा राजा दिसतो. तो किंवा त्याचा पिता जिनसेनाच्या काळी माळव्यात राज्य करीत असावा.

नंतरच्या काळात माळवा प्रतीहारांच्या राज्यात अन्तर्भूत झालेला दिसतो शक संवत् ८५३ (सन ९३१) मध्ये तेथे विनयादिकपाल नामक राजा राज्य करीत होता असे दुसरा एक जैन कवि हरिषेण याने म्हटले आहे. हा विनयादिकपाल बहुधा गुर्जर–प्रतीहार नृपति विनायकपाल दिसतो. तो त्या काळात कनोज येथे राज्य करीत होता.

नंतर काही काळाने माळव्यात परमारांचे राज्य स्थापन झाले.

१४. 'विद्धशालभञ्जिके'तील ऐतिहासिक समस्या

राजशेखराच्या 'विद्धशालभञ्जिका' नाटिकेचे कथानक इतर अनेक संस्कृत नाटकांतल्याप्रमाणे अन्तःपुरातील कारस्थानावर आधारित असले तरी त्याला ऐतिहासिक पृष्ठभूमि आहे हे आम्ही 'संशोधनमुक्तावलि,' सर १ (पृ. १८८–१९५) मध्ये दाखविले आहे. त्यात उल्लेखिलेल्या ऐतिहासिक घटनांचा निराळा अर्थ लावण्याचा प्रयत्न अलीकडे कुरुक्षेत्र विश्वविद्यालयाच्या प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृति विभागाचे प्रमुख डॉ. बुद्धप्रकाश यांनी केला आहे.[१] सत्यान्वेषणार्थ त्याचे परीक्षण करणे अवश्य आहे.

वाचकांना पुढील विवेचन समजण्याकरिता प्रथम त्या नाटिकेचे कथानक संक्षेपाने देणे आवश्यक आहे. ते असे—

त्रिपुरी (जबलपूरजवळचे सध्याचे तेवर) येथं राज्य करणाऱ्या कर्पूरवर्ष नामक करचुलि राजाच्या दरबारी कुन्तल देशाचा राज्यभ्रष्ट वीरपाल उर्फ चंडमहासेन आश्रयार्थ येतो. त्याच्या कुवलयमाला नामक मुलीवर कर्पूरवर्षाचे प्रेम बसते. कर्पूरवर्षाच्या राणीचा मामा लाट (गुजराथ) देशाधिपति चन्द्रवर्मा याला मुलगा नसल्याने त्याने आपल्या मृगांकावलि नामक मुलीलाच मुलगा म्हणून वाढविले होते, आणि त्याचे नाव मृगांकवर्मा असे ठेवले होते. कर्पूरवर्षाच्या राणीला मात्र याची माहिती नव्हती. मृगांकावलीचे ज्याच्याशी लग्न होईल त्याला चक्रवर्तिपद प्राप्त होईल असे भविष्य ज्योतिष्यांनी वर्तविले होते. ते माहित झाल्यामुळे कर्पूरवर्षाचा मन्त्री भागुरायण याने मृगांकावलीला मृगांकवर्मारूपाने काही

१. डॉ. मिराशी फेलिसिटेशन व्हॉल्यूम्, पृ. ४०६–४२३; उमेश मिश्र कॉमेमोरेशन व्हॉल्यूम्, पृ. ३६७–३७५.

निमित्ताने त्रिपुरीला आणले होते. त्याचे कन्यासदृश रूप पाहून राणी त्याला केव्हा केव्हा मौजेने स्त्रीवेष देत असे. त्या वेषात मृगांकावलीला पाहिल्यावर कर्पूरवर्ष तिच्यावर आसक्त होतो. राणीला राजाचे कुन्तल राजकन्या कुवलयामाला हिच्यावरही प्रेम बसले आहे हे समजल्यामुळे ती तिचा विवाह आपला मामेभाऊ मृगांकवर्मा याच्याशी करण्याचे योजते. तसेच नित्य नव्या स्त्रीवर आषक होणाऱ्या आपल्या पतीची फजीती करण्याच्या उद्देशाने ती त्याला 'माझ्या मामांनी मृगांकवर्म्याच्या बहिणीला विवाह जमविण्याकरिता येथे पाठविले आहे. मी तिचा तुमच्याशी विवाह लावून देणार आहे. त्याकरिता तयार असावे,' असा निरोप पाठवते. राजा अर्थातच त्याला संमति देतो. ठरल्याप्रमाणे विवाह येऊन लाजाहोमही होतो. इतक्यात लाटदेशाधिपति चंद्रवर्म्याकडून राणीला निरोप येतो की 'मला नुकताच पुत्र झाला आहे. तेव्हा मी मुलगा म्हणून वाढविलेल्या माझ्या मृगांकावलि कन्येचा विवाह योग्य वराशी करावा.' तेव्हा राणीला आपलीच फजीती झाल्याचे कळते. तथापि झाले ते ठीकच झाले असे मानून ती राजाच्या मृगांकावलीशी झालेल्या विवाहाला संमति देते. एवढेच नाही तर विदूषकाच्या सूचनेप्रमाणे राजाचे कुन्तल राजकन्या कुवलयमाला हिच्याशीही लग्न लावून देते. इतक्यात राजाचा सेनापति श्रीवत्स याच्याकडून आलेला दूत राजाला पुढील आशयाचा खलिता सादर करतो : 'पदभ्रष्ट झालेला कुन्तलाधिपति वीरपाल आपल्या आश्रयार्थ आला होता. त्याला पुढे घालून आम्ही पयोष्णीच्या तीरावर तळ दिला. तेथे घनघोर लढाई होऊन आमचा जय झाला. नंतर आम्ही वीरपालाला त्याच्या गादीवर बसविले.' तेव्हा भागुरायण मन्त्री कर्पूरवर्ष राजा सार्वभौम झाल्याचे जाहीर करतो.

'विद्धशालभंजिके'च्या कथानकाच्या वर दिलेल्या सारांशावरून त्याला लावलेल्या ऐतिहासिक झालरीची वाचकांस कल्पना येईल. त्यांत उल्लेखिलेली घटना खरोखरीच घडली असावी, असे आम्ही आमच्या 'संशोधनमुक्तावलि,' सर १, मधील पूर्वोक्त लेखात सविस्तर दाखविले आहे. राजशेखराने स्वकालीन ऐतिहासिक व्यक्तींची नावे थोडीबहुत बदलली आहेत. त्रिपुरीचा करचुलि कर्पूरवर्ष हा कलचुरिनृपति केयूरवर्ष-

प्रथम युवराजदेव (सन ९१५–९४५) हा होय. त्याच्या दरबारी त्याचा जामात राष्ट्रकूटवंशी बद्दिग उर्फ तृतीय अमोघवर्ष कांही वर्षे राहत होता असे तत्कालीन कोरीव लेखांवरून दिसते.[१] त्या वेळी त्याचा पुतण्या चतुर्थ गोविंद हा मान्यखेट (सोलापूरच्या आग्नेयेस ९० मैलांवरचे मालखेड) येथील गादीवर होता. बद्दिग–अमोघवर्ष याने विदर्भातील अचलपुरच्या कर्कर नामक राष्ट्रकूट सामंताशी युद्ध करून विजय मिळविला होता, असा कोरीव लेखात उल्लेख आढळतो.[२] अचलपूर पयोष्णी (पूर्णा) नदीच्या तीरापासून केवळ दहा मैल असल्याने ' विद्धशालभंजिके 'त वर्णिलेली कलचुरि व राष्ट्रकूट सैन्यांची लढाई अचलपुराजवळच झाली असावी असे दिसते. नंतर राष्ट्रकूटांच्या काही इतर सामन्तांप्रमाणे कलचुरि सेनापतीने मान्यखेटावर चाल करून चतुर्थ गोविंदाला पदच्युत केले आणि त्याचा चुलता बद्दिग उर्फ तृतीय अमोघवर्ष याला मान्यखेटाच्या गादीवर बसविले असावे. याप्रमाणे ' विद्धशालभंजिकेत ' उल्लेखिलेल्या घटनेची उपपत्ति लावता येते, असे आम्ही ' संशोधनमुक्तावलि,' सर १, मधील लेखात दाखविले होते.

डॉ. बुद्धप्रकाश यांनी ' विद्धशालभंजिके 'त उल्लेखिलेल्या घटनेचा निराळाच अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात, " वीरपाल हा

---

१. ॲन्युअल रिपोर्ट ऑफ दि ऑर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ मैसूर, (१९२१), पृ. २१–२१; एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. ३, पृ. १७९.

२. शिलाहार अपराजिताच्या मुरुड–जंजिरा ताम्रपटातील बद्दिग–अमोघवर्षाच्या वर्णनातील पुढील श्लोक पहा—

श्रीमत्कर्कर राष्ट्रकूटकटकेऽसद्वंशसंघर्षतो
रौद्रद्रोहदवप्रतापशमनं निस्त्रिंशधाराजलैः ।
येनाकारि समुद्धृतेन्द्रधनुषा भूषाश्मभिर्विद्युता
भाति श्रीमदमोघवर्षसुघनोऽसद्धूलिविध्वंसनात् ।।

याचे भाषांतर ' संशोधनमुक्तावलि,' सर, पृ. १९४–९५ वर पाहा.

राष्ट्रकूट नृपति बद्दिग–तृतीय अमोघवर्ष असणे शक्य नाही. बद्दिग हा कलचुरि नृपति केयूरवर्ष–युवराजदेव याचा जामात होता. तेव्हा ' विद्धशालभंजिके 'तल्या वीरपालरूपाने तो विवक्षित असल्यास त्याच्या कुवलयमाला कन्येचा त्या नाटिकेत दाखविल्याप्रमाणे त्याचा श्वशुर केयूरवर्षाशी विवाह होणे कसे शक्य आहे ? तश्यासारख्या घटनेच्या केवळ उल्लेखानेही राजसभेतील लोकांना भयंकर धक्का बसला असता. तेव्हा वीरपाल नावाने दुसरा कोणी विवक्षित असला पाहिजे.

तत्कालीन इतिहासाचा विचार करिता वीरपालाच्या रूपाने आंध्रप्रदेशातील पूर्वचालुक्यवंशी भीम, ज्याला चालुक्य द्वितीय भीम असेही नाव होते, तो असावा. त्याची राजमार्तंड आणि चण्डमहेन्द्र अशी बिरुदे होती. त्यांपैकी दुसरे ' विद्धशालभंजिके 'तील वीरपालाच्या ' चण्डमहासेन ' या विरुदासारखे आहे. तो वेंगी येथील पूर्वचालुक्यांच्या गादीवर हक्क सांगत होता. पण ती त्याला न मिळता त्याच्या द्वितीय युद्धमल्ल नामक दूरच्या नातेवाईकाने मान्यखेटच्या राष्ट्रकूटांच्या साहाय्याने 'बळकाविली होती. युद्धमल्लाने सन ९२८ ते ९३४ पर्यंत सात वर्षे राज्य केले. या काळात राष्ट्रकूटांचे त्याच्यावर फार वर्चस्व होते. म्हणून चालुक्य द्वितीय भीम याने त्रिपुरीच्या कलचुरि युवराजदेवाच्या साहाय्याची याचना केली असावी आणि त्याकरिता त्याला आपली कन्या देऊन वैवाहिक संबंध जोडला असावा. तो कुवलयमालेच्या विवाहाच्या रूपाने ' विद्धशालभंजिके 'त वर्णिला आहे.

भीमाच्या साहाय्यार्थ पाठविलेल्या सेनेची राष्ट्रकूटांशी पयोष्णीच्या (पूर्णेच्या किंवा पैनगंगेच्या) तीरी घनघोर लढाई झाली. तीत राष्ट्रकूटांचा पराभव झाल्यावर कलचुरि सेनेने चालुक्य द्वितीय भीमास वेंगीच्या गादीवर बसविले. नंतर राष्ट्रकूटांच्या राज्यांत क्रांति होऊन केयूरवर्षाचा जावई बद्दिग–अमोघवर्ष याला गादी मिळाली. पण पुढे त्याचा मुलगा तृतीय कृष्ण यास कलचुरींच्या सामर्थ्याचा हेवा वाटून त्याने युवराज-

देवाचा पराभव केला.[1] तेव्हा कलचुरींनी कित्येक पिढ्या चालत आलेले राष्ट्रकूटांशी सलोख्याचे संबंध तोडून टाकून उत्तरकालीन चालुक्यांशी सख्य केले आणि राष्ट्रकूटांचा उच्छेद केला.[2] ”

‘ विद्धशालभंजिके ’तील ऐतिहासिक घटनेची डॉ. बुद्धप्रकाश यांनी सुचविलेली वरील उपपत्ति स्वीकारण्यात अनेक अडचणी आहेत. त्यांचा आता विचार करू:—

१. वीरपाल हा पूर्वचालुक्य वंशातील चालुक्य द्वितीय भीम होय हे सिद्ध करण्याकरिता त्या दोघांच्या बिरुदांतील साम्य हे एक कारण बुद्धप्रकाश यांनी दिले आहे. पण त्यांत त्यांची फसगत झाली आहे. वीरपालाच्या ‘ चंडमहासेन ’ या बिरुदाचा ‘ विद्धशालभंजिके ’त उल्लेख आहे. पण चालुक्य भीमाचे बिरुद, बुद्धप्रकाश समजतात त्याप्रमाणे, ‘ चण्डमहेन्द्र ’ नसून ‘ गण्डमहेन्द्र ’ असे होते.[2] या दोन बिरुदांत मुळीच साम्य नाही.

२. ‘ विद्धशालभंजिके ’त वीरपाल हा कुंतलदेशाच्या गादीवर हक्क सांगत असलेला दाखविला आहे. पुढे पयोष्णीच्या युद्धानंतर कलचुरींच्या साहाय्याने त्याला ती मिळाली. पण चालुक्य भीम हा आंध्रदेशातील चालुक्यांच्या गादीकरिता झगडत होता, कुन्तलाधिपत्याकरिता नव्हे. म्हणून ते दोघे एक असणे शक्य नाही.

डॉ. बुद्धप्रकाशांच्या उपपत्तीच्या मार्गात ही सर्वात मोठी धोंड आहे. ती बाजूला सारणे अगदी अशक्य आहे. कुन्तल याने सर्व कानडी प्रदेश विवक्षित होता असे ते म्हणतात. पण आंध्रप्रदेश कधीही कानडीभाषी नव्हता. शेवटी, ‘ कुन्तल ’ शब्दाचा अनेकवचनी प्रयोग केल्यास त्याने सबंध

---

१. तृतीय कृष्णाच्या देवळी ताम्रपटातील पुढील श्लोक पहा—

रामहतसहस्रभुजो भुजद्वयाकलितसमदरामेण ।
जननीपत्नीगुरुरपि येन सहस्रार्जुनो विजितः ॥

२. पागनवरम् ताम्रपटातील ओळ ४५ पहा. इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. १३, पृ. २१४ व २१५ यांमधील प्लेट पाहा.

दक्षिण भारताचा उल्लेख होत असे ' असे मोठे साहसी विधान त्यांनी आपल्या उपपत्तीच्या समर्थनार्थ केले आहे. पण त्याचे एकही उदाहरण दिले नाही. त्यांना माहीत नाही काय की संस्कृतमध्ये देशांची नांवे नेहमी अनेकवचनातच योजिली जातात, जसे 'विदर्भेषु' म्हणजे विदर्भ देशात[६]. त्या नावाला 'देश' यासारखे उपपद जोडले असल्यास मात्र त्याचा एकवचनी उपयोग होतो. एक वचनात एरवी त्याचा अर्थ 'त्या देशाचा राजा' असा होतो. जसे 'कुन्तलः कुन्तशाली' (विद्धशालभंजिका, अंक ४). तेव्हा 'कुन्तलपति' शब्दाने आंध्रनृपति चालुक्य भीम विवक्षित असणे कदापि शक्य नाही.

३. आणखी असे की हा चालुक्य भीम कधीकाळी कलचुरींचे साहाय्य मागण्यास त्रिपुरीला गेला होता, याला मुळीच पुरावा नाही. ती बुद्धप्रकाशांची केवळ कपोलकल्पना आहे.

४. बद्दिग–अमोघवर्षाच्या राज्यारोहणानंतर कलचुरि आणि राष्ट्रकूटांचे संबंध बिघडले असे मानण्यास मुळीच पुरावा नाही. त्याकरिता बुद्धप्रकाशांनी उद्धृत केलेल्या पुढील श्लोकाचा[७] अर्थ त्यांना कळला नाही.

रामहतसहस्रभुजो भुजद्वयाकलितसमदरामेण ।
जननीपत्नीगुरुरपि येन सहस्रार्जुनो विजितः ।।

या श्लोकात बद्दिग–अमोघवर्षाच्या तृतीय कृष्ण या पुत्राचे वर्णन आहे. त्याची माता आणि पत्नी या कलचुरि वंशातील होत्या. कलचुरि राजे आपला वंश कार्तवीर्य सहस्रार्जुन याच्यापासून उत्पन्न झाला, असे मानत असत. वरील श्लोकात कृष्णराजाने सहस्रार्जुनालाही मागे टाकले असे श्लेषांच्या साहाय्याने वर्णिले आहे. त्या श्लोकाचा अर्थ असा–ज्याने आपल्या दोन्ही बाहूंनी मदविवश अशा स्त्रियांना कवटाळले आहे अशा त्या तृतीय कृष्णराजाने परशुरामाने ज्याचे सहस्र बाहू कापून टाकले

---

६. 'अस्ति दक्षिणापथे विदर्भेषु पद्मपुरं नाम नगरम् ।' मालती-माधव, अं. १.

७. या श्लोकाने डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांसारख्यांना चकविले होते. शेवटी त्याचा बरोबर अर्थ प्रा. नीलकंठ शास्त्री यांनी प्रथम लावला.

त्या कार्तवीर्य सहस्रार्जुनावर–तो आपल्या मातेचा आणि पत्नीचा पूर्वज होता तरी–सरशी केली.

येथे सहस्रार्जुन हा, बुद्धप्रकाश समजतात तसा, कोणी कलचुरि राजा विवक्षित नाही. या तऱ्हेच्याच दुसऱ्या एका श्लोकाकडे आम्ही इतरत्र लक्ष वेधले आहे.[१]

५. ‘ विद्धशालभंजिके ’तील वीरपालाने चालुक्य भीम विवक्षित होता असे मानले तरी त्याला वेंगीच्या गादीवर बसविण्याकरिता पाठविलेल्या कलचुरि सेनेने छत्तीसगड, बस्तरसंस्थान इत्यादि मार्गाने आंध्र-प्रदेशावर स्वारी करावयास पाहिजे होती. पूर्वीच्या समुद्रगुप्त, ईशानवर्मा मौखरि इत्यादि राजांनी याच मार्गाचा अवलंब करून पूर्व किनाऱ्यावरची कलिंग व आंध्र देशातील राज्ये जिंकली होती.[२] तो सरळ मार्ग सोडून वीरपालाबरोबरचे कलचुरि सैन्य विदर्भातून कशाला जाईल ? आंध्रदेशावर स्वारी करताना त्याची शत्रुसैन्याशी पयोष्णीच्या (पूर्णेच्या) काठी चकमक होणे सुतराम् असंभवनीय आहे.

तेव्हा ‘ विद्धशालभंजिके ’तील वीरपाल हा पूर्वचालुक्यवंशी द्वितीय भीम होय या डॉ. बुद्धप्रकाश यांच्या मताला काडीचाही आधार नाही.

याच्या उलट त्या वीरपालाच्या रूपाने राष्ट्रकूटवंशी बद्दिग उर्फ तृतीय अमोघवर्ष विवक्षित होता, असे मानण्यास भरपूर पुरावा आहे. तत्कालीन राष्ट्रकूट नृपति चतुर्थ गोविंद याचा तो चुलता असून मान्य-खेटच्या गादीवर हक्क सांगत होता. राष्ट्रकूटांची राजधानी कानडी प्रदेशात असल्यामुळे कोरीव लेखांत त्यांना ‘ कुन्तलाधिपति ’ असे म्हटले

---

१. ‘ संशोधनमुक्तावलि, ’ सर ५, पृ. १६५–१७०.

२. समुद्रगुप्ताने दक्षिण कोसल (छत्तीसगड) आणि महाकान्तार (बस्तर जिल्हा) आक्रमून नंतर पूर्व किनाऱ्यावरच्या एरण्डपल्ल वगैरे देशांच्या राजांचा पराभव केला. त्याची अलाहाबाद प्रशस्ति पाहा.

आहे.[१] बद्दिग–अमोघवर्ष काही काळ कलचुरींच्या आश्रयास राहत होता असे कुडलूर[२] आणि सुदी[३] ताम्रपटात म्हटले आहे. त्रिपुरी येथे असताना त्याने आपल्या रेवकनिम्मडी नामक कन्येचा गंग नृपति पेर्माडी बूतुग याच्याशी विवाह केला होता.[४] त्याचा पुत्र तृतीय कृष्ण याचाही विवाह एका कलचुरि राज्यकन्येशी झाला होता. तेव्हा त्रिपुरीचा कलचुरि-न्हपति युवराजदेव याने बद्दिगाचा पक्ष घेऊन त्याला गादीवर बसविण्याकरिता सैन्याची मदत दिली असली तर नवल नाही. त्रिपुरीहून मान्यखेटचा मार्ग विदर्भातूनच जातो. तेव्हा वाटेत त्या सैन्याचे अमरावती जिल्हयातील अचलपुरच्या चतुर्थ गोंविदाच्या पक्षाच्या कर्कर नामक राष्ट्रकूट सामन्ताच्या सैन्याशी पयोष्णी (पूर्णा) नदीच्या तीरावर युद्ध झाले असल्यास नवल नाही. अमोघवर्ष (बद्दिग) याने कर्कराचा पराजय केल्याचा उल्लेख कोरीव लेखांत आला आहे तो याच युद्धासंबंधी असावा.[५] या विजयोत्सवातच त्रिपुरी येथे ‘ विद्धशालभंजिका ’ प्रथम रंगभूमीवर आलेली दिसते.

या विजयानंतर कलचुरि आणि राष्ट्रकूट यांचे संबंध पूर्वीपेक्षाही दृढतर झालेले दिसतात. बद्दिगाचा पुत्र तृतीय कृष्ण याने कलचुरि युवराजदेवाचा पराजय केला होता, असे मानण्यास मुळीच पुरावा नाही. मागे उद्धृत केलेल्या श्लोकात त्या कृष्णनृपतीने कार्तवीर्य सहस्रार्जुनावर सरशी केल्याचे आलंकारिक वर्णन आहे, कलचुरि राजाच्या पराभवाचे नाही, हे मागे दाखविले आहे. एवढेच नव्हे, तर या युद्धानंतर आपणास

---

१. राजशेखराच्याच ‘ कर्पूरमंजरी ’ या प्राकृत नाटकांतील तत्कालीन राष्ट्रकूट राजाचा उल्लेख पाहा —

अत्थि तत्थ दक्खिणावधे कुन्तलेसुं सअलजणवल्लहो वल्लहराओ-णाम राआ ।

२. ॲ. रि. आ. स. मै. (१९२१), पृ. २१–२२.

३. ए. इं., व्हॉ. ३, पृ. १७९.

४. पूर्वोक्त.

५. वर पृ. १६९, टीप २ पाहा.

मान्यखेटची गादी मिळाल्यावरही शांतप्रकृतीच्या चिन्तनशील बद्दिगाने राज्यकारभाराची दगदग आपला पुत्र कृष्ण यावर सोपवून स्वतः त्रिपुरी येथेच कालक्रमणा करण्याचे पसंत केले होते, हे आम्ही एका तन्त्रविषयक ग्रंथातील उताऱ्यावरून दाखविले होते.[१] तेव्हा ‘ विद्धशालभंजिका ’ नाटिकेतील वीरपाल हा राष्ट्रकूटनृपति बद्दिग–अमोघवर्षच होय हे सिद्ध करण्यास भरपूर पुरावा आहे.

पण मग त्या वीरपालाच्या कुवलयमाला नामक कन्येचा विवाह कर्पूरवर्ष (कलचुरि केयूरवर्ष) याच्याशी झाल्याचे त्या नाटिकेत दाखविले आहे ते कसे ? असा प्रश्न उत्पन्न होतो. सकृद्दर्शनी ही गोष्ट असंभाव्य वाटते खरी. पण डॉ. अळतेकरांनी म्हटल्याप्रमाणे राजशेखराने त्या नाटकातील प्रेमकथानक जास्त गुंतागुंतीचे करण्याकरिता ही घटना त्यात घातली असावी. त्या घटनेची कथानकाच्या प्रगतीसाठी मुळीच आवश्यकता नाही. असे असताही ही असंभाव्य आणि आक्षेपार्ह घटना त्या नाटकात घालणे हे अविवेकीपणाचे लक्षण आहे. राजशेखराच्या बाबतीत हा अविवेक सुतराम् संभवनीय आहे. कारण त्याने इतक्या मूर्खपणाचे नसले तरी अनेक अविवेकी प्रसंग आपल्या इतर ग्रंथांत घातले आहेत. त्यापैकी काहींचा येथे निर्देश करू.

---

१. त्या ग्रंथातील पुढील उतारा पुष्कळ वर्षांपूर्वी नेपाळ म्युझियमचे संचालक डॉ. एस्. एन्. सेन यांनी मला पाठविला होता. सन १९४१ मध्ये हैदराबाद येथे ओरिएंटल कॉन्फरन्सच्या वेळी मी तो त्यांच्याजवळील हस्तलिखितात वाचला होता.

गतवति शककाले मङ्गलेष्वष्टसंख्ये शरदि विशदपक्षे चाश्विने शुक्रवारे । उडुनि सुरपतीशे योग आयुष्मतीयं तिथिरपि च गतानां पञ्चमी यत्र शुद्धा ।। चेदिकुलराजधान्यां गतवति श्रीवन्द्यगे निहत्यारीन् । तच्छासनेन वसुधां परिरक्षति कृष्णराजेऽपि ।।

ही तिथि (शुक्रवार, आश्विन शु. ५, शक ८५८) २३ सप्टेंबर सन ९३६ ला बरोबर जुळते. या उताऱ्यात बद्दिग चेदिदेशाच्या राजधानीत त्रिपुरी येथे, राज्य मिळाल्यावरही, राहत होता, असे म्हटले आहे.

१. राजशेखराने ‘ बालरामायणात ’ सीतेच्या स्वयंवराकरिता अनेक स्वकालीन राजे उपस्थित असल्याचे वर्णिले आहे. त्यामध्ये त्रिपुरीचा चेदि नृपति, लाट (गुजराथ) देशाचा चुलुक्य राजा, मरहट्ट (महाराष्ट्र) देशाधिपति आणि शक राजा यांचा अंतर्भाव आहे. यांतील कालविपर्यासाची राजशेखराला जाणीव नाही !

२. ‘ बालरामायणा ’च्या चौथ्या अंकात शतानन्द सीतेला पुढील उपदेश करतो––

निर्व्याजा दयिते ननान्दृषु नता श्वश्रूषु भक्ता भव
स्निग्धा बन्धुषु वत्सला परिजने स्मेरा सपत्नीष्वपि ।
पत्युर्मित्रजने सनर्मवचना खिन्ना च तद्द्वेषिषु
स्त्रीणां संवननं नतभ्रु तदिदं कान्तौषधं भर्तृषु ।।

ह्या श्लोकात राजशेखराने ‘ शाकुन्तला ’तील कण्वाच्या ‘ शुश्रूषस्व गुरुन् ’ इत्यादि श्लोकाचे अनुकरण केले आहे, हे स्पष्ट आहे. पण ते करताना शकुन्तलेप्रमाणे सीतेला विवाहापूर्वी आणि नंतरही कधीही सवती नव्हत्या, तेव्हा त्यांच्याशी स्मितपूर्वक वर्तन करण्याचा तिला उपदेश करणे मूर्खपणाचे आहे, हे त्याच्या ध्यानात आले नाही.

३. ‘ बालरामायणा ’च्या आठव्या अंकात राजशेखराने राम व सीता यांचा लंकेतून अयोध्येपर्यंतचा विमानातून प्रवास वर्णिला आहे. त्यांत त्यांना हिमालय, कैलास, मानस सरोवर, इंद्राची अमरावती, तसेच पृथ्वीवरील ताम्रपर्णी, गोदावरी, भीमेश्वर, आन्ध्रदेश, कावेरी वगैरे नद्या, देश, पर्वत वगैरेंचे, या अनुक्रमानेवर्णन भौगोलिक क्रम धाब्यावर बसवून केले आहे. त्यातील विसंगतीचे त्याला भान नाही.

४. ‘ विद्धशालभंजिके ’च्या चौथ्या अंकात कर्पूरवर्षाची राणी आपण आपल्या पतीचा विवाह मगध, मालव, पाञ्चाल, अवन्ती, जालन्धर आणि केरल या देशांच्या राजकन्यांशी त्यापूर्वीच घडवून आणला होता, असे म्हणते. हे विवाह खरोखरच घडले होते काय ? त्या काली (ख्रिस्तोत्तर दहाव्या शतकाच्या आरंभी) मालव आणि अवन्ती येथे दोन भिन्न राजे राज्य करीत होते काय ? त्यापूर्वी परमारांचे माळव्यावर स्वामित्व

प्रस्थापित झाले होते. तेव्हा वरील विधान खरे वाटत नाही. कलचुरींचे केरल देशाधिपाशी वैवाहिक सख्य स्थापन झाले होते, याला मुळीच पुरावा नाही.

५. आपल्या आश्रयदात्यांच्या विजयांच्या वर्णनात राजशेखर सत्यापेक्षा अनुप्रासप्रेमाने आकृष्ट झालेला दिसतो. उदाहरणार्थ त्याच्या 'बालभारता'तील प्रतीहारनृपति महीपालाचे खालील वर्णन पहा.

नमितमुरलमौलिः पाकलो मेकलानां
रणकलितकलिङ्गः केलितट् केरलेन्दोः ।
अजनि जितकुलूतः कुन्तलानां कुठारो
हठहृतरमठश्रीः श्रीमहीपालदेवः ॥

या श्लोकात कनोजच्या महीपालाने जवळच्या कुलूत देशाधिपतीवरच नव्हे तर दूरच्या कलिङ्ग, मुरल आणि केरल देशांच्या अधिपतींवरही विजय मिळविल्याचे वर्णन आहे. पण त्याला काडीचाही आधार नाही. वरील श्लोकांतील देशांची नावे अनुप्रासामुळे सुचलेली दिसतात.

राजशेखर हा अत्यंत थापाड्या होता. त्याने आपल्या अनेक श्लोकांत प्राचीन कवींविषयी मनोरंजक माहिती दिली आहे खरी, पण त्याच्या कित्येक श्लोकांनी विद्वानांपुढे दुर्ज्ञेय समस्याही उत्पन्न केल्या आहेत. उदाहरणार्थ त्याचे 'तीन कालिदास'[१] आणि 'दण्डीचे तीन प्रबंध'[२] याविषयी श्लोक पाहा. त्याची विधाने स्वीकारण्यापूर्वी ती स्वतंत्र पुराव्याने समर्थनीय आहेत काय, हे पाहिले पाहिजे. त्याने 'विद्धशालभंजिके'च्या चौथ्या अंकात उल्लेखिलेल्या अनेक राजकन्यांच्या विवाहाप्रमाणे कुन्तलराजकन्येचा कलचुरिनृपति वीरपालाशी विवाहही केवळ काल्पनिक

---

१. एकोऽपिजीयते हन्त कालिदासो न केनचित् । शृङ्गारे ललितोद्गारे कालिदासत्रयी किमु ॥

२. त्रयोऽग्नयस्त्रयो वेदास्त्रयो धर्मास्त्रयो गुणाः ।
त्रयो दण्डिप्रबधाश्च त्रिषु लोकेषु विश्रुताः ॥

आहे.[१] आणि तो त्या नाटिकेतील प्रेमप्रसंग जास्त गुंतागुंतीचा करण्याकरिता घातला आहे. तसा विवाह होणे अशक्य आहे, हे समजण्याचा विवेक राजशेखराच्या ठिकाणी नव्हता !

वरील विवेचनावरून 'विद्धशालभंजिके'तील 'वीरपाल' या पात्राने पूर्वचालुक्यनृपति चालुक्य द्वितीय भीम हा विवक्षित नसून तत्कालीन कुन्तलाधिपति बद्दिग अमोघवर्ष हाच अभिप्रेत होता हे स्पष्ट होईल.

---

१. राजशेखराने 'कर्पुरमञ्जरी'तही विदर्भातील वच्छोम (वत्सगुल्म) येथील कुन्तल राज्यकन्येचा कनोजच्या महीपाल राजाशी झालेला विवाह वर्णिला आहे.

'वत्सगुल्म' ही कधीही राष्ट्रकूटांची राजधानी नव्हती. ती राजशेखराची जन्मभूमि असल्याने त्याने वत्सगुल्माविषयी हे काल्पनिक विधान केले असावे.

१५. उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या इतिहासावर नवीन प्रकाश

प्राचीनकाळी महाराष्ट्रात शिलाहार वंशाच्या तीन शाखा राज्य करीत होत्या. एक शाखा दक्षिण कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यावर सुमारे सन ७६५ पासून सुमारे सन १०२० पर्यंत प्रथम गोव्यातील चंद्रपुर (सध्याचे चांदोर) व नंतर रत्नागिरी जिल्ह्यातील बलिपत्तन (सध्याचे खारेपाटण) येथून राज्य करीत होती. दुसरीचा अंमल कोल्हापूर, बेळगाव व सातारा या प्रदेशांवर सु. सन ९४० पासून सन १२१५ पर्यंत होता. तिची राजधानी कोल्हापूर होती असे दिसते. तिसऱ्या शाखेचे राज्य सु. इ. स. ८०० पासून सु. १२६५ पर्यंत उत्तर कोकणच्या ठाणे व कुलाबा जिल्ह्यांवर होते. तिची राजधानी स्थानक (सध्याचे ठाणे) येथे होती.

या घराण्याचा प्राचीन इतिहास पं. भगवानलाल इंद्रजी,[१] डॉ. फ्लीट[२] व डॉ. रा. गो. भांडारकर[३] यांनी दिला होता. नंतर डॉ. अ. स. अळतेकर[४] यांनी त्याची सविस्तर चर्चा केली. आम्हीही तो अलिकडे आपल्या संशोधन–मुक्तावलि, सर ५, (पृ. १७९–२२६) मध्ये दिला आहे. डॉ. मो. गं. दीक्षित यांनीही काही कोरीव लेख संपादिताना व इतरत्र त्याची चर्चा केली आहे. तथापि अद्यापि त्यांत अनेक त्रुटी व शंकास्थळे आहेत. प्रस्तुत लेखात उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या सु. सन

---

१. जर्नल ऑफ दि बाँबे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी (ज. बॉं. ब्रॅं. रॉ. ए. सो.), व्हॉ. ९, पृ. ३२९.

२. बाँबे गॅझेटीयर (जुनी आवृत्ति), व्हॉ. १, भाग २, पृ. ५३८.

३. पूर्वोक्त, व्हॉ. १, भाग २, पृ. १ इ.

४. इंडियन कल्चर, व्हॉ. २, पृ. ३९३ इ.

१०२५ ते ११२५ या शंभर वर्षांच्या इतिहासातील काही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

ह्या कालातील राजकीय घटना अत्यंत गुंतागुंतीच्या आहेत. तद्विषयक पुरावा तोकडा असल्यामुळे संशोधकांनी त्याविषयी भिन्न भिन्न मते प्रदर्शित केली आहेत. त्यांची चिकित्सा करण्यापूर्वी या कालातील शिलाहार नृपति आणि त्यांचे समकालीन शेजारी राजे यांच्या वंशावळी अनुमानाने ठरविलेल्या कालांसह दिल्या पाहिजेत, म्हणजे पुढील विवेचन समजण्यास मदत होईल.

वरील कालखंडात उत्तर कोकणच्या शिलाहारांचे राजनैतिक संबंध कल्याणीचे उत्तरकालीन चालुक्य आणि गोव्याचे कदंब यांच्याशी आले होते. त्यांच्या या कालातील वंशावळी खाली दिल्या आहेत.[1]

शिलाहार	उत्तरकालीन चालुक्य	कदम्ब
अरिकेसरी (१०१५–१०२५)	द्वितीय जयसिंह (१०१५–१०४३)	द्वितीय षष्ठ (१००५–१०५०)
छित्तराज (१०२५–१०३९) ; नागार्जुन (१०३९–१०४५) ; मुम्मुणि (१०४५–१०७०)	प्रथम सोमेश्वर (१०४०–१०६८)	प्रथम जयकेशी (१०५०–१०८०)
अनंतपाल (१०७०–१११०)	द्वितीय सोमेश्वर (१०६८–१०७६)	तृतीय गूहल्ल (१०८०–११००)
प्रथम अपरादित्य (१११०–१११४)	षष्ठ विक्रमादित्य (१०७६–११२६)	प्रथम विजयादित्य (११००–११०४)
		द्वितीय जयकेशी (११०४–११४०)

१. कंसांतील कारकीर्दीची वर्षे अनुमानाने दिली आहेत.

शिलाहारांच्या ताम्रपटात म्हटले आहे की मुम्मुणीनंतर शिलाहारांच्या राज्यात 'दायादव्यसन' किंवा भाऊबंदकी उत्पन्न झाली. त्यावेळी यवन सैनिकांनी देवब्राह्मणांचा छळ करून कोकण भूमीचा उच्छेद केला. तेव्हा त्या उग्र आणि पापी यवनांचा नाश करून अनन्तपालाने आपली कीर्ति चंद्रबिंबावर कोरविली.[१] त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस छितुक्क नामक असुराने कोकणावर स्वारी केली. त्यावेळी मांडलिक त्याला जाऊन मिळाले. धर्माचा नाश झाला, वृद्धांचा छळ झाला. प्रजाजन जीर्ण–शीर्ण झाले आणि राष्ट्राची भरभराट नष्ट झाली. तथापि न डगमगता अपरादित्य घोड्यावर स्वार होऊन एकटा रणांगणात घुसला आणि आपल्या बाहुबलाच्या आणि खड्गाच्या योगे त्याने शत्रूचा पाडाव केला. तेव्हा शत्रूला लढावे की पळावे असा पेच पडला. शेवटी त्याने म्लेंच्छांचा आश्रय घेतला.[२]

शिलाहारांवर ही जी दोन गंडांतरे आली ती कोणत्या शत्रूमुळे याचा त्यांच्या ताम्रपटांत स्पष्ट निर्देश नाही. तत्कालीन इतिहासाचा विचार करून ते आपणांस ठरवावयाचे आहे.

पहिल्या गंडांतराविषयी संशोधकांनी भिन्न भिन्न मते व्यक्त केली आहेत. डॉ. डी. सी. गंगुली यांनी म्हटले आहे की उत्तरकालीन चालुक्य नृपति प्रथम सोमेश्वर याने यावेळी शिलाहार मुम्मुणीचा शिरच्छेद केला होता.[३] डॉ. मो. गं. दीक्षित म्हणतात की कदम्ब नृपति–पहिल्या जय-

---

१. इंडियन अँटिक्वरी, (इं. अँ.), व्हॉ. ९, पृ. ३४–३५ वर का. त्रि. तेलंगांनी दिलेला या श्लोकाचा पाठ फार अशुद्ध आहे. मो. गं. दीक्षित यांनी त्यांत काही दुरुस्त्या सुचविल्या आहेत. इतिहास आणि संस्कृती (इ. सं.) वर्ष २, पु. ६, पृ. १३ पहा.

२. जर्नल ऑफ दि बाँबे ब्रँच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी (ज. बाँ. ब्रँ. रॉ. ए. सो.) व्हॉ. २१, पृ. ५०५ इ.

३. हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल (हि. क. इं. पी.), व्हॉ. ५, पृ. १७१.

केशीने मुम्मुणीला ठार मारले असावे.[१] ही दोन्ही मते संभवनीय वाटत नाहीत. सोमेश्वराने एका शिलाहार नृपतीचा पराजय केला होता खरा. तत्कालीन कोरीव लेखांत त्याने आपले अनेक सेनापति—काकतीस प्रोल, वनवासीचा कदम्ब चामुंडरस, यादव अज्जरस, हैहय रेवरस, मधुसूदन उर्फ मधुव आणि पुलकेशी—यांच्या सह कोकणावर स्वारी करून तेथील राजांचा उच्छेद केला होता असे म्हटले आहे.[२] ह्या घटनेचा उल्लेख अनेक कोरीव लेखांत येतो. पण त्यांतील कालानुक्रमाने पहिला उल्लेख नांदेड जिल्ह्यातील तडखेल येथील शक संवत् ९६९ (सन १०४७)चा आहे.[३] तेव्हा ही स्वारी त्या पूर्वी झाली असावी. त्यावेळी मुम्मुणि मारला गेला असणे शक्य नाही. कारण तो त्यानंतर निदान १४ वर्षे राज्य करीत होता.[४] तेव्हा या लढाईत कामास आलेला शिलाहार नृपति दुसराच कोणी असला पाहिजे.

तो राजा नागार्जुन असावा असा आमचा तर्क आहे. वरील वंशावळीवरून अरिकेसरीला छित्तराज, नागार्जुन आणि मुम्मुणि असे तीन पुत्र होते व ते तीनही एकामागून एक गादीवर बसले. 'नागार्जुन छित्तराजापूर्वी निधन पावला. तो गादीवर आला नव्हता' असे डॉ. अळतेकरांनी म्हटले आहे[५] पण ते खरे नाही. खारेपाटण आणि वडवली ताम्रपटांत तो छित्तराजानंतर 'क्ष्मापति' (राजा) झाला असे स्पष्ट म्हटले आहे. तत्कालीन सोड्ढलकवीच्या 'उदयसुंदरीकथे'तही छित्तराज, नागार्जुन व

---

१. इ. सं., वर्ष २, पुस्तक ६, पृ. १५. डॉ. दीक्षितांनी याला अनवधानाने दुसरा जयकेशी म्हटले आहे.

२. हि. क. इं. पी., व्हॉ ५, पृ. १७१.

३. इन्स्क्रिप्शन्स ऑफ दि नांदेड डिस्ट्रिक्ट, प्रस्तावना, पृ. २२.

४. मुम्मुणीचा शेवटचा ज्ञात कोरीव लेख शक संवत् ९८२ (सन १०६१) चा आहे. ज. बाँ. ब्रँ. रॉ. ए. सो. व्हॉ. १२, (जुनी माला), पृ. ३२९ इ.

५. इं. क., व्हॉ. २, पृ. ४१०.

मुम्मुणि या तिघांनीही राज्य केले असे म्हटले आहे.[१] शिवाय, अलीकडे नागार्जुनाचा शक ९६१ सन १०३९ चा ताम्रपट मिळाला आहे.[२]

नागार्जुनाची राजवट फार अल्पकाळ टिकली. छित्तराज व मुम्मुणि यांचे अनेक कोरीव लेख सापडले आहेत. नागार्जुनाचा एकच लेख आतापर्यंत मिळाला आहे. छित्तराजाचा कालक्रमाने शेवटचा ताम्रपट शक संवत ९५६ (सन १०३४) चा आहे.[३] यानंतरही तो काही काळ गादीवर असावा. मुम्मुणीचा पहिला ताम्रपट शक संवत् ९७० (सन १०४८) चा आहे.[४] हे अर्थातच त्याच्या कारकीर्दीचे पहिले वर्ष नव्हते. तेव्हा नागार्जुनाने सुमारे सहा वर्षे–सन १०३९ ते १०४५ या कालात–राज्य केले असावे सन १०४५ च्या सुमारास चालुक्य नृपति प्रथम सोमेश्वर याच्या स्वारीत त्याचा उच्छेद झाला असल्यास. सोमेश्वराच्या सन १०४७ च्या कोरीव लेखात त्या उच्छेदाचा निर्देश यावा हे साहजिक आहे.

नागार्जुन युद्धात मारला गेला तेव्हा त्याचा मुलगा अनन्तपाल हा अल्पवयस्क होता असे दिसते. त्यामुळे तो गादीवर न येता त्याचा चुलता मुम्मुणि हा राज्य करू लागला असावा. चालुक्य सोमेश्वर याच्या कृपेने त्याला गादी मिळालेली दिसते.[५]

मुम्मुणीने दीर्घकाल–सुमारे २५ वर्षे (सन १०४५ ते १०७०)–राज्य केले. त्याच्या कारकीर्दीत गोव्याचा कदम्ब नृपति द्वितीय षष्ठदेव (सुमारे सन १००५ ते १०५०) हा कोकणच्या किनाऱ्याने विहार करीत असता मुम्मुणीने त्याचे कसे स्वागत केले ते नरेन्द्र (जि. धारवाड) येथील लेखात पुढीलप्रमाणे वर्णिले आहे.[६] "छठ्ठयदेव सागरावर क्रीडा करीत

---

१. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६९ मधील आमचा 'सोड्ढदलाची उदयसुन्दरी कथा' हा लेख पाहा.

२. ए. इं, व्हॉ. ३७, पृ. २४७ इ.

३. एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. ३२, पृ. ६३ इ.

४. संशोधनमुक्तावलि, सर ४, पृ. ११५ इ.

५. हि. क. इं. पी., व्हॉ. ५, पृ. १७१.

६. ए. इं., व्हॉ. १३, पृ. ३२०.

असता त्याच्या प्रतापाची वार्ता ठाणेयच्या मुम्मुणीला समजली. तेव्हा तो त्याच्याकडे येऊन त्याला आपल्या प्रासादात घेऊन गेला आणि त्याने त्याचे अत्यंत प्रेमाने स्वागत केले. त्याने त्याला मोठ्या समारंभाने आपली कन्या अर्पण केली, आणि त्या आपल्या जावयाला त्याने पाच लाख सुवर्ण नाणी भेट म्हणून दिली."

मुम्मुणीने सुमारे सन १०७० पर्यंत राज्य केले.[१] त्याच्या कालानंतर शिलाहारांच्या राज्यात अंदाधुंदी माजली असे त्याचा पुतण्या आणि उत्तराधिकारी अनंतपाल याच्या ताम्रपटात वर्णन आहे. यावरून डॉ. मो. गं. दीक्षित यांनी षष्ठदेवाचा मुलगा प्रथम जयकेशी याने मुम्मुणीचा खून केला असावा असे अनुमान केले आहे.[२] ते म्हणतात, "शिलाहार व कदम्ब घराण्यांचे पूर्वापार वैर लक्षात घेता मुम्मुणीने षष्ठाचे केलेले स्वागत व आपल्या मुलीचा त्याच्याशी केलेला विवाह ह्या गोष्टी केवळ त्याने जुलमाचा रामराम म्हणून व कदाचित् राजनैतिक संबंध वाढावेत म्हणूनही मान्य केल्या असाव्यात, असे स्पष्ट दिसते, कारण एरवी ज्याची राजवट सुरू होऊन ५५ पेक्षाही अधिक वर्षे उलटून गेली अशा वयोवृद्ध राजपुरुषाशी आपल्या मुलीचा विवाह करण्याचे धाडस मुम्मुणीने सुखासुखी पत्करले असते, असे वाटत नाही. किंबहुना, ह्या घराण्यातील वैमनस्य वाढतच होते हे पुढे शक ९८२ नंतर केव्हा तरी खुद्द मुम्मुणीचाच खून षष्ठाचा मुलगा कदम्ब जयकेशी (द्वितीय) याच्या हातून घडला यावरूनही स्पष्ट होते."

डॉ. दीक्षित यांच्या वरील विधानात काही चुका आहेत. द्वितीय नव्हे, पण प्रथम जयकेशीने एका शिलाहार राजाला ठार केले असे

---

१ मुम्मुणीचा शेवटचा ज्ञात कोरीव लेख शक संवत् ९८२ (सन १०६०) चा आहे. त्यानंतरचा त्याचा पुतण्या अनंतपाल याचा लेख शक संवत् १००३ (१०८१)चा आहे. म्हणून मुम्मुणीने सन १०७० पर्यंत राज्य केले असावे.

२. इ. सं., वर्ष २, पु. ६, पृ. १५.

म्हटले आहे खरे, पण तो राजा मुम्मुणीचा वडील भाऊ नागार्जुन असावा हे मागे दाखविले आहे. पहिल्या जयकेशीने मुम्मुणीला ठार केले असते तर तसा उल्लेख अनन्तपालाच्या ताम्रपटात आला असता. पण अनन्तपाल केवळ दायादव्यसनाचा व यवनांनी (अरबांनी) मांडलेल्या धुमाकुळाचा उल्लेख करतो. यावरून वरील अनुमान सयुक्तिक दिसेल.

सोमेश्वराने शिलाहारांवरच्या स्वारीत आपल्या अनेक सामन्तांना व सेनापतींना बोलाविले होते काकतीय प्रोल, वनवासीचा कदंब अधिपति चामुंडरस, यादव अज्जरस, हैहय रेवरस, मधुसूदन आणि पुलकेशी यांनी शिलाहार राजाचा पराजय किंवा उच्छेद केला असे उल्लेख कोरीव लेखांत येतात हे मागे सांगितले आहे. असाच एक उल्लेख गोव्याच्या कदंबांच्या लेखात येतो. तोही याच घटनेस अनुलक्षून असावा. कदम्ब नृपति **प्रथम** जयकेशी याचे 'कापर्द्दिकद्वीपनृपालकाल:' (कपर्दीद्वीपाच्या किंवा कवडीद्वीपाच्या राजाचा काळ) असे वर्णन देगावे येथील शिलालेखांत आले आहे.[१] उत्तर कोकणच्या शिलाहारांचा मूळ पुरुष पहिला कपर्दी याच्या नावावरून त्यांच्या प्रदेशाला कपर्दीद्वीप किंवा कवडीद्वीप असे नाव पडले होते. वरील उल्लेखावरून प्रथम जयकेशीने उत्तर कोकणच्या एका शिलाहार राजास ठार केले होते यात संशय नाही. जयकेशी मुम्मुणीचा समकालीन असल्याने त्याने मुम्मुणीलाच ठार मारले असे फ्लीट,[२] दीक्षित[३] वगैरेंनी म्हटले आहे. पण हाही उल्लेख नागार्जुनाच्याच उच्छेदाचा असावा, असे वाटते. या जयकेशीचा पिता दुसरा षष्ठ हा उत्तरकालीन चालुक्य सम्राट् प्रथम सोमेश्वराचा[४] मांडलिक

---

१. ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो. (जुनी माला), व्हॉ. ९, पृ. २६६.

२. बॉ. गॅ., व्हॉ. १, भाग २, पृ. ५६७.

३. इ. सं., वर्ष २, पु. ६, पृ. १५. डॉ. दीक्षितांनी त्याला अनवधानाने 'द्वितीय जयकेशी' म्हटले आहे. वास्तविक तो प्रथम जयकेशी असावा.

४. मोराएस–कदम्बकुल.

होता. उत्तर कोकणवर स्वारी करताना सोमेश्वराने जय्यत तयार केली होती. त्याने अनेक सामन्तांना व सेनापतींना त्या स्वारीकरिता बोलाविले होते. तेव्हा कोकणच्या नजीकच्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या षष्ठदेव या आपल्या कदंब सामन्ताला त्याने बोलावले नसेल हे संभवत नाही. षष्ठाने आपला मुलगा युवराज प्रथम जयकेशी याला पाठविलेले दिसते. या युद्धात नागार्जुनाला ठार मारण्यात जयकेशीने प्रामुख्याने भाग घेतल्यामुळे देगावच्या शिलालेखात त्याला 'कापर्दिकद्वीपनृपालकाल:' म्हटले आहे.

पुढे मुम्मुणीने षष्ठाचे आदरातिथ्य करून व त्याला आपली मुलगी देऊन वैवाहिक सख्य केले होते. पण हे सख्य एका पिढीत नष्ट झाले असे मानण्यास पुरावा नाही. उलट मुम्मुणीचा पुतण्या अनन्तपाल याच्या शक संवत् १००३ (सन १०८१) च्या ताम्रपटात 'दायादव्यसना'चा (भाऊबंदकीचा) जो उल्लेख आला आहे त्यावरून निराळेच अनुमान निघते.

नागार्जुन अल्पवयात मारला गेल्यामुळे त्याचा मुलगा अनन्तपाल याला गादी न मिळता ती मुम्मुणीला मिळाली, हे आपण मागे पाहिले आहे. मुम्मुणीच्या निधनानंतर अनन्तपालाने गादीवरील आपला हक्क पुढे मांडला असावा. मुम्मुणीने अनन्तपालाचा हक्क दूर सारून गादी आपल्या मुलाला मिळावी अशी व्यवस्था केली असेल. पूर्वकालीन चालुक्य नृपति मंगलेश याने अशाच परिस्थितीत आपला पुतण्या द्वितीय पुलकेशी याचा आणि देवगिरीच्या महादेव राजाने आपला पुतण्या रामचंद्र (रामदेवराव यादव) याचा हक्क असाच धुडकावला होता. पण अनन्तपालाने हा अन्याय सहन न केल्यामुळे राज्यात यादवी उत्पन्न झाली असावी. तिचा उल्लेख अनन्तपालाच्या ताम्रपटात 'दायादव्यसन' (भाऊबंदकी) असा आला आहे. त्याचा अर्थ आतापर्यंत संशोधकांना लागला नव्हता. कोणी म्हणत 'दायादव्यसन' म्हणजे ठाण्याच्या आणि कोल्हापूरच्या शिलाहारांमधील झगडा असावा.[१] पण ते बरोबर

१. इं. क., व्हॉ. २, पृ. ४११.

नाही. कारण ही दोन घराणी 'दायाद' (समान पैतृक संपत्तीचे अधिकारी) नव्हती. तेव्हा 'दायादव्यसन' याचा अर्थ वरीलप्रमाणेच केला पाहिजे.

या परिस्थितीत गोव्याच्या कदंबांनी मुम्मुणीच्या मुलाचा पक्ष घेतलेला दिसतो. कोकणच्या पश्चिम किनाऱ्यावर काही अरब व्यापाऱ्यांच्या वसाहती होत्या. प्रथम जयकेशीच्या पणजी ताम्रपटात चेमुल्यपुरातील मानालियम नामक अरबी व्यापाऱ्याच्या (नौवित्तकाच्या) वसाहतीचा उल्लेख आहे.[१] चेमुल्य (अलिबागेजवळचे चौल) हे प्राचीन काळी प्रसिद्ध बंदर होते. या अरब व्यापाऱ्यांनी, नंतरच्या काळात इंग्रजी व्यापाऱ्यांनी केले त्याचप्रमाणे, आपल्या व्यापाराच्या संरक्षणार्थ थोडी-बहुत फौज ठेवली होती, असे दिसते प्राचीन काळी व्यापाऱ्यांच्या श्रेणींना असे सैन्य ठेवता येत असे. संकटकाळी राजे लोक अशा सैन्याचा (श्रेणिबलाचा) उपयोग करीत. कालांतराने हे अरब व्यापारी प्रबल झाले होते. त्यांपैकी काहींनी कदंबांना त्यांच्या संकटकाळी मदत केल्यामुळे त्यांनी त्यांना मंत्री म्हणून नेमले होते व ग्रामदानेही दिली होती.[२] अशा काही अरबी अधिपतींनी कदंबांनी शिलाहारांवर केलेल्या आक्रमणात त्यांचे साहाय्य केलेले दिसते. त्या युद्धात यवनांनी उत्तर कोकण उध्वस्त करून देवब्राह्मणांचा छळ केला होता. त्याचे वर्णन अनंतपालाच्या पूर्वोक्त खारेपाटण ताम्रपटात आले आहे.

या युद्धात कदम्ब नृपति द्वितीय षष्ठाचा पुत्र प्रथम जयकेशी याने काही काळ उत्तर कोकण बळकावले होते असे दिसते. कारण काही लेखात त्याला 'कोकणचा राजा' म्हटले आहे.[३] पण शिलाहार नागार्जुनाचा पुत्र

---

१. इंडिका (प्र. सेंट झेवीयर्स कॉलेज, मुंबई) पृ ९७.

२. पूर्वोक्त.

३. हि. क. इं. पी., व्हॉ. ५, पृ. १७२.

अनन्तपाल याने मोठ्या शर्थीने जयकेशीच्या यवन साथीदारांचा पुरा मोड करून कोकण भूमीला कदंबांच्या दास्यातून मुक्त केले. त्याचे सुंदर वर्णन खालील श्लोकात आले आहे.[1]—

जाते दायादवैरिव्यसननिनि समये यैरवाप्तप्रभावै-
र्ध्वस्तादेवद्विजातिप्रमथनविधिना कोंकणक्षोणिरेषा ।
तानुग्रान्पापराशीन्मुनयवनभटान्खड्गधाराम्बुराशौ:
क्षिप्तोच्चैश्चिन्द्रबिम्बे स्वकुलपतिसखो यः स्वकीर्तिं लिलेख ।।

[भाऊबंदकीचे संकट प्राप्त झाले असता ज्यांनी प्रबळ होऊन देवब्राह्मणांचा छळ केला आणि ही कोकणभूमि उद्ध्वस्त केली त्या उग्र आणि पापी यवनसैनिकांना आपल्या खड्गधारेच्या जलौघाने दूर फेकून त्या स्वकुलाच्या रक्षणकर्त्या अनन्तपालाने आपली कीर्ति चन्द्रबिम्बावर कोरून ठेवली.]

अनंतपालाने दीर्घ काल (सुमारे सन १०७० ते १११० पर्यंत ४० वर्षे) राज्य केले. त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस गोव्याच्या कदंबांनी पुनः उत्तर कोकणावर आक्रमण केले, त्याचे वर्णन अनंतपालाचा पुत्र आणि उत्तराधिकारी प्रथम अपरादित्य याच्या शक संवत् १०४९ (सन ११२७) च्या वडवली ताम्रपटात पुढील प्रमाणे आले आहे.[2]

आसीत्कोऽप्यसुरो जगद्दलयितुं छितुक्कनामान्तक-
स्तस्यैवं च समस्तमेव मिलितं सामन्तचक्रं ततः ।

---

१. या श्लोकातील पाठ अनुमानाने शुद्ध करून दिले आहेत. 'मुनयवनभटान्' यातील 'मुन' कदाचित् एखाद्या अरबी अधिपतीचे नाव असेल शेवटच्या पादात अनन्तवर्म्याने चन्द्रपुरावर आक्रमण केल्याचे सुचविले आहे, असे दीक्षित म्हणतात पण ते बरोबर वाटत नाही. चन्द्रबिंबावरील डाग हा अनन्तवर्म्याच्या कीर्तीचा लेख होय, असे सुचविलेले दिसते.

२. ज. बॉं. बॅं. रॉ. ए. सो., व्हॉं. २१ (जुनी माला), पृ. ५०५ इ.

ध्वस्ते धर्मधने गतेषु गुरूषु क्लिष्टे विभासंश्रये
शीर्णे जीर्णपुरप्रजापतिजने नष्टे च राष्ट्रोदये ।।
एकश्चैकतुरंगमश्च भुजयोर्द्वंद्वं च खड्गश्च तं
द्राग्दृष्ट्वा कठिने रणे सरभसं तत्संमुखं धावितः ।
नायोध्दुं न पलायितुं किमपि वा ज्ञातं च तेन स्फुटं
संग्रामं परित्हृत्य यस्य च भिया म्लेच्छाश्रये संस्थितः ।।

[पृथ्वीचा उच्छेद करणारा छित्तुक्क नामक यमासारखा राक्षस होऊन गेला. त्याला सर्व मांडलिक जाऊन मिळाले. त्याने धर्माचा नाश केला, वृद्धांचा छळ केला, सर्वत्र अंधकार माजला, प्रजाजन जीर्णशीर्ण झाले, राष्ट्राचा अभ्युदय नष्ट झाला. तेव्हा अपरादित्य घोड्यावर स्वार होऊन एकटा त्या भीषण रणांगणात घुसला आणि त्याने आपल्या बाहुबलाच्या आणि खड्गाच्या योगे शत्रूची दाणादाण केली. तेव्हा शत्रूला युद्ध करावे किंवा पळ काढावा हे सुचेना. शेवटी त्याने रणांगण भीतीने सोडून म्लेच्छांचा आश्रय केला.]

वडवली ताम्रपटाचे संपादक डॉ. का. बा. पाठक यांनी छित्तुक्क म्हणजे दुसरा जयकेशी असे म्हटले होते, पण ते कसे हे सांगितले नव्हते. पण शिलाहारांच्या इतिहासावर लिहिताना डॉ. अळतेकरांनी याविषयी एक कल्पना मांडली आहे.[१] ती सयुक्तिक वाटते. कदम्ब नृपति द्वितीय जयकेशी (सन ११०४ ते ते ११४७) याला शिवचित्त आणि विष्णुचित्त असे दोन पुत्र होते आणि ते त्याच्यानंतर गादीवर आले, असे कोरीव लेखांवरून समजते. तेव्हा त्यांचा पिता द्वितीय जयकेशी याला छित्तुक्क असे दुसरे नाव असावे. त्याने उत्तर कोकणावर स्वारी करून तो प्रदेश काही काळ बळकावला होता. नरेन्द्र येथील शिलालेखात त्याला कवडीद्वीपाधिपति म्हटले आहे.[२] उत्तर कोकणामध्ये शिलाहारांचे राज्य

१. इं. क., व्हॉ. २, पृ. ४१२ इ.
२. ए. इं., व्हॉ. २, पृ. ४१२ इ.

स्थापणारा प्रथम कपर्दी याच्या नावावरून त्या कोकणाला कपर्दिद्वीप किंवा कवडीद्वीप म्हणत असत हे मागे सांगितले आहे. तेव्हा कदम्ब नृपति द्वितीय जयकेशी याने उत्तर कोकणात आपला अंमल काही काळ प्रस्थापित केला होता. यात संशय नाही. शिलाहारांना या आक्रमणाची साहजीकच चीड आली होती. म्हणून अपरादित्याच्या वडवली ताम्रपटात छित्तुक्काला (द्वितीय जयकेशीला) असुर (राक्षस) म्हटलेले दिसते.

कदंबांचा उत्तर कोकणतील अंमल फार काळ टिकला नव्हता. नरेन्द्र येथील सन ११२५ व ११२६ च्या शिलालेखांत जयकेशीचे 'कवडीद्वीपाधिपति' म्हणून वर्णन आहे. त्यानंतर लौकरच अपरादित्याने त्याचा पराभव केला असावा कारण त्या पराभवाचा निर्देश सन ११२७ च्या पूर्वोक्त वडवली ताम्रपटात आला आहे. कदंबांना उत्तर कोकणांतून हाकून लावण्यात अपरादित्याला कोल्हापूरच्या शिलाहार शाखेचे साहाय्य झाले होते. कोल्हापूरच्या दुसऱ्या भोजाच्या शक संवत् १११३ (सन ११९१)च्या कशेळी ताम्रपटात त्याचा पूर्वज विजयादित्य याने स्थानक (ठाणे) मंडळाच्या पदच्युत अधिपतीला पुन: गादीवर बसविले असे म्हटले आहे[1] ते अपरादित्याला त्याने केलेल्या साहाय्याला अनुलक्षून असावे.

हा अपरादित्य संस्कृत वाङ्मयात 'याज्ञवल्क्यस्मृती वरील' अपरार्क टीकेचा कर्ता म्हणून सुप्रसिद्ध आहे.

प्रस्तुत लेखात उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या इतिहासांतील काही समस्या पुढील प्रमाणे सोडविण्याचा प्रयत्न केला आहे—

१. उत्तरकालीन चालुक्यनृपति प्रथम सोमेश्वर याने ज्या शिलाहार राजाला ठार मारले तो मुम्मुणि नसून त्याचा वडील भाऊ नागार्जुन होता.

२. कदम्ब नृपति प्रथम जयकेशी यानेहि मुम्मुणीचा वध केला नसून नागार्जुनाचा केला होता. त्याने मुम्मुणीच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलाचा पक्ष घेऊन उत्तर कोकणावर आक्रमण केले होते.

---

१. इन्स्क्रिप्शन्स ऑफ दि लिटररी सोसायटी ऑफ बाँबे, व्हॉ. २, पृ. ४१९ इ.

३. अनंतपालाच्या लेखात ज्या भाऊबंदकीचा उल्लेख आहे ती मुम्मुणीचा पुत्र आणि अनंतपाल यांच्या मधील असावी.

४. छित्तुक्क हा कदम्ब नृपति द्वितीय जयकेशी असून त्याने शिलाहार नृपति अनंतपाल याच्या निधनानंतर उत्तर कोकणात काही काळ आपला अंमल बसविला होता. नंतर अनंतवम्र्याचा पुत्र अपरादित्य याने कोल्हापूर शिलाहार शाखेच्या विजयादित्याच्या साहाय्याने आपले राज्य परत मिळविले.

---

१६. रामदेवराव यादवाचा अपूर्ण ताम्रपट

सुमारे अठरा वर्षांपूर्वी भारत इतिहास संशोधक मंडळाचे श्री. शं. ना. जोशी यांनी प्रथम या ताम्रपटाकडे माझे लक्ष वेधले. त्यावेळी तो ताम्रपट औरंगाबाद येथील आर्टस् आणि सायन्स कॉलेजचे प्राचार्य श्री. जी. एन्. थत्ते यांच्या संग्रही होता. श्री. जोशी यांनी त्या ताम्रपटाचे आपले वाचन मजकडे पाठवून त्याविषयी काही माहिती विचारली होती. नंतर श्री. थत्ते यांना तो ताम्रपट मजकडे पाठविण्याविषयी मी विनंती केली. त्यांनी ती तत्परतेने मान्य केली. त्यावरील माझा लेख गौहत्ती येथे इंडियन हिस्टरी काँग्रेसच्या सन १९५९ मध्ये भरलेल्या अधिवेशनात मी वाचला होता. तो त्या अधिवेशनाच्या वृत्तांतात (पृ. १९६ ते २००) छापला आहे. मराठी वाचकांसाठी त्याचे विवेचन येथे करीत आहे.

प्रस्तुत दानपत्र याच राजाच्या पुरुषोत्तमपुरी दानपत्राप्रमाणे तीन किंवा चार ताम्रपत्रांवर कोरले असावे, पण त्यांपैकी पहिला पत्रा मात्र सध्या मिळाला आहे. हा पत्रा फार वजनदार आहे. त्याचा आकार ११·५ इं. रुंद, १ फूट ५$\frac{1}{4}$ इंच लांब आणि $\frac{1}{2}$ इं. जाड असा असून वजन सहा शेर आहे. त्याच्या कडा वाकवल्या नाहीत. तथापि त्यावरील अक्षरे शेवटल्या दोन तीन ओळींशिवाय इतरत्र सुस्थितीत आहेत. अस्पष्ट झालेल्या अक्षरांपैकी शेवटल्या ओळीतील दहा खेरीज बाकीची अनुमानाने जुळविता येतात. पत्र्याच्या खाली मध्यभागी आठ इंचांचे छिद्र मुद्रेच्या कडी करिता केले आहे, पण कडी किंवा मुद्रा सापडली नाही. प्रस्तुत पत्र्यावर ३३ ओळी कोरल्या आहेत. अक्षराचे वळण चागले आहे.

प्रस्तुत लेखाची लिपी पुरुषोत्तमपुरी ताम्रपटातल्या प्रमाणे[१] नागरी आहे. तिचे खालील विशेष उल्लेखनीय आहेत. व्यंजनयुक्त ए, ऐ, ओ आणि औ काही ठिकाणी पृष्ठमात्रांनी दाखविले आहेत; 'ण' या

१. एपि. इंडिका, व्हॉ. २५, पृ. १९९ इ.

संयुक्त व्यंजनातील नंतरचा ण् आडव्या रेघेने दर्शविला आहे. 'ध्' अक्षराला डावीकडे शिंग फुटले आहे, तरीही 'धा'च्या दोन उभ्या रेषांना आडव्या रेषेने छेदले आहे. व् आणि ब् यांतील भेद स्पष्ट आहे.

भाषा संस्कृत आहे. आरंभीच्या 'ओम् नमः शिवाय' याखेरीज प्रस्तुत पत्र्यावरील सर्व लेख पद्यमय आहे. त्यात बारा पूर्ण श्लोक आणि तेराव्याचा काही भाग आला आहे. त्यांपैकी सात श्लोक पुरुषोत्तमपुरी ताम्रपटात आढळतात.

प्रस्तुत ताम्रपट **यादव नृपति रामचंद्र** याचा आहे. त्यात त्याचा वंश चंद्रापासून उत्पन्न झाल्याचे वर्णिले आहे. त्यातील पहिला ऐतिहासिक पुरुष सिंह (किंवा सिंहण) याचे वर्णन श्लोक ४ मध्ये आले आहे. त्यात त्याने बल्लाळ आणि आंध्रनृपति यांचा पराभव केला, कक्कल्लाचा उच्छेद केला, भंभागिरीच्या अधिपतीला क्षणात ग्रासून टाकले, भोजराजाला किल्ल्यावर बंदीत टाकले आणि अर्जुनाचा पाडाव केला, असे वर्णन आहे. हा श्लोक पुरुषोत्तमपुरी ताम्रपटातही आला आहे. त्यांपैकी बल्लाल हा होयसळ नृपति द्वितीय वीरबल्लाळ (सन ११७३-१२२०) हा होय. आंध्र नृपति हा काकतीयवंशी गणपति असावा. कक्कल्ल हा मैसूरच्या उत्तरेस असलेल्या वराट देशाचा अधिपति असावा. भंभागिरि हा खानदेशच्या पिंपळनेर तालुक्यातील भामेरचा किल्ला असावा. तेथे आभीरवंशी लक्ष्मीधर नृपति राज्य करीत होता. भोज हा कोल्हापूर येथील शिलाहारवंशी तन्नामक द्वितीय नृपति होय. याला सिंहणाने पन्हाळगडावर बंदीत टाकले होते. अर्जुन हा माळव्याच्या परमारवंशातील अर्जुनवर्मा नृपति होय.

यानंतर सिंहणाचा पुत्र जैत्रपाल (जैतुगि) आणि त्याचा पुत्र कृष्ण यांचे ठरीव साच्याचे वर्णन आले आहे. त्यात ऐतिहासिक माहिती काही नाही. यानंतर कृष्ण व लक्ष्मी यांचा पुत्र रामचंद्र याचा निर्देश आहे. त्यावरून रामचंद्राच्या (रामदेवरावाच्या) मातेचे नाव लक्ष्मी होते ही नवीन माहिती मिळते. प्रस्तुत ताम्रपटात कृष्णानंतर गादीवर आलेल्या

त्याच्या महादेव नामक भावाचा उल्लेख गाळला आहे. श्लोक ८ व ९ हे पुरुषोत्तमपुरी ताम्रपटातही आले आहेत. त्यांत रामचंद्राने युक्तीने आपले राज्य कसे मिळविले त्याचे वर्णन आहे. त्याने नाचे लोकांचा वेश घेतलेल्या आपल्या सैनिकांसह देवगिरि किल्ल्यात प्रवेश केला, नंतर लोक नाच पाहण्यात व्यग्र असताना आपल्या पक्षाच्या लोकांना जमवून, आणि नाचे लोकांना आपले अलंकार फेकून देण्यास सांगून आपणास विरोधी असलेल्या लोकांचा उच्छेद करविला आणि अशा रीतीने आपले राज्य मिळविले, असे वर्णिले आहे. नवव्या श्लोकात रामचंद्र नृपतीची कातंत्र व्याकरणकार शर्ववर्म्याशी श्लिष्ट पदांच्या योगाने तुलना केली आहे. नंतरचा दहावा श्लोक या ताम्रपटातच प्रथम आढळतो. तो असा—

रामेण कार्मुकं भंक्त्वा महादेवस्य नन्दनम् ।
प्राप्ता जनकजा लक्ष्मीर्निर्जितोऽर्जुनकीर्तिदः ।।[१]

यातही श्लेषाचा उपयोग केला आहे.

(ज्याप्रमाणे प्राचीन काळी रामाने महादेवाला प्रिय असलेले धनुष्य मोडून जनक राजाची कन्या सीता प्राप्त करून घेतली आणि कार्तवीर्य सहस्रार्जुनाची कीर्ति नष्ट करणाऱ्या परशुरामाचा पराभव केला, त्याप्रमाणे या रामचंद्र यादवाने आपला चुलता महादेव याचा पुत्र (आमण) याचा उच्छेद करून आपल्या पित्याचे राज्य मिळविले आणि अर्जुननृपाला कीर्तिमान् करणाऱ्या शत्रूचा पाडाव केला.) हा अर्जुन तत्कालीन कलचुरि नृपति असावा. कलचुरि नृपति सहस्रार्जुनापासून आपल्या वंशाची उत्पत्ति मानीत असत. पण त्याचा कोणता मित्र येथे विवक्षित आहे हे सांगता येत नाही.

यानंतरच्या अकराव्या श्लोकात रामाची चंद्राशी तुलना करून त्याचे श्रेष्ठत्व दाखविले आहे—

रामः सोम इति द्विराजमथवा राजात्र रामोऽधुना
न स्थानान्न परोदयान्न समयाद्रामेऽल्पता तेजसः ।

---

१. 'कीर्तिदः' यावर श्लेष आहे–(१) कीर्तिं द्यति इति, आणि कीर्तिं ददाति इति, असे दोन अर्थ विवक्षित.

सोमे सा शिवरात्रिरात्मनि कलाशेषे तिथौ तापसे
रामे राजनि राजते प्रतिजनं सर्वाः शिवा रात्रयः ।।

(राम आणि चंद्र हे दोन राजे आहेत. अथवा, राम हाच एकटा राजा होय; कारण चंद्र जसा विशिष्ट स्थानामुळे (सूर्यासमोर आल्यामुळे), दुसऱ्याच्या (पक्षी शत्रूच्या) उदयामुळे किंवा विशिष्ट कालामुळे (उदाहरणार्थ, अमावास्येस) तेजाने कमी होतो तसा हा राम होत नाही. (त्याचा प्रताप सर्व ठिकाणी, काळी आणि शत्रूंच्या उदयकाळीही तसाच भासतो.) चंद्राची एकच कला अवशिष्ट राहिली म्हणजे व्रतस्थ लोकांची शिवरात्रि होते, पण हा राम राज्य करीत असता सर्व लोकांना सर्वच रात्रि कल्याणप्रद होतात.)

नंतरच्या बाराव्या श्लोकात ससंदेह अलंकाराचे उत्तम उदाहरण आले आहे—

रामोऽयं भृगुनन्दनो यदि कथं कर्णेन नो वंचितो
रामोऽयं रघुनन्दनो यदि कथं भ्रान्तो न मार्गे क्वचित् ।
रामोऽयं यदुनन्दनो यदि कथं सर्वैरशेषो गुणैः
रामोऽयं स्वसमः स एव कवयः किं साम्यतः भ्राम्यथ ।।

(राम हा भृगुनन्दन (परशुराम) असेल काय ? नाही. परशुरामाला कर्णाने फसविले, पण या रामाला त्याचे कर्ण (हेर) फसवू शकत नाहीत. मग हा रघुनन्दन (दाशरथि राम) असेल काय ? नाही. तो राम सीतेच्या शोधात असताना कधी कधी वाट चुकत असे. पण हा रामराजा आपल्या राजनीतीत कधीही प्रमाद करीत नाही. मग हा यदुनंदन (बलराम) असेल काय ? नाही. त्या बलरामाच्या ठिकाणी सुरापानादि दोष होते, पण या रामराजाच्या ठिकाणी सर्व गुणच आहेत.[१] हे कविहो ! हा रामराजा स्वतःसारखाच आहे. त्याला उपमान देण्याकरिता का उगीच श्रम घेता ?)

यापुढील दानपत्राचा भाग उपलब्ध झाला नाही. त्यामुळे हे दान कशाचे व केव्हा दिले याचा पत्ता लागत नाही. तथापि, या दानपत्राच्या

१. बलराम सुरापान करीत असे आणि स्वभावाने रागीट होता.

अवशिष्ट श्लोकांत श्लेष, व्यतिरेक, ससंदेह इत्यादि अलंकारांची सुंदर उदाहरणे आली आहेत. यादवांच्या आश्रयास उत्कृष्ट मराठी कवि होते हे नरेन्द्राच्या ' रुक्मिणीस्वयंवरा 'वरून आपणास माहीत झाले आहे. तसेच त्याच्या दरबारी हेमाद्रि, बोपदेव यांसारखे उत्तम संस्कृत कविही होते. आणि त्यांची काव्यरचना तत्कालीन काव्यकल्पनांप्रमाणे पहिल्या दर्जाची होती, यात संशय नाही.

वाचन

१. ।। ओं नमः शिवाय ।। निरतिशयनिरंतानंदचित्सत्स्वरूपः प्रबलवि–

२. मलसत्व(त्त्व)स्वीकृतिव्यक्तशक्तिः । परमरमणमंगं मंगलानां निधा–

३. नं दधदधरितसेव्यः सेव्यतां शार्ङ्गपाणिः ।। १ ।। लक्ष्मीनारायण–

४. क्रीडासरःक्षीरसमुद्रजं(जम्) । लीलांबुजं विजयते विधुस्त्रिभुवनश्रियाः

५. ।। २ ।। निःसीमः सोमवंशः स जयति जगति प्रोल्लसत्कीर्तिवल्लिर्मुक्तारत्ना–

६. नि तत्राप्युरुरुचिररुचो वृष्णयः स्वच्छवृत्ताः । तेष्वप्येकावलीसद्गुण–

७. घटिततनुःकंठकांतिः कवीनां तस्यामप्येष चिंतामणिरुचितरु–

८. चिर्नायकः सिंहभूपः ।। ३ ।। बल्लालो विजितः पराभवभुवं संभावितोंध्राधि–

९. पः कक्कल्लो दलितः क्षणेन गिलितो भंभागिरेरीश्वरः ।
दुर्गाग्रे विनिब-

१०. ध्य भोजनृपतिर्न्यस्तोर्जुनो निर्जितः सिंहेनेति निशम्य के
भुवि भयं भे-

११. जुर्न भूमीभुजः ॥ ४ ॥ तत्पुत्रो जैत्रपालः कुलकुमुदवि-
धुर्वीरलक्ष्मीप्र-

१२. सादप्रासादो रूपसंपत्सुसमितसुषमाकंदकंदर्पदर्पः । यः
कर्ण्णः कि

१३. दधीचिः किमु किमुत शिबिः किन्नु जीमूतवाहः सत्वो-
(त्त्वो)द्रेकैकसीमा पुन-

१४. रभवदिति व्यक्ततर्कैर्व्यतर्कि ॥५॥ आज्ञा पंचदशाश्चतुर्दश-
कलाः

१५. कीर्तीर्व्यधानीज्जगद्भेदाद्भूदेवतीर्निधाय गिरिशे यः षोड-
शीभाव-

१६. नां(नाम्) । यस्मिन्नुद्गत एव तापतपसी प्राणे(ण)-
श्यतां प्राणिनां राजा शुद्धरुचिः

१७. स कृष्ण उदभूत्तस्माद्गुणांभोनिधेः ॥ ६ ॥ जयति जगति
रामः काम ए-

१८. वावतीर्ण्णः पुनरपि यदुवंशे कृष्णलक्ष्मीतनूजः । न हि
कथमपि कै-

१९. श्चिद्विक्रमो वीक्ष्यतेस्य क्षितिनिपतित एव वीक्ष्यते वीर-
वर्गः ॥ ७ ॥ आ-

२०. दौ देवगिरिप्रवेशनमथो वृ(नृ)त्तप्रकारेक्षणं पश्चात्स्वैर-
पदातिमेल-

२१. नमथालंकारविक्षेपणं (णम्) । अन्विष्टार्थविरोधिदूरकरणं तस्माद्रसासा-
२२. दनं श्रीरामेण कृतं ततस्तत इतः श्लोकोस्य लोकोत्तरः ॥ ८ ॥ श्रीरामः
२३. शर्ववर्मा पदघटनलघूपायदृग्दुर्गवृत्तिव्याख्याताशेषसूत्रो वि-
२४. करणविलसद्धातुनिष्पादितार्थः । वर्ण्णानां व्युत्क्रमेण व्यवहरणमपा-
२५. कृत्य संदर्शिताध्वा जेता दिव्याकृतीनां शिशुरपि तदिह स्पृश्यते नापश-
२६. ब्दैः ॥ ॥ रामेण कार्मुकं भंक्त्वा महादेवस्य नंदनं (नम्) । प्राप्ता जनकजा ल-
२७. क्ष्मीर्निर्जितोर्जुनकीर्तिदः ॥१०॥ रामः सोम इति द्विराज-मथवा राजात्र-
२८. रामोधुना न स्थानान्न परोदयान्न समयाद्रामेल्पता तेजसः । सोमे सा
२९. शिवरात्रिरात्मनि कलाशेषे तिथौ तापसे रामे राजनि राजति प्रति-
३०. जनं सर्वाः शिवा रात्रयः ॥११॥ रामोयं भृगुनंदनो यदि कथं कर्ण्णेन नो वं-
३१. चितो रामोयं रघुनंदनो यदि कथं भ्रांतो न मार्गे क्वचित् । रामो-
३२. यं यदुनंदनो यदि कथं सर्वैरशेषो गुणै रामोयं स्वसमः स एव
३३. कवयः किं साम्यतः भ्राम्यथ ॥१२॥ संतः सं ००००००

---

१७. धाराशिवची लेणी बौद्ध की जैन ?

सोलापूरच्या उत्तरेस ३७ मैलांवर धाराशिव हे प्राचीन गाव आहे. काही वर्षांपूर्वी हैदराबादच्या ओस्मान अली नवाबाने त्याचे ओस्मानाबाद असे नामान्तर केले होते. ते आता मराठवाड्याच्या ओस्मानाबाद जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे.

धाराशिवच्या ईशान्येस सुमारे दोन मैलांवरच्या पश्चिमाभिमुख टेकडीत कोरलेली काही लेणी पुरातत्त्वज्ञांस परिचित आहेत. बर्जेसने त्यांचे वर्णन आपल्या *Archaeological Survey of Western India*, Vol. III, आणि *Cave Temples of India* नामक ग्रंथांत केले आहे.[१] त्याच्या मते ती लेणी जैनधर्माची आहेत. अलीकडे डॉ. म. के. ढवळीकर यांनी ती बौद्धधर्माची आहेत असे विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिक, सन १९६५ आणि सन १९६८ मधील लेखांत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.[२]

अलीकडे कोकण व कोल्हापूर या प्रदेशांवर ख्रिस्तोत्तर नवव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत राज्य करणाऱ्या शिलाहार नृपतींच्या इतिहासाचा अभ्यास करताना या प्रश्नाकडे माझे लक्ष गेले. कारण हे शिलाहार राजे आपल्या कोरीव लेखांत आपल्या ‘तगरपुर-परमेश्वर’

---

१. *Archaeolagical Survey of Westarn India*, Vol. lll, pp. 4-11; *Cave Temples of India*, pp. 503-505.

२. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६५, पृष्ठे १३८-१४४. पूर्वोक्त १९६८, पृष्ठे ११९-१२६. डॉ. ढवळीकरांचे एतद्विषयक इंग्रजी लेख जर्नल ऑफ दि एशियाटिक सोसायटी ऑफ बॉंबे (न्यू सीरीज), व्हॉ. १९-२०, पृ. १८३ इ. आणि जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी, व्हॉ. ४६, पृ. ४०३ इ. मध्ये प्रसिद्ध झाले आहेत.

(तगर नगराचे अधिपति) या बिरुदाचा मोठ्या अभिमानाने उल्लेख करतात. त्याचा अर्थ ते त्या वेळी तगरपुरावर राज्य करीत होते असा करावयाचा नसून ते मूळचे तगरपुरचे होते असा अर्थ केला पाहिजे, हे आता सर्वमान्य झाले आहे. अशा तऱ्हेच्या दक्षिणच्या गुप्त राजांनी धारण केलेल्या 'उज्जयिनीपुरवराधीश्वर' या बिरुदाचा, तसेच कलचुरींच्या 'माहिष्मतीपुरवराधीश्वर' या बिरुदाचाही असाच अर्थ करण्यात येतो. ख्रिस्ती शकाच्या आरंभीच्या शतकांत तगर हे अत्यंत वैभवशाली नगर होते. दक्षिणेतील नागार्जुनकोंड, विनुकोंड, वेंगी या नगरांहून व्यापारी माल तगर येथे आणून नंतर तो पैठण, नाशिक मार्गांने उत्तरेस उज्जयिनी किंवा वायव्येस भडोच या बाजारपेठांस पाठविला जात असे. ग्रीक प्रवासी टॉलेमी याच्या ग्रंथात[१] तसेच पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी[२] या प्राचीन ग्रीक भूगोलविषयक ग्रंथात तगरनगराचा तत्कालीन प्रमुख व्यापारी पेठ म्हणून उल्लेख आला आहे. उज्जयिनी, त्रिपुरी, कौशाम्बी यांसारख्या प्राचीन काळच्या प्रसिद्ध नगरांप्रमाणे तगरनेही आपल्या नावाची नाणी पाडली होती. तसले एक ख्रिस्तोत्तर पहिल्यादुसऱ्या शतकांतले अत्यंत लहान आकाराचे 'तगर' असा लेख असलेले नाणे अलीकडे सापडले आहे.[३]

हे तगर नगर कोठे होते याचा शोध पुरातत्त्ववेत्त्यांना दीर्घ काळ लागला नव्हता. ग्रीक प्रवाशांनी केलेल्या भडोच व पैठणपासूनच्या दिशांच्या अंतराच्या उल्लेखांवरून ते देवगिरि (दौलताबाद), जुन्नर, बीड जिल्ह्यातील दारूर, कनकगिरीपासून बारा मैलांवर असलेले तवंगीर, आणि करवीर (कोल्हापूर) असावे असे विविध तर्क संशोधकांनी केले होते. शेवटी डॉ. फ्लीटने ते सध्याच्या ओस्मानाबाद जिल्ह्यातील तेर असावे हे

---

१. R. C. Majumdar, *Classical Accounts of India*, p. 376.

२. *Ibid.*, p. 304.

३. या नाण्याचे वाचन मी पूर्वी 'रजञ' (राजन्य) असे केले होते पण ते 'तगर' असे आता सिद्ध झाले आहे.

सिद्ध केले.[१] ते आता सर्वमान्य झाले आहे. तेर हे धाराशिवजवळ असून तेथे प्राचीन काळच्या बौद्ध व हिंदू देवळांचे अवशेष अद्यापि दृष्टीस पडतात. अलीकडे श्री. बी. एन्. चापेकर यांनी केलेल्या उत्खननात तेथे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकापर्यंतची सातवाहनकालीन खापरे, नाणी, भाजक्या मृण्मय मूर्ति वगैरे अवशेष सापडले आहेत. शिवाय तेथे संस्कृत, कानडी व मराठी भाषांतील ख्रिस्तोत्तर अकरा ते चौदा शतकांतील कोरीव लेखही मिळाले आहेत.[२] या सर्व पुराव्यावरून सध्याचे तेर हेच प्राचीन काळचे तगर होय याविषयी संशय राहत नाही. संस्कृतातील 'नगर'चे अपभ्रष्ट रूप 'नेर' होते (उदाहरणार्थ 'पिप्पलनगर'चे 'पिंपळनेर', 'संगमनगर'चे 'संगमनेर' पाहा). तसेच तगरचे तर झालेले दिसते. शिवाय जैन अपभ्रंश व संस्कृत ग्रंथांत त्याचे नाव तेरपुर[३] किंवा तेरापुर[४] असे येते हे पुढे दाखविले आहे. तेव्हा तगर हे तेर होय यात संशय नाही.

तेर हे धाराशिवच्या ईशान्येस बारा मैलांवर आहे. त्याच्याजवळच्या या लेण्यांचा इतिहास आणि वर्णन जैन ग्रंथांत आले आहे. सन १९२४ मध्ये डॉ. हीरालाल जैन यांना विदर्भातील कारंजा गावच्या जैनग्रंथ-भांडरात कनकामर कवीच्या 'करकंडचरिउ' (कर्कंडचरित) या अपभ्रंश भाषेतील ग्रंथाची एक प्रत आढळली. नंतर त्यांनी तो ग्रंथ कारंजा–जैन–ग्रंथमालेत प्रसिद्ध केला. त्या ग्रंथाचा काल ख्रिस्तोत्तर अकरावे शतक असा त्यांनी ठरवला आहे. या ग्रंथात कर्कंड राजाची पुढील कथा आली आहे.[४]

---

१. *J. R. A. S. (1901)*, pp. 539 f.

२. B. N. Chapekar, *Report of the Excavations at Ter.*

३. हरिषेणकृत बृहत्कथाकोष (सं. आ. ने. उपाध्ये) पृ. ९८; *Annals of the Bhandarkar Oriental Research Institute, (A. B. O. R. I.)*, Vol. XVI, p. 8.

४. करकंडचरिउ (सं. हीरालाल जैन), पृ. ३५–५०.

" कर्कण्ड हा उत्तर भारतातील अंग देशाचा राजा. त्याची राजधानी चंपा (सध्याचे भागलपूर) येथे होती. त्याचे राज्य भारतभर पसरले होते, पण दक्षिणचे चोल, चेर आणि पांड्य देशांचे राजे मात्र त्याचे स्वामित्व मान्य करीत नव्हते. तेव्हा त्यांना जिंकण्याकरिता मोठे सैन्य घेऊन तो त्यांच्या देशावर स्वारी करण्यास निघाला वाटेत त्याचा मुक्काम तेरापुर येथे पडला. तेथील शिव नामक राजाने त्याला जवळच्या पर्वतावरील लेण्यांसंबंधी माहिती दिली. तेव्हा तो ती लेणी पाहण्यास गेला. त्यांत त्याला पार्श्वनाथाची मूर्ति दिसली. तसेच त्या टेकडीवरील वारुळात दबलेली आणखी एक पार्श्वनाथाची मूर्ति त्याला आढळली. तीही त्याने आणून त्या लेण्यात बसविली. नंतर त्या लेण्यातील पार्श्वनाथ जिनाच्या सिंहासनावर त्याला एक ग्रंथि आढळली. ती तेथे योग्य दिसत नाही, असे वाटून त्याने एका शिल्पीला बोलावून ती ग्रंथि तोडून टाकण्यास सांगितले. तेव्हा तो शिल्पी म्हणाला, 'महाराज, या ग्रंथीच्या आत पाण्याचा मोठा झरा आहे. ती तोडून टाकल्यास पाण्याचा मोठा प्रवाह धो धो वाहत येऊन या लेण्याला धोका पोचेल.' पण राजाने त्याचे न ऐकता ती ग्रंथि तोडून टाकण्याची त्याला पुन: आज्ञा केली. पण तसे करताच पाण्याचा ओघ जोराने बाहेर पडून त्याने ते लेणे खराब झाले. त्यामुळे राजाला फार वाईट वाटले.[१] पण तितक्यात एका नागकुमाराने आकाशातून तेथे येऊन त्याचे सांत्वन केले. हे लेणे कोणी कोरविले असे राजाने विचारले तेव्हा त्याने त्याला पुढील माहिती दिली, 'दक्षिण वेद्यर्धामध्ये (म्हणजे कैलासच्या दक्षिण दिशेस) नील आणि महानील असे दोन विद्याधर भाऊ राज्य करीत होते. शत्रूंनी त्यांचा पाडाव केल्यामुळे ते दक्षिणेत तेरापुर येथे पळून आले आणि तेथे त्यांनी आपले राज्य स्थापिले. तेथे त्यांना एका मुनीने जैन धर्माची दीक्षा दिली. नंतर त्यांनी हे लेणे कोरवून त्यात पार्श्वनाथाची मूर्ति स्थापिली.' टेकडीवरील वारुळातील मूर्तीविषयी

---

१. पार्श्वनाथाच्या सिंहासनावरील ग्रंथीची कथा फक्त 'बृहत्कथाकोषा'त आढळते असे ढवळीकर म्हणतात. त्यांनी 'करकंडचरिउ'मधील हे वर्णन पाहिले नसावे.

कर्कण्डाला असे समजले की दुसऱ्या दोन विद्याधरांनी ती केरळ प्रदेशातील पूदी टेकडीवरून आणली होती आणि ती तेथेच सोडून ते निघून गेले होते.

नंतर कर्कण्डाने स्वतः त्या पर्वतात आणखी दोन लेणी कोरविली. पुढे त्याने सिंहलद्वीपावर स्वारी केली आणि परत येताना चोल, चेर आणि पांड्य या देशांना जिंकून तो स्वदेशी चालता झाला."

'करकण्डचरिउ' या अपभ्रंश काव्याचा कर्ता कनकामर हा कर्ण राजाच्या मंत्र्याच्या आश्रयास होता. हा कर्ण कलचुरिवंशी सुप्रसिद्ध कर्णराजा असल्यास कनकामराचा काल ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकाचा मध्य असा होईल.[१] कर्कण्डाचे नाव 'प्रत्येकबुद्ध' म्हणून बौद्ध व जैन परंपरांत आढळते. त्याची कथा हरिषेणाच्या 'बृहत्कथाकोशात' संस्कृतमध्ये वर्णिली आहे.[२] ती बहुतांशी वरील सारखीच आहे. क्वचित् तपशीलात फरक आहे. त्यात म्हटले आहे की टेकडीवरची पार्श्वनाथाची मूर्ति एका खेटाने (विद्याधराने) लंकेहून आणली होती. उत्तरेकडे जाताना त्याने तेरपुरातील ते लेणे पाहिले. तेव्हा तो पर्वतावर उतरला आणि आपण आणलेली पार्श्वनाथाची सुवर्णरत्नजडित मूर्ति तेथील वारुळावर ठेवून तो खालच्या बाजूला असलेले लेणे पाहावयास गेला. परत आल्यावर पाहतो तो ती मूर्ति तेथून हलेना. तेव्हा तो तिला तेथेच सोडून स्वधामास चालता झाला. दुसरा फरक असा की कर्कण्डाने तेरपुर येथे दोन नव्हे तर तीन लेणी कोरविली. त्यांपैकी एक स्वतःच्या नावे, दुसरे आपल्या राणीच्या नावे व तिसरे आपल्या पुत्राच्या नावे त्याने कोरविले होते.

वरील दोन ग्रंथांतील कर्कण्डाच्या कथानकात थोडासा फरक असला तरी साम्य पुष्कळच आहे. 'बृहत्कथाकोश' वर्धमानपुर येथे शकसंवत् ८५३, विक्रमसंवत् ९८९ (इ. स. ९३१–३२) मध्ये रचला होता.[३] अर्थातच तो संस्कृत ग्रंथ अपभ्रंश भाषेतील 'करकण्डचरउ' पेक्षा

१. *C. I. I.*, Vol. IV, Introd. p. cii.

२. बृहत्कथाकोष, पृ. ९८.

३. *Ibid.*, Introd., p. 122.

प्राचीन आहे. त्यातील तेरनगराचा उल्लेख वाङमयात आलेला सर्वात प्राचीन होय.

वरील दोन्ही ग्रंथांत उल्लेखिलेली लेणी धाराशिव येथीलच होत यात संशय नाही. धाराशिव येथे सध्या सहा लेणी दिसतात. त्यांपैकी चार एका बाजूस आणि दोन त्याच्या विरुद्ध बाजूस टेकडीत खोदली आहेत त्यांपैकी क्रमांक २ चे लेणे महत्त्वाचे, पण सध्या बरेचसे जीर्णावस्थेत आहे. त्याची रचना अजंटा येथील वाकाटककालीन क्र. १६ व १८ या लेण्यांसारखी आहे. समोरचा व्हरांडा ७८ फूट लांब आणि १० फूट ४ इंच रुंद होता. त्याचे छप्पर आता नष्ट झाले आहे. तथापि अवशिष्ट असलेल्या अर्धस्तंभांवरून ते चौकोनी खांबांवर आधारले होते आणि त्यांच्या ब्रॅकेट्स्वर व वरील पट्टीवर उत्कृष्ट खोदकाम केले होते, असे दिसते. त्यांत जैन तीर्थंकरांच्या मूर्ति व चैत्य गवाक्षे कोरली आहेत. आतील हॉल ८२ फूट लांब व ७९ ते ८५ फूट रुंद असून त्यांत ३२ खांब आहेत. त्यांपैकी २० खांबांनी बाहेरचा आणि १२ खांबांनी आतील चौक झाला आहे. गर्भगृहाच्या सयोरचे चार खांब वाटोळे असून त्यांचे शीर्षभाग चपटचा गिरद्यांच्या आकाराचे आहेत. हॉलच्या दोन्ही बाजूंच्या व मागच्या भिंतीत मुनींकरिता २२ खोल्या आहेत. पाठीमागच्या गर्भगृहात सिंहासनावर पार्श्वनाथाची मूर्ति ध्यानमुद्रेत कोरली असून त्याच्या डोक्यावर सात फणांचा नाग आहे. प्रत्येक फणेवर लहानसा किरीट आहे. सिंहासनाच्या पुढील भागावर सध्या भग्न झालेले कडेवर उभे असलेले चक्र आणि त्याच्या दोन्ही बाजूस दोन दोन हरिण कोरले आहेत. सिंहासनाच्या दोन्ही बाजूस एक एक शार्दूल, चामरधारी सेवक आणि मालाधारी विद्याधर दिसतात.[१]

या लेण्याजवळ क्रमांक ३ चे लेणे यासारखेच, परंतु जरा लहान आकाराचे आहे. त्याच्या व्हरांडचाच्या शीर्षपट्टीवर चैत्यगवाक्षे कोरून तिला शोभिवंत केले आहे. आतील गर्भगृहात क्रमांक २च्या लेण्यातल्याप्रमाणे मूर्ति आहे. तिच्या सिंहासनाच्या खालील पट्टीवर क्र. २ प्रमाणे चक्र

१. *A. S. W. I.*, Vol III, plate III. प्रतिमा क्र. १ व क्र. २ पाहा.

कोरलेले स्पष्ट दिसते. बाजूला हरिण होते किंवा नव्हते हे आता सांगता येत नाही. याशिवाय आणखी चार लेणी त्या टेकडीत कोरली आहेत. पण प्रस्तुत विवेचनाला त्यांच्या वर्णनाची आवश्यकता नाही.

धाराशिवची लेणी 'करकण्डचरिउ' या अपभ्रंश आणि 'बृहत्कथा-कोष' या संस्कृत ग्रंथात जैन धर्माची म्हणून वर्णिली आहेत. जेम्स बर्जेस याने त्यांचे सविस्तर वर्णन आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया, व्हॉ. ३, पृ. ४–११, आणि केव्ह टेंपल्स ऑफ इंडिया, पृ. ५०३–५०५ वर केले आहे. त्याच्याही मते ती जैनधर्माची होत. पण अलीकडे डॉ. म. के. ढवळीकर यांनी ती बौद्ध धर्माची होती असे प्रतिपादिले आहे. आपल्या मताच्या सिद्धयर्थं त्यांनी पुढील प्रमाणे दिली आहेत,[१]—

(१) क्र. २ व क्र. ३च्या लेण्यांचे अजंटाच्या महान् (वाकाटक-कालीन) बौद्ध लेण्यांशी साम्य आहे. याउलट वेरूळच्या जैन लेण्यांत आणि या लेण्यांत बराच फरक आहे.

(२) ही लेणी सहाव्या–सातव्या शतकांतील आहेत. त्या शतकांत उत्तर महाराष्ट्रात बौद्ध धर्म प्रामुख्याने नांदत होता. ९–१० व्या शतकात, विशेषत: शिलाहारांचा राजाश्रय मिळाल्यावर, महाराष्ट्रात जैन धर्माचा प्रसार झाला.

(३) कर्कण्ड राजाने क्र. २च्या लेण्यात दुसऱ्या जैन मूर्तीची स्थापना केली असे म्हटले आहे. वास्तविक त्या लेण्यात अगोदरच जैन मूर्ति असताना दुसऱ्या मूर्तीची स्थापना करण्याचे कारण नव्हते.[२] तेव्हा त्या लेण्यातील मूर्तीची पूजा केल्यावर ती बुद्धाची मूर्ति आहे असे कर्कण्डाच्या ध्यानात आले असावे. त्याने वास्तविक दुसरी मूर्ति बसविली नसून त्या मूर्तीच्या सिंहासनावरील धर्मचक्र नाहीसे केले असावे. पूर्वोक्त दोन्ही

---

१. वार्षिक १९६५, पृ, १४१ इ.; वार्षिक १९६८, पृ. १२४ इ.

२. वास्तविक त्या लेण्यातील गर्भगृहाजवळच्या खोलीत उभी ६ फू. १ इं. उंचीची दुसरीही जिनमूर्ति आहे. ती मूर्ती टेकडीवरून आणली असावी. *A. S. W. I*, Vol XIII, p. 6; Plate II, cell I पाहा. प्रतिमा क्र. १ पहा.

जैन ग्रंथांत मूर्तीच्या सिंहासनावरील ग्रन्थि कर्कण्डाने फोडावयाला लावली असे म्हटले आहे, ती ग्रंथि म्हणजे हे धर्मचक्रच होय. जवळच्या नं. ३च्या लेण्यात मूर्तींच्या सिंहासनावर धर्मचक्र अद्यापि स्पष्ट दिसते तेव्हा या दोन्ही मूर्ती बुद्धाच्या होत.

(४) या लेण्यातील मूर्तीच्या डोक्यावर सात फणांचा नाग आहे. म्हणून ती पार्श्वनाथ या तीर्थंकराची असावी असे वाटण्याचा संभव आहे. पण बुद्धाच्या डोक्यावरही असा नाग दाखविला जात असे. नागार्जुनकोंड येथे अशा अनेक मूर्ति सापडल्या आहेत.[१]

(५) लेण्याच्या समोर खोदकाम करून तयार केलेला प्राकार आणि व्हरांडयाच्या खांबांच्या पट्टीवरील जैनमूर्ति या मात्र कर्कण्डाने खोदविल्या असाव्या. शिवाय त्याने खोदविलेली लेणी क्र. ५ व क्र. ६ ही असावी. तेव्हा धाराशिवची क्र. १–४ ही लेणी प्रथम खोदली तेव्हा बौद्धधर्मीय होती. नंतर ९–१० शतकांत त्यांचे जैनधर्मीय लेण्यांत रूपान्तर करण्यात आले असावे. असा निर्णय डॉ. ढवळीकर यांनी केला आहे. सत्यान्वेषणार्थ त्यांच्या प्रमाणांचे क्रमाने परीक्षण करू.

प्रमाण १—धाराशिवच्या लेण्यांचे अजंटा येथील वाकाटककालीन महायानपंथी लेण्यांशी समोरचा व्हरांडा, त्यामागील हॉल, बाजूच्या मुनींच्या करिता लहान लहान खोल्या, हॉलच्या मागे गर्भगृह, त्यातील सिंहासनाधिष्ठित मूर्ति या बाबतीत साम्य दिसते. पण त्यावरून धाराशिव लेणी बौद्धधर्मीय असावी हे अनुमान बरोबर वाटत नाही. वरील साम्यावरून ती दोन्ही लेणी एकाच काळात कोरली गेली, एवढेच अनुमान करणे सयुक्तिक होईल ती एकाच धर्माची होती असे म्हणणे, इतर पुराव्याच्या अभावी, बरोबर होणार नाही. भिन्नधर्मीय राजांनी किंवा संपन्न गृहस्थांनी एकाच प्रदेशात किंवा काळात त्याच शिल्प्यांना आपापल्या धर्माच्या कलाकृतींच्या निर्माणार्थ नियुक्त केल्यामुळे हे साम्य आले आहे डॉ. यू. पी. शहा यांनी दाखविल्याप्रमाणे मथुरा येथे सापडलेल्या

१. A. H. Longhurst : *The Buddhist Antiguities of Nāgārjunakoṇḍa*, plate XXIII (b) and plate XXXI (c).

कुशाणकालीन बौद्ध, जैन व हिंदू कलाकृतींमध्ये साम्य दिसते याचे कारण हेच होय.[१]

क्र. २ च्या लेण्याच्या व्हरांडयाच्या खांबावरील अवशिष्ट शीर्ष-पट्टीवर जैनमूर्ति आढळतात हे बर्जेसने दाखविले आहे व ते ढवळीकरांनाही मान्य आहे. ती पट्टी मूळ लेण्याच्या निर्मितीनंतर तीन चार शतकांनी खोदली गेली, याला प्रमाण नाही. ती त्या लेण्याच्या काळीच खोदली गेली असली पाहिजे.

प्रमाण २—धाराशिव लेण्यांच्या काळी (ख्रिस्तोत्तर सहाव्या-सातव्या शतकांत) उत्तर महाराष्ट्रात जैन धर्माचा प्रसार नव्हता हे प्रमाण येथे गैरलागू आहे. कारण तगर हे त्या काळी महाराष्ट्रात अंतर्भूत होत नसून कर्नाटकात मोडत होते. तेर सध्या मराठी मुलखात मोडत असले तरी त्याची त्या काळी भाषा कानडी होती. तेथून राष्ट्रकूट काळाच्या आरंभी त्या सम्राटांच्या कृपेने कोकणात जाऊन राज्य करणाऱ्या शिलाहार राजांनी धारण केलेली अनेक बिरुदे—उदाहरणार्थ, मलगलगंड (पर्वतेशांमध्ये वीरपुरुष,), गण्डरगण्ड (वीरपुरुषांमध्ये श्रेष्ठ), गण्डवङ्गर (वीरपुरुषांमध्ये सोन्यासारखा), नन्निसमुद्र (सत्याचा समुद्र) विल्लविडेङ्ग (धनुर्धारित्वात कुशल), पुसिगंजुवात (मिथ्याभाषणभीरु) इत्यादि कन्नड भाषेतील आहेत.[२] पुढे उत्तर कोकणातील मराठी भाषेच्या प्रभावाने त्यांनी असली बिरुदे धारण करण्याचे सोडून दिले, तरी कोल्हापूरच्या शिलाहार राजांनी ती शेवटपर्यंत धारण केली होती, असे त्यांच्या कोरीव लेखांवरून दिसते. त्यांचे कोल्हापुरातील व त्याच्या परिसरातील काही लेख कन्नड भाषेत आहेत. तेव्हा तगर येथे त्यांची भाषा कन्नडच असली पाहिजे. त्या प्रदेशात त्या काळी जैन धर्माचा प्रसार होता किंवा नाही हे ठरवण्यास उत्तर महाराष्ट्राचा इतिहास उपयोगी पडणार नाही. दुर्दैवाने तगरजवळच्या प्रदेशाचे सहाव्या-सातव्या शतकांतील कोरीव लेख अद्यापि सापडले नाहीत. तरी एकंदरीत त्या काळी कानडी मुलखात जैन धर्माचा प्रसार बराच होता, यात संशय नाही. त्या

१. U. P. Shah : *Studies in Jain Art*, p. 1.
२. संशोधनमुक्तावलि : सर ५, पृ. १८३.

प्रदेशातील कदंब, पूर्वकालीन चालुक्य इत्यादि राजांचा त्या धर्माला आश्रय होता. तेरच्या दक्षिणेस सरळ रेषेत सुमारे दीडशे मैलांवरच्या वातापि (सध्याच्या बदामी) येथे ख्रिस्तोत्तर सातव्या शतकाच्या पूर्वार्धात राज्य करणाऱ्या चालुक्यवंशी द्वितीय पुलकेशीने ऐहोळे येथे जिनालय बांधणाऱ्या रविकीर्ति कवीला दिलेला आश्रय सुप्रसिद्ध आहे. तेव्हा तगर येथे सहाव्या सातव्या शतकात जैन धर्माचा प्रसार असणे असंभवनीय नाही. जैन परंपरेंनुसार नील व महानील या विद्याधरांनी जैन धर्म स्वीकारला होता व नंतर त्यांनी ही लेणी तगरजवळ खोदविली अशी कथा आहे. या प्रकरणात लक्षणीय गोष्टी ही की तगरपुरचे शिलाहार राजे स्वत:ला विद्याधरवंशी जीमूतवाहनाचे वंशज म्हणवत असत. ते स्वत: त्या काळी जैनधर्मी होते काय हे माहीत नाही. तथापि त्यांच्या उदार आश्रयाने ही लेणी कोरविली असल्यास कालांतराने विद्याधराशी त्यांचा संबंध जोडला जाणे संभवनीय आहे.

प्रमाण ३—क्रमांक २ च्या लेण्यातील मूर्ति बुद्धाची होती याचे प्रमाण म्हणून तिच्या सिंहासनावरच्या धर्मचक्राचा उल्लेख ढवळीकरांनी केला आहे. तिची पूजा जिनमूर्ति म्हणून केल्यावर ती बुद्धाची आहे असे कर्कण्ड राजाच्या लक्षात आले; म्हणून एका शिल्पीकडून ते तोडून टाकवून त्याने त्या बौद्ध मूर्तीचे जैन तीर्थकराच्या मूर्तीत परिवर्तन केले असे ढवळीकर म्हणतात. पूर्वोक्त दोन्ही जैन ग्रंथांत उल्लेखिलेली सिंहासनावरील ग्रंथि हे धर्मचक्रच होय असे ते सांगतात. तसेच जवळच्या क्र. ३ च्या लेण्यातील मूर्तीच्या सिंहासनावर धर्मचक्र आहे, त्यावरून ती मूर्तीही बुद्धाचीच होय असे ते प्रतिपादितात. तेव्हा ढवळीकर धर्मचक्र हे बुद्ध मूर्तीचे व्यवच्छेदक लक्षण मानतात, असे दिसते. या प्रमाणाचा थोडा विस्ताराने विचार करू.

गौतम बुद्धाने सारनाथ येथील मृगवनात आपल्या धर्माचा प्रथम उपदेश केला. त्याला ‘धर्मचक्रपरिवर्तन’ अशी संज्ञा आहे. तो प्रसंग बुद्धाच्या सिंहासनावर दोन बाजूंस एक एक हरिण आणि मध्ये चक्र दाखवून सूचित केला जातो. हे चिन्ह त्या प्रसंगाचे अत्यंत सूचक आहे यात संशय नाही. पण पुढे त्याच्या अनुकरणाने जैनधर्मीही प्रथम-प्रथम

तीर्थंकरांच्या सिंहासनावर तसेच हरिणयुक्त धर्मचक्र दाखवू लागले, असे दिसते. जैनधर्मीही चक्राला पूज्य मानतात. त्याच्या विषयी हरिभद्राच्या 'आवश्यकसूत्रा'त पुढील कथा सांगितली आहे.[१] एकदा ऋषभनाथ तीर्थंकर तक्षशिलेला एका दिवशी सायंकाळानंतर पोचले. तेथील राजा बाहुबली याला ती वार्ता समजताच त्याने दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचे दर्शन घेण्याचा संकल्प केला. पण त्यापूर्वीच ऋषभनाथ तेथून निघून गेले होते. तेव्हा राजाला फार वाईट वाटून त्याने ते उतरले होते त्या ठिकाणी एक चक्र उभारून त्याची पूजा केली. तेव्हापासून जैन धर्मात चक्रचिह्नाची पूजा प्रचलित झाली. अशा एका यष्टीवर लावलेले ब्राँझ धातूचे धर्मचक्र पाटणा म्यूझियममध्ये अद्यापि ठेवले आहे.[२]

जैनांचे चोवीस तीर्थंकर होऊन गेले. सर्वांच्या प्रतिमा सारख्याच असतात. पण त्यांच्या सिंहासनावर किंवा पादपीठावर त्यांची लांछने कोरून त्यांची नावे सुचविली जातात. प्राचीनकाळी–शक–कुषाण काळी–ही प्रथा प्रचलित नव्हती. तीर्थंकरांची नावे पादपीठावर कोरली जात. पण पुढे गुप्त काळात लांछनाच्या योगे तीर्थंकराचे नाव सूचित करण्याचा प्रघात पडला.[३] ही लांछने भिन्न भिन्न आहेत.[४] उदाहरणार्थ आदिनाथाचे लांछन

---

१. U. P. Shah : *Studies in Jain Art*, p. 10, n. 1.

२. *Ibid.*, Plate VI, Fig 15.

३. "Recognising symbols (*Lāñchanas*) of the various Tīrthaṅkaras were not evolved (in the Kushāṇa period) and the pedestals of Jain figures contained devotional scenes of the *dharmachakra* usually placed with its rim to the front on a pillar." U. P. Shah, *Studies in Jain Art*, p. 11.

अलीकडे विदिशा येथे सापडलेल्या गुप्तनृपति राम-गुप्ताच्या काळच्या चंद्रप्रभ व पुष्पदन्त यांच्या सिंहासनावरही फक्त चक्र आहे, लांछन नाही. *Journal of tne Oriental Institute*, Vol. XVIII, pp. 247 f.

४. *History and Culture of the Indian People* (*H.C.I.P.*), Vol. II, p. 427 वर त्यांची यादी दिली आहे ती पाहा.

वृषभ, शांतिनाथाचे हरिण, नेमिनाथाचे शंख, पार्श्वनाथाचे नाग आणि महावीराचे सिंह, अशी लांछने होती. आरंभी हे लांछन धर्मचक्राच्या दोन बाजूंस दाखविले जात असे. राजगीर येथील नेमिनाथाच्या सिंहासनावर मध्यभागी धर्मचक्र, त्याच्या पुढे चक्रपुरुष आणि दोन बाजूंस एक एक शंख दाखवून त्याचे नाव सूचित केले आहे.[१] त्याचप्रमाणे अलीकडे उत्तर गुजराथेतील खंडब्रह्म येथे सापडलेल्या जैन मूर्तीच्या सिंहासनावर मध्ये चक्र आणि त्याच्या दोन्ही बाजूंस एक एक हरिण (बौद्ध मूर्तीच्या सिंहासनावरील धर्मचक्राच्या चिन्हाप्रमाणे) कोरून ती मूर्ति शांतिनाथाची होय हे दाखविले आहे.[२] याच तऱ्हेची शांतिनाथाची मूर्ति फैझाबाद म्यूझियममध्ये आहे. तिच्या सिंहासनावरही मध्ये चक्र आणि दोन्ही बाजूंस एक एक हरिण कोरले आहे.[३]

तेव्हा सिंहासनावरील हरिणयुक्त चक्रावरून ती मूर्ति बुद्धाची, असे निश्चितपणे सांगता येत नाही. काही मूर्तींच्या सिंहासनावर हरिणयुक्त चक्र असून त्याशिवाय त्या त्या तीर्थंकराचे विशिष्ट लांछन कोरलेले असते.[४] वेरूळ येथे जैन लेणी ज्या टेकडीत कोरली आहेत तिच्या वरील भागी पार्श्वनाथाची १६ फूट उंचीची भव्य मूर्ति आहे. तिच्या सिंहासनावर कडेवर (edge-wise) उभे केलेले चक्र असून डोकीवर फणा पसरलेला नाग आहे.[५] तेव्हा हरिणसहित किंवा हरिणविरहित चक्र हे बौद्ध मूर्तीचे अनन्यसाधारण वैशिष्टय नसून ते चिह्न जैन मूर्तीवरही

---

१. *Studies in Jain Art*, Plate VIII.

२. *Journal of the Oriental Institute* (*J. O. I.*), Vol. X, p. 63.

३. *H. C. I. P.*, Vol. IV, p. 297.

४. धर्मचक्राच्या दोन बाजूंस तीर्थंकराचे लांछन दाखविण्याची ही पद्धत ९–१० शतकात लुप्त झाली. यापुढे तीर्थंकराच्या मांडीखाली पादपीठावरच लांछन कोरण्यात येऊ लागले. *J. O. I.*, Vol X, p. 63 पाहा.

५. *H. C. I. P.*, Vol IV, p. 297.

आढळते हे दिसून येईल.[१] 'मग ही क्रमांक २ च्या लेण्यातील मूर्ति कोणाची ?' असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर ती पार्श्वनाथाची हे त्या मूर्तीच्या शिरावरील फणा पसरलेल्या नागावरून मिळते.

प्रमाण ४– 'गौतम मूर्तीवरही फणा पसरलेला नाग आढळतो, तेव्हा त्या फणामुळे ही मूर्ति पार्श्वनाथाचीच असे म्हणता येत नाही. ती बुद्धाचीच असावी' असे म्हणून ढवळीकर नागार्जुनकोंड येथील तशा मूर्तीकडे आपले लक्ष वेधतात. तेव्हा त्याचा विचार केला पाहिजे.

शांतिनाथ तीर्थंकराच्या डोकीवर जसा फणा पसरलेला नाग आढळतो, तसा बुद्धाच्या **सर्व** मूर्तींवर आढळत नाही. विशिष्ट कथेच्या अनुषंगात मात्र तो आढळतो. ती कथा अशी—गयेस ज्ञानप्राप्ति झाल्यानंतर गौतमाने पाच आठवडे घालविले. नंतर तो जवळच्या तळ्यातील मुचलिंद नागाकडे गेला. त्यावेळी पाऊस पडू लागला. म्हणून मुचलिंदाने आपल्या फणा त्याच्या डोक्यावर उभारून त्याचे पावसापासून रक्षण केले. ही कथा बौद्ध स्तूपांच्या कठड्यावर अनेक ठिकाणी आकृतींनी दाखविली आहे.[२] तीन वर्षांपूर्वी भंडाऱ्यास स्तूपाचे अवशेष सापडले होते, त्यांमध्ये मुचलिंदाची आकृति डोकीवरच्या नागफणांनी दाखविलेली आढळली

---

१. ९–१० शतकानंतर ही पद्धत बंद झाली

२. Longhurst – *Buddhist Antiquities of Nāgārjunakoṇḍa*. यामध्ये Plate XXIII (b) and Plate XXX (c) मध्ये मुचलिंदकथेतील देखावे कोरले आहेत. तेथेच बुद्धाच्या डोकीवर नागफणा आहे. इतर अनेक प्लेटस्‌मध्ये बुद्धाची प्रतिमा कोरली आहे, पण त्यांमध्ये कोठेही तिच्यावर नागफणा दिसत नाही. दुसरी गोष्ट ही की पार्श्वनाथाच्या डोकीवर केवळ नागफणा दाखविली असते. पण मुचलिंद कथेतील बुद्ध नागाच्या वेटाळ्याच्या आसनावर बसला असून त्याची फणा बुद्धाच्या डोक्यावर पसरलेली असते. त्याच्या जवळ बुद्धाला लवून नमस्कार करणारे नाग पुरुष दाखवून मुचलिंदकथा सूचित केली असते.

आहे.[1] नागार्जुनकोंड येथे या कथेच्या अनुषंगाने गौतम बुद्धाच्या शिरावर पसरलेल्या नागफणा दाखविल्या आहेत. तो स्वतः त्या नागाच्या वेटाळचावर बसला आहे. जवळच्या नागाच्या डोक्यावरही तशाच फणा दाखविल्या असून ते त्याला हात जोडून विनम्रपणे नमन करीत आहेत असे दाखविले आहे.[2]

प्रमाण ५— धाराशिवच्या क्र. २च्या लेण्यापुढील व्हरांडयाच्या शीर्षपट्टीवर जिनांच्या मूर्ती कोरल्या आहेत; त्यांवरूनही ते लेणे जैनधर्मीय याविषयी संशय राहत नाही. समोरचा प्राकार आणि त्या मूर्ती नंतर तीन चार शतकांनी कोरल्या याला प्रमाण नाही.

तेव्हा हे धाराशिवचे क्रमांक २चे लेणे व तेथील इतर लेणीही बौद्ध धर्माची होती, असे मानण्यास यत्किंचितही आधार नाही. ख्रिस्तोत्तर नवव्या ते अकराव्या शतकात ती जैनांचीच मानली जात होती हे हरिषेणाचा 'बृहत्कथाकोश' आणि कनकामराचे 'करकंडचरिउ' या ग्रंथांवरून स्पष्ट दिसते.

या दोन ग्रंथांतील धाराशिवच्या लेण्यांचे सर्वच वर्णन सत्य मानले पाहिजे असे नाही. त्यांत इतर काव्यग्रंथांतल्याप्रमाणे कविकल्पनेचा विलास पुष्कळच आहे यात संशय नाही. उदाहरणार्थ, क्र. २च्या लेण्यातील मूर्ति रत्नजडित होती, टेकडीवरील वारुळातील दुसरी मूर्ति सुवर्ण-रत्नजडित होती[3] हे वर्णन 'त्या लेण्याला हजार खांब होते'[4] या वर्णना-प्रमाणेच काल्पनिक आहे. तीच गोष्ट सिंहासनावरील ग्रंथीची होय. त्या लेण्यात जवळच्या टाक्यातल्याप्रमाणे पाण्याचा झरा लागला असावा. त्यावरूनही कर्कण्डने सिंहासनावरील ग्रंथि तोडल्याची, आणि त्यातून पाण्याचा स्रोत वाहत आल्याची कथा प्रचलित झाली असावी. मी स्वतः

१. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६९, पृ. १३६ समोरील प्रतिमा पाहा.

२. वर पृ. २११, टीप २ मध्ये उल्लेखिलेली XXII(b) ही प्रतिमा पाहा.

३. हरिषेण, बृहत्कथाकोष, पृ. १००, श्लो. ३९८.

४. पूर्वोक्त, पृ. ९९, श्लो. ३६१.

ही लेणी पाहिली नाहीत. तथापि बर्जेसने क्र. २च्या लेण्याच्या वर्णनात मुख्य हॉलला जोडून गर्भगृहाच्या डाव्या बाजूला असलेल्या शेवटल्या खोलीच्या जमिनीत एक लहानसे बीळ असून ते नेहेमी पाण्याने भरलेले असते असे म्हटले आहे.[१] तसेच त्याने पार्श्वनाथाची दुसरी मूर्ति असलेल्या टाक्याच्या खोलीत दोन छिद्रे असून त्यांचा जवळच्या टाक्याशी संबंध आहे असे म्हटले आहे.[२] त्यावरून ही ग्रंथी तोडल्यावर उत्पन्न झालेल्या पाण्याच्या स्रोताची कथा उत्पन्न झाली असावी.

कर्कण्डाच्या कथेतील नील आणि महानील या विद्याधरांनी उत्तरेतून येऊन तगर येथे राज्य स्थापल्याची व ही लेणी कोरविल्याची कथाही काल्पनिकच असली पाहिजे. तिचा उल्लेख प्रथम हरिषेणाच्या खिस्तोत्तर दहाव्या शतकातील 'बृहत्कथाकोषात' आढळतो. याच्या सुमारे शंभर-सवाशे वर्षांपूर्वी शिलाहार राजांनी कोकणात आपले राज्य स्थापले होते.[३] ते आपण पूर्वी तगरपुरात राज्य राज्य करीत होतो असे आपल्या 'तगरपुरपरमेश्वर' या बिरुदाने सुचवितात. तसेच ते आपले कुल विद्याधरवंशी जीमूतवाहनापासून उत्पन्न झाले असे सांगतात. त्यावरून त्या काळी कोणी विद्याधराने प्राचीन काळी धाराशिवची अत्यंत आश्चर्यकारक भव्य लेणी कोरविली होती अशी कथा प्रचलित झाली असावी. शिलाहारांचे तगर येथे राज्य करणारे पूर्वज जैनधर्मी होते काय हे काळण्यास आता साधन नाही. तथापि ही जैन लेणी ज्याने कोरविली तो जैन असला पाहिजे अशा समजुतीने नील आणि महानील या विद्याधरांनी जैन धर्म स्वीकारला होता आणि त्यानंतर त्यांनी ही लेणी कोरविली, अशी कथा प्रचलित झालेली दिसते. या संबंधात विशेष उल्लेखनीय

---

१. *A. S. W. I.*, Vol. III, p. 6. प्रतिमा क्र. १ पाहा.

२. *A. B. O. R. I.*, Vol. XVI, p. 4.

३. उत्तर कोकणातील शिलाहारांचा पहिला ज्ञात लेख शकसंवत् ७६५ (इ. स. ८४३–४४)चा असून तो त्या वंशाचा दुसरा राजा पुल्लशक्ति याच्या कारकीर्दीतील आहे. संशोधनमुक्तावलि, सर ५, पृ. १९४–१९५.

गोष्ट ही की उत्तर कोकणच्या शिलाहारांचा संयान (हल्लीचे संजान) येथे राज्य करणारा मांडलिक चामुण्डराज हाही शिलाहारांप्रमाणे स्वतःचा 'तगरपुरपरमेश्वर' असा निर्देश करतो आणि स्वतः 'त्रिभुवननील' अशी पदवी धारण करण्यात भूषण मानतो.[१] त्याचा पिता विज्जराणक याने 'आहवनील' हे बिरुद धारण केले होते. या दोन्ही बिरुदांत विद्याधर नीलाचा तगरपुराशी आणि म्हणून या लेण्याशी संबंध प्रतिबिंबित झालेला दिसतो.[२]

---

१. एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. ३२, पृ. ६६.

२. हा लेख लिहिताना डॉ. यू. पी. शहा यांच्या *Studies in Jain Art* या ग्रंथाची मोठी मदत झाली आहे.

१८. विदर्भातील प्राचीन नाणी

विदर्भातील सर्वांत प्राचीन नाणी अकोला जिल्ह्यातील मालेगाव आणि वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे सापडली आहेत. त्यांना आहत मुद्रा (punchmarked coins) असे म्हणतात. चांदी किंवा तांबे याच्या लहान तुकड्यावर टंकाने (punch ने) दोन्ही बाजूस काही आकृत्या उमटवून ही बनविली असतात. त्यांच्या पुढील बाजूवर सामान्यतः पाच चिन्हे आणि मागील बाजूवर एक किंवा अधिक चिन्हे उमटविलेली असतात. यांचा प्रचार ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकापासून ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकापर्यंत होता.

यांनंतर सातवाहनांची नाणी विदर्भात प्रचलित झाली. सातवाहन वंशाचा मूळ पुरुष सातवाहन हा अशोकानंतर लौकरच उदयास आला. त्याची नाणी औरंगाबाद जिल्ह्यात सापडली आहेत. अलीकडे अकोल्यासही त्याचे एक नाणे मिळाले आहे, पण ते अद्यापि प्रसिद्ध झालेले नाही. ही नाणी तांब्याची किंवा शिशाची असून आकाराने चौकोनी किंवा लांबट वाटोळ्या आकाराची असतात. त्यांच्या पुढील भागावर सोंड वर केलेला हत्ती असून त्याच्या पाठीवर तिकोनी निशाण आणि त्याच्यासमोर दोन वर्तुळास छेदणाऱ्या रेषेचे चिन्ह असते. मागील बाजूस एकावर एक आडव्या उभ्या ठेवलेल्या डंबेल्सची आकृती असते. तिला ' उज्जयिनी चिन्ह ' अशी नाणकशास्त्रात संज्ञा आहे. त्यावर ' रञो सिरि सादवाहनस ' (हे नाणे राजा श्रीसातवाहनाचे) असा प्राकृत भाषेत लेख असतो.[१]

सातवाहनांचे महाराष्ट्रात ख्रिस्तपूर्व सुमारे २०० पासून ख्रिस्तोत्तर २५० पर्यंत दीर्घकाल, साडेचारशे वर्षे, राज्य होते. या वंशाचे सुमारे तीस


१. Mirashi, *Studies in Indology*, Vol. III, pp. 1 f.

राजे होऊन गेले. त्यांची नावे पुराणांतील राजवंशावलींत येतात. त्यांपैकी गौतमीपुत्र सातकर्णिपासून नंतरच्या अनेक राजांची नाणी विदर्भात सापडली आहेत. सन १९३९ मध्ये अकोला जिल्ह्यातील तऱ्हाळा गावी सातवाहनांच्या पोटीन धातूच्या[1] सुमारे १६०० नाण्यांचा मोठा संचय सापडला होता. तो मी भारतीय नाणकसंस्थेच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध केला होता. त्यामध्ये गौतमीपुत्र सातकर्णि, दुसरा पुळुमावि, वासिष्ठीपुत्र सातकर्णि, स्कन्द सातकर्णि, यज्ञ सातकर्णि, विजय सातकर्णि, कुम्भ सातकर्णि, कर्ण सातकर्णि, शक सातकर्णि व तिसरा पुळुमावि अशा दहा राजांची नाणी सापडली होती. त्यांपैकी कुम्भ सातकर्णि, कर्ण सातकर्णि आणि शक सातकर्णि यांची नावे पुराणांत आढळत नाहीत. ती प्रथमच या संचयावरून माहीत झाली. यांच्यापूर्वी, सन १८८८मध्ये, चांदा येथे काही सातवाहन नाणी मिळाली होती. त्यावेळी विदर्भात कोणी नाणकतज्ञ नसल्यामुळे ती वाचनार्थ कलकत्त्यास पाठविली गेली होती. तेथे होर्नल साहेबाने त्याचा अभ्यास करून त्यांवरील आपला अहवाल बंगाल एशियाटिक सोसायटीच्या १८९३ सालच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध केला होता. या नाण्यांच्या पुढील बाजूवर सोंड वर केलेला हत्ती आणि त्याच्या पाठीवर राजनाम आणि मागील बाजूवर उज्जयिनी चिन्ह असते.[2]


सुमारे ख्रिस्तोत्तर २५० मध्ये सातवाहनांचा उच्छेद होऊन वाकाटकांचे राज्य विदर्भात स्थापन झाले. विदर्भाच्या प्राचीन इतिहासाचे हे सुवर्णयुग होते. नर्मदेच्या उत्तरेस याच कालात गुप्तांचे समृद्ध राज्य प्रस्थापित झाले. या दोन्ही घराण्यांमध्ये सख्य व वैवाहिक संबंध झाले होते. दोन्ही घराण्यांचा विद्या, वाङ्मय व कला यांना उदार आश्रय होता. कांही वाकाटक राजे तर स्वतः उत्कृष्ट ग्रंथकार होते. द्वितीय प्रवरसेनाचे 'सेतुबन्ध' हे प्राकृत काव्य अद्यापि उपलब्ध आहे. सर्वसेन नामक दुसऱ्या

१. ही धातु तांबे, कथील व किंचित् लोखंड यांच्या मिश्रणाने बनविली असते.


2. Mirashi, *Studies in Indology*, Vol III, pp. 34 f.



प्रतिमा १ : शिलाहार द्वितीय केशिदेव याचा अक्षी शिलालेख (पृ. ११२)




प्रतिमा २ : धाराशिवच्या क्र. २ च्या लेण्याचे मानचित्र (पृ. २०४)




प्रतिमा ३ : धाराशिवच्या क्र. २ च्या लेण्यातील मूर्ति (पृ. २०५)



१



२



३



५



६



४



७

प्रतिमा ४ : विदर्भातील प्राचीन नाणी (पृ. २१५ – २२०)

विदर्भातील प्राचीन नाणी

क्र. १ : आहत (Punch–marked) प्रकारचे अत्यंत प्राचीन चांदीचे नाणे. पुढील बाजूस, बैल, सूर्य इत्यादि चिन्हे. मागील बाजूस, काही अस्पष्ट चिन्हे. वजन–३२ गुंजा (५० ग्रेन).
काल–खिस्तपूर्व पाचवे ते खिस्तोत्तर पहिले शतक.

क्र. २ : सातवाहन राजवंशाच्या उत्पादकाचे तांब्याचे नाणे. पुढील बाजूस, उजवीकडे सोंड उंच केलेला हत्ती, पुढे काही प्राचीन चिन्हे, हत्तीच्या पाठीवर '[रञो सिरिसादवाह[नस] ' हा प्राकृत लेख. मागील बाजूस, मध्यभागी उज्जयिनी चिन्ह, सभोवार प्राचीन चिन्हे.

क्र. ३ : क्षत्रप तृतीय रुद्रसेन याचे चांदीचे नाणे. पुढील बाजूस, राजाचा मुखवटा, कानामागे शक संवताचे वर्ष. मागील बाजूस, मध्ये टेकडी, त्या खाली नदीची आकृति; सभोवार ' स्वामिजीवदामपुत्रस राज्ञ क्षत्रपरुद्रसेनस ' असा लेख.
वजन–२७ ग्रेन.
काल–खिस्तोत्तर तृतीय शतकाचा द्वितीय पाद.

क्र. ४ : विष्णुकुंडी राजवंशाचे मिश्र धातूचे नाणे. पुढील बाजूस, उजवीकडे तोंड केलेला सिंह. मागील बाजूस, मध्ये कलश, दोन्ही बाजूंस त्रिशूल, सभोवार किरणे.

क्र. ५ : कलचुरि कृष्णराजाचे चांदीचे नाणे. पुढील बाजूस, राजाचा मुखवटा. मागील बाजूस, मध्ये नंदी, सभोवार ' मातापितृपादानुध्यातश्रीकृष्णराज ' असा लेख.
वजन–३५ ग्रेन.
काल–सुमारे खिस्तोत्तर ५५०.

क्र. ६ : देवगिरि यादवाचे सोन्याचे पद्मटंक. पुढील बाजूस, मध्ये कमळ, सभोवार शंखादि चिन्हे व राजनाम.
वजन–सुमारे ६० ग्रेन.
काल–खिस्तोत्तर तेरावे शतक.

क्र. ७ : विजयनगरच्या कृष्णदेवाचे सोन्याचे नाणे. पुढील बाजूस, शंखचक्रधारी विष्णु. मागील बाजूस, ' श्रीप्रतापकृष्णराय 'असा लेख.
वजन–सुमारे २६ ग्रेन.
काल–खिस्तोत्तर सोळाव्या शतकाचा प्रथम पाद.

वाकाटक राजाचें तसलेच 'हरिविजय' हे प्राकृत काव्य मात्र नामशेष झाले आहे. त्यातील काही उतारे व इतर काही माहिती नंतरच्या आलंकारिक ग्रंथांत आली आहे.

गुप्त राजांना आपल्या सार्वभौमत्वाचे चिन्ह म्हणून नाण्यांचे महत्त्व माहीत होते. त्यांची विविध प्रकारची सोन्याची नाणी सापडली आहेत. त्यावरून त्यांची कलाभिज्ञता, ऐश्वर्य, आणि संस्कृत भाषेविषयी प्रेम प्रत्ययास येते. गुप्तांचे आणि वाकाटकांचे सख्य आणि वैवाहिक संबंध असल्याने विदर्भात काही ठिकाणी त्यांची सोन्याची तुरळक नाणी मिळाली आहेत. पण वाकाटकांना तशी नाणी पाडण्याची बुद्धि झाली नाही असे दिसते. कारण त्याचें कोणत्याही धातूचे एकही नाणे विदर्भात किंवा इतरत्र मिळाले नाही. दैनंदिन व्यवहारात नाण्यांची फार आवश्यकता असते. वाकाटककाळी ही नाण्यांची गरज उत्तरेकडील माळवा व काठेवाड या प्रांतांवर राज्य करणाऱ्या शक क्षत्रपांच्या नाण्यांनी भागविली जात होती, असे दिसते. हे शकवंशी क्षत्रप कुशाण राजांचे प्रांताधिपति होते. त्यांना स्वतःच्या नावाने नाणी पाडण्याचा अधिकार होता. पुढे तर ते स्वतंत्र व फार प्रबळ झाले. त्यांपैकी बहुतेक सर्व राजांनी आपल्या नावाने चांदीची नाणी पाडली होती. ही आकाराने लहान व गोल असून त्यांच्या पुढील बाजूवर नाणे पाडणाऱ्या राजाचा मुखवटा आणि मागील बाजूवर मध्ये टेकडी, त्याखाली नदी दाखविणाऱ्या रेषा, टेकडीच्या बाजूस तारा आणि सभोवार कडेने राजाचे व त्याच्या पित्याचे नांव आणि 'क्षत्रप' किंवा 'महाक्षत्रप' अशी पदवी उमटविलेली असते. या नाण्यांचा एक आणखी महत्त्वाचा विशेष हा की त्यांच्या पुढील बाजूवर राजाच्या मुखवटाच्या कानामागे ते नाणे ज्या शकसंवत्सरात पाडले होते ते संवत्सर अंकदर्शक चिन्हांनी दाखविलेले असते. मुख्यतः या नाण्यांवरूनच शक क्षत्रपांचा इतिहास ज्ञात झाला आहे. कारण त्यांचे कोरीव लेख फारच थोडे मिळाले आहेत. पण त्यांच्या नाण्यांवरून त्यांची वंशावळ, प्रभाव व काल निश्चित करता आले आहेत.

क्षत्रपांची ही नाणी विदर्भात वाकाटककाळी सर्रास प्रचलित होती असे दिसते. कारण ती अनेक ठिकाणी—छिंदवाडा जिल्ह्यातील सोनपूर,

शिवनी जिल्ह्यातील केवलारी आणि शिवनी, अकोला जिल्ह्यातील वाशीम व कारंजा, अमरावती जिल्ह्यातील कुंडिनपुर वगैरे ठिकाणी सापडली आहेत. आणि ती द्वितीय रुद्रसेन, विजयसेन, तृतीय दामजदश्री, भर्तृदामन्, विश्वसेन, द्वितीय रुद्रसिंह, द्वितीय यशोदामन्, तृतीय रुद्रसेन अशा अनेक राजांची आहेत.[१] त्या सर्वांचा साचा मागे वर्णिलेला एकच प्रकारचा आहे. तेव्हा वाकाटकांनी स्वतः नाणी पाडली नसल्याने क्षत्रपांच्या नाण्यांच्या योगाने तत्कालीन व्यवहार होत होता असे दिसते.

ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकाच्या आरंभी वाकाटकांचा अस्त झाला. नंतर काही काळ आंध्रातील विष्णुकुंडी राजवंशाचे विदर्भात राज्य झाले. त्या वंशातील बलाढ्य राजा प्रथम माधववर्मा याने वाकाटक राजकन्येशी विवाह केला होता. तेव्हा तो एक प्रकारे वाकाटक राजाचा दौहित्र म्हणून विदर्भावर अधिकार सांगत असावा. शेवटच्या वाकाटक राजाच्या कारकीर्दीतील घटना दण्डीच्या 'दशकुमारचरिता'तील विश्रुतचरितात कशा प्रतिबिंबित झाल्या आहेत हे मी तीस वर्षापूर्वी दाखविले होते.[२] आणि वाकाटकानंतर विष्णकुंडी माधववर्म्यांचे राज्य विदर्भात व पश्चिम महाराष्ट्रातही झाले असावे असे कोरीव लेखांच्या पुराव्यावरून अनुमान केले होते. ते अनुमान वर्धा जिल्ह्यातील पवनार (प्राचीन प्रवरपूर) येथील उत्खननात सापडलेल्या विष्णुकुंडींच्या नाण्यांच्या संचयावरुन सिद्ध झाले आहे.[३] त्याशिवाय विष्णुकुंडींची किरकोळ नाणी पवनार येथे व नागपूरच्या आसमंतात् सापडली आहेत. तसले एक नाणे प्रा. पु. गो. वेलणकर यांनी मला काही वर्षांपूर्वी दिले होते. ते मी भारतीय नाणकसंस्थेच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध करीत आहे. हे नाणे वाटोळे असून त्याच्या पुढील बाजूवर शेपूट वर केलेला सिंह, त्याच्या पाठीवर दोन वर्तुळे आणि मागील बाजूस बैठकीवर ठेवलेले पात्र आणि दोन्ही बाजूंस एक एक त्रिशूळ

---

१. Mirashi *Studies in Indology*, vol. IV pp. 215 f.

२. *Ibid.*, vol. I, second ed., pp. 182 f.

३. *Paunar Excavations*, p. 13.

दिसतो. या नाण्यांवर नाव नसले तरी अशी नाणी विष्णुकुंडींचा मूळप्रदेश आन्ध्र यात त्या काळातील अवशेषांत सापडली असल्याने ती विष्णु-कुंडींची मानण्यात येतात.

विष्णुकुंडींचा अंमल विदर्भात अल्पकाळ टिकला. नंतर विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर कोकण या प्रदेशावर मध्यभारतातील माहिष्मती (सध्याचे महेश्वर) येथून राज्य करणाऱ्या कलचुरींचे साम्राज्य पसरले. विदर्भावर त्यांचे सामंत राष्ट्रकूट यांचे राज्य झाले. पण त्यांना आपली नाणी पाडण्याचा अधिकार नसल्याने विदर्भात त्यांचे सम्राट् कलचुरि यांची नाणी प्रचलित झाली. पूर्वकालीन कलचुरि वंशात कृष्णराज, शंकरगण आणि बुद्धराज असे तीन राजे होऊन गेले. पण त्यांपैकी फक्त कृष्णराजाची नाणी उपलब्ध आहेत. इतरांनी नाणी पाडली नसावीत. कृष्णराजाच्या चांदीच्या नाण्यांना 'कृष्णराजरूपक' असे नाव होते. ही नाणी कृष्णराजानंतर निदान १५० वर्षे प्रचलित होती, असे कोरीव लेखांवरून दिसते. विदर्भात कृष्णराजाची नाणी अमरावती जिल्ह्यातील धामोरी येथे व बैतुल जिल्यातील पट्टन येथे मिळाली आहेत. ही नाणी क्षत्रपांच्या नाण्यांसारखी लहान आकाराची व वाटोळी असून त्यांच्या पुढील बाजूवर राजाच्या शैव पंथाचा निदर्शक नंदी आणि सभोवार 'मातापितृपादानुध्यात–परममाहेश्वर–श्रीकृष्णराज' (हे नाणे माता-पित्यांच्या पावलांचे चिंतन करणारा महेश्वराचा परमभक्त श्रीकृष्णराज याचे) असा लेख आढळतो.[१] कलचुरीनंतर विदर्भात बदामीचे पूर्वकालीन चालुक्य, नंतर राष्ट्रकूट आणि त्यानंतर कल्याणीचे उत्तरकालीन चालुक्य यांचे राज्य झाले. पण त्यांपैकी एकाचीही नाणी अद्यापि सापडली नाहीत, काही राष्ट्रकूट राजांनी हजारो सुवर्ण (सोन्याची नाणी) आणि द्रम्म (चांदीची नाणी) ब्राह्मणांना दान दिल्याचे उल्लेख त्यांच्या दानपत्रांत आढळतात. पण त्यांचे एकही नाणे अद्यापि सापडले नाही हे आश्चर्य होय.

उत्तरकालीन चालुक्यांच्या नंतर देवगिरीच्या यादवांचे राज्य विदर्भात प्रस्थापित झाले. यादवांचे काही शिलालेख बुलढाणा जिल्ह्यातील अंबडापूर

१. Mirashi, *Inscriptions of the Kalachuri-Chedi Era*, (C. I. I., vol. IV), Introduction, pp. clxxx f.

येथे आणि रामटेक येथील लक्ष्मणाच्या देवळात सापडले आहेत.[१] यादवांच्या सोन्याच्या नाण्यांना 'पद्मटंक' असे नाव होते. कारण त्यावर मध्यभागी कमळाची आकृति असते. त्यावर राजाचे नाव, त्याखाली तरवार आणि कमळाखाली शंखाची आकृति असते.[२] मागची बाजू रिकामी असते. कमळादिकांची चिन्हे टंकांनी उमटविलेली असल्याने बहुतेक नाणी लहान पेल्यासारखी खोलगट झालेली दिसतात.

याशिवाय 'गद्याणक', 'विसोवा', 'आसू' वगैरेंचे उल्लेख तत्कालीन लेखांत आढळतात. पण तशी नाणी मात्र अद्यापि सापडली नाहीत.

शेवटी, विदर्भात विजयनगरच्या अनेक हिंदू राजांची जी सोन्याची नाणी सापडली आहेत त्यांचा विचार करू. विदर्भाच्या चांदा, यवतमाळ, अकोला, अमरावती, बुलढाणा आणि खामगाव या जिल्ह्यांत ती नाणी मिळाली असून ती विजयनगरच्या अनेक हिंदु राजांची आहेत. ती आकाराने लहान असून त्यांच्या पुढील बाजूवर राजनाम आणि मागील बाजूवर एखादी विष्णु किंवा शंकरासारखी देवता, नंदी, हत्ती, गरुड, गंडभेरुंड इत्यादिकांपैकी एखाद्याची आकृति असते.[३] विजयनगरपासून इतक्या दूर विदर्भात ही नाणी कशी सापडतात ही नाणकशास्त्रज्ञांना एक समस्या उत्पन्न झाली आहे व त्यांनी विविध प्रकारे तिची उत्तरे दिली आहेत. पूर्वीच्या म्हैसूर संस्थानातील पुरातत्व खात्याचे संचालक डॉ. एम्. एच्. कृष्ण यांच्या मते यध्यप्रदेशाच्या बैतुल जिल्ह्यातील खेडला येथे राज्य करणारे गोंड राजे विजयनगरचे मांडलिक होते. त्यांनी आपल्या सम्राटांची ही नाणी आपल्या राज्यात चालू केली असावी.[४]

---

१. मिराशी, मेघदूतातील रामगिरि अर्थात् रामटेक, पृष्ठ ८६-१३०.

२. O. P. Verma, *The Yādavas and Their Times*, Plate I.

३. Brown, *Coins of India*, Plate VII, No, 11.

४. Mirashi, *Studies in Indology*, Vol. III, pp. 135 f.

पण हे स्पष्टीकरण समाधानकारक वाटत नाही. खेडला येथील गोंड राजांशी विशेषतः नरसिंगरायाने आपल्या राज्याभोवतालच्या बहामनी राजांशी व मोगल प्रांताधिपतींशी झगडून काही काळ आपले स्वातंत्र्य टिकविले होते यात संशय नाही. पण ते राजे दूरच्या विजयनगरचे मांडलिक होते याला पुरावा नाही. खेडल्याचे राज्य माळव्याच्या हुशंग-शहाने नरसिंगरायला ठार मारून सन १४३३ मध्ये आपल्या राज्यात सामील केले होते. नंतरचे त्या प्रदेशात राज्य करणारे छोटे छोटे गोंड अधिपति तर विजयनगरच्या राजांशी संपर्क साधून राहात असणे संभवनीय वाटत नाही. दक्षिणेच्या इतर बहामनी राजांप्रमाणे वऱ्हाडातील एलिच-पूरच्या इमादशाही मुसलमान राजांनी विजयनगरशी झालेल्या लढायांत केलेल्या लुटींतून ही नाणी विदर्भात आली असावीत.[१]

---

१. विदर्भातील गोंड राजांच्या नाण्यांविषयी माहिती 'संशोधन-मुक्तावलि,' सर ३, पृ. २०९–२१४ वर दिली आहे.

परिशिष्ट

डॉ. वा. वि. मिराशी यांचे संशोधनपर ग्रंथ व लेख

इंग्रजी

1. *Kālidāsa : His Date, Life and Works* (pub. by Popular Prakashan, Bombay.)*
2. *Literary* and *Historical Studies* (in press).
3. *Inscriptions of the Śilāhāras* (in preparation).

हिंदी

4. भवभूति (प्र. पॉप्युलर प्रकाशन)

इंग्रजी लेख†

223. Three Famous Temples of the Sun, *Purāṇa*, VIII, 38 f.
224. Dr. Kane on Bhavabhūti and Umbeka, *Prof. S.K. Bhuyam Commemoration Volume*, 91 f.
225. Identification of King Jaitugi, *N. U. J.*, XVII.
226. Rāmagiri of Kālidāsa, *J. I. H.*, XLII, 131 f
227. New Light on the Ancient History of Malwa, *Cama Oriental Institute Golden Jubilee Volume*, 173 f.
228. A Fragmentary Stone Inscription from Kadwāhā,‡ *E. I.*, XXXVII, 117 f.

---

* In collaboration with Prof. N. R. Navlekar.

† For a list of 222 articles, see *Dr. Mirashi Felicitation Volume* (pub. by Vidarbha Samshodhan Mandal), pp xl*x* f.

‡ In collaboration with Dr. A. M. Shastri.

229. The Author and the Date of the *Kundamālā*, *Satkāri Mookerji Felicitation Volume*, 34 f.

230. A Disputed Reading in Kālidāsa's *Meghadūta*, *Studies in Indology (S. I.)* I (second ed.), 263 f.

231. Location of the Hermitage of Vālmīki, *Ibid.*, 276 f

232. Location of the Hermitage of Agastya in the Deccan, *Ibid* , 283 f.

233. Location of the Naimisha Forest, *Ibid.*, 291 f.

234. Two Kshatrapa Coins from Vidarbha, *J. N. S. I* , XXX, 92 f.

235. A Copper-plate Grant of Kramāditya Vikrama, *Journal of Bihar Research Society*, LI, 55 f.

236. Is Vijaya mentioned in Nāgārjunakoṇḍa Inscription the name of a Cyclic Year ?, *J O. I.*, XVIII, 318 f.

237. Some Aspects of the Rāmagupta Problem, *Ibid.*, XIX. 139 f.

238 A Coin of Mahākshatrapa Rudradāman, *J. N. S. I.*, XXXI, 22 f.

239. The Identity of the Satavāhana King Śiva-Śrī Puḷumāvi, *J. N. S. I.*, XXXI, 151 f.

240. A Unique Tiny Copper Coin of Rājanya Gaṇa, *Ibid.*, XXXI, 177 f.

241. Numismatics Notes, *Ibid.*, XXXII, 65 f.

242. The Chronological Relation of the *Uttararāmacharita* and the *Kundamālā*, *A. N. Jha Felicitation Volume*, 429 f.

243. The Author and the Date of the *Kundamālā* : Some Objections Critically Examined (1970), *D. P. Mishra Volume*, 535 f.

244. Further Light on the Identification of Kālapriyanātha (to be published in *Dr. Raghavan Felicitation Volume*)

245. Identification of Vīrapāla in the Viddhaśālabhañjıkā.

246. Location of Vardhamānapura.

247. The Date of the Original *Harivaṁśa, Prof. P. B. Desai Felicitation Volume*, 425 f.

248. The *Udayasundarīkathā* of Soḍḍhala, *Prof. K. Nilakanta Sastri Felicitation Volume.*

249. Mattavāraṇi (to be published in the Jubilee Volume of the *Journal of Oriental Resarch*).

250. Fresh Light on Two New Grants of the Vishṇukuṇḍins (1970), (to be pub. in *J. I. H.*).

251. Are the Caves at Dhārāśiva Buddhist or Jaina ? (to be published in the *Jubilee Volume* of *J. I H.*).

252. A Vishṇukuṇḍin Coin from Nāgpur (to be pub. in *J. N. S. I.*).

253. A Note on Sohoni's Theory about the Original Territory of the Vākāṭakas (to be pub. in *J. I. H.*).

254. Supposed Location of Rāmagiri in the Korāpuṭ District of Orissa (to be pub. in the *Bulletin of the Ancient Indian History and Archaeology, Saugar Univ.*)

मराठी पुस्तक

भवभूति (प्र. पॉप्युलर प्रकाशन)

मराठी लेख*

१२४. मेघदूतातील एक वादग्रस्त पाठ, वि. सं. मं. वार्षिक १९६६, पृ. १ इ.

१२५. वाल्मीकि आणि अगस्त्य यांच्या आश्रमांच्या स्थानांचा शोध वि. सं. मं. वार्षिक १९६७, पृ. १ इ.

१२६. नैमिषारण्याच्या स्थानाचा शोध, वि. सं. मं. वार्षिक १९६८, पृ. १ इ.

१२७. पहिला मराठी लेख कोणता ? महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक १६६.

१२८. कालप्रियनाथाच्या स्थानाचा शोध, नवभारत, ऑगष्ट १९६८.

१२९. गुप्तकालातील एक समस्या : रामगुप्त (लेखांक पहिला) नवभारत, १९६८.

१३०. गुप्तकालातील एक समस्या : रामगुप्त (लेखांक दुसरा), पूर्वोक्त.

१३१. मूळ हरिवंशाचा काळ, नवभारत, ऑगष्ट १९७०, पृ. १ इ.

१३२. सोड्ढलाची उदयसुन्दरीकथा, वि. सं. मं. वार्षिक १९६९, पृ. १ इ.

---

* यापूर्वीच्या १२३ लेखांची यादी संशोधनमुक्तावलि, सर १ (७० लेख), सर २ (१० लेख), सर ३ (१२ लेख), सर ४ (१६ लेख) आणि सर ५ (१५ लेख) यांत दिली आहे.

१३३. कुन्दमालेचा कर्ता आणि काल, वि. सं. मं. वार्षिक १९७०, पृ. ५६ इ.

१३४. हरिश्चन्द्र गडाच्या नावाचा शोध, वि. सं. मं. वार्षिक १९७०.

१३५. उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या इतिहासावर नवीन प्रकाश, इतिहास आणि संस्कृति, वर्ष ७, पु. २५, पृ. ६५ इ.

१३६. रामदेवराव यादवाचा एक अपूर्ण ताम्रपट, इतिहास आणि संस्कृति, वर्ष ७, पु. २६, पृ. ८, इ.

१३७. माळव्याच्या प्राचीन इतिहासावर नवीन प्रकाश, इतिहास आणि संस्कृति, वर्ष ८, पु. २९, पृ. ३९ इ.

१३८. मत्तवारणी, डॉ. कोलते गौरव ग्रंथ, पृ. १३, इ.

१३९ विद्धशालभञ्जिकेतील ऐतिहासिक समस्या, नवभारत, वर्ष २४ अंक ७, पृ. १ इ.

१४०. धाराशिवची लेणी बौद्ध की जैन ? वि. सं. मं. वार्षिक १९७१, पृ. ३७ इ.

१४१. विदर्भातील प्राचीन नाणी, स्मृतिगंथ (अप्पासाहेब चितळे स्मारक ग्रंथ), पृ. २७० इ.

१४२. विष्णुकुंडींच्या इंद्रपुरदानपत्रांवर नवीन प्रकाश (ग. ह. खरे अभिनन्दनग्रंथ)

सूची

शुद्धिपत्र

(प्रस्तुत ‘सरा’तील शुद्धलेखन मराठी महामंडळाच्या नियमांप्रमाणे केले असले तरी संस्कृत तत्सम शब्दांतील अन्त्य ह्रस्व स्वर तसेच ठेवण्याचा संकल्प होता. पण यांतील लेखांच्या पूर्व मुद्रितांत ते दीर्घ केले असल्यामुळे ते येथे अनवधानामुळे क्वचित् तसेच राहिले आहेत. त्यांचा अन्तर्भाव या शुद्धिपत्रात केला नाही.)

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१६	१५	वरदा	प्रवरा
१९	३	सत्व–	सत्त्व
२०	२३	सत्व	सत्त्व
४५	१०	प्रथमदिवसे	प्रशमदिवसे
४७	२१	आषाढ	कार्त्तिक
५४	१४	पिहल्या	पहिल्या
६०	२१	कविनाननिर्देशांचा	कविनामनिर्देशांचा
६२	१८	हस्तमुख	हस्तिमुख
९२	५	वैजन्तीभि–	वैजयन्तीभि–
१८२	३	काकतीस	काकतीय
१८९	६	परित्हृत्य	परिहृत्य
१९२	शीर्षक	अर्पूण	अपूर्ण
२०५	११	महान्	महायान
२०५	२८	क्र. १	क्र. ३
२२१	२	राजांशी	राजांनी

‘संशोधनमुक्तावलि : सर ५’ वरील

काही अभिप्राय

संशोधनाचा छंद लागल्यामुळे आपापल्या विषयाच्या व्यासंगात मुरलेले काही विद्वान् महाराष्ट्रात आहेत. त्यांपैकी प्राचीन भारतीय इतिहासाच्या क्षेत्रात महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांचे स्थान अव्वल दर्जाचे आहे. उत्कीर्ण लेख, नाणकशास्त्र, संस्कृत साहित्य इत्यादि विषय महामहोपाध्यायांच्या आवडीचे आहेत. सखोल अभ्यासाची ग्वाही देणारे साडेतीनशेच्यावर लेख त्यांनी इंग्रजी व मराठीतून लिहिले आहेत. भक्कम पुराव्यावर आधारलेले त्यांचे वाकाटक आणि कलचुरि या राजवंशांचे इतिहास नावाजले गेले आहेत. त्यांची भाषांतरेही झाली आहेत....

इतिहासकाराची विधाने ‘रागद्वेषबहिष्कृत’ असावीत असे कल्हणाने पूर्वीच सांगितले आहे. भावनेच्या बाबतीत ते प्रत्येकाच्या स्वभावधर्मावर अवलंबून राहील. पण विचार मांडताना तरी हा गुण दिसला पाहिजे. वादाच्या आखाड्यात कधी चाट देताना तर केव्हा कसोटी लावताना संधी मिळेल त्याप्रमाणे संशोधनाला अत्यावश्यक अशा १०–१२ गोष्टी तरी मिराशींनी जाता जाता सांसितल्या आहेत. त्या सर्व गोष्टी हाडीमांसीं भिनल्यामुळे डॉ. मिराशींच्या विषयप्रतिपादनात एक प्रकारचा ठाशीवपणा असतो. त्यांचा पाया जसा भक्कम तशीच नजर सूक्ष्म व भेदक आहे. त्यामुळे आव्हान देणे किंवा स्वीकारणे यात ते कधी कच खात नाहीत. प्रतिपक्षाला ‘जितं मया’ असे म्हणता येऊ नये म्हणून कांही लेख त्यांनी आवर्जून लिहिले आहेत. “कालिदास आणि गुप्तकाल या दोन विषयांवर काही विद्वानांनी मिथ्या ज्ञान पसरविण्याचा प्रयत्न केला, म्हणून त्यांवर लेख लिहावे लागले. ते लिहिले नसते तर मराठी वाचकांच्या मनात अनेक समज दृढमूल झाले असते” असे त्यांनी म्हटले आहे.

मु. ग. पानसे

(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष ४१, अंक १६१.)

२

प्रस्तुत मुक्तावलीमध्ये मिराशी यांचे संशोधनाचे पूर्वप्रसिद्ध अनेक लेख कालिदास, भवभूति, गजाननपूजा, सम्राट् अशोक, राष्ट्रकूट अशा विषयांवरील एकत्र वाचावयास मिळतात आणि पूर्व संशोधनाने सिद्ध होणारा ४८ पानी शिलाहार या खास महाराष्ट्रातील मांडलिक राजवंशाचा संकलित इतिहास स्वतंत्र प्रकरणात एकत्र उपलब्ध होतो...
'डॉ. काणे आणि भवभूतिविषयक काही प्रश्न' हा निबंध म्हणजे तुल्यबल अशा विद्वदग्रणींमधील उच्च पातळीवरील झटापटीचा प्रेक्षणीय नमुना समजला पाहिजे. डॉ. मिराशी यांच्या सखोल आणि बिनतोड विद्वत्तेला नि:संदिग्ध, अर्थवाही आणि प्रसन्न भाषाशैलीची जोड मिळाल्यामुळे प्रस्तुत पुस्तक त्यांच्या इतर भारी संशोधकीय पुस्तकांप्रमाणेच वाचनीय झाले आहे.

केसरी, पुणे,
दि. २७–१२–६६

३

महाराष्ट्रातील एक नामवंत इतिहाससंशोधक आणि संस्कृत पंडित महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांच्या एकूण अठरा संशोधनपर लेखांची गुंफण 'संशोधनमुक्तावलि'च्या या पाचव्या सरात केलेली आढळून येते. संस्कृत वाङ्मय, प्राचीन भारतीय इतिहासाची शिलालेख, ताम्रपट, नाणी इत्यादि साधने व खुद्द इतिहासाची मांडणी या क्षेत्रांतील डॉ. मिराशी यांचा अधिकार फार मोठा आहे. कालिदासाविषयीचे संशोधन, वाकाटक व कलचुरि राजघराण्यांचा इतिहास व त्यांची सांस्कृतिक कामगिरी हे मिराशींच्या खास अधिकारातले विषय असले तरी त्यांच्या चौकस बुद्धीचा आणि लेखणीचा प्रभाव विस्तृत क्षेत्रावर तितक्याच यशस्वीपणे पडू शकतो याचा प्रत्यय संशोधनमुक्तावलीच्या या पाचव्या सरातील लेखांमुळे येतो.

सकाळ, पुणे, दि. १–१०–१९६७

लेखकाचे इतर संशोधनपर ग्रंथ

इंग्रजी

१. *Inscriptions of the Kalachuri-Chedi Era* (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. IV)
२. *Inscriptions of the Vākāṭakas* (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. V)
३. *Inscriptions of the Śilāhāras* (in preparation)
४. *Studies in Indology*, Vol. I.
५. *Studies in Indology*, Vol. II.
६. *Studies in Indology* Vol. III (Ancient Indian Coins).
७. *Studies in Indology*, Vol. IV.
८. *Literary and Historical Studies* (in press)
९. *Kālidāsa**

मराठी

१०. कालिदास.
११. संशोधनमुक्तावलि : सर १
१२. संशोधनमुक्तावलि : सर २.
१३. संशोधनमुक्तावलि : सर ३.
१४. संशोधनमुक्तावलि : सर ४.
१५. संशोधनमुक्तावलि : सर ५.
१६. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल.
१७. कलचुरि नृपति आणि त्यांचा काल.
१८. मेघदूतातील रामगिरि अर्थात् रामटेक.

उडिया

१९. कालिदास

हिंदी

२०. कालिदास
२१. मेघदूतमें रामगिरि अर्थात् रामटेक.
२२. कलचुरि नरेश और उनका काल.
२३. वाकाटक राजवंश का इतिहास तथा अभिलेख.
२४. भवभूति.

कन्नड

२५. कालिदास (संकलित) (मैसूर विद्यापीठ)
२६. भवभूति (संकलित) (मैसूर विद्यापीठ)

---

* In collaboration with Prof. N. R. Navalekar.